# मानवी प्रतिष्ठा

१५५९
म.ग्रं.सं. ठाणे
विषय : निबंध
सं. क्र. : ९०७०

मूळ लेखक : रसेल डब्ल्यू. डेव्हनपोर्ट

अनुवाद : शिरूभाऊ लिमये

VBS

REFBK-0010290

व्हीनस बुक स्टॉल : पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ........ दि: ........
ग्रंथांक ........ नों. दि ........

# मानवी प्रतिष्ठा

मूळ लेखक : रसेल डब्ल्यू. डेव्हनपोर्ट

अनुवाद : शिरूभाऊ लिमये


दा. क्र. १०२९०

REFBK-0010290

ग्रंथ संग्रहालय
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०


व्हीनस बुक स्टॉल : पुणें २

प्रकाशक :
सौ. सुलोचना लिमये, एम्. ए.
व्हीनस बुक स्टॉल,
अप्पा बळवंत चौक,
पुणें २.

© 1955, by Institute for Creative Research, Inc.

प्रथमावृत्ति : जुलै १९५९

**मूल्य रुपये २·५० फक्त**

मुद्रक :
चिं. ग. वझे,
साधना प्रेस,
४३०-४३१ शनवार,
पुणें २.

# मानवी प्रतिष्ठा

# भाषांतरकाराचे चार शब्द

रसेल डब्ल्यू. डेव्हनपोर्ट या सुप्रसिद्ध लेखकाच्या Dignity of Man या इंग्रजी पुस्तकाचें भाषांतर करून त्यांतील अतिशय महत्त्वाचे व मूलगामी विचार मराठी वाचकांना उपलब्ध करून देण्याची संधि दिल्याबद्दल यूसिसच्या चालकांचें व विशेषेकरून श्री. दळवी यांचें मनःपूर्वक आभार मानणें जरूर आहे. मूळ पुस्तकांतील कांहीं महत्त्वाचीं विधानें व विवरण याबाबत मतभेद असले तरी, एकंदर पुस्तकाच्या भाषांतरानें भारतांतील जनतेला अत्यावश्यक असलेल्या विचारांना चालना मिळेल व त्यांत भर पडेल अशी खात्री वाटल्यानेंच भाषांतराची कल्पना मनांत आली. व्हीनस बुक स्टॉलचे मालक श्री. अनंतराव लिमये यांनीं आपलेपणानें यूसिसची परवानगी मिळवून दिली म्हणून यूसिसच्या चालकांबरोबर त्यांचेही मनःपूर्वक आभार मानतों.

भाषांतराचें कामीं माझे बंधु श्री. माधव लिमये यांचें बहुमोल साहाय्य झालें आहे. त्यांच्या मदतीशिवाय हें अवघड काम माझे हातून पार पडलें असतें कीं नाहीं अशीहि मनांत शंका येते. मूळ इंग्रजी पुस्तकाचें हें भाषांतर यथातथ्य उतरलें आहे कीं नाहीं हें अभ्यासू वाचकांनीं ठरवावयाचें आहे. त्यांच्या पसंतीला तें उतरलें तर या कामीं खर्च केलेल्या चार महिन्यांच्या श्रमाचें चीज झालें असें वाटेल.

'कायाकल्प'
फर्ग्युसन कॉलेज रोड,
पुणें ४.
२० जुलै १९५९

**शिरूभाऊ लिमये**

भाग पहिला :

१०२९०

# सर्व मानवजातीसाठीं

## १ : स्वोबोदा

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीची गोष्ट. रशियन आणि अमेरिकन लष्कराचे तळ जवळ जवळ पडले होते. दोन्ही सैन्यांतील अधिकारी निरनिराळे समारंभ घडवून आणीत आणि त्या दोन बलाढ्य अशा मित्र राष्ट्रांतील लष्करी अधिकारी मोठ्या खेळीमेळीनें एकमेकांशीं वागत. अशाच प्रकारच्या एका भोजनप्रसंगीं एक अमेरिकन वार्ताहर उपस्थित होता. खान्याच्या वेळीं त्याच्या दोन्ही बाजूंना दोन रशियन बसले होते. त्यापैकीं त्याच्या उजव्या हाताला बसला होता तो दुभाषी होता आणि डाव्या बाजूचा एक दुय्यम अधिकारी होता. स्टालीनग्राडच्या लढ्यांत तो जखमी झाला होता आणि तेव्हांपासून त्यानें लष्करी छायाचित्रकाराचा पेशा पत्करला होता. दुभाष्यामार्फत त्यांच्या गप्पा अगदीं रंगांत आल्या होत्या, आणि त्या भरांत ते दोघेहि एकमेकांचें मनमुराद कौतुक करीत होते.

गेल्या कांहीं वर्षांपासून हा अमेरिकन वार्ताहर कम्युनिझमच्या वाढत्या सामर्थ्याचा बऱ्याच आस्थेवाईकपणें विचार करूं लागला होता. मंदीच्या काळांत न्यूयॉर्कमधील युनियन चौकांत चक्कर टाकून तेथें होणारीं व्याख्यानें ऐकण्याचा त्याला छंदच लागला होता. तीं व्याख्यानें ऐकून त्याची अशी समजूत झाली होती कीं, जगांत कसला तरी भयंकर संघर्ष धुमसूं लागला आहे. लोकांतील मतभेदाची ती तीव्रता बघून तर तो स्तिमितच होऊन जाई. पण त्या संघर्षाचें स्वरूप नेमकें काय होतें या प्रश्नाचें उत्तर देणें त्यावेळीं फारसें सोपें नव्हतें आणि आजहि तें चटकन देतां येईल असें नाहीं; परंतु यू. एस्. एस्. आर्. ( सोव्हिएट रशिया ) आणि अमेरिका यांत दोन तट पडणार हें सांगायला कांहीं मोठ्या ज्योतिषाची जरूर उरली नव्हती. त्याला भविष्यकाळाबद्दल फारसा अंदाज बांधतां येत नसला तरी आज ना उद्यां ही रशियाची दोस्ती फार महाग पडल्याखेरीज राहणार नाहीं अशी मात्र त्याला सारखी धास्ती वाटे.

त्यामुळेंच त्याच्या त्या नव्या रशियन दोस्तानें, लाल सैन्यानें गाजवलेल्या मर्दुमकीचीं व मिळविलेल्या विजयाचीं रसभरीत वर्णनें करायला सुरवात केल्याबरोबर तो त्या दुभाष्याकडे वळून म्हणाला, " हें सर्व युद्ध कशाकरतां चाललें होतें असें त्याला वाटतें तें त्याला विचार."

दुभाष्यानें अधिकाऱ्याकडे वळून त्याला तो प्रश्न विचारला. बंदुकींतून गोळी सुटावी इतक्या त्वरेनें त्या प्रश्नाला जबाब मिळाला- " स्वोबोदा ! " " स्वातंत्र्य ! " रशियन अधिकाऱ्यानें हा शब्द उच्चारीत त्या अमेरिकन वार्ताहराकडे अशा कांहीं नजरेनें पाहिलें कीं, त्याला जणूं म्हणायचें होतें, " भल्या गृहस्था, इतकीं वर्षें तूं कुठं होतास? तुझ्या कांहींच कसें गांवीं नाहीं ! "

" पण स्वातंत्र्य म्हणजे तरी काय ? " वार्ताहरानें उलट प्रश्न केला.

" स्वातंत्र्य ? " अधिकारी क्षणभर गोंधळला. पण अमेरिकन गृहस्थाच्या नजरेला नजर भिडवीत तो अवसानानें म्हणाला " स्वातंत्र्य म्हणजे दुसऱ्याला मदत कशी करायची त्याची जाणीव. स्वातंत्र्य म्हणजे बंधुभाव. "

त्यावर मग तो वार्ताहार आणखी कांहीं बोलला नाहीं. कारण वाद वाढवण्याचें तें स्थळ नव्हतें. तथापि तो कार्यक्रम संपवून परत जातांना एक प्रश्न सारखा त्याच्या मनांत घोळत होता. स्वातंत्र्य आणि बंधुभाव ! रशियाच्या लाल सैन्याचें ध्येय स्वातंत्र्य आणि बंधुभाव प्रस्थापित करणें हें आहे यावर त्या रशियन अधिकाऱ्याचा मनापासून विश्वास तरी कसा बसतो आणि त्याबद्दल त्याला उत्साह तरी कसा वाटूं शकतो हा प्रश्न त्याला सतावीत होता. त्याचें समग्र उत्तर मिळायला त्याला पुढें कित्येक वर्षें लागलीं. परंतु जेव्हां जेव्हां तो याविषयीं विचार करी तेव्हां तेव्हां त्याला त्या मेजवानीच्या वेळची आठवण होई, आणि त्याला असें आढळून येई कीं, विसाव्या शतकाच्या मध्याला स्वतंत्र जगावर ओढवणाऱ्या संकटाची सूचना या घटनेंत जेवढी सामावली गेली होती तेवढी दुसऱ्या कोणत्याहि प्रसंगानें त्याच्या अनुभवास आली नव्हती.

* * *

## २ : : स्वातंत्र्याच्या नांवाखालीं—!

प्रत्येक युगाच्या कांहीं विशेष अशा समस्या असतात. त्या समस्या कोणत्या, त्यांचें स्वरूप काय तें हुडकून काढण्याचें कार्य त्या त्या कालखंडांतील मर्मज्ञ इतिहासकारांचें असतें. आपल्या सध्याच्या युगाची समस्या कोणती आहे हें तर स्पष्टच आहे. 'स्वातंत्र्य' हाच आजचा खरा प्रश्न आहे. आपण ईजिप्तमधील क्रांतिकारकाला विचारलें कीं, तो कशासाठीं धडपडत आहे, तर तो सांगेल "स्वातंत्र्यासाठीं." पॅलेस्टाइनमध्यें निराळ्या शब्दांत पण हेंच उत्तर आपल्याला मिळेल. इंडोनेशिया, इराण येथील जनताहि या स्वातंत्र्याच्या ध्येयासाठींच झगडत आहे. दक्षिण आफ्रिकेंतील संघर्षदेखील स्वातंत्र्यासाठींच चालला आहे. दक्षिण कोरियांतील जनतेनें प्राणपणानें लढा दिला तो सुद्धां स्वातंत्र्य संपादन करण्यासाठींच. पाकिस्तान आणि हिंदुस्थान हीं दोन राष्ट्रें एकमेकांकडे आखाड्यांत उतरलेल्या प्रतिस्पर्ध्यांच्या नजरेनें पाहत असलीं तरी त्यांनींदेखील स्वतःला स्वातंत्र्याच्याच ध्येयाला वाहून घेतलें आहे. शरिराच्या नसानसांतून रक्त खेळावें त्याप्रमाणें आज सर्व वातावरण स्वातंत्र्याच्या विचारानें भारून गेलें आहे. विंडेल विल्की यांनीं दहाबारा वर्षांपूर्वीं आपल्या 'वन वर्ल्ड' या पुस्तकांत असें लिहून ठेवलें आहे कीं, पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांतील जनता स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं "आगेकूच" करीत आहे. पृथ्वीच्या पाठीवरील संख्येनें दोन अब्जांपेक्षांहि अधिक असलेल्या जनतेकडे आपण दृष्टि टाकली तर आपल्याला असें आढळून येईल कीं, त्यांपैकीं बहुसंख्य लोक आज या ना त्या स्वरूपाच्या स्वातंत्र्याकांक्षेनें भारून गेले आहेत आणि मग त्यावरून साहजिकच असा निष्कर्ष निघतो कीं, स्वातंत्र्यासाठीं चाललेला हा प्रदीर्घ संघर्ष आपल्या काळांत आतां अगदीं शिगेला पोहोंचला आहे आणि भावी इतिहासकार जेव्हां विसाव्या शतकाच्या मध्याची नोंद करतील तेव्हां त्यांना असें म्हणावें लागेल कीं, हा काळ निर्णायक स्वरूपाचा होता. या काळांतच मानवाचा स्वातंत्र्याचा हक्क सर्वमान्य झाला असें तरी एक त्यांना म्हणावें लागेल, किंवा कुणी सांगावें, घटना वेगळ्या तऱ्हेनें घडत गेल्या तर याच काळांत मानवाला स्वातंत्र्य संपादण्याची सारी आशा सोडून द्यावी लागली असें म्हणण्याचीहि पाळी त्यांच्यावर येईल.

अमेरिकेच्या परंपरेंत प्राचीन आणि उदात्त असें तत्त्व अनुस्यूत आहे. अमेरिकन संयुक्त संस्थानें म्हणजे स्वातंत्र्याचा एक महान प्रयोग आहे; युरोपांतील निरनिराळ्या स्वातंत्र्यविषयक कल्पनांची जोपासना आणि संवर्धन करून अंतीं त्या अखिल मानव समाजाला उपलब्ध करून द्यावयाच्या हेंच तें तत्त्व होय. अमेरिकेच्या सुरुवातीच्या शेंदीडशें वर्षांच्या कालखंडापुरतें बोलायचें तर स्वातंत्र्य-साधनेचें हें तत्त्व म्हणजे एक दूरवर्ती असें ध्येय होतें. कांहींशा दोषैक दृष्टीनें सांगायचें झालें तर असें म्हणतां येईल कीं, ‘ स्वातंत्र्याच्या ध्येयाचा मक्ता ’ त्यावेळीं अटलांटिक जगाकडे होता आणि तेथूनच आशिया व आफ्रिका खंडांत त्या ध्येयवादाची निर्यात होत होती. अटलांटिक त्याच-प्रमाणें आफ्रिका आणि आशिया खंडांमधील देशांतील जनतेचें हित अंतीं त्यांतच आहे अशा समजुतीनेंच ह्या देशांचें नियंत्रण त्या काळीं अमेरिकेनें आपल्या हातीं ठेवलें होतें. परंतु सबंध एकोणिसाव्या शतकांत आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीला सर्वत्र आढळणारी ‘ जैसे थे ’ वृत्ति आतां संपुष्टांत आली आहे. निरनिराळ्या देशांतील जनता आतां स्वतःच्या हिंमतीवर उठाव करूं लागली आहे. जनतेची स्वातंत्र्यकांक्षा आतां कोणाच्या कांबूत राहिलेली नाहीं किंवा ती कोणाची मिरासदारीहि उरलेली नाहीं. ही स्वातंत्र्याकांक्षा साऱ्या मानवजातीला व्यापून टाकणार हें भविष्य टॉम पेनसारख्या लेखकांनीं पूर्वीच वर्तवून ठेवलें होतें.

अमेरिकेच्या परंपरेंतील हा विचार अत्यंत स्फूर्तिप्रद असा आहे. ज्यांना स्वसामर्थ्यावर स्वातंत्र्य संपादन करण्यासाठीं वर्षानुवर्षे रक्तलांछित लढ्यांत फुकट घालवावीं लागलीं असतीं अशा अनेक राष्ट्रांना स्वातंत्र्याचा मार्ग दाखवण्याची संधी आज अमेरिकेला प्राप्त झाली आहे. टॉम पेननें वर्तवि-लेल्या भविष्याप्रमाणें जगांतील सारी मानवजात मुक्त झाली पाहिजे, या ध्येयाचा उद्घोष आज आपण करूं शकतों. जगांतील जनता स्वातंत्र्यासाठीं अनायासें ‘ आगेकूच ’ करून निघालीच आहे तेव्हां त्या संधीचा फायदा घेऊन आपल्या कसोटीस उतरलेल्या तत्त्वावर आधारलेली नवी जागतिक स्वरूपाची समाजरचना निर्माण करण्याचे कामीं तिला मार्गदर्शन करण्याची संधी आपल्याला उपलब्ध झाली आहे. निरनिराळ्या राष्ट्रांच्या गरजा लक्षांत घेऊन त्यावर आधारलेलीं व त्यांच्या चालीरीति आणि संस्कृति यांमधून

विकसित होत गेलेलीं हीं तत्त्वें मानवी प्रतिष्ठेचें अव्याहत रक्षण करूं शकतील आणि परतंत्र व वासाहातिक देशांत लोकशाहीची जोपासना करण्याचा मार्ग खुला करून देतील. त्यायोगें खराखुरा जागतिक समाज निर्माण होईल आणि एकाच प्रतिनिधीमंडळाकडून त्याचें नियंत्रणहि होऊं शकेल. देशभक्तांनीं आणि हुतात्म्यांनीं सांडलेल्या रक्ताची किंमत देऊन आपण जो महत्त्वपूर्ण धडा शिकलों तो कारणीं लागेल व त्यामुळें राज्यशास्त्रांत मानव अधिकाधिक निष्णात होत जाईल. स्वातंत्र्यावर आधारलेल्या सामाजिक संस्थांचें शांततामय मार्गानें संरक्षण करण्याचें सामर्थ्य त्याला लाभेल व अधिक प्रगत अशा परस्पर मानवी संबंधाकडे तो लक्ष पुरवूं शकेल.

हा विचार अमेरिकन ध्येयाचा इतका अविभाज्य घटक होऊन बसला आहे कीं, लक्षावधी अमेरिकनांना तो नव्यानें सांगावाच लागत नाहीं. अमेरिकेच्या अंतर्गत आणि परराष्ट्रीय धोरणावर त्या थोर परंपरेचा फार मोठा प्रभाव पडलेला आहे. परंतु असें असूनहि आजच्या काळांतील कांहीं घटना त्या तत्त्वाशीं विसंगत अशा दिसत आहेत. खरें म्हणजे अशा अनेक घटना दाखवून देतां येतील. परंतु त्यांतील तीन विशेष उल्लेखनीय आहेत. त्यापैकीं सर्वांत महत्त्वाची म्हणजे जागतिक कम्युनिझमचा हिरिरीनें पुरस्कार करणारा सोव्हिएट रशिया आपण स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते असल्याचा दावा करतो ही होय. सोव्हिएट रशियांतून प्रतिदिनीं प्रसिद्ध होणाऱ्या निवेदनांवरून वरील विधानाची सत्यता पटूं शकेल. कम्युनिझम व स्वातंत्र्य हीं एकरूपच आहेत असें मानणाऱ्यांच्या वर्चस्वाखालीं जगांतील एक तृतीयांश जनता जगत आहे ही दुसरी महत्त्वाची घटना होय. आणि तिसरी घटना म्हणजे अमेरिका स्वातंत्र्याच्या पुरस्काराचा जो एवढा टेंभा मिरविते त्यांत तरी कांहीं सत्यांश आहे कीं नाहीं असा संदेह आपल्याच गोलार्धांतील लोकांच्या मनांत निर्माण करण्याच्या कामीं कम्युनिस्टांना यश लाभलें आहे ही होय. ब्रिटनपासून बोलीव्हियापर्यंत कोठल्याही देशांतील बुद्धिवादी लोकांत सध्यां जे वादविवाद चालू आहेत त्यांकडे नजर टाकली असतां वरील विधानाचें प्रत्यंतर येईल.

या घटना अत्यंत गंभीर आहेत. अगदीं थोड्या अवधींत त्यांनीं अमेरिकेची भूमिका पार पालटून टाकली आहे. एक काळ असा होता कीं, त्या

वेळीं अमेरिकेकडे सारें जग स्वातंत्र्याचा एकमेव आधारस्तंभ म्हणून बघत असे, परंतु एकोणिसशें एकोणचाळीस सालीं प्रथम नाझी आणि फॅसिस्ट विचारसरणीकडून आपल्या स्वातंत्र्याभिमुख जीवन - पद्धतीवर आघात झाला; त्यानंतर महायुद्ध सुरू झालें आणि त्यांत सोव्हिएट युनियनबरोबर हात मिळवणी करणें आपल्याला भाग पडलें. आतां युद्धांतील यशाचें श्रेय मात्र रशिया घेऊं पाहात आहे—केवळ युद्धांतील विजयाचेंच नव्हे तर स्वातंत्र्याच्या ध्येयाचें श्रेय देखील आपल्यालाच आहे, असा रशियाचा दावा आहे; आणि हें करीत असतांना आपला एकेकाळचा 'दोस्त' जो रशिया तोच आपल्यावर आग ओकूं लागला आहे. आणि कसें कोणास ठाऊक पण आपल्यापेक्षांही त्याला अधिकाधिक अनुयायी मिळूं लागले आहेत. लक्षावधि डॉलर्स खर्च करून आणि जबरदस्त मानसिक ताण सहन करून स्वातंत्र्याच्या नावाखालीं आपण आपल्या भागांतील देश कसेबसे एकत्र टिकवून धरले आहेत. पण त्याच स्वातंत्र्याच्या नांवाखालीं सोव्हिएट युनियननें आपल्यापेक्षां फार मोठी मजल मारली आहे. सबंध जगांत रशियानें आपले हातपाय पसरले असून त्याला आळा बसण्याचें कोणतेही चिन्ह दृष्टिपथांत नाहीं.

त्याशिवाय आणखीहि कांहीं बाबी विचारांत घेण्यासारख्या आहेत. पाश्चिमात्य संस्कृति ही मुख्यत: कांहीं विशिष्ट राजकीय संस्थांच्या आधारानें विकसित झाली आहे. देशकालपरिस्थितीप्रमाणें या संस्थांचें स्वरूप निरनिराळ्या पाश्चात्य लोकांत निरनिराळ्या प्रकारचें दिसत असलें तरी सर्वसामान्यपणें स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या संस्था म्हणूनच त्या ओळखल्या जातात. विचार आणि उच्चार स्वातंत्र्य, धर्म स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य, खाजगी मालमत्तेवरील मालकी हक्क व तिची विल्हेवाट लावण्याचे अधिकार हेबेयस कॉर्पस् ( व्यक्ति स्वातंत्र्याचा हक्क ), ज्यूरी पद्धतीचें न्यायदान, गुप्त मतदानपद्धति, बहुमताच्या जोरावर कारभार करण्याचा जनतेचा हक्क, अल्पसंख्यांकांना संरक्षण इत्यादि तत्त्वें ह्या संस्थांचा गाभा आहेत, हें अमेरिकेंतील शाळकरी पोरदेखील जाणतें. या तत्त्वांची अंमलबजावणी नेहमीं होतेच असा दावा स्वतंत्र देशांना करतां येणार नाहीं. तथापि राजकीय स्वातंत्र्यांत हे मूलभूत हक्क स्थूलमानानें अभिप्रेतच आहेत असें ते धरून चालतात,

म्हणूनच ज्या ध्येयाकडे समाज जाऊं पहात आहे तें ध्येय साध्य करून घेण्याचा व्यवहार्य मार्ग हाच आहे असें सर्व पाश्चात्य देशांत मानलें जातें.

परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, सोव्हिएट पद्धतींत ही तत्त्वप्रणाली सर्वत्र धुडकावून लावली जाते; तीं तत्त्वें पायाखालीं तुडविलीं जातात. ज्या ज्या ठिकाणीं सोव्हिएट राज्यपद्धती सत्तारूढ झाली आहे, त्या त्या ठिकाणीं त्यांपैकीं कशाचाही मागमूस सुद्धां राहिलेला नाहीं. ही सर्व हकीगत आतां सर्वांच्या परिचयाची होऊन बसली आहे. सोव्हिएट देशांतील नागरिकाला तेथील राज्यपद्धतीविरुद्ध एक अवाक्षरही उच्चारतां येत नाहीं. त्यानें लावलेले शोध त्या देशांतील अधिकृत धोरणाशीं विसंगत असतील तर ते देखील त्याला प्रसिद्ध करतां येत नाहींत. अधिकृत धोरणाच्या विरुद्ध एकाद्याच्या मनांत विचार येत आहेत असा नुसता संशय जरी आला तरी तेवढयावरून देखील त्याला अटक होऊं शकते; आणि एकदा का तो गिरफदार झाला म्हणजे मग हेबीयसकॉर्पसचा अर्ज करण्याचा किंवा ज्यूरी मागण्याचा असा कोणताही अधिकार त्याला मिळूं दिला जात नाहीं. उलट कबुलीजबाब लिहून देण्याची त्याच्यावर सक्ती केली जाते. त्यासाठीं त्याचा शारीरिक आणि मानसिक छळ केला जातो. "स्वातंत्र्याचे" हे तथाकथित पुरस्कर्ते लक्षावधि लोकांना वारंवार तुरुंगांत डांबतात, त्यांची उपासमार करतात, त्यांना वेठीला जुंपतात; इतकेंच नव्हे तर मर्जीला येईल त्यांचे खुशाल खूनही पाडतात. व्यक्तीची प्रतिष्ठा हा पाश्चात्य विचारसरणीचा गाभा समजला जातो. परंतु सोव्हिएट राष्ट्रांत त्याची जरा देखील कदर केली जात नाहीं. व्यक्ति आणि अल्पसंख्य गट यांचे सारे हक्क तेथें हिरावून घेतले जातात येवढेंच, नव्हे तर स्वतः अल्पसंख्य असलेल्या कम्युनिस्ट पक्षाव्यतिरिक्त इतर अल्पसंख्य गटांना कसलेहि हक्क उपभोगूं देणें ही कल्पना देखील त्यांना देशद्रोहाइतकी भयंकर वाटते. सोव्हिएट राज्यपद्धति टिकून राहते ती स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या तेथील संस्थांचा तिला पाठिंबा असतो म्हणून नव्हे तर नेमकें त्याच्या उलट—म्हणजे समाजांतील यच्चयावत् सर्व व्यक्तींना आपल्या मर्जीनुरूप हवें तसें वाकविण्याची अमर्याद सत्ता मूठभर लोकांच्या हातीं असते म्हणून !

या गोष्टी कांहीं आतां गुप्त राहिलेल्या नाहींत. रेडियो, वृत्तपत्रें, सिनेमा, तोंडी माहिती इत्यादींच्या द्वारा जगांतील कानाकोपऱ्यापर्यंत या गोष्टी जाऊन पोहोंचल्या आहेत. त्यामुळें प्रत्येक राष्ट्रांतील जनतेला त्यांची जाणीव झालेली आहे. परंतु अत्यंत आश्चर्याची गोष्ट अशी कीं, यापैकीं कशाचाही यत्किंचित् देखील परिणाम घडून न येतां कम्युनिझमची आगेकूच तशीच चालू आहे! कांहीं ठिकाणीं कम्युनिझमची पिछेहाट झाली असेल, किंवा क्वचित् कोठें त्यांना आपलें पाऊल मागें घ्यावें लागलें असेल; परंतु एकंदरीत पाहतां कम्युनिझमला पत्कराव्या लागलेल्या पराभवापेक्षां त्याला मिळालेले राजनैतिक आणि लष्करी विजय यांची संख्या कितीतरी अधिक आहे. निरनिराळ्या देशांतील सरकारांचा अधिक्षेप करणें, राज्यें ताब्यांत घेणें, देशभक्तांच्या कत्तली करणें, जनतेची लुबाडणूक करणें हें सारें स्वातंत्र्याच्या पुरस्काराच्या नांवाखालीं चालू आहे. लक्षावधि लोक हीं सर्व दुष्कृत्यें स्वातंत्र्यासाठींच चाललीं आहेत यावर विश्वास ठेवतात.

चटकन् कोणाचा विश्वासहि बसणार नाहीं अशा या घटनांमुळें जगांत स्वातंत्र्यासाठीं चालू असलेल्या संघर्षावर एक नवाच प्रकाश पडतो. स्वातंत्र्य हें आतां एक सर्वमान्य ध्येय बनलें आहे हें अगदीं खरें, पण तेवढ्यानें तें स्फूर्तिप्रद मात्र ठरत नाहीं, उलट तें भयानक ठरूं पहात आहे. कारण या सर्व घटना पाहिल्या म्हणजे एकदम आपल्या लक्षांत येतें कीं सबंध जगाला स्वातंत्र्याची ही जी आस लागून राहिलेली आहे तिच्यांतून स्वातंत्र्यासंबंधींच्या पाश्चात्य परंपरांची पूर्तता होईलच अशी कांहीं शाश्वति देतां येत नाहीं. कार्ल मार्क्सच्या शिकवणुकीची परिपूर्णता होण्याचा मार्ग मात्र त्यायोगें मोकळा होईल, नव्हे आपल्या काळांतच तो तसा झालेला आहे. आपण आपली बाजू कितीहि पद्धतशीरपणें मांडली किंवा सोव्हिएट पद्धतिसंबंधीची आपली टीका अगदीं मुद्देसूद असली तरी देखील तिचा प्रभाव पडूं शकत नाहीं. आणि कम्युनिझमची घोडदौड मात्र चालूच राहते. आपल्याला अभिप्रेत असलेलें स्वातंत्र्य सोव्हिएट पद्धतींत टिकूं शकत नाहीं हें दाखवून देणें अगदीं ेपें आहे. परंतु याची जाणीव करून घेण्याची आवश्यकताच आज जगाला टत नाहीं. सोव्हिएट पद्धति आणि आपली पद्धति यांत विरोध आहे, हें ाप्रमाणें मलायांतील क्रांतिकारी जाणून आहे, याचप्रमाणें आयोवा

संस्थानांतील डे मॉय्न् मधल्या नागरिकाला त्याची जाणीव आहे. परंतु आपल्या पद्धतीची परिणति खरोखरच अखेर स्वातंत्र्यांत होणार आहे, ह्याबद्दल मात्र मलायांतील क्रांतिकारकांची खात्री पटलेली नाहीं. उलट आतांपर्यंत तरी कम्युनिस्ट प्रचाराचाच त्याच्यावर अधिक प्रभाव पडलेला दिसतो. वॉशिंग्टनपेक्षां मॉस्कोकडूनच स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याची संधी जास्त मिळूं शकेल असें त्याला वाटतें. पृथ्वीच्या पाठीवर निरनिराळ्या देशांत विखुरलेल्या लक्षावधि लोकांची प्रतिक्रियादेखील अशीच असते.

वर उल्लेखिलेल्या मेजवानीच्या दिवशीं त्या रशियन रशियन अधिकाऱ्यानें आश्चर्य वाटण्याजोगीं जीं विधानें केलीं त्याची संगति लावण्याचा प्रयत्न करीत असतांना अमेरिकन वार्ताहराच्या मनांत हेच विचार घोळत होते. त्यावरून त्यानें आपल्या मनाशीं कांहीं निष्कर्षही काढले. सर्वसाधारण अमेरिकनांची अशी एक समजूत होती कीं, रशियाचा प्रचार म्हणजे निव्वळ थोतांड असतें. लोकांच्या मनावर भुरळ पाडून त्यांना बनविणें ह्या एका हेतुव्यतिरिक्त त्यांत दुसरा कसलाही अर्थ नसतो. ॲडॉल्फ हिटलरच्या प्रचाराचा जो अनुभव अमेरिकनांना आला होता; त्यामुळेंच मुख्यतः त्यांनीं अशी समजूत करून घेतली होती. प्रचार म्हटला कीं, त्यांत जनतेला भारून टाकण्याची किमयाही आलीच. त्यामुळें त्या प्रचाराशीं ज्यांचा ज्यांचा संबंध येतो—ज्यांच्यासाठीं म्हणून प्रचार केला जातो ते आणि जे तो प्रचार करतात--ते सुद्धां–त्यावर विश्वास ठेवूं लागतात. त्यामुळें असें देखील म्हणतां येईल कीं, हिटलर आणि त्याचे सहकारी यांचाही बहुधा स्वतःच्याच प्रचारावर विश्वास बसला असावा. पण त्यांच्याखेरीज इतर कोणीसुद्धां त्यांच्या प्रचाराला सहसा भुललें नाहीं. वस्तुतः नात्सी प्रचारांत विश्वास वाटावा असा भाग फारच थोडा असे, कारण त्यांत मानवता वगैरेला आवाहन नसे. त्यामुळें राइशच्या बाहेरील जनतेवर त्याची छाप पडत नसे. लष्करांतील एकाद्या रणगाड्यांच्या पथकाप्रमाणें किंवा युद्धनौकेप्रमाणें नाझीचें प्रचारतंत्र हें देखील उघड उघड त्यांच्या सत्तेचेंच एक अंग असे. रशियन प्रचाराचा प्रकार देखील अशाच स्वरूपाचा असला पाहिजे अशी त्याविषयीं (फारसा विचार न करतां) आपण समजूत करून घेतली होती असें नव्हे तर अमेरिकन सरकारचा दृष्टिकोण देखील तसाच

बनला होता आणि त्यामुळें अमेरिकेच्या धोरणावरही त्याचा फार परिणाम घडून आलेला आहे.

परंतु विसाव्या शतकाच्या मध्यांतील घडामोडी जसजशा आकाराला येऊं लागल्या तसतसें कम्युनिस्ट प्रचारासंबंधीं आपण केलेलें मूल्यमापन चूक असलें पाहिजे हें स्पष्ट होऊं लागलें. खरें बोलावयाचें तर कम्युनिस्ट प्रचार हा मुळीं प्रचार नसतोच. विशिष्ट प्रकारच्या वस्तुस्थितीचें तें व्यक्तीकरण असतें. ही वस्तुस्थिति काय आहे ह्याची आपणां अमेरिकनांना अंधुक कल्पना कदाचित् आलेली, असेल परंतु तिचें वास्तव स्वरूप मात्र इतके दिवस आपल्या ध्यानांतच आलें नव्हतें. नात्झीझम आणि कम्युनिझम यांच्यांतील वरवरच्या सारखेपणामुळें आपली दिशाभूल झाली. त्या दोन प्रचंड आंदोलनांत वापरण्यांत आलेल्या तंत्रांत बरेंच साम्य होतें. परंतु कम्युनिस्टांच्या विचारप्रणालींत नात्सीवादापेक्षां खूपच अधिक आशय असतो. कम्युनिस्टांचा प्रचार केवळ सोव्हिएट यूनियनपुरता मर्यादित असत नाहीं तर सर्वसाधारणपणें साऱ्या मानवजातीला त्यांत आवाहन केलेलें असतें. मानवाचीं जीं कांहीं शाश्वत अशीं मूल्यें आहेत त्यांवर त्यांत भर दिलेला असतो. विशिष्ट काळांत आणि विशिष्ट प्रसंगीं ज्याकडे लक्षावधि लोक आकर्षित होतात अशा कांहीं गोष्टी त्यांत अंतर्भूत असतात. त्या प्रचाराच्या आहारीं जाऊन, त्यांत नमूद केलेल्या गोष्टी प्राप्त करून घेतल्यानंतर त्यामागें लागलेल्या लक्षावधि जनतेचा कदाचित् भ्रमनिरासही होत असेल. असा भ्रमनिरास झाल्याचे भरपूर पुरावे सर्वत्र आढळतात. परंतु त्यांच्या राजकीय जीवनांत मात्र योग्य काळीं आणि योग्य स्थळीं ती अनिवार्यपणें येऊन बसते आणि मग त्यांना त्याबाबतींत कांहींही करतां येत नाहीं. त्या त्या देशीं आणि त्या त्या काळीं ती जनता स्वतंत्र जगांतील लोकांच्या नेमके उलट विचार उराशीं कवटाळून बसते आणि त्यालाच ती स्वातंत्र्य असें गोंडस नांव देऊन मोकळी होते. आपल्या काळांतील सर्वांत महत्त्वाची पण त्याचबरोबर सर्वांत अधिक गोंधळांत टाकणारी बाब हीच आहे.

आणि तिच्या जोरावरच सोव्हिएट रशियानें साऱ्या जगाचें नेतृत्व हिरावून घेतलें आहे. सर्वसामान्य जनतेच्या हक्कांचें आणि आकांक्षांचें आशास्थान जर कोठें असेल किंवा नव्या युगाचा आणि नव्या श्रद्धेचा उद्गाता जर

कोणी असेल तर तो म्हणजे सोव्हिएट रशिया अशी मान्यता जगाच्या पाठीवर अनेक देशांत दिली जात आहे. आपली राज्यपद्धति कम्युनिस्टांपेक्षां अधिक चांगली आहे. कम्युनिस्ट पद्धतींत पायदळीं तुडविले जाणारे मानवी हक्क आमच्या पद्धतींत अबाधित राखले जातात, हें सर्व खरें असलें तरी कम्युनिस्ट प्रचारापुढें त्यांना कांहीं किंमत उरत नाहीं. आम्ही कम्युनिस्टांपेक्षां अधिक समृद्ध व सामर्थ्यवान आहोंत. कदाचित् त्यांच्यापेक्षां जास्त सुखीदेखील असूं हें जगाला मान्य आहे. पण त्याला फारसें महत्त्व नाहीं. महत्त्वाची गोष्ट जर कोणती असेल तर ती हीं कीं, इत:पर जनतेच्या आशाआकांक्षांचे आधारस्तंभ आम्ही राहिलेलों नाहीं. जगांतील कोट्यावधि लोकांना असें वाटत असतें कीं, भूतकाळांत आम्ही जरी खूप मोठी कामगिरी बजावली असली तरी भावी काळांत आम्हांला तें स्थान उरलेलें नाहीं आणि आम्ही ज्या ध्येयाचा पुरस्कार करतों तें वस्तुतः अमेरिकेपुरतें संकुचित असलेलें ध्येय आहे असेंच ते मानतात. त्यांच्या दृष्टीनें "साऱ्या मानवजातीच्या उद्धाराचें" कंकण आतां सोव्हिएट रशियानें आपल्या हातीं बांधलें आहे.

* * *

## २ : : बळी तो कान पिळी

आतांपर्यंत वर जीं विधानें केलीं आहेत तीं खोडून काढणारी अशी दुसरीही एक बाजू या प्रश्नाला आहे. आपण साऱ्या मानवसमाजाचे उद्धारकर्ते आहोंत, हा कम्युनिस्टांचा दावा खरा मानणें किंवा त्याचा विशेष गांभीर्यानें विचार करणें मूर्खपणाचें आहे असें पुष्कळ अमेरिकनांना वाटत असतें. कम्युनिस्टांच्या या तथाकथित ध्येयवादाचा स्वीकार स्वेच्छेनें कोणीही केलेला नाहीं. चेकोस्लोव्हाकियाप्रमाणें एकतर जनतेची दिशाभूल करून तो तिच्या गळीं उतरविला गेला आहे किंवा बाल्टिक आणि इतर अंकित देशांप्रमाणें जनतेवर तो सक्तीनें लादण्यांत आलेला आहे. पूर्व जर्मनींत झालेल्या उठावावरून हेंच दिसून येतें कीं, जनतेनें स्वखुशीनें त्या ध्येयवादाचा स्वीकार केलेला नाहीं. कम्युनिस्ट वर्चस्वाखालील जनतेला स्वातंत्र्याचे हक्क उपभोगूं

दिले जात नाहींत, उलट पोलादी पडद्याआडून ज्या थोड्याफार बातम्या आपण मिळवूं शकतों त्यावरून असेंच दिसून येतें कीं, सोव्हिएट युनियनच्या अंकित असलेल्या देशांतील जनता कम्युनिस्टांच्या जुलमाचा अत्यंत तिटकारा करते.

कम्युनिस्टांना पदोपदीं शस्त्रबळाचा वापर करावा लागतो, निदान त्याचा धाक तरी दाखवावा लागतो. अमेरिकेचे जर्मनींतील भूतपूर्व हाय कमिशनर जॉन जे. मॅकक्लॉय यांनीं 'दि चॅलेंज टू अमेरिकन फॉरिन पॉलिसी' (अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणास आव्हान) या आपल्या पुस्तकांत म्हटलें आहे.

'स्टालिननिष्ठेच्या बुरख्याआड वावरणाऱ्या पूर्व बर्लिनमधील जनतेच्या अंगावरील कपडे फाटकेतुटके असतात. तेथील लोकांचे चेहरे भकास दिसतात आणि कसल्यातरी संकटाच्या काळजीनें ते सदैव पछाडलेले दिसतात. सरकारच्या गुप्त पोलिसांचा ससेमिरा प्रत्येकाच्या पाठीशीं लागलेला असल्यामुळें तेथील वातावरण निर्जीव आणि भयग्रस्त बनलेलें असतें. तसेंच जर्मन फेडरल रिपब्लिकच्या पूर्व सरहद्दीच्या बाजूनें चक्कर टाकली तर आपल्याला पोलिशी राज्याच्या सरंजामाची दुःखद जाणीव झाल्याशिवाय राहात नाहीं. कांटेरी तारांचीं कुंपणें, पोलिसांना त्यांच्या कामांत मदत करण्यासाठीं ठेवण्यांत आलेले कुत्रे, मशीनगनचे मोर्चे, राहत्या लोकांना काढून टाकून रिकाम्या करण्यांत आलेल्या जागा, नांगरट करून ठेवलेले जमिनीचे पट्टे आणि हजारों निर्वासितांचे भीतिग्रस्त चेहरे आपल्या चटकन् नजरेंत भरतात.'

मानवतेच्या नांवानें कम्युनिस्ट आपल्या सत्तेचा उपयोग करीत असतात. परंतु त्या सत्तेखालीं सापडलेल्या कोणाही व्यक्तीला माणूस म्हणून जगतां येत नाहीं. त्यामुळें लोकांनीं आपण होऊन कम्युनिझमचा स्वीकार केला आहे असें सहसा म्हणतां येणार नाहीं. लष्करी आणि मुलकी सत्तेचा निर्घृणपणें उपयोग करून त्या जोरावर चालविलेल्या जुलूमशाहीची तेथील जनता शिकार बनलेली असते. त्यामुळें ध्येयवादाचा आव आणून कम्युनिस्टांकडून जो प्रचार केला जातो त्याकडे दुष्ट वक्तृत्वाचा एक नमुना म्हणून दुर्लक्ष करण्याचा साहजिकच मोह होतो. आपण सध्यां ज्या लढयांत गुंतलों आहोंत

तो लढा सत्ता हस्तगत करण्यासाठींच चाललेला आहे. त्या व्यतिरिक्त त्यांत दुसरें कांहींही नाहीं, असें समजण्याचा मोह होतो. ह्या संघर्षाच्या मुळाशीं दोन तत्त्वप्रणालीमधील विरोध आहे हें आपल्याला पटूंच शकत नाहीं; कारण आपल्या दृष्टीनें कम्युनिस्ट तत्त्वप्रणाली हें एक थोतांड आहे. कम्युनिझम म्हणजे लष्करी सत्तेसाठीं चाललेली चुरस असून मूठभर गुंडांनीं आपल्या हातांतील पाशवी सत्तेच्या जोरावर जगांतील सुसंस्कृततेचा बळी घेतला आहे असेंच म्हणावें लागेल. 'शठं प्रति शाठ्यं' हाच न्याय त्यांच्या बाबतींत योग्य ठरेल. कारण तीच एक भाषा त्यांना समजूं शकते. आणि असें केलें तरच या राष्ट्रांची कांहीं धडगत आहे अशी विचारसरणी आहे.

एकदां आपण ही विचारसरणी मान्य केली म्हणजे मग कम्युनिस्ट आक्रमणाचें फारसें भय राहात नाहीं. अर्थात् अण्वस्त्रांच्या हल्याचा धोका नजरेआड करतां येणार नाहीं. पण त्याच्याबरोबर हेंही खरें कीं, या हल्याचा देखील नसता बागूलबोवा करतां कामां नये. कम्युनिस्टांकडून असा हल्ला झालाच तर त्याचा तितक्याच निर्धारानें प्रतिकार करण्याची स्वतंत्र जगानें जय्यत तयारी ठेवली पाहिजे. आणि मग कम्युनिस्टांची मुळीं अणुबॉंब टाकण्याची छातीच होणार नाहीं. गेल्या दहा वर्षांतील घटनांची नीट छाननी केली तर आपल्याला स्पष्टपणें असें दिसून येईल कीं, सोव्हिएट रशियाचा खरा भर उसनें अवसान आणून दुसऱ्याला घाबरवून सोडण्यावरच असतो. वस्तुतः रशियाचें सामर्थ्य भासविलें जातें त्यापेक्षां खूपच कमी आहे. आणि म्हणूनच बर्लिनमधील लोकांना विमानांच्या साहाय्यानें आपण मदत केली, तशीं आव्हानें ज्या ज्या वेळीं रशियाला दिलीं गेलीं त्या त्या वेळीं प्रत्यक्ष युद्धांत उतरण्याची रशियानें हिंमत दाखविलेली नाहीं. या वस्तुस्थितींत अद्यापहि फारसा फरक पडलेला नाहीं. अचानकपणें अणुहल्ला करून रशियाला सुरुवातीला कांहीं फायदा करून घेतां येईल, पण अमेरिका आणि स्वतंत्र जग यांच्याबरोबर दीर्घकालपर्यंत युद्ध करीत राहावें लागलें तर त्याचा परिणाम काय होईल तें रशिया पुरतेपणीं जाणून आहे. यावरून आपल्यापुढील मार्ग साहजिकच सुस्पष्ट होतो; आणि तो म्हणजे कम्युनिस्टांचा ध्येयवाद ही निव्वळ धूळफेक आहे हें ओळखून आपली सर्व शक्ति स्वतंत्र जगाचें लष्करी सामर्थ्य वाढवून तें संघटित करण्याकडे लावणें हाच होय. आपण आपलें

दिले जात नाहींत, उलट पोलादी पडद्याआडून ज्या थोड्याफार बातम्या आंपण मिळवूं शकतों त्यावरुन असेंच दिसून येतें कीं, सोव्हिएट युनियनच्या अंकित असलेल्या देशांतील जनता कम्युनिस्टांच्या जुलमाचा अत्यंत तिटकारा करते.

कम्युनिस्टांना पदोपदीं शस्त्रबळाचा वापर करावा लागतो, निदान त्याचा धाक तरी दाखवावा लागतो. अमेरिकेचे जर्मनींतील भूतपूर्व हाय कमिशनर जॉन जे. मॅकक्लॉय यांनीं 'दि चॅलेंज टू अमेरिकन फॉरिन पॉलिसी' (अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणास आव्हान) या आपल्या पुस्तकांत म्हटलें आहे.

'स्टालिननिष्ठेच्या बुरख्याआड वावरणाऱ्या पूर्व बर्लिनमधील जनतेच्या अंगावरील कपडे फाटकेतुटके असतात. तेथील लोकांचे चेहरे भकास दिसतात आणि कसल्यातरी संकटाच्या काळजीनें ते सदैव पछाडलेले दिसतात. सरकारच्या गुप्त पोलिसांचा ससेमिरा प्रत्येकाच्या पाठीशीं लागलेला असल्यामुळें तेथील वातावरण निर्जीव आणि भयग्रस्त बनलेलें असतें. तसेंच जर्मन फेडरल रिपब्लिकच्या पूर्व सरहद्दीच्या बाजूनें चक्कर टाकली तर आपल्याला पोलिशी राज्याच्या सरंजामाची दुःखद जाणीव झाल्याशिवाय राहात नाहीं. कांटेरी तारांचीं कुंपणें, पोलिसांना त्यांच्या कामांत मदत करण्यासाठीं ठेवण्यांत आलेले कुत्रे, मशीनगनचे मोर्चे, राहत्या लोकांना काढून टाकून रिकाम्या करण्यांत आलेल्या जागा, नांगरट करून ठेवलेले जमिनीचे पट्टे आणि हजारों निर्वासितांचे भीतिग्रस्त चेहरे आपल्या चटकन् नजरेंत भरतात.'

मानवतेच्या नांवानें कम्युनिस्ट आपल्या सत्तेचा उपयोग करीत असतात. परंतु त्या सत्तेखालीं सापडलेल्या कोणाही व्यक्तीला माणूस म्हणून जगतां येत नाहीं. त्यामुळें लोकांनीं आपण होऊन कम्युनिझमचा स्वीकार केला आहे असें सहसा म्हणतां येणार नाहीं. लष्करी आणि मुलकी सत्तेचा निर्घृणपणें उपयोग करून त्या जोरावर चालविलेल्या जुलूमशाहीची तेथील जनता शिकार बनलेली असते. त्यामुळें ध्येयवादाचा आव आणून कम्युनिस्टांकडून जो प्रचार केला जातो त्याकडे दुष्ट वक्तृत्वाचा एक नमुना म्हणून दुर्लक्ष करण्याचा साहजिकच मोह होतो. आपण सध्यां ज्या लढयांत गुंतलों आहोंत

तो लढा सत्ता हस्तगत करण्यासाठींच चाललेला आहे. त्या व्यतिरिक्त त्यांत दुसरें कांहींही नाहीं, असें समजण्याचा मोह होतो. ह्या संघर्षाच्या मुळाशीं दोन तत्त्वप्रणालीमधील विरोध आहे हें आपल्याला पटूंच शकत नाहीं; कारण आपल्या दृष्टीनें कम्युनिस्ट तत्त्वप्रणाली हें एक थोतांड आहे. कम्युनिझम म्हणजे लष्करी सत्तेसाठीं चाललेली चुरस असून मूठभर गुंडांनीं आपल्या हातांतील पाशवी सत्तेच्या जोरावर जगांतील सुसंस्कृततेचा बळी घेतला आहे असेंच म्हणावें लागेल. 'शठं प्रति शाठ्यं' हाच न्याय त्यांच्या बाबतींत योग्य ठरेल. कारण तीच एक भाषा त्यांना समजूं शकते. आणि असें केलें तरच या राष्ट्रांची कांहीं धडगत आहे अशी विचारसरणी आहे.

एकदां आपण ही विचारसरणी मान्य केली म्हणजे मग कम्युनिस्ट आक्रमणाचें फारसें भय राहात नाहीं. अर्थात् अण्वस्त्रांच्या हल्याचा धोका नजरेआड करतां येणार नाहीं. पण त्याच्याबरोबर हेंही खरें कीं, या हल्याचा देखील नसता बागूलबोवा करतां कामां नये. कम्युनिस्टांकडून असा हल्ला झालाच तर त्याचा तितक्याच निर्धारानें प्रतिकार करण्याची स्वतंत्र जगानें जय्यत तयारी ठेवली पाहिजे. आणि मग कम्युनिस्टांची मुळीं अणुबाॅंब टाकण्याची छातीच होणार नाहीं. गेल्या दहा वर्षांतील घटनांची नीट छाननी केली तर आपल्याला स्पष्टपणें असें दिसून येईल कीं, सोव्हिएट रशियाचा खरा भर उसनें अवसान आणून दुसऱ्याला घाबरवून सोडण्यावरच असतो. वस्तुतः रशियाचें सामर्थ्य भासविलें जातें त्यापेक्षां खूपच कमी आहे. आणि म्हणूनच बर्लिनमधील लोकांना विमानांच्या साहाय्यानें आपण मदत केली, तशीं आव्हानें ज्या ज्या वेळीं रशियाला दिलीं गेलीं त्या त्या वेळीं प्रत्यक्ष युद्धांत उतरण्याची रशियानें हिंमत दाखविलेली नाहीं. या वस्तुस्थितींत अद्यापहि फारसा फरक पडलेला नाहीं. अचानकपणें अणुहल्ला करून रशियाला सुरुवातीला कांहीं फायदा करून घेतां येईल, पण अमेरिका आणि स्वतंत्र जग यांच्याबरोबर दीर्घकालपर्यंत युद्ध करीत राहावें लागलें तर त्याचा परिणाम काय होईल तें रशिया पुरतेपणीं जाणून आहे. यावरून आपल्यापुढील मार्ग साहजिकच सुस्पष्ट होतो; आणि तो म्हणजे कम्युनिस्टांचा ध्येयवाद ही निव्वळ धूळफेक आहे हें ओळखून आपली सर्व शक्ति स्वतंत्र जगाचें लष्करी सामर्थ्य वाढवून तें संघटित करण्याकडे लावणें हाच होय. आपण आपलें

लष्करी प्रभुत्व टिकवून धरूं शकलों तर कम्युनिस्ट तत्वज्ञानाचा त्यापुढें कसलाही पाड लागणार नाहीं.

परंतु दुर्दैवानें ही विचारसरणी वरवर पहातां वाटते तितकी वास्तववादी नाहीं. सोव्हिएट पुढाऱ्यांना दरोडेखोर, गुंड अशा संज्ञा देण्यामुळें कदाचित् आपल्याला भावनात्मक आनंद लाभूं शकेल. कदाचित् तीं विशेषणें अगदीं अन्वर्थकहि असतील; परंतु त्यामुळें कम्युनिझमचें सत्यदर्शन मात्र खासच होऊं शकत नाहीं.

कम्युनिस्टांकडून उपयोगांत आणल्या जाणाऱ्या पाशवी शक्तिसंबंधीं एकदम घाईघाईनें कोणतेहि निष्कर्ष काढण्यापूर्वीं ते आपलें सामर्थ्य किंवा शक्ति कोणत्या उद्देशानें वापरतात असा प्रश्न आपण स्वतःला विचारला पाहिजे. आणि त्या प्रश्नाचा विचार करूं लागलों कीं, आतापर्यंतचे ऐतिहासिक दाखले या बाबतींत उपयोगी पडण्यासारखे नाहींत असें आढळून येईल. ब्रिटिशांनीं आरमाराच्या जोरावर कांहीं काळ शांतता व सुव्यवस्था टिकवून धरली होती, परंतु तसें करण्याचा कम्युनिस्टांचा इरादा दिसत नाहीं. त्याचप्रमाणें सत्तेच्या समतोलाच्या परंपरागत तत्त्वावरहि त्यांचें धोरण आधारलेलें दिसत नाहीं. हिटलरप्रमाणें वंशश्रेष्ठत्वाचा किंवा मुसोलिनीप्रमाणें वासाहतिक विस्ताराचा त्यांना हव्यास आहे असेंहि दिसत नाहीं. तसेंच कम्युनिस्ट हे ज्युलियस सीझरच्या मार्गानें आपलें साम्राज्य उभारायला निघाले आहेत किंवा नेपोलियनप्रमाणें लढाया मारून ते जग जिंकायला सिद्ध झाले आहेत असेंहि म्हणतां येणार नाहीं. कम्युनिस्टांकडून केल्या जाणाऱ्या शस्त्रबळाच्या वापराचें वरील इतिहासप्रसिद्ध उदाहरणांशीं अनेक बाबतींत साम्य आहेसें दिसेल. किंबहुना ह्या ना त्या प्रकारें त्यांचें ह्या सर्वच उदाहरणांशीं साम्य आहे असें म्हणतां येईल. सत्तेची इतकी हाव असलेलें आणि आपलें साम्राज्य वाढविण्यासाठीं इतकें हापापलेलें राष्ट्र सोव्हिएट रशियाखेरीज अन्य कोणतेंहि अजूनपर्यंत झालें नसेल असेंहि म्हणतां येईल. तथापि ऐतिहासिक घटना, सोव्हिएट युनियनचें जाहीर झालेलें धोरण, सोव्हिएट नेत्यांचे लेख किंवा वारंवार त्यांचेकडून होत असलेलीं ठाशीव वक्तव्यें यांपैकीं कशाचाच वरील ऐतिहासिक उदाहरणांशीं मेळ बसत नाहीं. या सर्वांची बारकाईनें छाननी करणाऱ्या अभ्यासकाला शेवटीं असाच निष्कर्ष काढावा लागतो कीं, पाशवी

सामर्थ्याचा उपयोग करण्यामागें असलेला कम्युनिस्टांचा हेतु इतरांपेक्षां सर्वस्वी भिन्न आणि त्यांच्यापेक्षांहि तितकाच कुटिल आहे.

कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाच्या थोर उद्गात्यांच्या घोषणा ऐकल्या कीं, लष्करी सामर्थ्यावर प्रामुख्यानें भिस्त ठेवणारांची सारी बाजूच ढासळून पडते, कारण थेट मार्क्सपासून स्टालीनपर्यंतचे कम्युनिझमचे प्रवक्ते एकमुखानें असाच निर्वाळा देत आले आहेत कीं, मानवाचीं मनें जिंकून घेणें कम्युनिझमला अगदीं शक्य असून तशीं 'तीं' जिंकून घेतल्याशिवाय कम्युनिझम कधींहि राहणार नाहीं. निदान कम्युनिस्ट पुढाऱ्यांची तरी खासच अशी धारणा असते कीं, त्यांची खरी शक्ति अमेरिकन लोक ज्याला कमी लेखतात, त्या कम्युनिस्ट सिद्धांतांतच आहे. यावर अनेक जण असें म्हणतील कीं, कम्युनिस्ट पुढारीपण हें बौद्धिक आणि नैतिक दृष्ट्याहि अत्यंत भ्रष्ट असें असल्यामुळें ते पुढारी जें म्हणतात त्यावर विश्वास ठेवण्याचें कारण नाहीं. कदाचित् तसें असेलहि, परंतु जगाच्या संस्कृतीचें भवितव्य ज्यावर अवलंबून आहे असें धोरण आखतांना आपलीं गृहीत कृत्यें बरोबर आहेत किंवा नाहींत तें तपासून पाहणें अगत्याचें आहे. कम्युनिस्ट शस्त्रबळावर विशेष भर देतांना आढळतात. त्यामुळें शस्त्रबळाखेरीज इतर कशाचीच त्यांना पर्वा नसावी असा आपला ग्रह होणें स्वाभाविक आहे. जरूर पडतांच शस्त्रबळाचा वापर करण्याला कोणताहि 'सच्चा' कम्युनिस्ट मागेंपुढें पाहणार नाहीं. परंतु त्याजबरोबर तसें करतांना तो कम्युनिस्ट तत्वज्ञानाचा हवाला दिल्याशिवायहि रहाणार नाहीं. वस्तुतः स्वतंत्र जगापेक्षां कम्युनिस्ट जगांतच तत्त्व आणि व्यवहार याची अधिक सांगड घातलेली आढळून येते. त्यामुळें कम्युनिस्टांच्या तत्त्वप्रणालीकडे तुच्छतेनें पाहणें अत्यंत मूर्खपणाचें ठरेल.

कम्युनिस्ट तत्त्वप्रणाली ही कार्ल मार्क्स् आणि फ्रेड्रीक एंगेल्स ज्याला 'विरोधविकासवाद' अशी संज्ञा देतात त्या तत्त्वज्ञानाच्या सिद्धांतावर आधारलेली आहे. शंभर वर्षांपूर्वीं त्या दोघांनीं हा विरोधविकासवादाचा सिद्धांत मांडला. हा सिद्धांत जितका ठोकळेबाज तितकाच अनाकलनीय आणि सर्वसामान्य माणसाच्या ग्रहणशक्तीच्या पलीकडचा आहे. अमेरिकन लोक तर कम्युनिस्टांच्या वारेमाप विसंगत बडबडींतला आणि थापेबाजींतलाच

तो एक प्रकार आहे असें म्हणून त्याची वासलात लावतात. परंतु वस्तुस्थिति मात्र अशी आहे कीं, विरोधविकासवाद ही इतिहासांतील एक फार मोठी बौद्धिक आणि नैतिक शक्ति होऊन बसली आहे. तो कांहीं केवळ धूळ खात पडलेला शुष्क तात्त्विक काथ्याकूट राहिलेला नाहीं. विसाव्या शतकांतील विचारवंतांवर प्रभाव पाडणारी अशी ती एक तत्त्वप्रणाली असून त्यांच्या विचारसरणींतील मूलभूत कल्पना आणि त्यांचे अभिप्राय यांवर विरोधविकासवादाचा प्रचंड पगडा बसलेला आहे. विरोधविकासवादाची व्याप्ति थेट आंतरराष्ट्रीय क्षेत्रांपर्यंत भिडली असून त्याचा पगडा जगांतील सर्व बौद्धिक क्षेत्रांत दिसून येतो. प्रत्यक्ष व्यवहारांत त्याचे परिणाम अत्यंत आक्रमक व भयानक स्वरूपाचे असे होतात. आणि एकदां का या विरोधविकासवादाच्या कचाट्यांत सांपडलें कीं, मग त्यांतून कधींच बाहेर पडतां येत नाहीं.

आजच्या परिस्थितीचें विवेचन करतांना आपल्याला विरोधविकासवादाचा सिद्धांतदेखील विचारांत घ्यावा लागेल. या पुस्तकाच्या तिसऱ्या भागांत त्याचा उहापोह केला आहे. जरासा ठोकळेबाजीचा धोका पत्करून देखील तूर्त त्याचा त्रोटक आढावा घेतला तरी चालण्यासारखें आहे. पाश्चात्य जगांत आणि विशेषतः अमेरिकेंत, मानवाची विरोधविकासवादी कल्पना स्पष्ट करतांना कांहीं रूढ तत्त्वांचा अवलंब केला जातो. विरोधविकासवादाच्या दृष्टीनें पाहतांना व्यक्तीचें समाजांतील स्थान हें कांटेकोर शिस्तीच्या चौकटींत ज्याचा कारभार चालतो अशा वारुळांतील एकाद्या मुंगीप्रमाणें असतें. विरोधविकासवादानुसार शासन व्यवस्थेंत माणसाला एकाद्या निर्जीव यंत्रापेक्षां जास्त किंमत उरत नाहीं असें आपण समजतों. परंतु विरोधविकासवादाच्या अनुरोधानें व्यक्तीचें वास्तव स्थान निश्चित करावयाचें असेल तर, केवळ अशा तऱ्हेच्या ढोबळ गृहीत कृत्यांवर विसंबून भागणार नाहीं. अर्थात् तीं गृहीतकृत्यें अजिबात चुकीचीं आहेत असें नाहीं. म्हणूनच आपल्या तात्पुरत्या विवेचनासाठीं त्यांचा आधार घ्यावयास हरकत नाहीं. आपल्याला असें म्हणतां येईल कीं, विरोधविकासवादी सिद्धांतानुसार कल्पिलेली व्यक्ति ही आपण ज्याला अमानुष म्हणून संबोधतों त्या वर्गांत मोडते. तसेंच मानवाचें कल्याण किंवा स्वातंत्र्य यालादेखील त्या कल्पनेनुसार नेमका उलट

अर्थ प्राप्त होतो. हा सिद्धांत मानावयाचा तर मानवाचें अकल्याण म्हणजेच कल्याण आणि जुलूमजबरदस्ती म्हणजे मानवी स्वातंत्र्य असेंच मानावें लागेल. खालीं डोकें वर पाय अशी स्थिति त्याला प्राप्त होते. मानवासंबंधींच्या पाश्चात्यांच्या कल्पनांना नेमकें उलट स्वरूप दिलें म्हणजे विरोधविकासवादी सिद्धांताला अभिप्रेत असलेली व्यक्ति आपल्या डोळ्यांपुढें उभी राहते. साहजिकच अशी व्यक्ति ही आपल्या जगाच्या विध्वंसाची पुरस्कर्ती ठरते. पृथ्वीवर जर अशा व्यक्तीचें प्रभुत्व प्रस्थापित झालें तर मानवासंबंधींच्या आपल्या कल्पना कधींच टिकूं शकणार नाहींत.

विरोधविकासवादी व्यक्तींचीं दोन प्रमुख लक्षणें आपण समजावून घेतलीं पाहिजेत. विरोधविकासवाद मान्य करणारे त्याकडे सर्वंकष विचारसरणी म्हणून बघतात. आणि तो सिद्धांत मानणारांनीं केवळ मानसिक किंवा वैचारिक दृष्ट्या तो मान्य करून चालणार नाहीं तर त्यांचें सारें जीवन त्यानें व्यापून टाकलें पाहिजे, अशी अपेक्षा केली जाते. एवढ्याचसाठीं पुष्कळवेळां असें मानण्यांत येतें कीं, कट्टर विरोधविकासवाद्यांना इतरांपासून अलग केलें तर विरोधविकासवादाला पायबंद बसेल. परंतु हें खरें नाहीं. कारण वस्तुस्थिति अशी आहे कीं, विरोधविकासवादाच्या पाठीमागें असलेल्या कल्पना या केवळ कम्युनिझम पुरत्याच मर्यादित नाहींत. तसें पाहिलें असतां विसाव्या शतकांतील सर्वच विचारसरणीवर त्या कल्पनांचा प्रभाव पडल्याचें दिसून येतें. इतर बाबतींत ज्यांचा कम्युनिस्ट विचारसरणीला सक्त विरोध असतो, अशा करोडों लोकांचें बौद्धिक जीवन या कल्पनांनीं व्यापून टाकलें आहे. आपल्याला असें दिसून येईल कीं, या तत्त्वज्ञानाला विरोध करण्याच्या बाबतींत जेथें तीव्र भावनोत्कटता दिसून येते अशा अमेरिकेंतदेखील विरोधविकासवादाला जन्म देणाऱ्या विचार पद्धतीचा आपल्या समाजावर आणि आपण काढीत असलेल्या निष्कर्षांवरहि फार मोठा परिणाम घडून आला आहे. अनेक बाबतींत पाश्चात्य विचारवंत विरोधविकासवावादी सिद्धांताला परिणामकारक उत्तर देऊं शकत नाहींत, कारण त्यांची विचारसरणीदेखील कित्येक बाबतींत विरोधविकासवादी सिद्धांतातील प्रमेयांवरच आधारलेली असते. कम्युनिझमला विरोध असणाऱ्या राजकीय

गटांचादेखील कम्युनिस्ट अनेकदां पाठिंबा मिळवूं शकतात, कारण व्यक्ति आणि तिचें जगांतील स्थान या संबंधींचीं त्यांचीं मतें अशीं बनलेलीं असतात कीं, ते त्यांना विरोध करूंच शकत नाहींत.

'विरोधविकासवादी व्यक्ति'च्या दुसऱ्या वैशिष्ट्याचा विचार करूं लागतांच आपण कम्युनिस्ट जो पाशवी सामर्थ्याचा उपयोग करतात त्याकडे येतों. त्या ठिकाणीं आपण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, विरोधविकासवादाला अभिप्रेत असलेली व्यक्ति हा एक अमूर्त आदर्श आहे. तो अद्यापपर्यंत साकार झालेला नाहीं. अशी व्यक्ति अद्यापपर्यंत अस्तित्वांतच आलेली नाहीं. हळूंहळूं ती अस्तित्वांत येऊं पाहत आहे. आपण विरोधविकासवादी व्यक्ति झालों आहों म्हणजे विरोधविकासवादाला अभिप्रेत असलेलीं व्यक्तिचीं सर्व लक्षणें आपल्या ठिकाणीं आलीं आहेत असा दावा फारच थोड्या व्यक्ति करूं शकतील. अशा निवडक व्यक्तींत कम्युनिस्ट आंदोलनाला उघड किंवा प्रच्छन्नपणें नेतृत्व पुरविणाऱ्या कम्युनिस्टांतील प्रख्यात व्यक्तींचा अंतर्भाव होतो. दैनंदिन जीवनांत आढळणाऱ्या सर्वसामान्य व्यक्तींचें विरोधविकास वादी आदर्शांत रूपांतर घडवून आणण्याच्या दूरगामी प्रयत्नांत सारें कम्युनिस्ट जग गढून गेलें आहे. आणि मुख्यतः एवढ्याचसाठीं कम्युनिस्टांकडून सामर्थ्याचा, हिंसेचा उपयोग केला जातो. सामर्थ्याचा उपयोग करण्यामागें कम्युनिस्टांचे जे हेतु आहेत ते आजपर्यंतच्या रूढ हेतूंपेक्षां निराळे आहेत. तत्त्वज्ञानांतील आदर्श प्रत्यक्ष मूर्त स्वरूपांत उतरविण्यासाठीं ते सामर्थ्याचा अवलंब करतात. त्यामुळें साहजिकच हें पाशवी सामर्थ्य कौशल्यानें व निर्धार-पूर्वक वापरलें गेलें तर माणसांत परिवर्तन घडून येईल, आणि 'विरोध-विकासवादी व्यक्ति'चा आदर्श निर्माण होऊं शकेल.

परंतु एवढ्यानेंदेखील हें विवेचन पूर्ण होत नाहीं. पाशवी सामर्थ्याच्या सिद्धांताचें संपूर्ण आकलन करून घ्यावयाचें असेल तर आणखीं थोडें पुढें जाऊन पाश्चात्यांना गोंधळांत टाकणाऱ्या इतर बाबींचाहि विचार केला पाहिजे. माणसामध्यें आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याचा कम्यु-स्टांनीं जो एवढा चंग बांधला आहे तो कांहीं केवळ एखादें विशिष्ट ध्येय साध्य व्हावें म्हणून नव्हे तर आपला विरोधविकासवादाचा सिद्धांत बिनचूक आहे, हें सिद्ध करून दाखवण्यासाठींच. कम्युनिस्ट आपल्या सामर्थ्याचा

उपयोग कशासाठीं करतात, त्यामागें त्यांचा अंतस्थ हेतु काय असतो हें पाश्चात्यांच्या नीट लक्षांत येऊं नये यांत फारसें आश्चर्य नाहीं. पाश्चात्य समाजाची घडण घडविण्यांत तत्त्वज्ञानांतील निरनिराळ्या विचारसरणींचा फार मोठा हात आहे. आणि जराशा भोंगळ शब्दांत बोलावयाचें झाल्यास असेंहि म्हणतां येईल कीं, विशिष्ट तत्त्वज्ञानाच्या पुरस्कारामुळेंच अनेकदां जगांत हिंसा आणि विजिगीषा निर्माण झाली आहे. परंतु एखाद्या तत्त्वज्ञानाच्या प्रसारासाठीं हिंसेचा अवलंब केला जावा किंवा हिंसा हा वादपद्धतीचाच एक भाग बनावा हें पाश्चात्यांना समजूंच शकत नाहीं. पाश्चात्य देशांत प्रत्यक्ष कृतीवर विशिष्ट कल्पनांचा किंवा विचारांचा प्रभाव पडल्याचीं अनेक उदाहरणें सांपडतात. परंतु त्या कल्पना किंवा ते विचार लोकांच्या गळीं उतरविण्यासाठीं वादविवादाऐवजीं हिंसेचा अवलंब केलेला मात्र आपल्याला खपत नाहीं. पण या परिभाषेंत विचार केला तरच सोव्हिएट पद्धतींतील पाशवी सत्तेला इतकें महत्त्वाचें स्थान कां प्राप्त झालें आहे त्याचा उलगडा होणार आहे. दहशत हेंच मुळीं त्यांचें प्रतिपादन असतें. त्याचप्रमाणें हेरगिरी करणें, धरपकड करणें, हवे तसे कबुली जबाब लिहून घेणें, 'पक्षाच्या धोरणापासून तत्त्वच्युत झालेल्याची सुधारणा करणें,' भूतकाळांतील घटनांचें नांवनिशाणदेखील नष्ट करून टाकणें, आणि स्वतःला अप्रिय वाटणाऱ्या विचारसरणींचा नायनाट करणें हादेखील त्यांच्या वादविवादपद्धतीचाच एक भाग असतो. पाशवी सामर्थ्याचीं हीं सर्व साधनें वापरण्यामागील हेतू एकच असतो. आणि तो म्हणजे विरोधविकासवादी सिद्धांताच्या सांच्यांत इतिहास बसवून दाखविणें किंवा हिंसेच्या जोरावर त्या सिद्धांताचा प्रचार करून त्याची सत्यता पटवून देणें.

साहजिकच हिंसेचा प्रत्यक्ष अवलंब करण्यामागें किंवा तसा धाक दाखवण्यामागें कम्युनिस्टांचा काय हेतु असतो हा प्रश्न शिल्लकच राहतो. केवळ लष्करी दृष्टयाच याचा विचार करून भागत नाहीं, तर सर्व माणसांना एक साचेबंद स्वरूप देण्याची कम्युनिस्टांची जी क्रांतिकारी धडपड चालू असते तीहि आपल्याला विचारांत घ्यावी लागेल. कम्युनिस्टांच्या या धडपडीचें मूल्यमापन जर आपण अचूकपणें करूं शकलों नाहीं तर आपल्या शत्रूचें नेमकें स्वरूप काय आहे तेंच मुळीं आपल्या ध्यानांत येणार नाहीं.

कारण एकादें विशिष्ट राष्ट्र किंवा त्याचें लष्कर हा कांहीं आपला खरा शत्रू नव्हे. तसेंच विशिष्ट शासनपद्धति ही आपली शत्रू आहे असेंहि नाहीं. आपला खरा शत्रू म्हणजे माणसासंबंधींची ही विशिष्ट कल्पना. अर्थात् सोव्हिएट सरकार गडगडलें तर कम्युनिस्ट क्रांतीला फार मोठा पायबंद बसेल यांत कांहींच शंका नाहीं. तथापि आपण त्यावर फारशी भिस्त ठेवून चालणार नाहीं.सोव्हिएटचा पाडाव झाल्यामुळें मानवजातीला विशिष्ट साच्यांत बसविण्याच्या धडपडीला कदाचित् तात्पुरता आळा बसेलहि. परंतु तेवढ्यानें ती कल्पना समूळ नष्ट होऊं शकणार नाहीं. आपण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, विरोधविकासवादी व्यक्तीचा उगम कांहीं रशियांत झालेला नाहीं. विरोधविकासवादी कल्पना ज्यांनीं आत्मसात केल्या आहेत अशा व्यक्ति रशियांत सत्ताधारी बनल्या असल्या तरी त्यांनीं नद्या किंवा पर्वतराजी ह्यांना सीमा म्हणून कधींच मान्यता दिली नाहीं. कारण ‘ विरोधविकासवादी व्यक्ति ’ क्रेमलिनपुरती मर्यादित नाहीं तर सारी मानवजात ही तिची व्याप्ति आहे. माणसाचें मन हेंच तिचें वसतिस्थान आहे. जवळ जवळ गेलीं शंभर वर्षें ती या मानवी जगांत वसति करून आहे. जगांतील सर्व समाजांत तिनें आपला शिरकाव करून घेतला आहे. कोठल्याहि ( देशाच्या ) मर्यादा ओलांडावयाचें तिनें बाकी ठेवलें नाहीं. कोट्यावधी लोकांच्या विचारसरणींवर तिनें आपला पगडा बसविला आहे. आणि ही व्यक्ति जेथें जेथें जाते तेथें तेथें तिच्याभोंवतीं तिच्या सग्यासोयऱ्यांचें कडें पडलेलेंच असतें. एक नांव सोडलें तर बाकी सर्व बाबतींत त्यांचें या व्यक्तिशीं तंतोतंत साम्य असतें. विरोधविकासवादी कल्पनांच्या तालमींत तयार झालेल्या प्रचंड सैन्याला आपल्याला कोणत्या क्षणीं तोंड द्यावें लागेल त्याचा नेम सांगवत नाहीं हें खरेंच आहे, पण विरोधविकासवादांतील मूळ कल्पनेशींच आपल्याला दोन हात करावे लागणार आहेत, हें त्याहून महत्त्वाचें आहे. जगाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यापर्यंत जेथें जेथें म्हणून आपली दृष्टी पोहोचूं शकेल अशा प्रत्येक आघाडीवर तिचा मुकाबला करण्यासाठीं आपल्याला ‘ सदैव ’ सिद्ध रहावें लागणार आहे हें निश्चित.

सोव्हिएट रशियाच्या अंतर्गत राजकारणांत सत्तास्पर्धेचा बुजबुजाट झालेला असून हातघाईवर आलेल्या महत्त्वाकांक्षी व्यक्तींच्या आपसांतील संघर्षाचाच तो एक प्रकार आहे अशी पाश्चात्य देशांतील निरीक्षकांची पुष्कळदां समजूत

होते. विशेषतः स्टालीनच्या मृत्यूनंतर तर या सत्तास्पर्धेमुळें सोव्हिएट युनीयनच्या धोरणांत अनेक फेरबदल घडून आले. अर्थात त्यापैकीं कांहीं स्वतंत्र जगाला दिलासा वाटावा असेच होते. तथापि 'विरोधविकासवादी व्यक्ती'च्या मुळाशीं असलेल्या कल्पनेसंबंधीं आपण विचार करूं लागलों तर आपल्यापुढें असा प्रश्न पडतो कीं, स्वतंत्र जगाला दिलासा वाटावा असें या फेरबदलांत नेमकें काय आहे? 'विरोधविकासवादी व्यक्ती'ची शक्ति तर थोडीसुद्धां कमी झालेली आढळत नाहीं. क्रेमलीनमधून होणाऱ्या कांहीं लोकांच्या हकालपट्टीचें धोरण हें सर्वस्वी वैयक्तिक स्वरूपाचें बनलें असून त्यामुळें सोव्हिएट युनियनच्या ध्येय धोरणाला सुरुंग लागत चालला आहे, असें आपल्याला वाटण्याचा संभव आहे. परंतु हा "विरोधविकासविरोधी" दृष्टिकोन झाला. पूर्वीं पौर्वात्य देशांत ज्याप्रमाणें राजा हाच विष्णूचा अवतार मानण्यांत येई त्याप्रमाणें सध्यां ज्याच्या हातीं सोव्हिएट सत्तेचीं सूत्रें असतात तोच 'विरोधविकासवादी व्यक्तीं'चें प्रतीक बनलेला असतो. त्यामुळें तो सत्ताधीश जें कांहीं करतो तें तो व्यक्तिशः त्याच्यासाठीं म्हणून करीत नाहीं. एखाद्या कलावस्तूची "भांडवलदारी" म्हणून तो हेटाळणी करो, किंवा आपल्या एखाद्या कच्च्या प्रतिस्पर्ध्याला विश्वासघातानें नेस्तनाबूद करो. त्यामुळें तो इतिहासाला विरोधविकासवादी वळणच देत असतो तशी त्याची दृढ श्रद्धा असते.

थोडक्यांत म्हणजे 'विरोधविकासवादी व्यक्ति' मागील कल्पना हीच आजच्या काळांतील रहस्य समजावून घेण्याची एकमेव गुरुकिल्ली आहे. ही गुरुकिल्ली गवसल्याशिवाय आपल्याला दूरगामी आणि कायम स्वरूपाचें धोरण ठरविणें अशक्य होणार आहे. 'विरोधविकासवादी व्यक्ति'चा मुकाबला नुसत्या लष्करी सामर्थ्याच्या जोरावर करतां येणार नाहीं. कल्पनांचा मुकाबला कल्पनाच करूं शकतील, म्हणून 'विरोधविकासवादी व्यक्ति' मागील कल्पना हाणून पाडावयाच्या असतील तर त्या कल्पनांऐवजीं मानवासंबंधीच्या नव्या कल्पना प्रसृत केल्या पाहिजेत आणि त्या इतक्या प्रभावी असल्या पाहिजेत कीं, 'विरोधविकासवादी' कल्पनांवर त्यांना मात करतां आली पाहिजे. निराळ्या शब्दांत सांगावयाचें तर खरा प्रश्न लष्करी स्वरूपाचा नसून तो मूलतः तात्त्विक आहे.

* * *

# ४ : : स्वातंत्र्याची गळचेपी

अशा तऱ्हेनें केवळ फसव्या घोषणा आणि अत्यंत कौशल्यानें रचलेले डावपेंच यांना आपल्याला तोंड द्यावयाचें नसून कम्युनिस्टांनीं प्रतिपादलेल्या जीवनविषयक मुलभूत कल्पनांच्या जागीं नवीं जीवनमूल्यें कशीं रुजवितां येतील या प्रश्नाला अमेरिकेला तोंड द्यावयाचें आहे हें लक्षांत येईल. आणि नेमकें याच ठिकाणीं अमेरिकनांना अपयश आलें आहे.

या बाबतींत अमेरिकनांना केवढा मोठा पराभव पत्करावा लागत आहे हें रशियाच्या प्रचारतंत्रावरून सहज दिसून येईल. त्या प्रचारतंत्राचें एक प्रमुख वैशिष्ट्य असें आहे कीं, एखाद्या नव्या तत्त्वाचा पुरस्कार करण्या-ऐवजीं ते पाश्चात्यांच्या जुन्या कल्पनांचाच आपल्या प्रचारासाठीं उपयोग करून घेत असतात. उदा० पाश्चात्य संस्कृतींत 'सत्याची' महति फार मानली जाते. सत्यकथन आणि सत्यसंशोधन यावर आपली मोठी भिस्त असते. सत्याची प्रतिष्ठा राखली गेली नाहीं तर स्वातंत्र्यामागच्या आपल्या साऱ्या कल्पनाच अर्थशून्य ठरतील. परंतु कम्युनिझमची गोष्ट तशी नाहीं. स्वतःचें उद्दिष्ट साध्य करून घेण्यासाठीं खऱ्याचें खोटें करायला कम्युनिस्टांची केव्हांही तयारी असते, आणि त्यांचा प्रचार तर नेहमींच असत्यावर आधारलेला असतो. तरीदेखील कांही बाबी त्यांत अशा असतात कीं, ज्याबद्दल आपण अत्यंत दक्षता बाळगली पाहिजे. कम्युनिस्टांचा प्रचार निखालस खोटा असला तरी तो अत्यंत कौशल्यानें केलेला असतो, आणि ते जें असत्य पसरवीत असतात त्याचा धागा विकृत स्वरूपांत कां होईना, पण कोठल्या तरी सत्य घटनेशीं जोडलेला असतो. परंतु त्या सत्याला कित्येक वेळीं इतकें विकृत स्वरुप दिलेलें असतें कीं त्यांतील मूळ सत्यांश कोठल्या कोठें गडप होऊन गेलेला असतो. परंतु खोलांत शिरून त्या विकृत प्रचाराची नीट छाननी केली तर सत्याशीं जोडलेला त्याचा बादरायण संबंध हटकून सांपडतो. पण कम्युनिस्टांना जर जाणून बुजून असत्य प्रचारच करावयाचा असतो तर त्याचा सत्याशीं दुरान्वयानें कां होईना पण संबंध जोडण्याची एवढी उठाठेव ते कां करतात? याचें उत्तर एवढेंच आहे कीं, सत्याचा मुलामा दिला म्हणजे कोणताहि प्रचार अधिक

प्रभावी ठरूं शकतो. प्रत्येक मनुष्याच्या मनांत सत्याविषयीं आदर वसत असतो हें जगांतील सर्वच निष्णात प्रचारक जाणून असतात. मानवी स्वभावाचा हा पैलू प्रचार करतांनादेखील नजरेआड होऊं देतां कामा नये, याची त्यांना जाणीव असते असें आपल्याला दिसून येईल. मानवी मनाला असलेली ही सत्याची ओढ आपल्या प्रचारामुळें नष्ट न होऊं देतां उलट तिचाच उपयोग करून आपल्या असत्याचा डोलारा उभा करावयाचा हें प्रचारकांचें तंत्र असतें. अशा तऱ्हेनें सत्याला विकृत स्वरूप देऊन त्यावर असत्याची—अपप्रचाराची इमारत रचली जाते.

एकाद्या गोष्टीला कलाटणी देऊन नेमकें त्याविरुद्ध कांहीं तरी भासविण्याचे अनेक मार्ग असतात. उदा० "लोकशाही" हा शब्द घ्या. अनेक पाश्चात्य विचारवंतांच्या मनांत लोकशाहीच्या इष्टानिष्टतेबद्दल संदेह होता आणि आजहि कांहींच्या मनांत तो आहे. परंतु 'ज्या राज्यपद्धतींत राज्यकारभाराची सारी सत्ता जनतेच्या हातीं असते व तिचा ती प्रत्यक्षपणें वापर करूं शकते अशा स्वरूपाचें सरकार' म्हणजे लोकशाही या (वेब्स्टरनें केलेल्या) लोकशाहीच्या व्याख्येबाबत कोणाच्याच मनांत कधीं संशय निर्माण झालेला नाहीं.

परंतु कम्युनिस्टांनीं 'जनता लोकशाही किंवा लोकशाहीवादी गट' अशीं जीं नाना सोंगें उभीं केलीं आहेत तीं मात्र वस्तुतः पक्कीं हुकूमशाही अधिकारशाहीचींच रूपें आहेत. अशा तऱ्हेनें पाश्चात्यांनीं अत्यंत मोलाच्या वाटणाऱ्या शब्दांची ओढाताण करून त्या शब्दांचा अर्थ त्यांनीं नेमका उलट बनवलेला असतो. 'उदार', 'न्याय', 'शांतता', 'बंधुभाव' इ० कितीतरी शब्द असे दाखवितां येतील कीं, ज्यांचा अर्थ कम्युनिस्टांनीं उफराटा करून टाकला आहे. विरोधविकासवादाचा आसरा घेऊन, स्वातंत्र्याच्या उपासकांना प्रिय वाटणाऱ्या शब्दांचा उपयोग स्वातंत्र्याचे हे कट्टे वैरी स्वतःच्या हेतुपूर्तीसाठीं करून घेत असतात. राजकीय विमोचन साध्य करून घेण्यासाठीं पाश्चात्य नागरिकांनीं जो दीर्घकालीन लढा दिला त्यामागील मूलभूत कल्पनांच्या आधारावरच यांचा विरोधविकासवादी सिद्धांत प्रगति करीत असतो. सत्याप्रमाणेंच या कल्पनांचें आवाहनहि अत्यंत परिणामकारक ठरूं शकतें, कारण त्यांचा उगम माणसाच्या मूलभूत आशाआकांक्षांत आणि

गरजांत असतो. म्हणून ज्याला आधुनिक जगावर प्रभुत्व गाजवावयाचें असेल, त्यानें या कल्पनांचा उपयोग करून घेतलाच पाहिजे.

प्रचारासाठीं पाश्चात्यांच्या कल्पना वेठीला धरण्याचे त्यांचे आणखीहि कांहीं मार्ग आहेत. जेव्हां जेव्हां पाश्चात्य जगाबरोबर संघर्ष निर्माण होतो तेव्हां तेव्हां पगडी फिरवून पाश्चात्यांना प्रिय असणाऱ्या मूल्यांचा डांगोरा पिटीत सुटावयाचें ! सोव्हिएट राज्यपद्धतींत भाषण-स्वातंत्र्याची संपूर्ण गळचेपी होत असतांना पाश्चात्य राष्ट्रांत भाषण-स्वातंत्र्याच्या तत्त्वाला हरताळ फासला जातो अशी हाकाटी कम्युनिस्टांकडून केली जाते. एकीकडे लक्षावधी ज्यूंची हाकालपट्टी करण्याचा निर्णय सोव्हिएटमधील सत्ताधारी घेत असतांनाच दुसरीकडे पाश्चात्य राष्ट्रांतील जनता ज्यू लोकांविषयींच्या विद्वेषानें पछाडली गेली आहे, अशा प्रकारच्या प्रचाराला पूर आलेला असतो. सोव्हिएट राज्यपद्धतींत अल्पसंख्याकांची ससेहोलपट होत असते, तर तिकडे त्यांचा प्रचार मात्र नागरिक हक्कासाठीं चाललेला असतो. कम्युनिस्ट राजवटींत न्यायदानाचे सारे संकेत सर्रास पायदळीं तुडविले जातात, पण दुसऱ्या देशांत एकाद्या कम्युनिस्टावर देशद्रोहाचा आरोप करण्यांत आला तर मात्र येथून तेथून सारे कम्युनिस्ट लगेच 'न्याय द्या', 'न्याय द्या' म्हणून किंचाळूं लागतात. पाश्चात्य कल्पनांचा उपयोग करून घेतल्याशिवाय आपणाला सत्ता बळकावतां येणार नाहीं, याची सोव्हिएट अधिकाऱ्यांना बरोबर कल्पना आहे हेंच यावरून सिद्ध होतें. आपल्या प्रचाराला पाश्चात्य कल्पनांचा मुलामा चढविला नाहीं तर सोव्हिएट जगाबाहेर कोणीहि त्यावर विश्वास ठेवणार नाहीं आणि ॲडॉल्फ हिटलरच्या प्रचाराची जर्मनीबाहेरील जनतेनें जी संभावना केली तीच आपल्याहि प्रचाराची गत होईल हें ते जाणून असतात. सोव्हिएट सत्तेच्या विस्तारासाठीं अशाप्रकारें पाश्चात्य तत्त्वांचा वापर करणें अपरिहार्य आहे, कारण त्यायोगेंच जनतेचीं मनें जिंकून घेतां येतात.

आज स्वतंत्र जगाच्या निदर्शनाला जर कांहीं येत असेल तर तें म्हणजे एक प्रकारचा तात्त्विक अत्याचार. कम्युनिस्टांकडून होणाऱ्या आक्रमणांतील आक्रमक आपल्याला उघड स्वरूपांत दिसूं शकणार नाहींत, आणि हा आक्रमक सरळ सरळ हल्लाहि करीत नाहीं. तो नुसती दिशाभूल करतो. कम्युनिस्ट

आक्रमक हा कधीं मंदिरावर हल्ला करून तें उध्वस्त करणार नाहीं, तर संत महात्म्यांच्या वेषांत मंदिराच्या गाभाऱ्यांत जाऊन तेथें तो आपलीं अत्याचारी कृत्यें सर्रास चालू ठेवील. आणि एकदां तें मंदिर आंतून पुरतें भ्रष्ट झालें म्हणजे मग तो तें जमीनदोस्त करील. कम्युनिस्ट सत्तेच्या पंखाखालीं सांपडलेल्या प्रत्येक राष्ट्राला त्यांच्या या तंत्राची पुरेपूर ओळख पटलेली आहे, कारण त्यांपैकीं प्रत्येक राष्ट्र हें कम्युनिस्टांनीं चालविलेल्या मानवताद्रोहाला बळी पडलेलें आहे. मानवतेचा जय करतां करतां आपल्या आशाआकांक्षा, आपली संस्कृति, आपण उभ्या केलेल्या निरनिराळ्या संस्था आणि आपलें सरकार हें सर्व कम्युनिस्टांनीं कसें भ्रष्ट करून टाकलें याची त्यांना पुरी प्रचीति आलेली आलेली आहे. पाश्चात्य कल्पना व पाश्चात्य तत्त्वप्रणाली ( यांचें विडंबन करून ) उफराटी करून त्यांत अभिप्रेत असलेल्या उद्दिष्टांच्या नेमक्या उलट उद्दिष्टांसाठीं ती दावणीला बांधण्याचा उपद्व्याप कम्युनिस्ट करीत असतात, तो कांहीं उगीच नव्हे. स्वातंत्र्याचीं मूल्यें जतन करण्याच्या कामीं सोव्हिएट युनियनचा लष्करी पाडाव करूनहि जी कामगिरी आपल्याला बजावतां येणार नाहीं ती बजावल्याचें श्रेय, कम्युनिस्टांची ही प्रतिक्रिया नीट ओळखून तिला पायबंद घालायला आपण शिकलों तर आपल्याला मिळणार आहे. आणि तोच या पुस्तकाचा मुख्य उद्देश आहे. तसें करीत असतांना वरवर पाहतां आपल्या मुख्य उद्दिष्टांशीं ज्यांचा कांहीं संबंध नाहीं अशा अनेक प्रश्नांचा उहापोह करावा लागेल. स्वातंत्र्याच्या मूल्यांचें पुनरुज्जीवव करावयाचें असेल तर आपण त्याची पूर्वपीठिका पुरतेपणीं समजावून घेतली पाहिजे. आणि आपल्याला आपल्या इच्छेविरुद्ध उलट दिशेनें खेचीत नेणाऱ्या शक्ति कोणत्या आहेत तें ओळखून त्यांचा मुकाबला करण्याची तयारी ठेविली पाहिजे.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 43833 वि: विविध
क्रमांक ... नों दि 2/3/67

## ५ : : अमेरिकेची विफलता

परंतु स्वतःच्या फायद्यासाठीं कम्युनिस्टांना आपल्या कल्पनांचा आणि तत्त्वाचा उपयोग तरी कसा करून घेतां येतो? वस्तुतः आपण पाश्चिमात्य लोक हे त्यांचे जनक आहोंत. आपणच त्यांची जोपासना केली आणि त्यासाठीं लढेदेखील दिले. त्यांना आजचें प्रगल्भ स्वरूपदेखील आपणच प्राप्त करून दिलें. त्यामुळें साहजिकच त्या तत्त्वांचे उद्‌गाते म्हणून आपलाच निर्देश व्हावयास पाहिजे. परंतु जगाच्या जवळ जवळ निम्या भागांत याची जाणीव राहिलेली नसल्यामुळें आणि आपल्याच कल्पना स्वतःच्या म्हणून दडपून त्यांचा स्वतःच्या प्रचारासाठीं कम्युनिस्ट उपयोग करून घेत असल्या-कारणानें, वस्तुतः ज्या कल्पनाचें जनकत्व आपणांकडे जावें त्यांचा अर्थ स्पष्ट करण्याच्या कामीं, तसेंच ऐन मोक्याचे वेळीं त्यांचा पाठपुरावा करण्याचे कामीं, आपण असमर्थ ठरलों आहोंत; असा निष्कर्ष अपरिहार्यपणें निघूं लागला आहे. थोडक्यांत म्हणजे जुलूमजबरदस्तीला लोकशाही, गुलाम-गिरीला स्वातंत्र्य, असत्याला सत्य, आणि वाईटालाच चांगलें भासविण्यांत कम्युनिस्टांनीं जें एवढें डोळे दिपविणारें यश मिळविलें आहे त्याचें सारें श्रेय केवळ कम्युनिस्ट प्रचारकांच्या चातुर्याला देऊन चालणार नाहीं. आपली ज्यावर निष्ठा आहे अशा या सर्व उदात्त ध्येयांना साकार करण्याच्या बाबतींत आपण अपयशी ठरलों हेंहि तितकेंच महत्त्वाचें कारण आहे, हें विसरून चालणार नाहीं.

आणि या कामीं आपण अपयशी ठरलों आहोंत याची जाणीव जितकी युरोपियनांना झाली आहे, तितकी ती अमेरिकनांना झालेली नाहीं. याचें कारण असें कीं, राजकीय विचारप्रणालीविषयींच्या आपल्या निष्ठा या स्वयं-सिद्ध आहेत असें आपण धरून चाललेलों असतों. स्वातंत्र्यामागील तत्त्वा-विषयीं आपल्या कल्पना कदाचित् सुस्पष्ट नसतील, परंतु स्वातंत्र्यामागें कांहीं उच्च तत्त्वें आहेत आणि त्यावरच आपलें सारें जीवन आधारलेलें आहे एवढें आपल्याला ठाऊक असतें. आणि स्वातंत्र्याप्रमाणेंच मानवी स्वभावाशीं निगडित असलेल्या व्यक्तींची प्रतिष्ठा, सुखाचा शोध, शिक्षणाची आवश्य-

कता किंवा नैतिक वर्तनासंबंधीचे नैसर्गिक गुण इत्यादि इतर अनेक उदात्त तत्त्वांसंबंधींहि असेंच म्हणतां येईल. मनुष्यस्वभावाच्या या पैलूंवर आपला प्रगाढ विश्वास असून ते विकसित होत जावेत अशीच आपल्या राज्यपद्धतीची घडण आहे. अमेरिकेच्या बाहेर मात्र अशा तऱ्हेचा विश्वास असल्याचें आढळून येत नाहीं. जगांतील इतर लोकांच्या दृष्टीनें आपण ( अमेरिकन ) फार श्रीमंत आणि नशीबवान समजले जातों. परंतु स्वातंत्र्यासंबंधींची आपली तथाकथित तत्त्वप्रणाली त्यांना सहजासहजीं आकलन होत नाहीं. आणि म्हणून जर आपली त्यावर खरोखरीच निष्ठा असेल तर आपण ती इतरांना पटवून देण्याची धडपड केली पाहिजे.

परंतु हीच तर नेमकी अडचण आहे. कारण कसें कुणास ठाऊक, पण याच बाबतींत आपण भोंगळ राहतों. आपल्या जीवनपद्धतीबद्दल आपल्या मनांत नितांत विश्वास वसत असतो. पण जगांतील अन्य लोकांना त्यांत सहभागी करून घेणें मात्र आपल्याला जमत नाहीं. याचा अर्थ असा नव्हे कीं, आपण त्या दृष्टीनें कांहीं प्रयत्नच केला नाहीं. अमेरिकेची तत्त्वप्रणाली विशद करणारीं पुस्तकें आणि निरनिराळ्या मासिकांमधून प्रसिद्ध होणारे लेख यांचा नुसता वर्षाव होत असतो. निरनिराळ्या संस्था स्थापन केल्या जात आहेत. राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रत्येक समारंभांतून वक्तृत्वपूर्ण भाषणें केलीं जात आहेत. अध्यक्ष ट्रूमन यांच्या राजवटीच्या अखेरी अखेरीला तर, आपल्याला अभिप्रेत असलेल्या स्वातंत्र्याच्या ध्येयासाठीं सारें जग एकत्रित करणाऱ्या अमेरिकन तत्त्वप्रणालीचा एक मसुदा बनविण्याची योजना खुद्द सरकारी खात्यामार्फतच हातीं घेण्यांत आली होती.

परंतु या सर्व खटाटोपांतून तादृश असा फायदा फारच थोडा झाला. प्रावाहाच्या उलट दिशेनें होडी वल्हविण्याचा प्रयत्न करण्यांपैकींच तो प्रकार होता. या सर्व प्रयत्नांमुळें आपल्या स्वतःच्या निष्ठा अधिक खंबीर बनल्या असतील, परंतु जागतिक लोकमताचा वारा मात्र झपाट्यानें मॉस्कोच्या दिशेनेंच वाहूं लागला आहे. आपल्या सध्याच्या या प्रयत्नांची निष्फळता आपल्या मित्रांनीं आणि सहकाऱ्यांनींच आपल्या निर्दशनास आणून दिली आहे. फ्रान्सा मोरिॲक हा ले फ्रिगारो या कम्युनिस्ट विरोधी नियतकालिकांत म्हणतो, " अमेरिका आणि सोव्हिएट युनियन यांमधील भेदामुळें आपण

घाबरून जाण्याचें कारण नाहीं तर त्यांच्यांत जें साम्य आढळतें तेंच वस्तुतः भयप्रद आहे. या दोन देशांतील तंत्रज्ञशाह्या ( Technocrocies ) परस्पर विरोधी भासत असल्या तरी परिणामतः मानवाला त्या एकाच दिशेकडे खेचीत आहे. " हें विधान धादांत खोटें आहे, याची अमेरिकनांना जाणीव आहे. पण तें दुसऱ्याला पटवून कसें द्यावयाचें तें मात्र त्यांना उमजत नाहीं. अमेरिकन जीवनप्रणालीचा प्रयोग, त्यांचीं ज्यांनीं स्वप्नें रंगविलीं होतीं त्यांच्या कल्पनेपलीकडे यशस्वी झाला आहे. परंतु आतां इतर जगांतील जनता त्याचा फायदा करून घेण्याच्या बेतांत असतांना मात्र तो प्रयोग काय आहे, ती विचारसरणी नेमकी काय आहे, तें त्यांना समजावून सांगतां येईनासें झालें आहे. स्वातंत्र्याच्या ध्येयाची दुंदुभी साऱ्या जगांत झडूं लागेल ही टॉम पेनची भविष्यवाणी खरी ठरली आहे. पण टॉम पेनचे वारसदार असूनहि आपण मात्र कांहीं करूं शकत नाहीं.

जगावर मोठें अरिष्ट ओढवलेलें असतांना आपल्याला कांहीं करतां येऊं नये, आपण हृदयाशीं बाळगलेल्या ध्येयांचें दर्शन आपल्याला दुसऱ्यांना घडवितां येऊं नये यामुळें तर आपण अधिकच भांबावून जातों. कारण जीवनाविषयींची आपली दृष्टि निर्दोष आणि स्फूर्तिप्रद आहे असें अगदीं लहानपणापासून आपल्या मनावर बिंबविण्यांत येत असतें. लोकांच्या भावना भडकविणाऱ्या एकाद्या टॉम पेनचे तेवढे आपण वारसदार नाहीं, तर ज्यांनीं आपल्या तत्त्वज्ञानाचा पाया घातला, ज्यांना आपण मोठ्या अभिमानानें आपल्या परंपरेचे आधारस्तंभ समजतों अशा अनेक विख्यात व्यक्तींचा वारसा आपणांकडे चालत आला आहे. वॉशिंग्टन, जेफरसन्, बेन, फ्रँकलीन ॲडक्स्, हॅमिल्टन्, मॅडिसन्, मेसन्, शरमन् जे, मार्शल्, आणि यांच्या मालिकेंत बसणाऱ्या इतर अनेक व्यक्ति हीं कांहीं केवळ सत्तेसाठीं झगडणारीं क्षुद्र माणसें नव्हतीं. तर ज्यांची मानवावर नितांत निष्ठा होती आणि ज्यांनीं ही निष्ठा साऱ्या जगाला शिकविली अशा त्या थोर आणि उदार विभूति होत्या. त्यांनीं केवळ अमेरिकेचाच इतिहास घडविला असें नव्हे तर साऱ्या जगाच्या इतिहासावर त्यांनीं आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. इतकेंच नव्हे तर असेंदेखील म्हणतां येईल कीं, राजकीय क्षेत्रांत इतकीं बुद्धिमान् माणसें एकत्र आल्याचें उदाहरण जगाच्या इति-

हासांत दुसरें सांपडावयाचें नाहीं. स्वातंत्र्याचा खरा अर्थ काय, त्याचें प्रत्यक्ष उदाहरण त्यांनीं अमेरिकेच्या द्वारां साऱ्या जगासमोर ठेवलें, आणि इतरत्र तो आदर्श फैलाविण्याचें कार्य त्यांनीं अमेरिकेवर सोंपविलें. राजकीय स्वातंत्र्य म्हणजे काय याची जाणीव त्यांनींच आपल्याला करून दिली. त्यांच्या शिकवणुकीमुळें आपण आपला जीवनविषयक दृष्टिकोन बदलूं शकलों. मात्र त्यांनीं मांडलेले सिद्धांत त्रिकालाबाधित किंवा ईश्वरनिर्मित होते असें आपण मानतां कामा नये. मानव आणि त्याचें स्वातंत्र्य यासंबंधीं त्यांनीं जें लिहिलें तें अखेरचें असें आपण मानीत नसल्यामुळें, स्वतःची बुद्धि चालवून विचार करण्याचें आतां कारण उरलें नाहीं, असें म्हणून आपल्याला स्वस्थ बसतां येणार नाहीं. आपल्या ध्येयासंबंधीं आपल्यावर येऊन पडणाऱ्या जबाबदाऱ्यांचें गाठोडें आपल्या पूर्वजांच्या खुंटीला अडकवून ज्याप्रमाणें मोकळें होतां येणार नाहीं, त्याचप्रमाणें मानवासंबंधीं त्यांनीं ज्या मांडल्या किंवा जीं स्वप्नें रंगविलीं, तेवढ्याच्याच बलावर आज आपल्या समोर असलेलें ‘विरोधविकासवादाचें भूत’ गाडतां येईल अशी आशाहि बाळगतां येणार नाहीं.

आपल्या देशांतील आद्य विचारवंतांनीं मांडलेले सिद्धांत हे अमेरिकेच्या राज्यपद्धतींत कायमचे एकरूप होऊन गेले आहेत. आणि कांहीं अंशीं दाठर झाले आहेत. त्यांनीं तयार केलेली आपली घटना ही आजहि स्वयंनिर्णयांचे बाबतींत आपली मार्गदर्शक आहे. घटना तयार झाल्यापासून कायदेविषयक सिद्धांतांत बरेंच स्थित्यंतर घडून आलेलें आहे हें सर्वोच्च न्यायालयानें दिलेल्या निवाड्यांवरून दिसून येतें. त्या कोर्टानें दिलेला प्रत्येक निवाडा हा घटनेंत नमूद करण्यांत आलेल्या तत्त्वांवरच आधारलेला असतो. आणि त्या दृष्टीनें ते निवाडे घटनेच्या मूलभूत सिद्धान्तांशीं निगडित असेच असतात. अशा तऱ्हेनें अमेरिकन समाजानें आपल्या घटनेच्या शिल्पकारांच्या मूळ कल्पना जतन करून ठेवल्या असून, त्या कल्पनांमध्यें खूप पालट घडून आलेले असतांनादेखील आपल्याला त्या थोर विचारवंतांचें साहचर्य लाभत आहे. राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रसंगीं नव्यानें उदित झालेल्या विरोधी कल्पना चटकन् मागें पडतात आणि अठराव्या शतकांत प्रसृत करण्यांत आलेले मूळ सिद्धान्त हे स्वयंसिद्ध राजकीय सिद्धान्त आहेत असें आपण मानतों, हें अप्रत्यक्षरीत्या सिद्ध केलें जातें.

परंतु अमेरिकेच्या घटनेशीं ज्यांचा संबंध आलेला नाहीं, त्यांना तिच्या पाठीमागील मूलभूत तत्त्वांचें हें वैशिष्ट्य उमगत नाहीं. युरोपियनांच्या दृष्टीनें ज्यांनीं अमेरिकन विचारसरणीचा पाया घातला ते अठराव्या शतकांतील तत्त्ववेत्ते होते, ते अत्यंत थोर होते, हें अर्थातच ते मान्य करतात. परंतु त्यांच्या मतें ते केव्हांच इतिहासजमा होऊन गेले आहेत. मानवासमोर आज ज्या समस्या उभ्या आहेत त्यांची त्या काळांतील विचारवंतांना पुसटदेखील कल्पना नव्हती. त्यांच्या काळांतल्यापेक्षां आज समाजांत फार मोठीं स्थित्यंतरें घडून आलेलीं आहेत. मानवजातीच्या विचारांत ज्यामुळें आमूलाग्र क्रांति घडून येणार आहे, अशा घटनाहि आजच्या काळांत घडून आलेल्या आहेत आणि खुद्द अमेरिकनांनीं त्यांत पुढाकार घेतलेला आहे. अशा परिस्थितींत ज्यावेळीं एकादी अमेरिकन व्यक्ति आपल्या स्वातंत्र्याच्या कल्पनांचा आविष्कार कांहींशा जुनाट भाषेंत करूं लागते, त्यावेळीं बिचारे युरोपियन गोंधळून जातात. त्यांच्यापैकीं जे उदार मनाचे असतात ते त्या भाषेकडे दुर्लक्ष करतात. परंतु स्वतःला "वास्तववादी" म्हणून घेणारांना मात्र अमेरिकन माणसाच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका वाटूं लागते.

आणि आजच्या या विसाव्या शतकांत वास्तववादी दृष्टीकोन आवश्यक समजला जात असल्याकारणानें अमेरिकनांच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका निर्माण होण्यासारखे प्रसंग वारंवार उद्भवतात. जॉन लॉकनें प्रतिपादलेल्या राजकीय सिद्धान्तांवर आज विसाव्या शतकांत एकाद्यानें विसंबून रहावें हें आजच्या युरोपियन विचारवंतांना किंवा त्यांच्या अनुयायांना मोठें विचित्र वाटतें. कारण त्यांच्या मनांत आधीं शंका येते कीं, जॉन लॉकच्या विचारसरणींतील मूलभूत स्वरूपाची तात्त्विक विसंगति त्यांच्या कधीं लक्षांत येत नाहीं ? आणि ही विसंगति त्यांच्या लक्षांत येत नाहीं, असें क्षणभर मानलें तरी गेल्या दोन शतकांत राजकीय क्षेत्रांत जी प्रगति झाली आहे, त्यांकडे अजिबात दुर्लक्ष करून "नैसर्गिक हक्का"सारख्या लॉकप्रणीत सिद्धान्तांना ते कसे चिकटून बसूं शकतात असा त्यांना प्रश्न पडतो. लॉकप्रणीत "नैसर्गिक हक्का"चा उगम कशांत आहे ? त्याचें संरक्षण कसें होतें ? आणि इतिहासाच्या दडपणाखालीं अबाधित राहील असा एकादा तरी हक्क कोणाला दाखवितां येईल का ? उदाहरणार्थ मालमत्तेसंबंधीं "नैसर्गिक हक्क" घ्या. ज्यांना

स्वतःची मालमत्ता नाहीं अशा लक्षावधी लोकांना विचारांत न घेतां स्वातंत्र्याची व्याख्या करतां येणार नाहीं. ही विसाव्या शतकानें आजवरच्या विचारसरणींत घातलेली फार मोठी भर आहे. अशा माणसांच्या बाबतींत मालमत्ताहि त्यांच्या मालकीची बाब असत नाहीं. तर उलट मालमत्तेमुळें ते स्वतःची मालकी गमावून बसतात. ते किंवा त्यांचें स्वातंत्र्य त्या मालमत्तेमुळें विकलें जाईल, अशी त्यांना धास्ती वाटते. थोडक्यांत म्हणजे मालमत्तेवरील मालकी हा सर्वसामान्य जनतेला "नैसर्गिक" हक्क वाटण्याऐवजीं ती सर्वांत "अनैसर्गिक" अशी बाब वाटते आणि म्हणून मालमत्तेच्या दुरुपयोगापासून आपल्याला सरकारनें संरक्षण दिलें पाहिजे अशी जनतेची मागणी असते. ज्यावेळीं असे प्रश्न उपस्थित होतात त्यावेळीं "जीवन, स्वातंत्र्य आणि मालमत्ता" ही लॉकची त्रयी आणि त्याहीपेक्षां गोंधळांत टाकणारी "जीवन, स्वातंत्र्य आणि सौख्यासाठीं धडपड" ही जेफरसन्‌ची त्रयी, कोणताहि तोडगा सुचवूं शकत नाहीं. किंवा या दोन विचारवंतांच्या त्रिविध सिद्धान्तांतून या प्रश्नांचीं उत्तरें मिळण्यासारखीं असलींच तर त्याची जाणीव तरी निदान अमेरिकनांनीं इतरेजनांना खासच करून दिलेली नाहीं.

मात्र यावरून असा निष्कर्ष काढण्याचें कारण नाहीं कीं, "स्वतंत्र मानवाचे" म्हणून जे मूलभूत हक्क अठराव्या शतकांत ठरविण्यांत आले ते सर्व या विसाव्या शतकांत आतां निरर्थक ठरले आहेत. उलट जो कोणी या हक्कांमागील विचारसरणी समजून घेण्याचा प्रयत्न करील, त्याला असें आढळून येईल कीं, आजचें जग ज्या स्वातंत्र्याच्या शोधांत आहे त्याचा उगम त्या हक्कांत अनुस्यूत असलेल्या मूलभूत कल्पनांतच आहे. परंतु मुद्याची गोष्ट अशी आहे कीं, अमेरिकनांनीं त्या कल्पनांमागील हा अर्थ विशद करून दाखविलेला नाहीं. स्वतंत्र मानवाचे अधिकार किंवा त्यांमागील मूलभूत कल्पना स्वयंसिद्ध आहेत असेंच अमेरिकन लोक धरून चालतात. आणि त्यामुळें स्वतःची बुद्धि चालवून विचार करण्याची कांहीं जरूर आहे, असें त्यांना वाटत नाहीं. याचा परिणाम असा झाला आहे कीं, लॉक व जेफरसन्‌ यांनीं पुरस्कारिलेले नैसर्गिक हक्क आतां जुनाट वाटूं लागले आहेत. अठराव्या शतकांत त्यांचा उद्‌घोष करण्यांत आल्यापासूनच्या या दोन शतकांत जग कितीतरी पुढें गेलें आहे. आणि आजच्या विचारसरणीनें

केवढातरी मोठा पल्ला गांठला आहे. असें असतांना ज्यावेळीं आपण अमेरिकन त्या जुनाट तत्त्वाला चिकटून बसतों; आजहि तें पहिल्याइतकें सर्वमान्य होण्यासारखें आहे असें मानून त्याचा हवाला देऊं लागतों; त्यावेळीं आपण हास्यास्पद ठरतों. ज्या राष्ट्रापुढील समस्या, आणि त्या सोडविण्यासाठीं त्यानें चालविलेले प्रयत्न किंवा उचललेलें पाऊल इतकें वास्तववादी व चालू काळाला लागू पडणारें असतें तें राष्ट्र बौद्धिक दृष्टया इतकें मागासलेलें कसें राहूं शकेल ? आणि तसें तें राहिलें तर इतरांना त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका आल्याशिवाय कशी राहील ?

त्यामुळें साहजिकच अमेरिकन लोक जेव्हां कम्युनिस्ट राष्ट्रांचें आक्रमण थांबवून त्यांवर प्रभुत्व कसें मिळवावयाचें याचा विचार करूं लागतात, तेव्हां त्यांचीं मनें निराशेनें झांकळून जातात. त्यांच्या ह्या निराशेचें मूळ कल्पना-विचारांच्या कक्षेंत आहे आणि म्हणूनच त्यांना असहाय आणि पराभूत वाटत असतें. हा प्रश्न जर उत्पादनासंबंधींचा असता तर अमेरिकनांनीं तो चुटकीसरशीं सोडवून दाखविला असता. किंवा १९४४ सालांतल्याप्रमाणें एखाद्या दूरच्या देशावर प्रचंड सामर्थ्यानिशीं हल्ला करण्याचा सवाल असता तर त्यांतहि अमेरिकन मागें पडले नसते. परंतु आज अमेरिकनांपुढें जो प्रश्न आहे, तो या स्वरूपाचा नाहीं. स्वातंत्र्याचें ध्येय आज अमेरिकेच्या हातून हिसकून घेतलें जात आहे तें शस्त्रबलाच्या जोरावर नसून तें कल्पना-विचारांच्या जोरावर घेतलें जात आहे. आणि ज्यामुळें जगाचा आपल्यावर विश्वास बसूं शकेल अशा तऱ्हेनें आपली तत्त्वप्रणाली विशद करण्याच्या कामीं अमेरिका आज असमर्थ ठरत आहे.

* * *

## ६ : : कल्पनांना बगल

कल्पनांच्या क्षेत्रांतील आपला हा कमकुवतपणा घालवण्याऐवजीं त्यापासून पळ काढून आपल्याला सहज सुचणाऱ्या कृतीच्या मार्गाचा आपण अवलंब करूं पाहतों. त्यामुळें आपण कम्युनिस्टांच्या तत्त्वप्रणालीचा मुकाबला करूं

शकूं अशी आपण समजूत करून घेतों. स्वतंत्र जगांत आज जो संघर्ष चालू आहे त्याची मीमांसादेखील लष्करी, आर्थिक, राजकीय, भौगोलिक अशा कोणत्या ना कोणत्या, परंतु प्रत्यक्ष कृतीच्या भाषेंत करूं पाहतों. कारण कृतीच्यामागें दडून "विरोध विकासी व्यक्ती"च्या रूपानें मूलभूत तात्त्विक सिद्धान्ताचें जें आव्हान आपल्याला दिलें गेलें आहे, त्याला बगल देण्याचा आपला अंतस्थ हेतु असतो. परंतु या पलायनवादामुळें जागतिक परिस्थितीची वास्तवता आपल्याला आकलन होऊं शकत नाहीं आणि परिणामीं आपल्याला कम्युनिस्टांचें आक्रमणहि थोपवितां येत नाहीं.

दुसऱ्या महायुद्धानंतर आपण सर्वांत प्रथम जर कोणता पवित्रा घेतला असेल तर तो म्हणजे आपल्या सैनिकांना परत बोलावून त्यांना निःशस्त्र करणें. या माघारीमुळें प्रत्यक्ष असें तर कांहीं साधलें नाहींच; उलट आपल्या कमकुवतपणाचें मात्र त्यामुळें चांगलें प्रदर्शन झालें. कारण ती माघार घेतांना कम्युनिस्ट राष्ट्रांकडून प्रसृत होणारी तत्त्वप्रणाली काय आहे, स्वतंत्र मानवाच्या आशाआकांक्षांवर तिचा काय परिणाम घडून येणार आहे, किंवा वेळींच तिला विरोध केला नाहीं तर त्याची परिणति कशांत होणार आहे यापैकीं कशाचाच आपण विचार केलेला नव्हता. त्यामुळें परिणाम असा झाला कीं, कम्युनिस्ट त्याचा हवा तसा फायदा घेऊं लागले. मग आपण जागे झालों. आणि त्या वेळीं आपण जी कृति केली ती पहिलीच्या नेमकी उलट. आपण पुन्हा शस्त्रीकरण सुरू केलें आणि आपल्या मित्रांनाहि तसें करण्याचा सल्ला देऊं लागलों. परंतु आपल्या या नव्या पवित्र्यामुळें आपण अधिकच अडचणींत आलों. आपले दोस्त आपल्यावर टीका करून आपल्या मार्गांत अडथळे आणूं लागले. अमेरिकनांनाच युद्ध हवें होतें व त्यासाठींच त्यांनीं हें पाऊल उचललें असाच नाहीं का त्याचा अर्थ झाला ? आणि संशयाच्या या ठिणगीला आपल्या प्रचाराची फुंकर घालून कम्युनिस्टांनीं चांगलीच आग भडकविली. त्याचा परिणाम असा झाला कीं, पाश्चात्य देशांत तीव्र स्वरूपाचे मतभेद निर्माण झाले. अमेरिकेनें युरोपवर टीकेची झोड उठविली व त्यांचा उपहास सुरू केला तर युरोपीय लोकांच्या मनांत अमेरिकेबद्दलच्या संशयानें कायमचें ठाण मांडलें.

आतांहि दुसरी कांहींशी धूर्तपणाची कृति पहा. आपण स्वतः होऊनच त्या कृतीच्या चक्रव्यूहांत गुरफटले गेलों आहोंत. दारिद्य हें कम्युनिझमच्या वाढीला अत्यंत पोषक ठरतें म्हणून आपण असा विचार केला कीं, दारिद्या-विरुद्ध आपण कांहीं उपाययोजना केली पाहिजे. म्हणजेच डॉलरच्या सहाय्यानें कांहीं तरी आर्थिक हालचाल केली पाहिजे. ट्रूमन यांच्या कारकीर्दींत आपण "मागासलेल्या" देशांना सहाय्य करण्याच्या उद्देशानें आपल्या कार्यक्रमांत चवथ्या कलमाची भर टाकली. अर्थात या कार्यक्रमांत गैर कांहींच नव्हतें. परंतु अमेरिकनांनीं त्याबद्दल जो खुलासा केला तो मात्र चुकीचा होता. ज्यांनीं पुरेसें औद्योगीकरण साध्य करून घेतलेलें नाहीं त्यांची उत्पादन क्षमता वाढावी, जीवनमान सुधारावें, आणि औद्योगिक क्षेत्रांत पुढें गेलेल्या देशांशीं त्यांना बरोबरी करतां यावी हे त्यांना आर्थिक मदत देण्यामागील आपले हेतु निःसंशय स्पृहणीय व अमेरिकनांना अभिनास्पद असेच होते. परंतु या स्तुत्य हेतूच्या मागें जे सुप्त हेतु दडलेले होते ते केवळ दुसऱ्यांनाच नव्हे तर आपल्याला देखील आपण पटवून देऊं शकलों नाहीं.

उदाहरणार्थ असें एक विधान केलें जातें (विशेषतः कॉंग्रेसमध्यें) कीं, मागासलेल्या देशांतील जनतेला मदत करण्यामागील आपला व्यवहार्य आणि वास्तववादी दृष्टीकोन असा असतो कीं, त्यायोगें कम्युनिझमला पायबंद बसावा. परंतु अशा प्रकारचीं विधानें आपण करतों त्यावेळीं त्यांतून काय ध्वनित केलें जातें? हेंच कीं, सोव्हिएट युनियनबरोबर आपला जो संघर्ष सुरू आहे, त्यांत इतर देशांतील लोकांचा आपण प्याद्यांसारखा उपयोग करून घेऊं इच्छितों. आपल्याला त्यांचें हुकुमी सहाय्य मिळावें म्हणूनच आपण त्यांची आर्थिक गरज भागवून त्यांचा विकास होऊं देत आहोंत. ही विचारसरणी मानवतेच्या दृष्टीनें मोठीशी उत्साहवर्धक आहे असें खासच म्हणतां येणार नाहीं. आपल्या देशाच्या बाहेर या विचारसरणीला खूप विरोध झाला आहे, इतकेंच नव्हे तर त्याबद्दल आपला उपहासहि करण्यांत आला आहे. संयुक्तराष्ट्र संघटनेंत मागें याबद्दल अशी एक आख्यायिका सांगितली जात असे कीं, अमेरिकेकडून मदत मिळविण्याच्या हेतूनें एका छोट्या राष्ट्रानें दुसऱ्या एका बड्या राष्ट्राकडे दोन हजार कम्युनिस्ट उसने पाठवून देण्याची विनंती केली! मागासलेल्या जनतेला आपला आर्थिक

विकास साधतां यावा म्हणून आपण जें सहाय्य करतों, त्यामागें कम्युनिझमला तोंड देणें एवढाच आपला हेतु असतो, असें म्हणणें बरोबर ठरणार नाहीं. अमेरिकन लोकशाही टिकून रहावी असें वाटत असेल तर, सर्वसामान्य मानवजातीसंबंधीं तिच्यावर एक विशिष्ट जबाबदारी पडते ती तिनें पार पाडली पाहिजे. परंतु ही भूमिका आपण कधींहि स्पष्ट करूं शकलेलों नाहीं. आपल्या प्रत्येक कृतीचें समर्थन व्यवहाराच्या भाषेंत करण्याचा आपण अट्टाहास धरतों, त्याचा परिणाम असा होतो कीं, इतर सर्वांना कःपदार्थ मानून त्यांना आपण आपल्या पैशानें मिंधे करायला निघालों आहोंत अशीच आपल्याविषयीं समजूत होऊन बसते.

अमेरिकेच्या युद्धोत्तर काळांतील धोरणांतलें प्रमुख सूत्र कोणतें असेल तर तें म्हणजे शत्रूला थोपवून ठेवणें. जॉर्ज एफ् केनन या मुत्सद्याकडे याचें जनकत्व जातें. आंतरराष्ट्रीय दृष्टीचें आणि अत्यंत वास्तववादी असें या धोरणाचें वर्णन केलें जातें. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें तर हें धोरण दीर्घपरिणामी, धीमें पण दृढ आणि जागरूक असें रशियन विस्ताराला थोपवून धरण्याचें धोरण आहे. पाश्चात्य जगांतल्या स्वतंत्र संस्थांवर सोव्हिएट रशियाचें दडपण पडतें आहे. रशियाचें हें विस्तारशील दडपण, राजकीय आणि भौगोलिक क्षेत्रांत एकामागून एक वेगवेगळ्या ठिकाणीं पडत असतें. त्या त्या वेळीं आणि त्या त्या ठिकाणीं त्याला तितक्याच जोरानें आणि जागरूकपणें मागें रेटलें तर तें थोपवलें जाऊं शकेल; तसें ह्या धोरणामुळें तें थोपवलें जाऊं शकेल.

ट्रूमन राजवटींत जवळ जवळ याच धोरणाचा अंगीकार करण्यांत आला होता. तरीहि तें यशस्वी ठरूं शकलें नाहींत. उलट कम्युनिझमची वाढच होत राहिली. याचें कारणदेखील नेहमींप्रमाणें हेंच होतें कीं, आपणांत आणि कम्युनिस्ट जगांत जे मूलभूत मतभेद आहेत त्यांना या धोरणामुळें हात घातला जात नव्हता. याचा पडताळा पहावयाचा असेल तर या धोरणामागील मूळ प्रेरणा काय होती तें समजावून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. बाह्य जगांतील लोकांपुढें कोणती वस्तुस्थिति रेखाटण्यांत आली होती ? याचें उत्तर इतकेंच आहे कीं, प्रत्यक्ष कृतीव्यतिरिक्त इतर कोणतेंहि तत्त्व त्यांच्यासमोर ठेवण्यांत आलें नव्हतें. कोणताही आदर्श जगासमोर उभा करण्यांत

आला नव्हता. सोव्हिएट युनियनचें आक्रमण थांबविण्याची धडपड करीत रहावयाचें एवढेंच काय तें या धोरणाचें सूत्र होतें. पण ही धडपड आपण कां करीत आहों, कम्युनिस्टांचें आक्रमण कां थांबविलें पाहिजे त्याबद्दल कधीं चकार शब्दसुद्धां काढण्यांत आला नाहीं. अमेरिकन लोकांची निष्ठा नेमकी कशावर आहे तें कधींहि स्पष्ट करण्यांत आलें नाहीं. अमेरिकनांकडून दर-वेळीं फक्त एवढेंच सांगितलें जाई कीं, यू. एस्. एस्. आर्. वर सतत दडपण येत राहील अशा प्रकारची कृति आपण करीत राहिलों तर कम्युनिस्ट पद्धति हळू हळू आंतून पोखरली जाईल. श्री. केनॉन यांचें तर असें मत आहे कीं, " कम्युनिस्ट पद्धतींतच असे कांहीं आंतरविरोध आहेत कीं, त्यामुळें ती पद्धति डबघाईला येणें किंवा नष्ट होणें क्रमप्राप्त आहे. " आणि जर आपण दूरवरचें धोरण आंखून तें धीमेपणानें परंतु ठामपणें आणि अत्यंत दक्षतेनें अमलांत आणलें तर आपल्या शत्रूचा पाडाव होऊन आपल्या पुढील समस्या आपोआपच सुटतील."

इतिहासाकडे बघण्याची जी स्थितिशील दृष्टि या भूमिकेंत आहे तिचा आपल्याला विचार केला पाहिजे. या मार्गानें कम्युनिस्ट साम्राज्याचा पाडाव करतां आला तरी त्यामुळें स्वतंत्र जगाचा विजय झाला असें आपणांस यथार्थतेनें म्हणतां येईल का ? आंतरराष्ट्रीय राजकारणांतील तथाकथित " वास्तववादी " भूमिकेव्यतिरिक्त कोणतीहि नवी भर मानवजातीच्या विचारसंपदेंत न घालतां जर आपण कम्युनिझमचा पाडाव करूं शकलों; तर आपल्या स्वातंत्र्याच्या संस्था यशस्वी होण्याला अनुकूल अशी परिस्थिति निर्माण होईल का ? या प्रश्नांचीं उत्तरें आपल्याला नकारार्थींच द्यावीं लागतील. कारण रशियन सत्तेची वाताहत झाली तर विरोधविकासवादी व्यक्तिलाहि मोठाच धक्का बसेल. हें जरी खरें असलें तरी तेवढ्यानें आपण ज्याला स्वातंत्र्य अशी संज्ञा देतों ती परिस्थिति मनुष्याला प्राप्त होईलच असें नाहीं." " विरोधविकासवादी " तत्त्वप्रणालीनें लक्षावधि लोकांच्या मनांत पाश्चात्य देशांतील स्वातंत्र्याच्या परंपरांशीं सर्वस्वी विरोधी अशा कल्पना भरवून दिल्या आहेत. त्यामुळें वास्तववादी मुत्सद्देगिरीपेक्षां अधिक भरीव अशीं कांहीं मूल्यें जर आपण त्या लक्षावधि लोकांच्या गळीं उतरवूं शकलों नाहीं तर त्यांना स्वातंत्र्याच्या ध्येयाभोंवतीं संघटित करणें शक्य होणार नाहीं.

श्री. केनन यांनाहि याची जाणीव होती. कारण 'फॉरिन अफेअरस्' या नियतकालिकांत 'क्ष' या सहीनें त्यांनीं जें एक संस्मरणीय निवेदन प्रसिद्ध केलें त्यांत ते म्हणतात "आपली फळी धरून ठेवायची आणि त्यामुळें अपेक्षित परिणाम घडून येईल अशी आशा करीत रहायचें एवढ्यापुरतेंच अमेरिकेचें धोरण मर्यादित नाहीं. आपल्याला नेमकें काय साधायचें आहे याची अमेरिकेला बरोबर जाणीव झालेली आहे. तसेंच आपल्या अंतर्गत समस्यांना यशस्वीपणें तोंड देण्याची तिची तयारी असून जगांतील एक बलाढ्य राष्ट्र या नात्यानें पडणारी जबाबदारी पेलण्याला ती समर्थ आहे. आणि आजच्या वैचारिक संघर्षांत स्वतःचें वैशिष्ट्य कायम टिकविण्याइतकी आध्यात्मिक अस्मिता तिच्यापाशीं आहे. हें ज्या प्रमाणांत अमेरिका जगांतील जनतेला पटवून देऊं शकेल त्याच प्रमाणांत अमेरिकेचें धोरण यशस्वी ठरूं शकेल. "थोडक्यांत म्हणजे नुसतें जशास तसें किंवा ठोश्यास ठोसा असें धोरण अवलंबून भागणार नाहीं." आजच्या वैचारिक संघर्षाच्या काळांत आपलें स्वतःचें वैशिष्ट्य टिकविण्याइतकी आध्यात्मिक अस्मिता हेंच अखेर व्यवहारवादी धोरणाचेंदेखील गमक ठरतें." असें श्री. केनन प्रतिपादन करतात. त्याचा अर्थ काय होतो ? श्री केनन यांनीं त्यासंबंधीचा खुलासा आपल्या निवेदनांत केलेला नाहीं. परंतु आपण असा निष्कर्ष काढूं शकतों कीं, अमेरिकनांनीं तात्त्विक क्षेत्रांतहि कांहीं कर्तृत्व गाजविलें पाहिजे असेंच त्यांना सुचवायचें आहे.

या धोरणाप्रमाणेंच वारंवार उपस्थित केला जाणारा दुसरा एक प्रश्न म्हणजे कम्युनिस्ट रशियाबरोबर शांततापूर्ण सहजीवन आपल्याला शक्य आहे का ? परंतु हा प्रश्न बरोबर नाहीं. स्वातंत्र्याचें ध्येय मान्य करणारे किंवा स्वातंत्र्यासाठीं धडपडणारे लोकशाहीवादी लोक इतरांशीं हरप्रकारें जमवून घेतातच आणि रशियाला थोपवून धरण्याचा किंवा त्याहूनहि विशेष म्हणजे "विरोधविकासवादी व्यक्ति"ला रशियाच्या चतुःसीमेच्या आंत रोखून धरण्याचा एखादा मार्ग उपलब्ध झाला तर रशियाबरोबरदेखील आपल्याला मित्रत्वाचे संबंध ठेवतां येतील. पण खरा प्रश्न नेमका याच्या उलट आहे. रशिया आपल्याबरोबर गुण्यागोविंदानें राहण्यास तयार होईल का ? हा खरा प्रश्न आहे. मानवसंबंधीच्या ज्या कल्पनेला रशिया हें राष्ट्र बांधलें गेलें आहे तिच्यांत सापेक्षतेला-तडजोडीला वाव नाहीं. इतिहाससंबंधीच्या

आला नव्हता. सोव्हिएट युनियनचें आक्रमण थांबविण्याची धडपड करीत रहावयाचें एवढेंच काय तें या धोरणाचें सूत्र होतें. पण ही धडपड आपण कां करीत आहों, कम्युनिस्टांचें आक्रमण कां थांबविलें पाहिजे त्याबद्दल कधीं चकार शब्दसुद्धां काढण्यांत आला नाहीं. अमेरिकन लोकांची निष्ठा नेमकी कशावर आहे तें कधींहि स्पष्ट करण्यांत आलें नाहीं. अमेरिकनांकडून दर-वेळीं फक्त एवढेंच सांगितलें जाई कीं, यू. एस्. एस्. आर्. वर सतत दडपण येत राहील अशा प्रकारची कृति आपण करीत राहिलों तर कम्युनिस्ट पद्धति हळू हळू आंतून पोखरली जाईल. श्री. केनॉन यांचें तर असें मत आहे कीं, "कम्युनिस्ट पद्धतींतच असे कांहीं आंतरविरोध आहेत कीं, त्यामुळें ती पद्धति डबघाईला येणें किंवा नष्ट होणें क्रमप्राप्त आहे." आणि जर आपण दूरवरचें धोरण आंखून तें धीमेपणानें परंतु ठामपणें आणि अत्यंत दक्षतेनें अमलांत आणलें तर आपल्या शत्रूचा पाडाव होऊन आपल्या पुढील समस्या आपोआपच सुटतील."

इतिहासाकडे बघण्याची जी स्थितिशील दृष्टि या भूमिकेंत आहे तिचा आपल्याला विचार केला पाहिजे. या मार्गानें कम्युनिस्ट साम्राज्याचा पाडाव करतां आला तरी त्यामुळें स्वतंत्र जगाचा विजय झाला असें आपणांस यथार्थतेनें म्हणतां येईल का? आंतरराष्ट्रीय राजकारणांतील तथाकथित "वास्तववादी" भूमिकेव्यतिरिक्त कोणतीहि नवी भर मानवजातीच्या विचारसंपदेंत न घालतां जर आपण कम्युनिझमचा पाडाव करूं शकलों; तर आपल्या स्वातंत्र्याच्या संस्था यशस्वी होण्याला अनुकूल अशी परिस्थिति निर्माण होईल का? या प्रश्नांचीं उत्तरें आपल्याला नकारार्थींच द्यावीं लागतील. कारण रशियन सत्तेची वाताहत झाली तर विरोधविकासवादी व्यक्तिलाहि मोठाच धक्का बसेल. हें जरी खरें असलें तरी तेवढ्यानें आपण ज्याला स्वातंत्र्य अशी संज्ञा देतों ती परिस्थिति मनुष्याला प्राप्त होईलच असें नाहीं." "विरोधविकासवादी" तत्त्वप्रणालीनें लक्षावधि लोकांच्या मनांत पाश्चात्य देशांतील स्वातंत्र्याच्या परंपरांशीं सर्वस्वी विरोधी अशा कल्पना भरवून दिल्या आहेत. त्यामुळें वास्तववादी मुत्सद्देगिरीपेक्षां अधिक भरीव अशीं कांहीं मूल्यें जर आपण त्या लक्षावधि लोकांच्या गळीं उतरवूं शकलों नाहीं तर त्यांना स्वातंत्र्याच्या ध्येयाभोंवतीं संघटित करणें शक्य होणार नाहीं.

श्री. केनन यांनाहि याची जाणीव होती. कारण 'फॉरिन अफेअरस्' या नियतकालिकांत 'क्ष' या सहीनें त्यांनीं जें एक संस्मरणीय निवेदन प्रसिद्ध केलें त्यांत ते म्हणतात "आपली फळी धरून ठेवायची आणि त्यामुळें अपेक्षित परिणाम घडून येईल अशी आशा करीत रहायचें एवढ्यापुरतेंच अमेरिकेचें धोरण मर्यादित नाहीं. आपल्याला नेमकें काय साधायचें आहे याची अमेरिकेला बरोबर जाणीव झालेली आहे. तसेंच आपल्या अंतर्गत समस्यांना यशस्वीपणें तोंड देण्याची तिची तयारी असून जगांतील एक बलाढ्य राष्ट्र या नात्यानें पडणारी जबाबदारी पेलण्याला ती समर्थ आहे. आणि आजच्या वैचारिक संघर्षांत स्वतःचें वैशिष्ट्य कायम टिकविण्याइतकी आध्यात्मिक अस्मिता तिच्यापाशीं आहे. हें ज्या प्रमाणांत अमेरिका जगांतील जनतेला पटवून देऊं शकेल त्याच प्रमाणांत अमेरिकेचें धोरण यशस्वी ठरूं शकेल. "थोडक्यांत म्हणजे नुसतें जशास तसें किंवा ठोश्यास ठोसा असें धोरण अवलंबून भागणार नाहीं." आजच्या वैचारिक संघर्षाच्या काळांत आपलें स्वतःचें वैशिष्ट्य टिकविण्याइतकी आध्यात्मिक अस्मिता हेंच अखेर व्यवहारवादी धोरणाचेंदेखील गमक ठरतें." असें श्री. केनन प्रतिपादन करतात. त्याचा अर्थ काय होतो? श्री केनन यांनीं त्यासंबंधीचा खुलासा आपल्या निवेदनांत केलेला नाहीं. परंतु आपण असा निष्कर्ष काढूं शकतों कीं, अमेरिकनांनीं तात्त्विक क्षेत्रांतहि कांहीं कर्तृत्व गाजविलें पाहिजे असेंच त्यांना सुचवायचें आहे.

या धोरणाप्रमाणेंच वारंवार उपस्थित केला जाणारा दुसरा एक प्रश्न म्हणजे कम्युनिस्ट रशियाबरोबर शांततापूर्ण सहजीवन आपल्याला शक्य आहे का? परंतु हा प्रश्न बरोबर नाहीं. स्वातंत्र्याचें ध्येय मान्य करणारे किंवा स्वातंत्र्यासाठीं धडपडणारे लोकशाहीवादी लोक इतरांशीं हरप्रकारें जमवून घेतातच आणि रशियाला थोपवून धरण्याचा किंवा त्याहूनहि विशेष म्हणजे "विरोधविकासवादी व्यक्ति"ला रशियाच्या चतुःसीमेच्या आंत रोखून धरण्याचा एखादा मार्ग उपलब्ध झाला तर रशियाबरोबरदेखील आपल्याला मित्रत्वाचे संबंध ठेवतां येतील. पण खरा प्रश्न नेमका याच्या उलट आहे. रशिया आपल्याबरोबर गुण्यागोविंदानें राहण्यास तयार होईल का? हा खरा प्रश्न आहे. मानवसंबंधीच्या ज्या कल्पनेला रशिया हें राष्ट्र बांधलें गेलें आहे तिच्यांत सापेक्षतेला-तडजोडीला वाव नाहीं. इतिहाससंबंधीच्या

एका विशिष्ट दृष्टिकोनावर ही कल्पना बसविलेली आहे. आणि हा दृष्टिकोन निर्विवाद आहे असें कम्युनिस्ट मानतात. आणि आपलाच दृष्टिकोन खरा आहे हें सिद्ध करण्यासाठीं दुसरे सर्व दृष्टिकोन नष्ट करणें त्यांना आवश्यक वाटतें. पुन्हां एकदां केननच्या शब्दांत सांगायचें तर "एका बाजूला सोव्हिएट युनियन आणि दुसऱ्या बाजूला भांडवलशाही समजलीं जाणारीं राष्ट्रें यांच्यांत ध्येयासंबंधीं कधींकाळीं एकवाक्यता होऊं शकेल ही गोष्ट रशियाच्या बाजूनें मुळीं कधीं मान्यच केली जाणार नाहीं." मॉस्कोवाले नेहमीं असेंच धरून चालतात कीं, भांडवलशाही राष्ट्रें आणि सोव्हिएट युनियन यांचीं ध्येयें हीं परस्परविरोधी अशींच असणार. भांडवलशाही पद्धति, भांडवलशाही राष्ट्रें आणि आपण ज्याचा पुरस्कार करतों व जें प्रत्यक्ष उपभोगतों तें स्वातंत्र्य, यांना कसून विरोध करणें हा तर "विरोधविकासवादी व्यक्ति"चा पिंडच आहे. त्यामुळें मानवासंबंधींच्या आपल्या कल्पना टिकून राहिल्या तर त्यांत कम्युनिस्ट जगाचा सर्वनाश सांठविलेला आहे, अशी त्यांची पक्की खात्री आहे. आणि त्यामुळेंच मानवासंबंधींच्या कल्पनांसाठीं महान् लढा देण्यापलीकडे कम्युनिस्ट जगाबरोबर आपला दुसरा कोणताहि संबंध असूं शकणार नाहीं.

* * *

## ७ : सत्यसंशोधनाची नवी दृष्टि

स्वतंत्र जगापुढें असलेल्या सर्वांत महत्त्वाच्या प्रश्नाच्या गाभ्याला आतां आपल्याला हात घालतां येईल. "विरोधविकासवादी व्यक्ती"ला तोंड देण्यासाठीं स्वतंत्र जगानें मानवासंबंधीं एखादी कल्पना निश्चित करणें आवश्यक आहे. असें विधान आतांपर्यंतच्या विवेचनांत अनेकवार येऊन गेलें आहे. पण यावर असा आक्षेप घेतला जाईल कीं, स्वतंत्र जग हें खरेंच स्वतंत्र असेल तर अशी एकच एक कल्पना निश्चित करतां येणार नाहीं. स्वतंत्र वातावरणांतील बौद्धिक जीवनाची जोपासना मतभिन्नतेमधून होत असते. साचेबंदपणाचें अशा जीवनाला वावडें असतें. स्वतंत्र विचारसरणीच्या विचारवंतांवर एखादी विशिष्ट तत्त्वप्रणाली सक्तीनें लादण्यांत आली तर

त्याचें अस्तित्वच नाहींसें होईल. कारण मग त्यांची विचारसरणी मुळीं स्वतंत्र रहाणारच नाहीं. आणि अशा तऱ्हेनें दुसऱ्यावर विशिष्ट विचार लादण्याचे प्रयत्न जर यशस्वी झाले तर त्यामधून आणखी एका सर्वाधिकारशाहीचा जन्म होईल आणि तिला कोणतेंहि जरी नांव दिलें तरी ती कम्युनिस्ट सत्तेइतकीच भयंकर ठरेल. मानवी मूल्यांना मग कसलेंच स्थान राहणार नाहीं. आणि स्वातंत्र्याचा जप करतां करतां, दुसऱ्याला नष्ट करण्याच्या हेतूनें, एकमेकांच्या अंगावर तुटून पडणाऱ्या दोन प्रचंड शक्तींच्या ओढाताणींत मानवतेची कुतरओढ होईल आणि पृथ्वी ओस पडेल.

माणसांचीं मनें भारून टाकण्याचें जें तंत्र कम्युनिस्टांनीं आत्मसात केलें आहे त्याला तोंड देण्याचें सामर्थ्य स्वतंत्र जगापाशीं नाहीं. याचा वरील विवेचनावरून पुन्हा एकदां प्रत्यय येईल. मात्र या प्रश्नाला आणखी एक बाजू आहे. आपण वर हें पाहिलें आहेच कीं, स्वतंत्र जगांत मतभिन्नताहि राहणारच. परंतु त्यायोगें कमकुवतपणा निर्माण होण्याचाहि धोका असतो. तो धोका नष्ट करण्याचा मार्ग आपल्याला शोधून काढला पाहिजे आणि मतभिन्नतेंतच आपल्याला स्वतंत्र जगाची ताकत शोधली पाहिजे. मतभिन्नतेचें बल हें कशाचें बल आहे ? तें सत्याचें बल आहे. स्वतंत्र जगांतील विचारवंतांचे परस्परांशीं मतभेद होतात ते त्यांना सत्याची कदर नसते म्हणून नव्हे तर ते सत्याच्या शोधांत असतात म्हणून. निरीक्षकांचें एकाद्या प्रश्नावर एकमत झालें म्हणजे सत्य प्रस्थापित झालें असें मानण्यांत येतें. क्वचित् असें असूंहि शकेल, पण तो कांहीं नियम होऊं शकत नाहीं. एकाद्या प्रश्नावर एकमत झालें म्हणून तें सत्य असेलच असें म्हणतां येणार नाहीं. कम्युनिस्टांचेंच उदाहरण द्यावयाचें तर विशिष्ट प्रश्नावर " पक्षानें घेतलेल्या भूमिके "बद्दल सर्व सभासदांचें एकमत असेलहि, परंतु त्यावरून सत्य त्यांना सांपडलें असें म्हणतां येत नाहीं, उलट त्याचा अर्थ असाहि होईल कीं, त्यापैकीं कोणालाच सत्याची चाड नाहीं. सत्य म्हणून कांहींएक चीज आहे आणि त्या सत्याचें दर्शन आपल्याला झालें पाहिजे, अशी जाज्वल्य निष्ठा असणें हीच स्वतंत्र जगाची खरी शक्ति म्हटली पाहिजे. समाजांतील सर्व व्यक्तींचें एकमेकांबरोबर सहमत असणें ही स्वतंत्र मानवाच्या मागची कल्पनाच नाहीं. सर्वांनीं सत्यान्वेषणासाठीं धडपडणें हा त्या कल्पनेचा मूलाधार आहे.

इतिहासाचे अनेक पैलू असतात. युद्ध, मुत्सद्देगिरी किंवा सत्तास्पर्धा यापैकीं कोणत्याहि दृष्टिकोनांतून ऐतिहासिक घटनांकडे पाहतां येईल. त्याचबरोबर आर्थिक किंवा तांत्रिक विकास, तसेंच विज्ञान किंवा कला यांची प्रगति हाहि इतिहासाचें मूल्यमापन करण्याचा निकष होऊं शकतो. त्याचप्रमाणें इतिहासाकडे बघण्याची दृष्टि ही केवळ संशोधकाचीहि असूं शकते. त्यापैकीं आपण शेवटच्या म्हणजे संशोधकाचा दृष्टिकोन स्वीकारला तर एक विशिष्ट तत्त्व आपल्याला आढळून येईल. आणि आपल्याला आज जें कार्य साधावयाचें आहे त्याकामीं त्याचा चांगला उपयोग होईल. इतिहासांत असे कांहीं कालखंड येऊन जातात कीं, मानवजातीच्या दृष्टीनें ते अत्यंत उज्ज्वल आणि संस्मरणीय ठरतात. आणि अशा कालखंडांकडे आपण जर नजर टाकली—उदाहरणार्थ इटालींतील पुनरुत्थानाचा ( Renaissance ) किंवा जर्मनींतील सुधारणावादाचा ( Reformation ) कालखंड–तर आपल्याला असें आढळून येईल कीं, त्यापासून आपल्या ज्ञानांत भर अशी फारच थोडी पडते. त्या काळांत अज्ञात असलेलीं संशोधनाचीं तंत्रें आतां आपणांस अवगत झालीं आहेत. त्यामुळें आपलें ज्ञानाचें क्षितिज इतकें व्यापक झालें आहे कीं, त्यापुढें पूर्वींचें ज्ञान आतां थिटें वाटूं लागलें आहे. तरीदेखील आपल्याला आपल्या प्रगतीसाठीं त्या काळाची संपूर्ण माहिती असणें आवश्यक आहे हें नाकारतां येणार नाहीं. आपल्याला घेतां येण्यासारखें असें त्यांच्या जवळ काय आहे ? सत्यशोधनासाठीं त्यांनीं अवलंबिलेला मार्ग असेंच या प्रश्नाचें उत्तर द्यावें लागेल. अशा प्रत्येक कालखंडांत आपापल्यापरीनें सत्य शोधून काढण्याचा यत्न झालेला आहे. आणि सत्यशोधनाची जी आंच त्यावेळीं लागून राहिलेली होती तिची अभिव्यक्ति आपणांस त्या त्या कालखंडांतील घटनांमध्यें झालेली दृष्टीस पडते. आपल्या आजच्या ज्ञानाच्या निकषावर घासून पाहतां, अरिस्टॉटलची महति ही त्याच्या भौतिक जगासंबंधींच्या ज्ञानावरून आजमावतां येणार नाहीं. त्याचें पुष्कळसें ज्ञान चुकीचें होतें असें आज दिसून आलेलें आहे. परंतु भौतिक जगाचें ज्ञान संपादन करण्याची त्याची जी वृत्ति होती तिचें मोल मात्र आजहि कमी लेखतां येणार नाहीं. ॲरिस्टॉटलची ही वृत्ति मध्ययुगीन कालांतल्या वृत्तीपेक्षां भिन्न होती. तशीच विसाव्या शतकांत आढळून येणारी वृत्ति ही पुनरुत्थान काला-

तल्या वृत्तीपेक्षां निराळी आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आणि या दृष्टीनें पाहतां मानवसमाजाचा इतिहास म्हणजे सत्याच्या जास्त जास्त जवळ जाण्यासाठीं चाललेल्या अखंड प्रयत्नांची एक मालिका आहे असेंच म्हणावें लागेल. अर्थात् अशा प्रत्येक प्रयत्नामधून भिन्न भिन्न वृत्ति प्रगट होतात, आणि त्यामधून जगाच्या आणि मानवाच्या निरनिराळ्या स्वभाववैशिष्ट्यांचेंहि दर्शन घडतें.

हें विधान कोणाला अत्यंत ठोकळेबाज वाटण्याचा संभव आहे. परंतु इतिहासांतील निरनिराळ्या बारीकसारीक घटनांचा परामर्श घेतला तर त्याची सत्यता सहज पटूं शकेल. या घटनांत आजच्या आपल्या काळांत जो संघर्ष चालू आहे त्याचाहि अंतर्भाव करावयास हवा. पाश्चात्य संस्कृतीच्या जवळ जवळ तीन शतकांच्या कालखंडाकडे नजर टाकली तर असें दिसून येईल कीं, त्यावरदेखील संशोधक वृत्तीचीच छाप पडलेली आहे. त्या वृत्तीचींहि खास अशीं कांहीं वैशिष्ट्यें दाखवितां येतील. तीं वैशिष्ट्यें कोणतीं तें शोधून काढणें हें आपल्यापुढील एक महत्त्वाचें कार्य आहे.

तथापि आतांपर्यंतच्या विवेचनावरून हें लक्षांत येईल कीं, परिस्थिति अनुकूल असेल तर आजच्या काळांतील लोकांना "विरोधविकासवादी व्यक्ती"ची जी कल्पना आहे तिचें आकर्षण वाटतें. विसाव्या शतकांत सत्याचा मागोवा घेण्याची जी वृत्ति आढळून येते, तिच्यांतच तर 'विरोधविकासवादा'चा उगम नसेल ना! आजच्या काळांतील गोंधळवून टाकणाऱ्या शक्तीचें स्वरूप समजावून घेऊन त्याच्यावर जर प्रभुत्व मिळवायचें असेल तर "विरोध-विकासवाद" ही विसाव्या शतकांतील संशोधक वृत्तीची तर्कशुद्ध परिणति आहे हें ओळखलें पाहिजे, असा तर ह्याचा अर्थ नसेल? अनेकांना या विधानानें धक्का बसेल आणि कांहीं जण तें खोडून काढण्यासाठीं पुढेंदेखील सरसावतील. अर्थात् या विधानाची सत्यता पटवून देणें आवश्यक आहे हें मला मान्य आहे. पुढील प्रकरणांत निदान कांहीं प्रमाणांत तरी, तसा प्रयत्न खासच करण्यांत येईल. परंतु आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून या विधानाचा थोडाफार तरी पडताळा येण्याला हरकत नाहीं. "विरोधविकासवादी व्यक्ति" ही मानसिक पातळीवरचें युद्ध चालवण्यासाठीं कम्युनिस्टांनीं निर्माण केलेली एक कल्पना आहे. अशी जोंपर्यंत आपली समजूत राहील तोंपर्यंत लोकांच्या

मनावरची त्या कल्पनेची पकड आपल्याला संपूर्णतः अगम्यच राहील, परंतु "विरोधविकासवादी व्यक्ति" आणि त्याच्याभोंवतीं उभारलेलें गेलेलें तत्त्वज्ञान हीं आजच्या युगांतल्या संशोधकवृत्तीचा नैसर्गिक परिपाक असतील तर त्यांच्या सामर्थ्याचें मूळ कुठें आहे तें कळूं शकेल. "सगळ्या मनुष्यजातीच्या कल्याणा"चा मक्ता कम्युनिस्टांनीं कसा घेतला, त्यांचा प्रचार इतका प्रभावी कां ठरतो, त्या प्रचारांतून सत्याचा आभास कसा निर्माण केला जातो या सर्व प्रश्नांची संगतीदेखील त्यायोगें आपणांस लावतां येईल.

कम्युनिस्टप्रणीत "विरोधविकासवादी व्यक्ति"विषयक कल्पनांना तोडीसतोड अशा प्रकारच्या मानवासंबंधींच्या कल्पना आपण प्रस्तुत करण्याची भाषा काढूं त्या वेळीं आपल्या हें ध्यानांत येईल कीं, कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाला प्रतिस्पर्धी असें तत्त्वज्ञान उभें करणें एवढेंच कांहीं आपलें उद्दिष्ट नाहीं. एका नव्या मार्गानें सत्याचा मागोवा घेणें हें आपलें कर्तव्य आहे आणि त्यासाठीं, 'विरोधविकासवादी' सिद्धांत जीर्ण करून संशोधनाची नवी प्रेरणा जिच्यामुळें मिळेल अशी नवी संशोधकवृत्ति आपल्याला धराण करावी लागेल आणि आपण तें करूं शकलों तरच स्वतंत्र मानवासंबंधींच्या कल्पना साकार होऊन त्याविषयीं सर्वत्र सर्वांना सारखाच जिव्हाळा वाटूं लागेल.

त्याचबरोबर मानवाकडे आणि मानवी सत्याकडे बघण्याच्या या नव्या दृष्टिकोनाची सुरवात अमेरिकेपासूनच झाली पाहिजे हेंहि उघड आहे. अमेरिकेच्या भूमींतच तो प्रथम रुजला पाहिजे आणि अमेरिकन नागरिकांचीं मनें त्यानें व्यापून टाकलीं पाहिजेत याचें कारण अमेरिकेबद्दलचा वृथाभिमान हें मात्र नव्हे. अमेरिकेच्या प्रचंड सामर्थ्यामुळें तिच्याकडे स्वतंत्र जगाचें नेतृत्व आलें आहे. स्वातंत्र्याच्या ध्येयासंबंधीं आपल्या मनांत कांहीं विशेष स्पष्टता आहे म्हणून आपणाकडे नेतृत्व आलेलें नसून केवळ आपल्या सामर्थ्यामुळें जगानें आपलें नेतृत्व स्वीकारलेलें आहे हें आपण विसरून चालणार नाहीं. आपल्या आजच्या कवींनीं कोणतींहि नवीं क्षितिजें मानवापुढें उभीं केलीं नाहींत किंवा आपल्या तत्त्ववेत्यांनीं नवीन मार्गदर्शक तत्त्वें जगापुढें ठेवलेलीं नाहींत. आपली साधन-संपत्ति अफाट आहे आणि "भौतिक वस्तु" निर्माण करण्यांत आपण प्रचंड यश मिळविलें आहे म्हणूनच केवळ आपल्याला आपलें स्थान टिकवून ठेवतां आलें आहे. परंतु इतक्या प्रचंड सामर्थ्याच्या

आणि भौतिक निर्मितींतील यशाच्या तोलाची विचारसंपदा आपल्यापाशीं आहे का ? असा प्रश्न स्वतंत्र जगांतील लोकांच्या मनांत आल्याशिवाय राहणार नाहीं. आणि जोंपर्यंत या प्रश्नाचें उत्तर आपण देऊ शकत नाहीं तोंपर्यंत स्वतंत्र जगाचें नेतृत्वहि प्रभावीपणें आपल्या हातून होणार नाहीं.

साहजिकच बहुतेक अमेरिकनांची समजूत आहे त्यापेक्षां केवढीतरी मोठी जबाबदारी आपल्या शिरावर पडलेली आहे. ही जबाबदारी केवळ प्रत्यक्ष कृतिरूपी पावलें टाकून पार पाडतां येणार नाहीं, तसेंच डॉलर्सची खैरात करून किंवा अण्वस्त्रांचें प्रचंड प्रमाणावर उत्पादन करूनहि ती तडीस जाणार नाहीं. कम्युनिस्टांचा वैचारिक पराभव करण्यासाठीं अधिकाधिक चातुर्य आणि उत्साह पणाला लावण्यानेंहि आपलें इच्छित कार्य साध्य होणार नाहीं. या सर्व गोष्टींची अर्थातच आवश्यकता आहे. कारण त्यांच्या अभावीं सोव्हीएट अंकित राष्ट्रांप्रमाणें स्वतंत्र जगांतील राष्ट्रेंहीं सोव्हिएट रशियाच्या सामर्थ्याला बळी पडतील. त्यांचा अशा प्रकारें बळी जाऊं नये असें वाटत असेल तर आपल्यापाशीं देखील सामर्थ्याचें पाठबळ असलें पाहिजे. पण आपल्या कार्याचा तो केवळ एक भाग झाला. अमेरिकेला जगाचें नेतृत्व करावयाचें असेल तर लष्करी, आर्थिक, मानसिक राजकीय, तांत्रिक इ. सर्व आघाड्यांवर तिनें अग्रभागीं राहिलें पाहिजे. अमेरिकन नेतृत्वाची एकाद्या अष्टपैलू हिऱ्याशीं तुलना करतां येईल. आणि अंतर्गत तेजावांचून हिऱ्याला जसें महत्त्व नाहीं तसें आपल्या नेतृत्वाला जर अंतर्गत तेज नसेल तर इतिहासांत त्यालाहि कांहीं किंमत राहणार नाहीं. हें तेज, हा प्रकाशच अमेरिकन नेतृत्वाला अर्थ प्राप्त करून देईल.

हा प्रकाश शोधण्यासाठीं लांब जायला नको. तो आपल्याजवळच आहे. अमेरिकेंतील यादवी युद्धांत घडलेल्या एका घटनेपासून आपल्याला ह्या प्रकाशाचें स्वरूप समजून घेतां येण्यासारखें आहेत. आज ज्याप्रमाणें दोनहि बाजू स्वातंत्र्याला आवाहन करीत आहेत त्याप्रमाणें त्या यादवी युद्धाच्या वेळीं दोन्ही बाजू ईश्वराला आपल्या सहाय्यासाठीं आवाहन करीत होत्या. तेव्हां अब्राहम लिंकनला एकानें असा प्रश्न केला कीं, ईश्वर दोघांच्याही पाठीशीं कसा असूं शकेल? त्यावर लिंकननें दिलेलें उत्तर मोठें मार्मिक होतें. तो म्हणाला, "ईश्वर आपल्या बाजूला असावा अशी प्रार्थना मी विश्वासपूर्वक करूं शकत नाहीं,

म्हणून मी नेहमीं अशी प्रार्थना करतों कीं, मी ईश्वराच्या बाजूला असावें." आपलीं धर्मविषयक मतें कांहींहि असलीं तरी लिंकननें व्यक्त केलेल्या भावनांवरून फार मोठा बोध घेतां येण्यासारखा आहे. माणसें जेव्हां स्वात्मार्पण बुद्धीनें सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात–स्वार्थ साधण्याचा किंवा पूर्वग्रह पोसण्याचा नव्हे–तेव्हां त्यांच्याठिकाणीं जो अंतःप्रकाश निर्माण होतो तशा प्रकाशाची आज अमेरिकन नेतृत्वाला अत्यंत आवश्यकता आहे. स्वातंत्र्य आमच्या बाजूला आहे, तें आमच्यासाठीं राबतें आहे, आणि स्वातंत्र्याला आवाहन करण्याचा कम्युनिस्टांपेक्षां आम्हालाच अधिक अधिकार आहे असा दावा आपल्याला करावयाचा नाहीं. असा दावा करून स्वातंत्र्याची आकांक्षा बाळगणाऱ्यांचा विश्वास आपल्याला संपादन करतां येणार नाहीं. स्वातंत्र्याचे खरे कैवारी कोण आहेत तें त्यांना कळायला हवें आहे. आणि या प्रश्नाचें उत्तर केवळ शस्त्रास्त्रांच्या खणखणाटानें मिळूं शकणार नाहीं. पाश्चात्य जगाला आपादमस्तक शस्त्रसज्ज बनवून इतिहासांत आजपर्यंत कधीं झालें नसेल इतकें भयंकर युद्ध खेळून प्रचंड विजयहि कदाचित् आपण संपादन करूं शकूं. आणि तरीहि कदाचित् स्वातंत्र्य गमावून बसूं. आपली सारी सत्ता आणि सारी संपत्ति तें स्वातंत्र्य मिळवून देण्याचे कामीं तोकडी पडणें असंभवनीय नाहीं. सत्य शोधण्याची तीव्र इच्छा आपण जनतेच्या मनांत निर्माण करूं शकलों तरच आपल्याला स्वातंत्र्याचें ध्येय गांठतां येईल. मात्र सत्यान्वेषणाची ही इच्छा इतकी प्रखर असली पाहिजे कीं, तिच्यापुढें विरोध-विकासवादी व्यक्तींची कल्पना सर्वस्वीं निष्प्रभ ठरली पाहिजे.

* * *

# संकटाची नांदी

## १ : : औद्योगिक मानवाचा उदय

आज जो एवढा अटीतटीचा तत्त्वज्ञानविषयक संघर्ष सुरू आहे त्यामागें मनुष्यस्वभावांतील कोणत्या प्रेरणा प्रकर्षानें वसत आहेत त्यांचें संपूर्ण ज्ञान प्राप्त करून घेणें हाच मुख्यतः या ग्रंथलेखनाचा उद्देश आहे. त्यासाठीं आपण आजपर्यंत कोणता मार्ग चोखळला तें नीट समजावून घेतलें पाहिजे.

विसाव्या शतकाची सुरुवात जितकी आशादायक वाटली तितकी बहुधा दुसऱ्या कोणत्याहि शतकाची वाटली नसेल. पाश्चात्य जगांत जवळ-जवळ सर्वत्र शांतता नांदत होती; आणि त्या शांततेचा भंग होईल अशी शंकाहि कोणाच्या मनांत डोकावत नव्हती. जागतिक युद्धाचा काळ मागें पडला असून एकमेकांचे गळे दाबणें हा रानटीपणा आहे, हें ओळखून मानवानें त्याचा त्याग केला आहे असा भरंवसा वाटूं लागला होता. ग्रेट ब्रिटननें अवलंबिलेल्या "उदारमतवादी" धोरणाची सर्व जगावर छाप पडली होती. मागासलेल्या देशांना स्वातंत्र्य देण्याच्या बाबतींत किंवा आर्थिक गुलामगिरींतून त्यांची मुक्तता करण्याच्या बाबतींत य धोरणाची जेवढ्या त्वरेनें अंमलबजावणी व्हावयास पाहिजे होती तेवढी ती होत नव्हती, हें दुर्दैवानें खरें आहे. परंतु तरीदेखील मागासलेल्या देशांचा स्वातंत्र्याचा हक्क निदान नैतिक दृष्ट्यातरी मान्य केला गेला होता. आणि ते लोक शांतता व सुव्यवस्था यांचा लाभ घेऊं शकत होते. आणि नाहीं म्हटलें तरी त्या राजवटीला एक जाणवण्यासारखा नैतिक व्यवस्थेचा आधार होता.

शिवाय वासाहतिक देशांना स्वातंत्र्य देण्याच्या कामीं इंग्लंड खळखळ करीत असलें तरी निदान अमेरिका ही उणीव भरून काढील अशी आशा वाटत होती, कारण स्वतः जिंकलेल्या प्रदेशांच्या बाबतींत अमेरिकेनें साम्राज्य-शाहीविरोधी धोरण स्वीकारलें होतें आणि फिलिपीन्समध्यें ती एक नवा प्रयोग

करूं पाहात होती, त्यावेळीं सर्वसाधारण जनतेची अशी भावना झाली होती कीं, राजकीय स्वातंत्र हें प्राप्त करून घ्यावें लागतें. अर्थात् इंग्रजांच्या राजवटींत स्वातंत्र्यासाठीं जबर किंमत मोजावी लागत असली तरी आस्तेआस्ते ते अधिकाधिक उदार धोरण अंगिकारूं लागतील आणि जगांतील अधिकाधिक लोकांना त्यामुळें स्वातंत्र्याचा लाभ घेतां येईल अशी आशा वाटूं लागली होती.

स्वतंत्र संस्था, शिक्षण, भौतिक विज्ञान, वैद्यक या सर्व क्षेत्रांत आशेचे नवे नवे अंकूर पल्लवित होत होते. त्या काळांत पाश्चात्य जगांतील जनतेचीं मनें मानवाच्या भवितव्याचीं आशावादी चित्रें रंगविण्यांत गढून गेलीं होतीं. जुन्या जगाच्या मरणोन्मुख आणि अन्यायी अवशेषांतून आपण नव्या जगाची उभारणी करूं शकूं असा आत्मविश्वास अमेरिकन जनतेला वाटूं लागला होता. त्यांच्या डोळ्यांदेखत होत असलेलें संक्रमण ते प्रत्यक्ष पाहात होते. प्रत्येक वर्षीं औद्योगिक क्षेत्रांत आश्चर्यकारक शोध लागत होते. घासलेटच्या जागीं गॅसचे दिवे आले; आणि त्यांची जागा थोड्याच दिवसांत विद्युत्दीपांनीं घेतली. राजरस्यांवरून मोटारींची ये जा सुरू झाली. विमान ही आतां परीकथेंतील अद्‌भुत चीज राहिली नव्हती. “आकाशांत भरारी मारणारी ही अजब वस्तु आम्ही प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिली” असें सांगणाऱ्या लोकांची संख्या वाढूं लागली होती. दूरदूरचीं शहरें लोहमार्गांनीं जोडलीं जात होतीं व आगगाड्यांचा वेगहि प्रतिदिनीं वाढत होता. अमेरिकेंत पन्नास हजारांचेवर टेलिफोन किणकिणत होते; इतकेंच नव्हे तर मार्कोनीनें बिनतारी संदेशाचा शोधहि लावला होता. भरभराटीस येऊं लागलेल्या निरनिराळ्या शहरांतून नव्या नव्या उद्योगधंद्यांची झपाट्यानें वाढ होत होती, पण याहिपेक्षां आश्चर्यकारक शोध अल्पावकाशांत लागूं शकतील अशी भाषा बोलली जात होती. आजपर्यंत मिळविलेलें सारें ज्ञान संकलित करून त्याला प्रयोगाची जोड दिली तर भावी काळांत मन थक्क करून सोडणाऱ्या गोष्टी सहजसाध्य होतील असें वाटूं लागलें होतें. हजारों वर्षांपासून मानव ज्या कल्पना रंगवीत आला होता त्या साकार होण्याचा दिवस आतां जवळ येऊन ठेपला आहे असा भरंवसा वाटूं लागला होता. आजपर्यंत साध्य न झालेली किमया करून दाखवून अतिमानवाच्या कोटीला

पोंहोंचण्यास आतां फार अवकाश उरलेला नव्हता. एक दिवस असा उगवेल कीं, दूरदूरच्या व्यक्ति हवेंतील लहरींच्या साहाय्यानें एकमेकांशीं संभाषण करूं शकतील. समुद्र, सूर्य, इतकेंच नव्हे तर इतर पंचमहाभूतांतील शक्ति मानवाच्या सुखसोयीसाठीं राबवून घेतां येतील. जीवनकलह संपुष्टांत येऊन आदिमानवापासून पाठीशीं लागलेले कष्ट आणि हाल कायमचे थांबतील. नुसतें बटन दाबण्याचा अवकाश कीं, सारीं पंचमहाभूतें हात जोडून आपल्या सेवेला हजर होतील, आणि इतर चांगल्या गोष्टी करावयाला माणसाला हवी तेवढी फुरसत मिळेल अशी आशा वाटूं लागली होती.

विसाव्या शतकांत घडून आलेल्या वैज्ञानिक प्रगतीनें ही भविष्यवाणी खरी करून दाखविली आहे. इतकेंच नव्हे तर त्याच्याही पुढची मजल मारली आहे. १९०० सालीं एच्. जी. वेल्सनें भावी काळांत घडणाऱ्या आश्चर्यकारक गोष्टींची कल्पना आपल्या "Anticipations" ह्या पुस्तकांतून जगापुढें मांडली. त्या कल्पना इतक्या तंतोतंत खऱ्या ठरलेल्या पाहून मन थक्क होऊन जातें. या गोष्टी घडून यावयाला इसवी सनाचें २००० वें साल उजाडावें लागेल असा अंदाज वेल्सनें व्यक्त केला होता. परंतु त्याच्या वेळापत्रकापेक्षां आपण चांगली पन्नास वर्षांनें आघाडी मारली आहे. हेन्री ॲडम्स्नें प्रथम शोधून काढलेला एक महत्त्वाचा सिद्धांत एच्. जी. वेल्ससारख्या भविष्यवेत्त्याच्या लक्षांत आला नव्हता. कोळशाच्या ज्वलनासंबंधीं संशोधन करीत असतांना ॲडम्सनें प्रथम आपल्या गतीसंबंधींचा सिद्धांत (Law of Acceleration) मांडला. १९०४ सालीं लिहिलेल्या आपल्या आत्मचरित्रांत त्यानें यासंबंधाचें विवेचन केलेलें आहे. त्या सिद्धांताच्या आधारें त्यानें असें भाकित केलें होतें कीं, कोळसा, निरनिराळीं रसायनें, त्याचप्रमाणें आजपर्यंत ज्यांचें आकलन होऊं शकलेलें नाहीं अशा पदार्थांमधील सुप्त शक्ति ह्यांच्या जोरावर अमेरिकन लोक अशी कांहीं किमया करून दाखवतील कीं, त्याला दुसरी तोड राहणार नाहीं. या शोधामुळें मानवाला जणुं कांहीं ईश्वरी सामर्थ्य प्राप्त होईल.

आणि नेमकें असेंच घडून आलें आहे. अवघ्या अर्ध शतकाच्या कालावधींत जगाचें स्वरूप पार बदलून गेलें आहे. जगाच्या कांहीं भागांत एक नवीनच मानवजात निर्माण झाली आहे. निरनिराळ्या शोधांच्या सहाय्यानें

जणूं नवीं इंद्रियें प्राप्त करून घेतलेल्या असामान्य प्राण्याचें स्वरूप त्याला प्राप्त झालें आहे. या नव्या मानवाला "औद्योगिक मानव" अशी संज्ञा देतां येईल. शेकडों नव्हे हजारों अश्वशक्तींचीं कामें करून घेण्याची ताकद त्यानें प्राप्त करून घेतली आहे. घरापेक्षांहि मोठ्या आकाराचीं अशीं कांहीं प्रचंड अवजारें त्यानें निर्माण केलीं आहेत कीं, जीं ताकदीच्या बाबतींत पूर्वींच्या राक्षसांनाहि मागें सारूं लागलीं आहेत. हातीं धरलेल्या चक्राच्या योगानें वेगाच्या बाबतींत तो वाऱ्यावरहि मात करतो. आणि हातांतील काठीच्या आधारानें तो आवाजाची मर्यादा ओलांडूं शकतो. त्यानें असे कांहीं यांत्रिक पंजे स्वतःच्या हातांवर बसवून घेतले आहेत कीं, ज्यामुळें तो जमिनीच्या पोटांत मैलच्या मैल खणूं शकतो. तसेंच त्यानें जें कवच शोधून काढलें आहे, त्यामुळें समुद्राच्या तळाशीं तो हवा तेवढा वेळ राहूं शकतो. आणि आजपर्यंत अज्ञात असलेलीं बिनतारी यंत्राचीं शिंगें बसविलीं कीं, अंधारांतील वस्तू पाहण्याची आणि पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याहि माणसाशीं बोलण्याची दिव्य शक्ति त्याला प्राप्त होते. प्राचीन काळचे लोक देवांच्या आंगीं जें सामर्थ्य आहे असें समजत असत, तें सामर्थ्य आज विसाव्या शतकाच्या मध्यकाळीं माणसाला प्राप्त झालें आहे. त्याच्या सामर्थ्याला अंत नाहीं. निसर्गाच्या शक्तीवर त्यानें आतां इतकें प्रभुत्व मिळवलें आहे कीं, तो अणूमधल्या पोकळीवरहि आपला प्रभाव गाजवूं शकतो.

औद्योगीकरणाच्या उत्पत्तीसंबंधानें यापेक्षां अधिक विवेचन करण्याची आवश्यकता नाहीं. माणसानीं यंत्राच्या साहाय्यानें आपल्या इंद्रियांना दिलेली जोड आणि नैसर्गिकरित्या विकसित होणारीं इंद्रियें यांत अर्थातच फार फरक आहे. रूढ समाजशास्त्रीय कल्पनांपेक्षां आपल्यापुढील समस्या कशा निराळ्या आहेत तें दाखवून देण्यापुरतीच ही उपमा लागू पडण्यासारखी आहे. विशिष्ट नैसर्गिक परिस्थितींत इंद्रियांत उत्क्रांति होत जाते हें समाजशास्त्रज्ञ जाणतात. पण परिस्थितीला कितीहि महत्त्व असलें तरी केवळ परिस्थितीमुळें जातीचें संपूर्ण रूपांतर होऊं शकत नाहीं असें उत्पत्तिवाद्यांचें (geneticists) मत आहे. माणसामध्यें कांहीं प्रचंड शक्ति कार्य करीत असतात हें आपण ओळखूं शकलों नाहीं, आणि त्यांची कांहीं प्रमाणांतहि व्याख्या करूं शकलों नाहीं तर आपल्याला आजच्या काळाचें खरें रहस्य समजूं शकणार

नाहीं. जें जें घडत आलें आहे तें सगळें केवळ परिस्थितीमुळेंच घडत आलें आहे, असें आपण मानूं लागलों तर आपली फसगत झाल्यावांचून राहणार नाहीं. कारण आपल्याला ज्या स्थित्यंतरांचा विचार करावयाचा आहे तीं लहानसहान स्थित्यंतरें नाहींत तर मानवाच्या ज्ञात इतिहासांत कधीं घडलीं नसतील अशीं मूलगामी स्थित्यंतरें अचानकपणें घडून आलेलीं आपण पाहात आहोंत. ऐतिहासिक दृष्ट्या बोलावयाचें झालें तर औद्योगिक मानवाचा अवतार हा सर्व जगाला हादरवून सोडणाऱ्या प्रचंड स्फोटासारखा आहे. धर्म, कला, नीतिनियम, राजकीय विचारसरणी किंवा जीवनपद्धति यापैकीं कोणीहि या नव्या मानवाचें वर्चस्व थोपवूं शकलेलें नाहीं. विशेषतः हजारों वर्षांपासूनच्या परंपरा असलेल्या अतिपूर्वेकडील मुख्यत्त्वेंकरून हिंदुस्थान व चीन ह्यांसारख्या देशांतल्या संस्कृती त्यामुळें अल्पकाळांतच विस्कळीत होऊन गेल्या आहेत. म्हणून या "औद्योगिक मानवा"चा अवतार कसा झाला हें नीटपणें समजून घ्यायचें असेल तर केवळ बाह्य शक्तीकडे बघून चालणार नाहीं, तर अंतर्गत शक्तीचादेखील विचार करावा लागेल.

"औद्योगिक मानवा"च्या विजयाची जो अप्रतिहत घोडदौड चाललेली आहे, त्यामुळें आपल्या पूर्वजांच्या कल्पनाशक्तीच्याहि पलिकडचीं अशी नवीं नवीं स्वप्नें आतां त्याला दिसूं लागलीं आहेत. जगाची आर्थिक सुरक्षितता हें असेंच एक आजच्या मानवाचें सुखस्वप्न आहे. या शतकाच्या आरंभीं जें आशादायक वातावरण दिसत होतें तेव्हांपासून पृथ्वीच्या पाठीवरील दोन अब्ज लोकांपैकीं प्रत्येकाला अन्न, वस्त्र व निवारा यांची तर तरतूद करतां येईलच; पण या जीवनावश्यक गरजांच्या व्यतिरिक्त आणखीहि कांहीं सुख-सोयी उपलब्ध करून देतां येतील असा विश्वास वाटूं लागला आहे आणि अमेरिका व रशिया या जगांतील महाप्रबळ अशा दोन्ही राष्ट्रांनीं या महत्त्वाकांक्षी कल्पनेचा संकल्प सोडला आहे ही त्यांतली गंमत आहे. जगाची आर्थिक सुरक्षितता हें आतां नुसतें स्वप्न राहिलेलें नाहीं तर नजिकच्या काळांत साकार होण्यासारखें ध्येय बनलेलें असून जगांतील मुत्सद्यांना त्याचा विचार करणें आतां भाग पडूं लागलें आहे. प्रत्येकाला सधन बनविण्याची

कल्पना जरी अद्यापि मनोराज्यांत मोडणारी असली तरी कोणालाहि ददात पडणार नाहीं अशी व्यवस्था करणें हें खासच आपल्या आवाक्यांत आलें आहे. औद्योगिक मानवानें सृष्टीचें रहस्य शोधून काढलें असून कमतरता हा शब्द काढून टाकण्याइतकी साधनसंपत्ति त्यानें हस्तगत केली आहे किंवा करण्याच्या परिस्थितींत तो आहे. विसाव्या शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षांत मानवानें जी आश्चर्यकारक प्रगति करून घेतली त्याचे परिणाम हे इतके दूरगामी आणि सर्वस्पर्शी आहेत.

* * *

## २ : : आशावादी तवत्त्ज्ञान

विसाव्या शतकाच्या आरंभींच्या "आशा युगांत" नव्यानें दृग्गोचर झालेलीं क्षितिजें पाहून जो अपूर्व उत्साह निर्माण झाला तो केवळ कांहीं तरी भव्य असें दृष्टीस पडल्यामुळें निर्माण झालेला उत्साह नव्हता, त्याला एक तात्त्विक अधिष्ठानहि होतें आणि त्या आधारावरच नवयुगाचे भविष्यवेत्ते उभे होते. विशेषतः अमेरिकेमध्यें विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत जीं भाकितें वर्तविण्यांत आलीं तीं मानवासंबंधींच्या कांहीं गृहीत कृत्यांवर आधारलेलीं होतीं आणि अमेरिकन परंपरेला अनुसरून हीं गृहीत कृत्यें स्वयंसिद्ध मानलीं गेलीं होतीं. ह्या गृहीत कृत्यांनाच त्या भविष्यवेत्त्यांनीं "अपरिहार्य प्रगती"च्या सिद्धान्ताचें स्वरूप दिलें.

प्रगतीच्या सिद्धान्ताचें नीट आकलन करून घ्यावयाचें असेल तर आपल्याला एक गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे, ती म्हणजे मानवी संस्कृतीचा सारा इतिहास दुःखमयतेच्या भावनेनें भारावलेला आहे. मानवी इतिहासाचें परिशीलन केलें तर आपणांस असें आढळून येतें कीं, आपणांत कांहींतरी दैवी अंश आहे आणि आपलें खरें स्थान परलोकांत कोठेंतरी आहे आणि तिथून आपण ह्या पृथ्वीवर आलों आहों अशी माणसानें स्वतःची समजूत करून घेतलेली आहे. धर्माच्या सहाय्यानें परलोकाशीं सबंध जोडण्याचा त्याचा प्रयत्न सतत चाललेला आहे. परलोकांतून भूलोकांत त्याचा जो अधःपात झाला त्याचें चित्र

दा. क्र. 90280

त्याच्या कलाकृतींत पहावयास सांपडतें. रोजच्या भौतिक जीवनांत त्याच्या वांट्यास आलेलें पाप व दुःख आणि परलोकांत त्यानें अनुभविलेलें आणि आतां अर्धविकृत अवस्थेंत त्याच्या अंतःकरणांत राहिलेलें सत्य, शिव, सुंदर यांची सांगड घालण्याचीच धडपड तो तत्त्वज्ञानाच्या साहाय्यानें करीत असतो. जगांतील भिन्न भिन्न साली या प्रश्नांची भिन्न भिन्न मार्गानें उपपत्ति लावण्याचा प्रयत्न धर्म, तत्त्वज्ञान आणि कला यांच्या क्षेत्रांत झालेला आहे. परंतु त्या सर्वांच्या शिकवणुकीचें सार सर्वसाधारणपणें निराशावादीच असे. भौतिक जीवनांत पारलौकिक सुखाचा आस्वाद घेतां येणें शक्य नाहीं आणि मंगल जें आहे तें तर कधींच साध्य होणार नाहीं हाच त्याच्या शिकवणुकीचा स्थायीभाव असल्याचें आढळून येतें. हा एक मूलगामी स्वरूपाचा दृष्टिकोन असून त्याचा मथितार्थ इतकाच आहे कीं, हें मर्त्य जीवन म्हणजे कष्ट, दुःख, भय, एकाकीपणा आणि मृत्यु सहन करायला शिकविणारी एक शाळाच आहे. मेल्यानंतर पुन्हां वरच्या कोटींत जन्माला कसें यावें त्याचें ज्ञान त्यामुळेंच प्राप्त होतें, अशी ही शिकवण आहे.

सर्व प्रमुख धर्मांचा आणि विशेषतः ख्रिश्चन धर्माचा भौतिक जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन असाच असून त्याला तात्त्विक निराशावाद (Philosophical pessimism) अशी संज्ञा देतां येईल. मात्र आर्थर शोपेन हावर ह्यांच्या निराशावादासारखा हा निराशावाद संकुचित स्वरूपाचा नाहीं. शोपेन हावरच्या निराशावादी विचारसरणीचें सूत्र असें आहे आहे कीं, मानवाला तृप्तीचा आनंद कधींहि उपभोगतां येणार नाहीं. याच्या उलट वर उल्लेखिलेल्या निराशावादाची मानवी जीवनाकडे आणि त्याला कराव्या लागणाऱ्या संघर्षाकडे बघण्याची दृष्टि अधिक मूलगामी आहे. एका दृष्टीनें तात्त्विक निराशावाद हा मुळांत आशावादीच आहे. कारण सत्य, शिव, सुंदर अशा एका अवस्थेचा जेथें उपभोग घेतां येईल अशा उच्च लोकांशीं मानवाचा संबंध आहे किंवा त्या लोकाप्रत तो पोहोंचू शकतो, असें ही विचारसरणी सांगते. परंतु त्याच्या मतें भौतिक जगाचा संबंध त्या उच्च लोकाशीं पोहोंचू शकत नसल्याकारणानें मर्त्य जीवनाकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन मात्र निराशावादीच असतो. किंवा निराळ्या शब्दांत सांगावयाचें तर मानवाला ह्याच देहीं ह्याच लोकीं मुक्ति मिळणें शक्य नाहीं अशी ही

63533
22202 22.3.69

भूमिका आहे. उलट भौतिक जीवनामुळें तो पापाच्या फेऱ्यांत अधिकाधिक गुरफटत जातो. एखाद्या माणसाला चांगल्याची वांछा धरतां येईल. परंतु तो जर एकाकी प्रयत्न करीत राहील तर तें त्याला कधींहि साध्य होणार नाहीं. त्यासाठीं कोणत्या ना कोणत्या स्वरूपांतील दैवी शक्तीचें सहाय्य घेणें त्याला आवश्यक. मग ही दैवी शक्ति वन्य समाजांतल्या " भगता "च्या मंत्रांतली असो, हिंदुधर्मांतील कर्मवादाची असो नाहींतर ख्रिस्ती धर्मांत सांगितलेली ख्रिस्ताच्या मध्यस्थीनें होणाऱ्या पाप-मुक्ततेच्या सिद्धांताच्या स्वरूपाची असो. माणसाला जसा जसा आपल्या अंतस्थ आध्यात्मिक आणि दैवी शक्तीचा साक्षात्कार होत जाईल तसतसा तो पापाच्या आणि दुःखाच्या बंधनांतून मुक्त होत जाईल. भौतिक जगापासून दुःख आणि मोह यावांचून त्याला अन्य कशाचीच प्राप्ती होत नाहीं. परंतु आत्मसाक्षात्कार होण्यासाठीं त्याला या दिव्यांतून जावेंच लागतें.

परंतु अमेरिकेचा प्रगतीचा सिद्धान्त सध्यां ज्या तत्त्वज्ञानावर आधारलेला आहे त्याची बैठक यापेक्षां फार निराळी आहे. तात्त्विक आशावाद (Philosophical optimism) म्हणून त्याला संबोधितां येईल. अर्थात् ही विचारसरणी केवळ स्वभाववैशिष्ट्यावर आधारलेल्या उथळ आशावादासारखी नाहीं. मानव आणि त्याचें ऐहिक जीवन यांचा सखोल विचार यांत झालेला आहे. माणसाची इच्छाशक्ति, त्याचीं कृत्यें, आणि त्याची नियति या सर्वांच्या बाबतींत या विचारसरणींच्या पुरस्कर्त्यांनीं काढलेले निष्कर्ष आशावादी आहेत. माणसाच्या मुक्तीसाठीं ही विचारसरणी परलोकाकडे डोळे लावून बसत नाहीं. अर्थात् मुक्तीची कल्पना हीच मुळीं शंकास्पद आहे. कारण मूलभूत किंवा जन्मजात पापाच्या गृहीत तत्त्वावर ती आधारलेली असते. मनुष्य हा जन्मतःच पापी आणि भ्रष्ट असतो, या कॅल्व्हिनच्या सिद्धांताची फार मोठी छाप अमेरिकन संस्कृतीवर पडलेली आहे हें खरें. परंतु त्या सिद्धांतांत आतां इतकें स्थित्यंतर घडून आलें आहे कीं, त्याचा मागमूसहि अमेरिकन संस्कृतींत राहिलेला नाहीं. इतकेंच नव्हे तर कॅल्व्हिनची विचारसरणी—निदान तिच्या मूळ प्रवर्तकाला ती जशी अभिप्रेत होती तशी—बौद्धिकदृष्ट्या कुचकामी आहे आणि नैतिकदृष्ट्यादेखील दोषास्पद आहे असें आतां मानलें जाऊं लागलें आहे. सभोंवतालच्या वातावरणाचें आव्हान स्विकारून मानवानें स्वसामर्थ्या-

वरच स्वतःची मुक्ति करून घेतली पाहिजे हा प्रगतीच्या सिद्धांताचा खरा गाभा आहे. आणि अमेरिकेंतील आशावादी विचारवंतांची यावर इतकी निष्ठा आहे कीं, ईश्वरी कृपाप्रसादासारख्या अमूर्त आणि गूढ तत्त्वावर विसंबण्याची त्यांना आवश्यकता वाटत नाहीं. अर्थात् ऐहिक जीवन हें दुःख व असत् यांनीं भरलेलें आहे हें आशावादी तत्त्वज्ञानीहि मानतात, परंतु 'हीं दुःखें दूर करतां येतील' असा त्यांचा दावा असतो. ईश्वराचें अस्तित्व ते नाकारतातच असें नव्हे, परंतु "जे स्वतः हातपाय हलवतात त्यांनाच देव सहाय्य करतो" या वचनावर मात्र त्यांचा दृढ विश्वास असतो. आधिदैविक शक्तीमुळें माणसाला मुक्तीचा मार्ग दिसतो असें मानण्यास कोणताहि आधार नाहीं. अशा भानांत राहणें म्हणजे एकपरीनें मोहाच्या आणि अंध समजुतीच्या आहारीं जाण्यासारखेंच आहे, असें त्यांचें प्रतिपादन असतें. माणसाला स्वतःची मुक्ति स्वतःलाच करून घेणें अगदीं शक्य आहे आणि त्यानें ती करून घेतली पाहिजे किंवा आशावादी तत्त्ववेत्त्यांच्या शब्दांत सांगावयाचें तर माणसानें आत्मोन्नति साधली पाहिजे आणि तीसुद्धां कोठल्यातरी आधिदैविक किंवा पारलौकिक शक्तीवर भरंवसा ठेऊन नव्हे तर याच आधिभौतिक जगांत वावरत असतांना! निर्भेळ आनंद आणि सौंदर्य ह्यांचा अंतःसाक्षात्कार जो माणसाला होत असतो त्यासंबंधीं या तत्त्ववेत्त्यांचें प्रतिपादन असें आहे कीं, आशावादाच्या सत्यतेचा तो एक पुरावाच आहे. कारण हा साक्षात्कार म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून माणसाला आजपर्यंत प्राप्त होऊं न शकलेली पूर्णावस्था प्राप्त करून घेण्याची त्याला लागलेली तळमळ होय. भूक किंवा विषयवासना ह्यांप्रमाणेंच वरील वासनेचें मूळदेखील मनुष्यस्वभावांत असतें. आणि त्या वासनांच्या द्वारां मनुष्याची प्रकृति स्वतःला पूर्णावस्थेकडे नेण्याचा प्रयत्न करीत असते. म्हणजेच त्याचें प्रतिपादन असें असतें कीं, सुखप्राप्तीचें ध्येय डोळ्यांपुढें ठेऊन त्यासाठीं झगडण्यांत अयोग्य असें कांहींहि नाहीं. उलट मानवी स्वभावाला धरूनच आहे. आणि मानवी प्रयत्नांनीं तें साध्यहि करून घेतां येईल.

तात्त्विक आशावादी आणि तात्त्विक निराशावादी यांच्यांतील मतभेदाचा सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे असत् किंवा दुष्ट प्रवृत्तींकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन. माणूस हा मूलतः सुष्ट, चांगला आहे असें आशावादी मानतात.

त्यांच्यामतें बहुसंख्य स्त्रीपुरुष हे नेहमीं स्वतःचें व दुसऱ्याचें भलें व्हावें अशी सदिच्छा बाळगणारे असतात. माणसाला जीं दुःखें भोगावीं लागतात तीं त्याच्या हातून घडलेल्या चुकांमुळें किंवा त्याच्यांतील उणीवांमुळें भोगावीं लागत असल्यामुळें त्यांचें निराकरण करणें शक्य आहे अशी त्यांची धारणा असते. म्हणून आशावादी मूलतः सुधारणावादी असतात. असत् प्रवृत्तींचीं कारणें हीं बाह्य स्वरूपाचीं असतात. अज्ञान आणि दारिद्र्य यांतून असत् प्रवृत्तींचीं बीजें अंकुरित होतात. आणि जेथें अज्ञान आणि दारिद्र्य आहे तेथें फसवणूक, स्वार्थलंपटता, भय आणि तिरस्कार हें सर्व आलेंच. राज्यसंस्था किंवा धर्म अशासारख्या मानवनिर्मित संस्था सामान्यतः या परिस्थितीला जबाबदार आहेत. वस्तुतः माणसाची वास्तव गरज भागावी म्हणून माणसानें त्या निर्माण केल्या, परंतु जुलूम आणि संकुचित वृत्ति यांच्या आहारीं गेल्यामुळें अनेकदां मानवी प्रगतीलाच त्या खो घालतात. सभोंवतालची ही परिस्थिति पालटतां आली तर असत् प्रवृत्तीचा प्रश्न सोडवतां येईल, अशी आशावादी तत्त्ववेत्त्यांची धारणा असते. सभोंवतालच्या परिस्थितीला कलाटणी देऊन ती माणसाला स्वतःच्या उच्च प्रकारच्या इच्छापूर्तींसाठीं राबवितां आली तर हें ऐहिक जीवन सुखी करण्याच्या मार्गांत कोणतीहि अडचण उरणार नाहीं आणि मग अनादिकालापासून हृदयाशीं धरलेली सत्‌चिदानंदावस्थेप्रत पोहोंचण्याची त्याची इच्छा तृप्त होऊं शकेल.

तात्त्विक आशावादाचें मूळ कशांत आहे हें शोधीत न बसतां एवढें म्हणतां येईल कीं, एक महत्त्वाचा विचारप्रवाह म्हणून अठराव्या शतकाच्या मध्याला तो जगभर मान्यता पावला. याच काळांत प्रामुख्यानें थॉमस जेफरसन आदि आद्य विचारवंतांच्या विचारसरणीवर त्याचा पगडा बसला. अमेरिका ज्यावेळीं एक राष्ट्र म्हणून उदयास येत होती, त्यावेळीं निराशावादी तत्त्ववेत्त्यांची छाप तिच्यावर पडलेली नव्हती असें नव्हे. विशेषतः जॉन ॲडम्सची विचारसरणी त्यावेळीं बऱ्याच अंशीं प्रभावी होती परंतु त्याचवेळीं अमेरिकेच्या जीवनपद्धतीनें आशावादाचा अंगीकार केला आणि तेव्हांपासून इतर कोणत्याहि देशापेक्षां अमेरिकेंत या विचारसरणीचीं पाळेंमुळें अधिक खोलवर रुजलीं असें अगदीं यथार्थतेनें म्हणतां येईल. उदाहरणार्थ जॅक्सनप्रणीत सर्वंकष लोकशाहीचा विचार हा आशावादाचाच जोरकस असा

आविष्कार होता आणि त्यापुढें ॲडॅम्सच्या शिकवणुकीची पार वाताहत होऊन गेली. विसाव्या शतकाच्या सुरुवातीबरोबर आशावादांतील 'जहाल' तत्त्वें अमेरिकन पद्धतींत पार एकरूप होऊन गेलीं. थीओडोर रूझवेल्टच्या व्यक्तिमत्त्वांत त्यांचा आविष्कार झाला आणि वाटेल ती किंमत द्यावी लागली तरी माणसाचें ऐहिक जीवन समृद्ध करायचेंच ह्या निश्चयानें फ्रँकलीन रूझवेल्टनें ज्या सुधारणा अमलांत आणल्या त्यामुळें तो लोकप्रियतेच्या शिखरावर पोंहोंचला. त्याच्याइतकी लोकप्रियता आजपर्यंत अमेरिकेच्या दुसऱ्या कोणत्याहि अध्यक्षाच्या वांट्याला आलेली नाहीं.

मात्र अमेरिकन आशावादाचें स्वरूप केवळ राजकीय आहे असें मानून चालणार नाहीं. सामान्यपणें आपण ज्याला सिद्धांत म्हणतों तसा तो नुसता सिद्धांत नाहीं तर जीवनाकडे बघण्याची ती एक सम्यक् दृष्टि आहे. आणि मानवी मनाच्या विकासाशीं ती निगडित आहे. आधुनिक तात्त्विक आशावादाचा मूलाधार आपण ज्याला सर्वसाधारणपणें विज्ञान म्हणून संबोधतों ती संशोधनाची शास्त्रीय पद्धतीहि आहे. मूलतः माणूस सत्प्रवृत्तच असतो, अशासारखीं आशावादांतील महत्त्वाचीं तत्त्वें अठराव्या शतकांतील बुद्धिवादी विचारसरणींतून विकसित झालीं आहेत हें खरें आहे. कदाचित् त्याचा धागा आणखीहि मागें नेतां येईल; परंतु विज्ञानानें प्रगतीचा जो टप्पा गांठला आहे त्यावरून आपण बाळगलेला विश्वास तंतोतंत बरोबर असल्याचाच पुरावा मिळतो; असें आशावाद्यांना आढळून आलें आहे. माणसाची जीवनसरणी ही निश्चितपणें सुधारण्यासारखी असून ती सुधारणा सभोंवतालची परिस्थिति बदलल्यानें घडवून आणतां येईल. आणि एकदां परिस्थितींत स्थित्यंतर घडून आलें म्हणजे समाजावर त्याचे इष्ट परिणाम होतील. हीं कांहीं आतां केवळ तात्त्विक प्रमेयें राहिलेलीं नाहींत तर विज्ञानांत झालेल्या अचाट प्रगतीमुळें विसाव्या शतकांतील अमेरिकन संस्कृतीवर त्याचा चांगलाच ठसा उमटला आहे.

याच सिद्धांतामुळें या शतकाचा शुभारंभ आशादायी झाला. माणसाच्या बुद्धिवैभवांतून निर्माण झालेल्या तंत्रविद्येमुळें जगांत इतके क्रांतिकारी बदल घडून आले कीं, त्यापुढें निराशावाद पार मागें पडला. जीवनकलहाचें जें प्रचंड ओझें इतके दिवस मानवाच्या बोकांडीं बसलें होतें तें तंत्रविद्येमुळें

उतरलें जाऊन मानवाला इतर उदात्त ध्येयांचा मार्ग चोखाळण्यास मोकळीक मिळाली. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य किंवा विकासाची संधि यांसारख्या अगदीं प्राथमिक गरजांपासूनदेखील वंचित राहिल्यामुळेंच वा युद्धें आणि निरनिराळ्या साथींमुळें उद्भवणारीं दुःखें माणसाच्या पाठीशीं लागलीं! तंत्रविद्येच्या योगानें या प्राथमिक गरजा भागवितां आल्या तर अज्ञानांधकार घालविण्याकडे माणसाला आपलें शक्तिसर्वस्व वेंचतां येईल आणि त्यायोगें ज्ञानाचा मार्ग मोकळा करून घेतां येईल.आणि अशा तऱ्हेनें अंतीं त्यांना ख्रिस्ती धर्मांत सांगितलेल्या नीतिनियमानुसार आपलें जीवन व्यतीत करतां येईल.

या दृष्टीनें पाहून या शतकांतील सुरुवातीच्या काळांतील अमेरिकन विचारवतांनीं असें भाकित वर्तविलें कीं, तंत्रविद्येतील क्रांति ही ख्रिस्ती धर्मतत्त्वांच्या पूर्ततेची नांदी ठरणार आहे. अर्थात् त्यासाठीं "नव्या करारांत" थोडा बदल करणें आवश्यक होतें. जगांतील इतर सर्व धर्मांप्रमाणेंच ख्रिस्ती धर्माची शिकवण हीदेखील मूलतः निराशावादी किंवा निवृत्तिमार्गीच आहे. ख्रिस्तीधर्मांतील पंथोपपंथ मानवाच्या कर्मासंबंधीं निरनिराळे सिद्धांत मांडत असले तरी आपल्या सभोंवतालची परिस्थिति पालटण्यासाठीं माणसानें झगडलें पाहिजे असें मात्र त्यांच्यापैकीं कोणीच सांगत नाहीं. माणसानें आपल्या आत्म्याची उन्नति करून घेण्याचा प्रयत्न करीत राहिलें पाहिजे, याबद्दल मात्र त्या सर्वांचें एकमत असल्याचें दिसून येतें. शिवाय, ख्रिश्चन धर्माचा संस्थापक जो प्रभु येशू ख्रिस्त त्यानेंच अनेक ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें तो सामान्य मानव नव्हता तर देवाचा प्रत्यक्ष पुत्रच होता. मानवजातीला मोक्ष प्राप्त व्हावा म्हणून अवघ्या मानवजातीच्या वतीनें प्रचंड आत्मयज्ञ करण्यासाठींच त्यानें या भूतलावर अवतार घेतला होता. या भूतलापेक्षां उच्चकोटींतील जीवन असलेलें एखादें जग असलें पाहिजे, असें मानणारी ही विचारसरणी आणि माणसाचें ईप्सित या जगांतदेखील साध्य होऊं शकेल, ही आशावादांतील विचारसरणी या परस्परविरोधी आहेत. अमेरिकन आशावादी हे ह्या ख्रिस्ती परंपरेंत वाढलेले असल्याकारणानें तिचा त्याग करण्याला ते तयार नव्हते. त्यामुळें या प्रश्नांतून सोडवणूक करून घेण्यासाठीं ख्रिस्ताच्या अनुयायांनीं मागें ठेवलेल्या त्याच्या 'करारांत' फेरबदल करण्यावांचून त्यांना गत्यंतर नव्हतें.

आणि तें काम फारसें अवघड होतें अशांतलाहि भाग नाहीं. टॉमस जेफरसननें कांहीं प्रमाणांत तें कार्य आधींच उरकलें होतें. त्याला अत्यंत प्रिय असणाऱ्या बुद्धिवादी दृष्टिकोनाशीं विसदृश दिसूं नयेत म्हणून त्यानें खिस्ती धर्मग्रंथाला मोठ्या आत्मविश्वासानें नवी झिलाई दिली होती. त्याच्यानंतर संशोधनाच्या बाबतींत माणसाला जीं साधनें उपलब्ध झालीं त्यांवरून ऐतिहासिक दृष्ट्या 'नवा करार' खऱ्या अर्थानें अधिकृत नाहींच असें सिद्ध करणें शक्य झालें आहे. सर्वच्यासर्व करार जरी नव्हे तरी त्यांतील बराचसा भाग येशू खिस्ताच्या मृत्यूनंतर कितीतरी वर्षांनीं, ज्यांनीं त्याला कधीं पाहिलेलेंहि नव्हतें, अशा लोकांनीं लिहिलेला आहे आणि येशूविषयींच्या अपार भक्तिभावामुळें बहुधा त्यांनीं त्याला ईश्वरी अंश बनविला असावा. अन्यथा स्वतः येशूनें कांहीं आपल्या तोंडानें मी ईश्वराचा अवतार आहें असें म्हटलें नसतें. अर्थात् विज्ञानयुगापूर्वीपासून चालत आलेल्या धर्मसिद्धान्तावर विश्वास ठेवणाऱ्या कॅथालिक धर्मपंथाला ही "पाखंडी" भूमिका अजिबात मान्य नाहीं. कारण 'नवा करार' हा तर ते खिश्चन धर्माचा गाभाच समजतात. पण निरनिराळ्या प्रॉटेस्टंट पंथांनीं मात्र धर्मासंबंधींचा बुद्धिवादी दृष्टिकोन आणि खिस्तीधर्म संस्थापकांची मानवतावादी भूमिका यांचा बऱ्याच प्रमाणांत अंगिकार केलेला आहे. माणसांतील स्वयंसिद्ध सत्प्रवृत्ति येशूमध्यें साकार झालेल्या होत्या. त्याच्याविषयींचा कोणताहि ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नसल्याकारणानें व्यक्ति म्हणून येशूसंबंधींच्या आपल्या कल्पना अंधूकच असाव्यात हें स्वाभाविक आहे. परंतु सौजन्य, प्रेम, आत्मक्लेश या गुणांच्या उपासनेसाठीं स्वतःवर फार मोठी संकटपरंपरा ओढवून घेऊन त्यानें एक भव्य आदर्श आपल्यापुढें ठेवला आहे.

खिस्ती धर्म आणि त्याचा संस्थापक यांच्यासंबंधीं आधुनिक काळाला साजेशीं मतें प्रतिपादण्यांत आल्यामुळें त्या धर्माला 'औद्योगिक मानवा'च्या गरजा व्यवस्थितपणें भागवूं शकेल अशा तऱ्हेचें नवें उपयुक्त स्वरूप देणें शक्य झालें. मानवांतल्या ज्या सत्त्वांशासाठीं येशू झगडला आणि क्रूसावर चढला तो सभोंवतालच्या परिस्थितीमुळें गुदमरून आणि विकृत होऊन गेला आहे. त्याला कोठें वाव मिळत नाहीं. अज्ञान, दारिद्र्य आणि जुलूम हीं त्या परिस्थितीचीं महत्त्वाचीं अंगें आहेत. शिक्षण हा अज्ञानावरील हमखास तोडगा आहे.

त्याप्रमाणें जुलूम थांबवायचा असेल तर लोकशाहीवादी परंपरा रूढ करून त्यांना उत्तेजन दिलें पाहिजे आणि दारिद्र्य घालवायचें असेल–अनेक आशावादी विचारवंत तर असें मानतात कीं, दारिद्र्यामुळेंच अज्ञान आणि जुलूम यांचा जन्म होतो–तर औद्योगीकरणावर आधारलेल्या अर्थशास्त्राची कांस धरली पाहिजे. या त्रिविध सुधारणांमुळें जगाला आशेचा किरण दिसूं लागणार आहे; असें विसाव्या शतकाच्या सुरवातीला जे उत्साही विचारवंत होऊन गेले त्यांना वाटूं लागलें होतें.

* * *

## २ : : दुष्ट प्रवृत्तीच्या फेऱ्यांत

सर्वसाधारणपणें बोलायचें तर वरील दृष्टिकोन हाच विसाव्या शतकांतील अमेरिकन विस्ताराचा पाया होता.

परंतु या विचारसरणीला पहिला तडा गेला तो १९१४सालच्या पहिल्या जागतिक महायुद्धामुळें. चिखलानें भरलेल्या खंदकांत बसून, " स्वभावतः सत्प्रवृत्त " असलेलीं माणसें एकमेकांचे मुडदे पाडीत असलेलीं पाहून ही सर्व विचारसरणी सदोष असली पाहिजे असें मनांत येऊं लागतें. स्वतः वुड्रो विल्सन हादेखील नवें युग अवतरणार असें म्हणणाऱ्यांपैकीं होता. पण त्याचे आडाखे देखील चुकीचे ठरत आहेत, असें दिसूं लागल्यामुळें पाश्चात्य जगाचे डोळे खाडकन उघडले. विज्ञानयुगामुळें आपल्याला नव्या खिस्ती धर्माचा खरोखरी साक्षात्कार होणार आहे का अशी शंका त्यांना सतावूं लागली.

युरोपमध्यें अर्थातच या घटनांमुळें चांगलाच भ्रमनिरास झाला आणि युरोपांतील विचारप्रवाहावर त्यामुळें मूलगामी स्वरूपाचे परिणाम घडून आले. परंतु अमेरिकेंत त्याचें जे पडसाद उमटले ते मात्र काहींसे नाटकी आणि कृत्रिम (रोमँटिक) स्वरूपाचे होते. बरबाद झालेल्या पिढीचे स्वयंमन्य प्रतिनिधि पुढें

आले. नित्शेप्रमाणें मूल्येंच उफराटीं बनविण्यास त्यांनीं सुरुवात केली. मात्र आपण जी नाट्यपूर्ण भाषा बोलतों तिचा इतरांवर काय परिणाम घडून येत आहे त्याचें निरीक्षण ते करीत असत. त्या काळांतील अगदीं सर्वोत्कृष्ट पुस्तकांचें परिशीलन केलें तरी निराशेंत सुख मानण्याची प्रवृत्ति त्यांतून डोकावत असल्याचें आपल्या प्रत्ययाला येईल. " विनाशा "बद्दलदेखील एक प्रकारचें आकर्षण त्या ग्रंथांतून आढळून येतें आणि वाङ्मयांतील या अद्भुतरम्यतेमुळेंच कांहीं काळपर्यंत तरी अमेरिकन आशावादाला जीवदान मिळालें. अखेर जनतेला ह्या शोकनाट्याचा कंटाळा आला. युद्ध आणि त्यामुळें घडून आलेले परिणाम ह्यांची शास्त्रीय छाननी केल्यानंतर असें आढळून आलें कीं, त्याला आळा घालणें शक्य होतें. युद्धाची जबाबदारी मानवी स्वभाववर नसून, एकोणिसाव्या शतकापासून त्यानें निर्माण केलेल्या निरनिराळ्या संस्था आणि त्या संस्थांचें मानवानें पत्करलेलें दास्य हेंच युद्धाचें खरें कारण होतें. होहेन झोलर्न घराणें, शस्त्रास्त्रांचे कारखानदार आणि त्यांच्या सारखेच " मृत्यूचे " इतर " व्यापारी " कालविसदृश ठरलेल्या रूढी, इतकेंच नव्हे तर माणसाला स्वतःची बुद्धि चालवून विचार करायला शिकविण्याऐवजीं त्याला अंधश्रद्ध आणि सनातनी बनविणारीं धर्मपीठें यांकडे उदाहरण म्हणून बोट दाखवितां येईल. माणसांतील सत्प्रवृत्तीचा विकास होण्यासाठीं त्याच्यावर बसलेला हा विघायक पगडा दूर कसा करावयाचा हाच प्रश्न प्रामुख्यानें विचारवंतांना सतावीत होता. त्यांत यश आलें तर माणूस युद्धाचें पुन्हां नांवदेखील काढणार नाहीं, अशी त्यांची समजूत होती.

या विचारसरणीचा परिणाम असा झाला कीं, विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकांतदेखील अमेरिकेंतील एक प्रमुख विचारप्रवाह म्हणून आशावादाचें स्थान कायमच राहिलें. युद्धकाळांत तांत्रिक प्रगतींत खूप भर पडली होती, त्यामुळें तर या आशावादाला आणखीनच उजाळा मिळाला आणि निसर्गावर प्रभुत्व मिळवून माणूस थोड्याच दिवसांत पृथ्वीवर नंदनवन उभें करूं शकेल असा विश्वास वाटूं लागला. या काळांत अमेरिकेंत घडून आलेल्या प्रचंड आर्थिक घडामोडींमुळें हा विचार खूपच लोकप्रिय झाला. त्यांतच १९२८ सालच्या निवडणूक मोहिमेंत " प्रत्येक कुटुंबाला जेवणाचे वेळीं दोन कोंबडीं आणि बाहेर जाण्यासाठीं गाडी " मिळवून देण्याचें रिपब्लिकन

पक्षानें आश्वासन दिल्यामुळें तर या आशावादानें लोकप्रियतेचा उच्चांक गांठला. त्यामुळें मानवी प्रगतीच्या सिद्धान्ताला पुन्हा एकदां बळकटी आली.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे १९३० ते ४० च्या दरम्यान आलेल्या प्रचंड आर्थिक मंदीमुळेंदेखील त्याला ओहोटी लागली नाहीं. आर्थिक मंदीमुळें थोडासा परिणाम घडून आला; तो म्हणजे अमेरिकेचा विकास आतां पूर्ण झाला असून तिच्यापुढें आतां आणखी व्याप कसा वाढवायचा हा प्रश्न नसून आजपर्यंत साधलेली प्रगति टिकवून कशी धरावयाची व तिचें विभजन कसें करावयाचें हाच खरा प्रश्न आहे, असा एक विचित्र सिद्धांत मांडला जाऊं लागला. परंतु हा सिद्धांत मुख्यतः आर्थिक क्षेत्रांपुरताच मर्यादित होता. जीवनविषयक तत्त्वज्ञानाच्या बाबतींत मात्र आर्थिक मंदीमुळें आशावादावर विरजण न पडतां उलट त्या विचारसरणीची फेरमांडणी करण्याची संधि उपलब्ध झाली. पुन्हां एकदां जुन्या संस्थांवर झोड उठविण्यांत आली. जणुं कांहीं जनतेच्या हिताचा बळी देऊन स्वतःच्या फायद्यासाठीं सत्ता काबीज करणाऱ्या अमेरिकन व्यापारी कंपन्यांमुळेंच मंदीची लाट पसरली होती. "औद्योगिक लोकशाही" हा वाक्प्रयोगहि वारंवार ऐकूं येऊं लागला. त्याची सुस्पष्ट व्याख्या कोणीच कधीं केली नव्हती. परंतु सर्वसाधारणपणें त्यापासून लोकांनीं एवढा अर्थबोध घेतला होता कीं, राज्यसंस्थेप्रमाणेंच औद्योगिक पद्धति भांडवलदारांच्या कचाट्यांतून मुक्त होऊं शकेल. आर्थिक मंदीला जबाबदार असलेल्या 'दुष्ट' परंपरा मोडून काढण्यासाठीं किंवा त्यांत इष्ट तो बदल घडवून आणण्यासाठीं शेंकडों सुधारक पुढें सरसावले. आदरणीय आणि सत्त्वशील अशा जॉन डयुईला आपला गुरु मानणाऱ्या आशावादी तत्त्वज्ञान्यांनीं विश्वविद्यालयें काबीज करून तेथून वरील विद्धांताच्या प्रचाराचा धडाका सुरू केला.

मनुष्य हा मूलतः सत्प्रवृत्त आहे का ? या प्रश्नाच्या मुळाला खरें म्हणजे या मंडळींनीं हातच घातला नाहीं. एक राइन होल्ड नीबूर या थोर प्रॉस्टेस्टंट तत्त्ववेत्त्याचा अपवाद सोडला तर चवथ्या दशकांतील सुधारणावादी तत्त्ववेत्त्यांपैकीं कोणीच या प्रश्नाची सांगोपांग चर्चा केलेली आढळत नाहीं. राइन होल्ड नीबूरनें मात्र "न्यू डील" मध्यें अंतर्भूत असलेल्या सुधारणांचा पाठपुरावा केला असला तरी त्याचबरोबर सुधारणावाद्यांचा मूलभूत सिद्धांत

चुकीचा आहे असा इशारा देऊन ठेवला. टॉमस जेफरसनपासून तो जॉन ड्यूईपर्यंत अमेरिकेंतल्या इतक्या विचारवंतांनीं मनुष्याचा स्वाभाविक चांगुलपणा आग्रहानें प्रतिपादन केल्यामुळें तो सिद्धांत अमेरिकेंत एकऱ्या धर्मतत्त्वाच्या योग्यतेला चढला होता.

शेवटीं ॲडॉल्फ हिटलरनें या आशावादी तत्त्ववेत्यांना वास्तववादी बनावयास लावलें. दुसऱ्या जागतिक महायुद्धांतील भयंकर घटना जसजशा घडूं लागल्या तसतसा या सिद्धांताला हादरा बसूं लागला. उदाहरणार्थ जगाला विनाशाच्या खाईंत लोटण्याचा चंग बांधलेल्या एका मिशाळ, बुटक्या व्यक्तीनें चालवलेल्या असत्य आणि विकृत प्रचाराला लोक बळी पडत आहेत असें पाहिल्यावर माणसाचा माणसाच्या भलेपणावर विश्वास तरी कसा टिकून रहावा? युद्धामुळें जगांत जिकडे तिकडे रक्ताचे पाट वाहून शहरेंच्या शहरें बेचिराख होऊं लागल्यावर हे सगळे प्रश्न कांहीं काळ मागें पडले. मात्र युद्धोत्तर काळांत बंदी-छावण्यांतून करण्यांत आलेल्या अनन्वित छळांच्या हकीगती बाहेर येऊं लागल्यावर पुन्हां एकदां या प्रश्नांनीं डोकें वर काढलें. केवळ हिटलरच नव्हे तर हजारों जर्मन नागरिकदेखील युद्ध काळांत इतक्या क्रूरपणें वागले कीं, जणुं कांहीं जगांतील सर्व दुष्ट प्रवृत्तीच त्यांच्यारूपानें साकार झाल्या होत्या. मानवी बुद्धिमत्ता लाभलेला एखादा पशू जसा कहर उडवून देईल, तसाच या नरपशूंनीं युद्धकाळांत उच्छाद मांडला होता. तांत्रिक प्रगति ही नव्या ख्रिस्ती धर्माची नांदी ठरेल ही आशा फोल ठरली होती. प्रगतीचीं सर्व साधनें या दुष्टांच्या हातीं पडलीं आणि तीं जगाचा नाश करण्यासाठींच वापरण्याचें त्यांनीं एकदां ठरवल्यावर जगांतील सारा सद्भाव (अमेरिकन) कॉंग्रेसनें खर्चीं घातलेली सगळी मुत्सद्देगिरी किंवा गहन तत्त्वज्ञानाची चर्पटपंजरी नाझींना थोडीच अडवूं शकणार होती? आपल्याच बांधवांचा सर्वनाश करून त्यांची विटंबना करण्यापासून त्यांना कोणीच परावृत्त करूं शकलें नाहीं आणि एवढें पुरें झालें नाहीं म्हणूनच कीं काय, युद्ध संपतां संपता हिरोशिमावर ॲटम बॉंब पडला. त्या बॉंबचा आघात केवळ हिरोशिमावर झाला असें नाहीं तर भयानें गर्भगळित झालेल्या साऱ्या मानव जातीवरच त्यामुळें वज्राघात झाला. इतिहासपूर्वकाळीं मानव गुहांमधून रहात होता, तेव्हांपासून त्याची निसर्गावर मात करण्याची जी धडपड

चालू होती तिनें प्रगतीचे अनेक टप्पे गाठतां गाठतां अखेर अणु-विभजनांत यश मिळवलें. आणि केवळ अलंकारिक अर्थानेंच नव्हे तर खऱ्या अर्थानें सारी पृथ्वी उडवून देण्याचें तंत्र शोधून काढलें! मनुष्य हा स्वभावानें सत्प्रवृत्त व्हावा हें बरें! पण वस्तुतः तसा तो आहे का? आशावादी तरी तसा निवाळा देऊं शकतील का?

परंतु माणसाच्या सत्प्रवृत्तीवरील अमेरिकन जनतेचा विश्वास इतका दांडगा होता कीं, अशाहि परिस्थितींत आशावादी विचारसरणीचा तिच्या मनावरील पगडा कमी झाला नाहीं. आतां संयुक्तराष्ट्र संघटनेची स्थापना झाली आहे, तेव्हां झालें तें युद्ध कदाचित् इतिहासांतील अखेरचें ठरेल; संयुक्त राष्ट्र संघटनेंत कांहीं उणीवा असल्या आणि रशिया आडमुठेपणानें वागत असला तरी तेवढ्यानें निराश होऊन जाण्याचें कारण नाहीं. रशियन्सदेखील चांगलेच नाहींत का? तेदेखील आपल्या खांद्याला खांदा लावूनच लढले ना? नवसमाज निर्मिति हेंच त्यांचेंदेखील ध्येय आहे ना? कदाचित् आपल्यापेक्षां त्यांचें स्वरूप निराळें असेल, पण आधिभौतिक विकासांतूनच माणूस स्वतःची मुक्ति साधूं शकेल या आशावादांतील सिद्धांताच्या आधारावरच त्याची उभारणी झालेली आहे ना? पण हळू हळू याहि बाबतींत भ्रमनिरास होऊं लागला. सुरक्षा समितींत व्हीटोचा (नकाराचा) अधिकार वापरून रशिया वारंवार अडथळे आणूं लागला. रशियांतील सक्तीची मजुरी आणि बंदी छावण्या ह्यासंबंधीचीं वर्णनें ऐकूं येऊं लागलीं, रशियन आक्रमणाचीं उदाहरणें तर समोरच होतीं; त्यानें एस्तोनिया गिळंकृत केला. लॅटव्हिया, लिथुआनिया, पोलंड, हंगेरी, रुमानिया इतकेंच नव्हे तर चेकोस्लोव्हाकिया सुद्धां घशांत घातला. नागरिकांच्या सरसहा कत्तली करण्यांत आल्या. त्यांचे हाल करण्यांत आले. हाल हाल करून त्यांच्याजवळून सक्तीनें कबुलीजबाब लिहून घेण्यांत आले. रशियानें अवलंबिलेले हे मार्ग नाझींनादेखील मागें टाकणारे होते. नाझी निदान उघडपणें तरी युद्धाचा पुरस्कार करीत, परंतु "सद्भावा"च्या अघळपघळ गप्पा मारणारी ही नवी जात हीं सगळीं क्रूर कर्मे शांततेच्या नांवाखालीं करीत होती.

आणि त्यांतहि पुन्हां खेदाची गोष्ट अशी होती कीं, या चढत्या कमानीला आळा बसण्याचें कांहींच चिन्ह दिसत नव्हतें. केवळ अर्धशतकाच्या अल्पा-

वर्षींतच आशावादी तत्त्वप्रणालीसमोर तीन प्रश्नचिन्हें उभीं राहिलीं. तीं म्हणजे कैसर, विल् हेल्म, ॲडॉल्फ हिटलर आणि जोझेफ स्टालिन ! प्रत्येक-जण पहिल्यापेक्षां अधिक भयंकर होता. त्यांनीं संस्कृतीची जवळ जवळ धूळधाण केली. उभा यूरोपखंड त्यांनीं बेचिराख करून टाकला. त्यांनीं काय करायचें बाकी ठेवलें ? आपल्या शेजाऱ्यांवर आक्रमण करून त्यांना आपलें गुलाम बनवून टाकलें; निरनिराळ्या देशांतील सरकारें उलथून पाडलीं. जिकडे तिकडे दहशत बसविली असल्याचा फैलाव केला आणि द्वेषाचें बीज पेरलें—आणि त्यांचीं हीं दुष्कृत्यें एकसारखीं वाढतच असून त्याला आळा बसण्याचेंहि लक्षण दिसत नाहीं. पण हीं माणसें केवळ प्रतीक-रूप होतीं. त्यांना हजारों माणसांचें साहाय्य होतें. आणि लक्षावधि माणसें त्यांच्यामागून जायला तयार होतीं. आणि अशांची संख्या सारखी वाढत होती. जगांतील एकतृतीयांश जनतेला आपल्या टांचेखालीं दाबून, उध्वस्त शहरांच्या आणि मानवी दुःखांच्या राशीवर आज विसाव्या शतकाच्या मध्य काळांत कम्युनिस्ट आरूढ झाले आहेत.

अमेरिकेचा जो एवढा विकास घडून आला आहे त्याचें जर आपण नीट निरीक्षण केलें; तर एक प्रमुख वैशिष्ट्य आपल्याला आढळून येतें आणि त्या वैशिष्ट्यामुळेंच इतिहासांतील या महत्त्वपूर्ण घटनांचें मर्म अमेरिकनांच्या चटकन् लक्षांत येत नाहीं. स्वतंत्र जगाचें नेतृत्व करण्याची जबाबदारी आपल्यावर असल्यामुळें, जगांत सर्वत्र आढळून येणाऱ्या दुष्ट प्रवृत्तींची दखल घेणें आवश्यक आहे. परंतु कदाचित् अजाणतेपणें असेल—आपण स्वतःला दुसऱ्यापेक्षां कोणीतरी श्रेष्ठ समजत असतों. आपल्याला असें वाटतें कीं, सारें जग दुष्ट प्रवृत्तींनीं भरलेलें असलें तरी आपण अमेरिकन मात्र तसे नाहींत. कारण विसाव्या शतकांतील साऱ्या अनिष्ट घटनांना सुरुवात झाली, ती अमेरिकेबाहेर झाली; तरीहि स्वतंत्र जगाला साहाय्य करण्यासाठीं आपण आपला देश सोडून लांबच्या रणांगणांवर भीषण युद्धाच्या रणधुमाळींत उतरलों. त्याचबरोबर आपण अत्यंत महत्त्वाच्या अशा सार्वत्रिक सुधारणाहि घडवून आणल्या. आपण शिक्षण हें जवळ जवळ सार्वत्रिक करून टाकलेंच आहे. आपलें जीवनमान तर कमालीचें उंचावलेलें आहे आणि आपल्या समाजावर लोकशाही संस्थांचें वर्चस्व आहे. पूर्वींच्या " अनिष्ट "

संस्था अजिबात मोडून किंवा त्यांत सतत सुधारणा घडवून आणून आपण आपल्या देशांतील लोकशाही प्रस्थापित केली आहे. त्यामुळें आपण अशी समजूत करून घेतली आहे कीं, इतर जगाच्या बाबतींत आशावादी तत्त्वप्रणाली लागू पडत नसली तरी अमेरिकेच्या बाबतींत मात्र अद्यापहि ती लागू पडूं शकेल. माणसें मूलतः चांगलीं आहेत आणि स्वतःच्या प्रयत्नानें तीं आपली मुक्ति साध्य करून घेऊं शकतील. या गृहीत कृत्याच्या आधारानें आपलें येथील जीवन अजूनहि भरभराटीस येऊं शकेल, असा आपल्याला विश्वास वाटतो.

यावर ज्यांनीं कांहीं आक्षेप घेतले आहेत त्यांतदेखील राईनहोल्ड नीबूर यांचाच समावेश होतो. त्यांनीं असें दाखवून दिलें आहे कीं, माणूस मूलतः निष्पाप आहे ही समजूत हें अमेरिकेचें एक मूलभूत वैशिष्ट्य आहे. तो म्हणतो, " आपल्या इतिहासाच्या आरंभींच्या काळांत न्यू इंग्लंडमधील कॅल्व्हिनिस्ट विचारसरणी आणि व्हर्जिनियांतील Deist विचारसरणी, जेफर्सनचीं मतें ह्यांची आपल्या जीवनाला प्रेरणा होती. परस्परांपासून अगदीं भिन्न असूनहि आपली राष्ट्रीय प्रकृति, आपलें भवितव्य ह्या दोहोंच्या अर्थासंबंधीं त्यांचीं अनुमानें सारखींच येतात, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. न्यू इंग्लंडमधील धर्मवेत्त्यांचें मत असें होतें कीं, आपण चालविलेला "प्रयोग" हा धर्मासंबंधींच्या अभिनव आणि शुद्धतर कल्पनांवर आधारलेला आहे असें आपलें पूर्वज मानीत असत. जेफरसन आणि त्याच्या पठडींतील लेखकांनीं समाजाचा मुख्यतः राजकीय दृष्टयाच विचार केलेला आहे, पण त्यांचेंदेखील असेंच मत होतें कीं, जगांत नवी मानवजात निर्माण करण्याचें कार्य ईश्वरानें आपणांवर सोंपविलें आहे. आपणच प्रभूचीं लाडकीं लेकरें आहोंत."

डॉ. टॉकव्हील यांनादेखील कित्येक वर्षांनंतर अमेरिकच्या सरहद्दीवर जनतेच्या भोळ्या भावासंबंधीची हीच श्रद्धा आढळून आली असें डॉ० नीबूर यांनीं दाखवून दिलें आहे. डॉ. टॉकव्हील यांचा खालील उतारा त्यांनीं उध्दृत केला आहे. " एकाद्या अमेरिकनाला मी म्हटलें कीं, तूं ज्या देशांत राहतोस तो देश फार सुंदर आहे" तर तो लगेच म्हणतो कीं, " असा देश जगांत कोठें सांपडायचा नाहीं." ते उपभोगीत असलेल्या स्वातंत्र्याची मी स्तुति केली कीं, " स्वातंत्र्य तर हवेंच, पण जगांतील फारच थोड्या राष्ट्रांची

ते उपभोगायची लायकी असते." असा शेरा त्यानें मारलाच म्हणून समजा. अमेरिकेंत प्रकर्षानें आढळणाऱ्या नीतिमत्तेचा उल्लेख करायचा अवकाश कीं तो सुनवील कीं, "जगांतील लाचलुचपतीचा अनुभव घेतलेला एखादा परका माणूस अमेरिकेंत आला, तर माझी खात्री आहे, त्या बाबतींतील येथील फरक पाहून तो स्तिमितच होऊन जाईल." शेवटीं तो जरासा अंतर्मुख व्हावा म्हणून मी संभाषण थांबवतों. परंतु तो थोडाच निमुट बसतोय? पुन्हां पुन्हां विषय उकरून काढून माझ्याकडून अमेरिकेच्या स्तुतिस्तोत्रांचा पाढा वाचून घेतल्याखेरीज त्याला चैनच पडत नाहीं. अमेरिकनाइतका तापदायक आणि बडबड्या देशभक्त शोधूनहि कोठें सांपडणार नाहीं."

अर्थात् हें खरें कीं, माणसाच्या निष्कपटपणावर अमेरिकनांची ही जी श्रद्धा आहे, तिचे अमेरिकन समाजावर विधायक स्वरूपाचेच परिणाम घडून आलेले आहेत. सद्भाव हीच माणसाला कार्यप्रवण करणारी मूळ प्रेरणा आहे असें गृहीत धरूनच मुळीं ते वागत असतात. त्यामुळें त्यांच्याप्रमाणेंच आशावादी विचारसरणी असेल त्यांच्या मनांत, म्हणजेच पर्यायानें त्यांच्या समाजांतच ते सद्भाव निर्माण करतात. सर्वसाधारण अमेरिकन माणूस हा धूर्त असतो, परंतु इतरांविषयीं तो नसते संशय घेत बसत नाहीं किंवा दुसरा कोणी आपला गैरफायदा तर घेणार नाहीं ना, याची काळजी करण्यांत तो आपला वेळहि फुकट घालवीत नाहीं. अमेरिकेंतील व्यापार काय किंवा उद्योगधंदे काय, हे परस्पर विश्वासाच्या वातावरणांतच चाललेले असतात. निरनिराळ्या घटकांत कमालीची स्पर्धा चाललेली असतांना अशा-तऱ्हेचें परस्पर विश्वासाचें वातावरण असावें हें तर विशेषच म्हटलें पाहिजे. सर्व क्षेत्रांत पूर्णत्व प्राप्त करून घेण्याची जी ओढ अमेरिकनांना लागलेली असते तिच्यामुळें सर्व अडचणींवर मात करण्याइतका उत्साह आणि जोम त्या समाजांतून ओसंडत असतो. लोकशाहीपद्धति यशस्वी होण्यासाठीं आशावादी विचारसरणी 'अशी' कांहीं तरी अनिवार्य असते, असेंदेखील म्हणतां येईल. त्यामुळें नवीं नवीं क्षेत्रें शोधून काढण्यासाठीं लागणारी स्फूर्ति जनतेला मिळून समाज सतत वर्धिष्णु बनत जातो.

आशावादी तत्त्वप्रणालीमधील हे सर्व गुण मान्य करूनही त्यांतील दोषां-कडे डोळेझांक करून भागणार नाहीं. वस्तुतः इतरत्र कोठेही माणसाच्या सत्प्रवृत्तीचा दाखला मिळत नसतांना अमेरिकन लोक त्याचा एवढा गाजा-वाजा करतांना दिसले म्हणजे इतरांना तें फार चमत्कारिक वाटतें. मात्र आशावादी आणि निराशावादी तत्त्वप्रणालींत मतभेद आहे तो या मुद्यावर नव्हे. एकादी व्यक्ति दुसऱ्यापेक्षां अधिक चांगली किंवा वाईट आहे असें दाखवून देण्याच्या भानगडींत निराशावाद पडत नाहीं. सर्व माणसें—मग त्यांचे गुणदोष कांहींही असोत—एकाच दुष्ट चक्रांत सांपडलेलीं असतात असें त्याचें प्रतिपादन असतें. नाझी हे अमेरिकन होते कां जर्मन होते हा भाग महत्त्वाचा नाहीं. कारण, शेवटीं तींही माणसेंच होतीं. आणि त्यांनीं जगाला जी पीडा दिली ती तरी ‘ जर्मन ’ पीडा म्हणून वेगळी काढतां येईल का ? पीडा इथून तिथून एकच असणार; आणि माणूस, मग तो कोणीही असो, त्याला तिची झळ सारखीच लागणार. म्हणून अमेरिकनांना जर वास्तवाशीं सुसंगत असें मानवाचें वास्तव स्वरूप समजावून घ्यावयाचें असेल तर त्यांनीं हीं दुष्ट कृत्यें जणूं आपल्याच हातून घडलेलीं आहेत असें मानून त्यांचा विचार केला पाहिजे. स्वतःच्या निरागसतेविषयीं भलत्या कल्पना करून घेऊन अमेरिकन जनता त्यांतच दंग होऊन जाईल तर सर्व मानवजातीला लागूं पडूं शकेल अशा मानवासंबंधींच्या यथार्थ कल्पनेचें मुळीं त्यांना आकलनच करतां येणार नाहीं. आपल्याकडे सबंध जगाचें नेतृत्व आलें आहे अशी अमेरिकनांची दृढ समजूत असते. परंतु स्वतःच्या निराग-सतेसंबंधींच्या नसत्या कल्पनांना ते चिकटून बसतील तर त्यांच्याकडे चालून आलेलें नेतृत्व देखील त्यांना गमावून बसावें लागेल. म्हणून आपला पाप-भीरुपणा गृहीत धरून चालणें हें आपल्या हिताचें ठरण्याऐवजीं आत्मघातकी-पणाचेंच ठरणार आहे. त्यायोगें एक प्रकारची तात्त्विक पोकळी निर्माण होऊन अमेरिकेंतील परंपरा त्यांत गुदमरून नष्ट होऊन जातील.

शिवाय, आपण पापभीरु आहोंत हा देखील त्यांचा एक भ्रम आहे. इतरांइतकेंच त्यांचेही हात या प्रकरणांत लडबडलेले आहेत. हिटलरच्या नात्सीवादाची ( राष्ट्रीय समाजवाद ) वाढ होण्यास १९२० ते १९४० पर्यंत अमेरिकेनें अवलंबिलेलें धोरण कितपत जबाबदार आहे हा प्रश्न क्षणभर

बाजूस ठेवला तरी, ज्या बिकट अवस्थेंत आपण आज सांपडलों आहोंत तिला आपलेही दोष कारण आहेत हें नाकारतां येणार नाहीं. दुष्ट प्रवृत्ती-मधून स्वतःला सोडवून घेण्याचा आपण कितीहि जरी प्रयत्न करीत असलों तरीं त्यांतून आपली सुटका तर होणार नाहींच उलट, ती आपल्या अंगीं लागण्याचाच संभव अधिक आहे. डॉ. निबूरनें या संबंधानें केलेला युक्तिवाद बिनतोड आहे.

" यापुढें आपल्याला युद्ध टाळतां येईल कीं नाहीं कुणास ठाऊक. पण त्याची जबाबदारी मात्र आपल्याला टाळतां येणार नाहीं. सर्वस्वी बुद्धिवादी दृष्टिकोणाचा अंगीकार करून त्यावर मानवांमानवांतील परस्पर संबंधांची उभारणी करतां येईल अशीं स्वप्नें आपण रंगवीत होतों, परंतु प्रत्यक्षांत मात्र आपण, " सर्वजण " युद्धांत गुरफटले गेलों आहोंत. " शास्त्रीय मार्गाचा " अवलंब करून सर्व समस्या सोडवितां येतील अशीं आपलीं मनोराज्यें होतीं. परंतु आपल्याला अनुभव मात्र असा येत आहे कीं, जागतिक संघर्षांतून तणातणी निर्माण झाली असून व्यक्तिगत त्याचप्रमाणें सामूहिक भावना इतक्या भडकावल्या गेल्या आहेत कीं, बुद्धिवादानें त्या आवरणें दुरापास्त होऊन बसलें आहे. न्याय आणि अन्याय यांतील अगदीं सूक्ष्म भेद देखील आपल्याला ओळखून काढतां येईल अशी आशा आपण बाळगली होती. परंतु माणसाच्या उत्तमोत्तम कृतींना देखील दुष्ट प्रवृत्तीचें गालबोट लागल्याचें आढळून आल्यामुळें त्याही बाबतींत आपली निराशाच झाली आहे......

" अशा तऱ्हेनें एका " पापभीरु " राष्ट्राच्या इतिहासांत एक विचित्र आणीबाणीचा प्रसंग येऊन ठेपला आहे. ॲटम बॉंबसारख्या संहारक शस्त्राचा रखवालदार होऊन बसण्याचा प्रसंग त्या राष्ट्रावर गुदरला आहे. दुसऱ्या कोणी अस्त्राचा उपयोग करून आपल्या दोस्तांचें स्वातंत्र्यच नव्हे तर प्रत्यक्ष अस्तित्व देखील संपुष्टांत आणील ही भीति असल्यामुळें आपण त्यांचा त्यागहि करूं शकत नाहीं; आणि आपल्याला त्याचा अवलंब करावा लागला तर महापातकाचें खापर मात्र आपल्याच माथीं फुटणार आहे. जगांतील आपलें अस्तित्व नष्ट होऊं नये म्हणून आपण एवढा आटापिटा करायचा, पण त्यामुळें साऱ्या जगावर अशी अवकळा पसरणार आहे कीं, नको असें म्हणायची पाळी आपल्या नशिबीं यायची....." अशा रीतीनें संस्कृतीला पापाचें

आणि अपराधाची जाणीवहि नव्हती तिच्याशीं, आणि जें राष्ट्र त्या संस्कृतीचें सर्वोत्कृष्ट फळ मानलें जात होतें, त्या राष्ट्राशीं मानवाच्या इतिहासांतल्या सनातन, नैतिक प्रश्नांची सांगड घातली गेली आहे.

आपल्या काळावर एका महान् अरिष्टाची घनदाट छाया पसरली आहे. याची सर्व जबाबदारी आर्थिक, राजकीय, धार्मिक किंवा सांस्कृतिक संस्थांवर आहे–अर्थात् त्या संस्था देखील मनुष्य निर्मितच आहेत–हा सिद्धांत उत्तरोत्तर अधिकाधिक लटका पडूं लागला आहे. कम्युनिस्ट ज्या प्रकारच्या जुल्म जबरदस्तीचा अवलंब करीत आहेत त्यांतूनच अरिष्टाचा उद्भव होतो हें खरें असलें तरी त्याला तोंड कसें द्यावयाचें ? सारी संस्कृति नामशेष होण्याचा धोका पत्करूनहि रणांगणांत उतरावयाचें का ? पण त्यांतून कांहींहि चांगलें निष्पन्न होणार नाहीं. बरें कांहींच न करणें हाही चांगुलपणाचा मार्ग होत नाहीं. नेतृत्वाचा तर नाहींच नाहीं. उलट आपण निष्क्रिय राहिलों तरच दुष्ट प्रवृत्तींना ऊत येतो; हें आधिकाधिक स्पष्ट होऊं लागलें आहे. माणसाच्या मनांतील दुष्ट प्रवृत्तीबद्दल कोणाचे कांहींहि सिद्धांत असले तरी, एक गोष्ट सत्य आहे कीं, दुष्ट प्रवृति ही प्रत्यक्ष वस्तुस्थिति आहे. माणसाच्या ऐहिक जीवनाचा तो स्थायीभाव बनला असून माणूस त्यांत चांगलाच गुरफटला गेला आहे.

* * *

## ४ : : सुखाचा शोध

१९४८ सालीं 'लाईफ' मासिकांतर्फे इलिनॉस विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा एक परिसंवाद घडवून आणण्यांत आला होता. परिसवादाचा विषय "सुखाचा शोध" असा होता. त्यावेळी परिसंवादाचे अध्यक्ष आणि परिसंवादांत भाग घेणारा झिमेरली नांवाचा, युद्धावर जाऊन आलेला, एक विवाहित विद्यार्थी यांच्यांत खालील प्रश्नोत्तरें झालीं. सौख्यप्राप्तीसाठीं, शांततेसाठीं वाटेल ती किंमत मोजायला तो तयार नाहीं. कांहीं विशिष्ट परिस्थितींत तो युद्धावर जाणेंच पसंत करील.

"अध्यक्ष—म्हणजेच शांतता अत्यावश्यक आहे असं नाहीं ?

श्री. झिमेरली—शांतता अत्यावश्यक आहे असेंच माझें मत आहे. मला सुखी व्हावयाचें असेल तर शांतता नांदायलाच पाहिजे. परंतु, इतरांच्या सुखासाठीं मी माझ्या सुखप्राप्तीच्या हक्कावर पाणी सोडायला तयार आहें.

अध्यक्ष—निष्क्रिय राहण्यापेक्षां तुम्ही युद्धावर जाणें पसंत कराल असें म्हटलें तर तें बरोबर होईल का ?

श्री. झिमेरली—नाहीं. नुसतें निष्क्रिय जीवन जगण्यानें कसलेंही सुख लाभेल असें मला मुळींच वाटत नाहीं.

अध्यक्ष—" सुख " या शब्दाचा अर्थ नीट समजावून घेण्याचा मी प्रयत्न करीत आहें. केवळ स्वतःच्या सुखापाठीमागें लागण्यापेक्षां इतरांसाठीं त्याग करण्यांत तुम्हाला जास्त सुख लाभणार नाहीं का ?

श्री. झमेरली—तुम्ही ज्या अर्थानें ' सुख ' हा शब्द वापरीत आहांत त्या अर्थानें मी तो वापरीत नाहीं. त्यागामुळें आपण सुखाच्या अधिक जवळ जाऊं असें वाटत नाहीं. "

अमेरिकेंतील आशावादी परंपरेची पार्श्वभूमि लक्षांत घेतली तर वरील संवादांतून डोकावणारी प्रवृत्ति मोठी विचित्र वाटते. सभोंवतालची परिस्थिति सुधारल्यानें जर दुष्ट प्रवृत्ति नष्ट होणार असेल, तर त्याच मार्गानें दुःख आणि क्लेश यांचा देखील अंत कां करतां येऊं नये ? मृत्यूसारखीं कांहीं दुःखें अनिवार्य आहेत असें मानलें तरी वैद्यकांतील नवनवे शोध आणि शिक्षण व सुधारणा यांच्या साहाय्यानें तीं दुःखें देखील अगदीं कमी करतां येतील, आणि बहुतेक सर्व माणसांना जीवनाचा जास्तींत जास्त आस्वाद घेतां येईल अशी आशा आपण कां करूं नये ? या प्रश्नाचें आशावाद्यांकडून मिळणारें उत्तर हें नेहमी होकारार्थीच असतें. आणि मनुष्य हा स्वभावतः सत्प्रवृत्त आहे अशी ग्वाही ते देत असल्यामुळें त्यांचें होकारात्मक उत्तर देखील बुद्धीला पटूं लागतें.

सौख्य हेंच मानवी जीवनाचें योग्य ध्येय होय, या अमेरिकन जीवनांतील सर्वसाधारण सिद्धांताचा एकूण निष्कर्ष हाच आहे. ' सुखाचा शोध ' या आपल्या पुस्तकांत हॉवर्ड ममफोर्ड जोन्सनें म्हटल्याप्रमाणें अमेरिकेंतील राजकीय जीवनांत सुरवातीपासूनच हा सिद्धांत लागू करण्यांत आला आहे. अठराव्या शतकांतील आद्य विचार प्रवर्तकांनीं जनतेचें सुख हेंच सरकारचें

उद्दिष्ट असलें पाहिजे असें मोठ्या आग्रहानें प्रतिपादलें आहे. तसेंच जॉर्ज मेसननेंदेखील आपल्या जाहीरनाम्यांत "सौख्य आणि सुरक्षितता मिळविण्याच्या व उपभोगण्याच्या" अधिकाराचा उल्लेख केल्याचें आढळून येतें. आणि त्यानंतर दोनच महिन्यांनीं जेफरसनचा स्वातंत्र्याचा विख्यात 'जाहीरनामा' प्रसिद्ध झाला. सुखाचा शोध हा कांहीं वेळां हक्क मानला गेला आहे; तर कांहीं वेळां तें ध्येय आहे असें समजण्यांत आलें आहे. तें कसेंहि असलें तरी अमेरिकेच्या सर्वच थोर मुत्सद्यांच्या लिखाणांत त्यावर भर देण्यांत आलेला आहे. लिंकनच्या साऱ्या जीवनावर एक प्रकारची दुःखी छाया पसरलेली असली तरी त्यानेंदेखील सुखाच्या शोधाविरुद्ध टीका केली असती असें वाटत नाहीं.

परंतु, सुखाची व्याख्या करण्याच्या बाबतींत मात्र अमेरिकनांची मोठी पंचाईत झाली आहे. हॉवर्ड ममफोर्ड जोन्स यानें दर्शविल्याप्रमाणें अठराव्या शतकांतील लेखक हे जमीनदार लोकांच्या सुखाचे पोवाडे गाण्यांत मशगुल झालेले आढळतात. आपल्या देशाची इमानेंइतबारें सेवा करून परत आपल्या शेतीवर जाऊन आवडत्या पुस्तकांच्या संगतींत जुन्या सुखद स्मृतींना उजळा देत कालक्रमणा करण्याची ज्याला संधि मिळाली तो अमेरिकन सिनसिनाटस वॉशिंग्टन ह्या सुखकल्पनेचा आदर्श होता. त्यानंतर पश्चिमेला विस्तार सुरू झाला. त्यावेळीं शेतीच्या कल्पनेलाच प्राधान्य होतें; पण त्यांत आतां जमीनदारी सुखवस्तूपणा राहिला नव्हता, एक प्रकारची साहसी वृत्ति आणि कठोरपणा होता. त्यानंतर एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत शेतीची जागा उद्योगधंदे आणि त्यांतून निर्माण होणाऱ्या नानाविध वस्तूंनीं घेतली आणि अगदीं अलिकडील आपल्या काळाकडे पाहिलें तर आपल्याला असें दिसून येईल कीं, मेसननें प्रतिपादलेल्या 'सुख आणि सुरक्षितता' यांच्यासाठींच सरकारनें निरनिराळे अधिकार आपल्या ताब्यांत घेतले आहेत. तसेंच १९४८ सालीं हॅरी ट्रूमन यांनीं अमेरिकेच्या राजकीय इतिहासांतील एक मोठा विजय मिळविला, तो देखील एक प्रकारया सुखसमृद्धीच्या आश्वासनावरच.

सुखासंबंधींच्या अमेरिकनांच्या या निरनिराळ्या कल्पनाचें जर परीक्षण केलें तर आपण आज ज्या विपत्तींत सांपडलों आहोंत त्यासंबंधीं दोन निष्कर्ष

निघतात. त्यांपैकीं पहिला निष्कर्ष असा कीं, अमेरिकनांच्या जीवन आणि विजय याविषयींच्या कल्पना मूलतः बाह्य जगावर आधारलेल्या किंवा वस्तुनिष्ठ आहेत. डॉ. कार्ल जी. युंग म्हणतात कीं, बहिर्मुख माणसाचें मुख्य लक्षण हें असतें कीं, तो बाह्य वस्तूकडे जाण्याची, बाह्य वस्तूशीं समरस होण्याची आणि जाणून बुजून तिच्यावर विसंबून राहण्याची धडपड करीत असतो........याच्या उलट, अंतर्मुख माणूस बाह्य जगाशीं संबंध आला असतां निराळें असें स्वतःचें व्यक्तिमत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत असतो....तो मुख्यतः कल्पनेचा आश्रय घेतो.

अमेरिकन लोक हे अर्थातच सगळेच अंतर्मुख किंवा सगळेच बहिर्मुख नाहींत. परंतु त्यांच्यासंबंधीं एक सर्वसामान्य असा सिद्धांत बसवितां येईल. माणसांची वर्गवारी करतांना आणखी एक महत्त्वाचा फरक केला जातो तो म्हणजे, आत्मनिष्ठ किंवा आंतर जग आणि वस्तुनिष्ठ किंवा बाह्य जग. माणसाच्या जाणीवेमधूनच हे फरक निर्माण होतात. आपण एखाद्या खुर्चीकडे पाहतों त्यावेळीं आपणाहून निराळी अशी ती एक बाह्य वस्तु आहे याची आपल्याला जाणीव होते; आणि जेव्हां आपली सदसद्विवेक बुद्धि आपल्याला चिमटा घेते तेव्हां ती एक आपल्या अंतर्गत असलेली अशी चीज आहे ह्याची आपल्याला जाणीव होते.

बाह्य जगाशीं असलेले आपले संबंध अत्यंत घनिष्ठ असले किंवा आपल्या शक्तीदेखील बाह्य जगांतच कार्य करीत असल्या तरी, तें जग म्हणजे " मी नव्हे ". माझ्या व्यतिरिक्त इतर वस्तूंचें आणि घटनांचें, म्हणजे बाह्य जग आणि आंतरजग म्हणजे " माझें "—माझ्या आत्म्याशीं ज्याचा प्रत्यक्ष संबंध आहे तें—हें जग अत्यंत संवेदनाक्षम असून त्यांत अनेक घडामोडी होत असतात.—आपले विचार आणि विवेचक शक्ति, आपलीं तत्त्वें आणि आपले निकष; आपल्या निष्ठा आणि पूर्वग्रह, आपण चितारलेल्या कल्पना आणि प्रतीकें, आपलीं स्वप्नें आणि मनोराज्यें हें सारें त्या अथांग आंतर जगांत खोल कोठेंतरी, प्रत्यक्ष जाणीवेच्याही पलीकडे चाललेलें असतें. आपल्या पार्थिव शरीराव्यतिरिक्त इतर कोठल्याहि क्षेत्रांत जाणीवेच्या या दोन अंगांची गल्लत होऊं शकत नाहीं. परंतु शरीर हें बाह्य आणि आंतर जग

ह्यांमधील एक अभेद्य असा दुवा आहे; आणि त्याबरोबरच त्या दोहोंमधला फरक स्पष्ट होतो.

संपूर्णपणें अंतर्मुख होऊन जगाकडे बघण्याचा बुद्ध भिक्षूंचा सुखप्राप्तीचा मार्ग अमेरिकनांना मान्य नाहीं. आणि खरोखरीच तो मार्ग अगदीं विकृत मनोवृत्तीचा निदर्शक नसला तरी कांहींसा जुनाट आणि टाकाऊ खासच आहे. आपला समाज अंतर्मुख नसून बहिर्मुख आहे. आपण आपलें व्यक्ती-करण नेहमीं कृतीच्या रूपानें करीत असतों. मानवी मूल्यें आणि मानवी शक्ती ह्यांचें प्रकटीकरण करायचें हें आपल्या समाजाचें एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. आणि या वैशिष्ट्याचा आजच्या काळावर सांस्कृतिक दृष्ट्या फार मोठा परिणाम घडून आलेला आहे. कांहीं तरी करीत व्हावें, वस्तु बनवाव्या, बदलाव्यात, मालकीच्या करून घ्याव्यात, दिसण्यासारखें, मोजतां-मापतां येण्यासारखें कांहीं तरी करावें हा आपला स्वभाव आहे.

"स्वतःच्या इच्छेनुरूप ईश्वराची उपासना करण्याचें स्वातंत्र्य" आणि त्यासारखे इतर आंतरिक हक्क उपभोगतां यावेत म्हणून प्रथम प्यूरिटन लोक इकडे आले. त्यांच्या बाबतींत हें खरें नाहीं, असा आक्षेप यावर घेतला जाण्याचा संभव आहे. हा आक्षेप बरोबर आहे. पण अमेरिकनांच्या सुख-विषयक कल्पनासंबंधीं दोन शाश्वत निष्कर्ष निघतात असें जें वर म्हटलें होतें, त्यापैकीं दुसरा निष्कर्ष याठिकाणीं लागू पडतो. आणि तो म्हणजे सुखाच्या कसोटीचें सतत वाढत्या प्रमाणावर बाह्यीकरण चाललें आहे.

विल्यम ब्रॅडफर्ड आणि जॉन विन्थ्रॉप यांच्यापेक्षां जेफरसनच्या काळांतील सुखविषयक कल्पनांचा भर बाह्य वस्तूंवर, सुखसाधनांवर अधिक होता. पण याच्याहि पुढच्या शंभर वर्षांनंतरच्या काळांतील उद्योगपतींच्या आणि साम्राज्यसंस्थापकांच्या युगाकडे पाहिलें तर आपल्याला असें आढळून येईल कीं, वॉशिंग्टन आणि जेफरसन यांना शेतीविषयीं जें आकर्षण वाटत असे तें मागें पडून "औद्योगिक" युगाच्या वाखाणणीची जोरदार लाट उसळली होती. "जगांत पुढें येण्यासाठीं लागणारी शक्ति आणि युक्ति असणाऱ्या माणसाचें, "स्वयंसिद्ध" माणसाचें यश किंवा बाह्य स्वरूपाचें यश ही आतां सुखाची कसोटी बनली. अर्थात सुखाच्या शोधाची प्रक्रिया येथेंच थांबली नाहीं. मॅकलिनचें युग भौतिकतावादी होतें हें तर खरेंच. परंतु आधुनिक

उद्योगधंद्यांनीं—कारखान्यांनीं—निर्माण केलेल्या वस्तु असणें म्हणजे सुखी जीवन—चांगलें जीवन—असें समीकरण तोंपर्यंत मान्यता पावलें नव्हतें. ती आपल्यापुढें विसाव्या शतकाच्या मध्याला म्हणजेच आज प्राप्त झाली असून या अवस्थेंत निदान एक तरी स्नानगृह, भरपूर पाणी, विजेचे दिवे आणि विजेच्या चुली इ. सुखसोयींनीं युक्त असें एखादें टुमदार घर, साधेच पण आकर्षक असे कपडे ( वाटल्यास ते पॅरिस फॅशनचे असले तरी चालतील, पण त्यांची किंमत मात्र जगांत इतरत्र मिळणाऱ्या चांगल्या कपड्यांपेक्षां कमी असली पाहिजे ) रेडिओ, टेलिव्हिजन, मोटार, कपडे धुण्याचें यंत्र, बशा धुण्याचें आणि कचरा झाडण्याचें यंत्र, टोस्टर, टेलिफोन आणि खूपशा सिगेरटस् या अमेरिकेंतील माणसाला किमान गरजेच्या वस्तु वाटूं लागल्या आहेत. या चैनीच्या गोष्टी आहेत असें आतां कोणी मानीत नाहीं. यांतच आणखी कांहीं गोष्टींची भर घालून त्यावर मजूरखातें राहणीच्या मानाचें गणित बसवतें आणि बऱ्याचशा कंपन्या किंवा कामगारसंघटना आपापल्या कामगारांना योग्य वेतन मिळतें कीं नाहीं तें मजूर खात्यानें नमूद केलेल्या वरील राहणीमानावरूनच ठरवितात. आजच्या अमेरिकन समाजांत प्रत्येकाला वरील सर्व सुखसोयी मिळतातच असेंहि नाहीं. कोणाची कितीहि इच्छा असली तरी त्या उपलब्ध करून देण्याची हमी आज देतां येत नाहीं. परंतु त्या दिशेनें पावलें पडूं लागलीं असून यापुढील सुखाच्या कल्पनांचा गाभा तोच ठरणार आहे.

"औद्योगिक मानवानें केलेल्या प्रगतीबद्दल आदरभाव बाळगण्याची शिकवण आपल्याला लहानपणापासूनच दिली जाते. अगदीं खरींखुरीं वाटणारीं खेळणीं, शेजाऱ्याच्या नव्या मोटारीची घरांत आई-वडिलांकडून होणारी वाखाणणी आणि अधिकाधिक यांत्रिक साधनें वापरण्याची आपल्यापैकीं प्रत्येकाला लागलेली लालसा हीं सर्व हेंच दर्शवितात कीं, आपण सुखाची जी व्याख्या करूं पाहत आहोंत ती "बाह्य जगाच्या" संदर्भांतच खरी ठरूं शकेल. अमेरिकन जीवनांतील बाह्य परिस्थितीला तोंड देण्यासाठीं तरुण मुलामुलींची तयारी करून घेणें यावरच भर दिला जात आहे. शिक्षणतज्ञांत या विषयावर सध्यां मोठा वाद चालू आहे. सांस्कृतिक स्वरूपाच्या शिक्षणाचा पुरस्कार करणारांना आंतरिक मूल्यांचा विकास

करण्याची आवश्यकता वाटूं लागली असून, त्या मुद्यांवर आधारेल्या सुखाची प्राप्ती कशी करून घेतां येईल याची त्यांना चिंता लागून राहिलेली आहे. परंतु या बाबतींत त्यांना फार मोठ्या अडचणींना तोड द्यावें लागत आहे. मुलांना घरांतून मिळणारें शिक्षण, तसेंच विचारविनिमयाचीं किंवा करमणुकीचीं साधनें यांच्याशीं येणारा त्यांचा घनिष्ट संबंध यायोगें बाह्य-मूल्यांचीच त्यांच्यावर छाप पडत असते. त्यामुळें कॉलेजांतील शिक्षणक्रमाची निवड करतांना "वृत्तपत्र व्यवसाय," "इंजिनियरिंग" किंवा "वहातूक सुरक्षितता" यासारखे बाह्यमूल्यांचा परिपोष करणारे विषयच ते पसंत करतात. एस्किलसच्या नाटकांचें रसग्रहण करण्याचा प्रयत्न करणें किंवा तो कोण होता ह्याची चौकशी करणें—ही त्यांना "शैक्षणिक चैन" वाटते.

धुण्याचीं यंत्रें, मोटारी, टेलिव्हिजन असल्या गोष्टींवरच आपल्या जीव-नाचें उद्दिष्ट अवलंबून आहे असें वस्तुतः अमेरिकनस् मानीत नाहींत. उलट जगांतील इतर कोणापेक्षांहि अमेरिकनांचा नैतिक बाजूवर अधिक भर असतो आणि त्यासाठीं कितीहि क्लेश सहन करावे लागले तरी त्याला त्याची तयारी असते. त्याचप्रमाणें केवळ सभोवारच्या परिस्थितीवर अवलंबून अस-लेल्या मूल्यांपेक्षां उच्चतर मूल्यांचें मोल त्याला अधिक वाटतें, असेंदेखील आपण म्हणूं शकूं. परंतु आपण ज्या आशावादी परंपरांत वाढलों आहोंत त्यामुळें आपण एक प्रकारच्या तात्त्विक सांपळ्यांत सांपडतों. सभोंवतालच्या परिस्थितीपेक्षां किंवा बाह्य जगापेक्षां आंतरिक जगाचें निराळें असें अस्तित्व असतें हें आशावादी तत्त्ववेत्ते नाकारीत नाहींत. परंतु जीवनाचीं खरीं मूल्यें शोधण्यासाठीं ते आंतरिक जगाकडे वळत नाहींत आणि आपला आशावाद सोडायचा नसेल तर त्याला तसें करून चालणारहि नाहीं. आशावाद्यांचे विरोधक जे निराशावादी तत्त्ववेत्ते ते मानवी जीवनासंबंधीचा आपला दृष्टी-कोन आंतरिक जगावरच आधारित असतात. दुष्टप्रवृत्ति ही एक वास्तव अवस्था असून बाह्य परिस्थितींत सुधारणा घडवून आणल्यानें ती नष्ट करतां येणार नाहीं. दुष्ट प्रवृत्तींविरुद्ध झगडणें म्हणजे कांहीं केवळ दारिद्र्य, अज्ञान आणि जुलूम-जबरदस्ती ह्यांच्याविरुद्ध झगडणें नव्हे; तर तो माणसाच्या आंतरमनांत आपल्याशींच करावा लागणारा झगडा आहे. आणि भौतिक जीवनापेक्षां निराळ्या अशा पातळीवर म्हणजेच माणसाचें खरें वास्तव्य

जेथें असतें त्या जगाशीं त्या झगड्याचें मूळ आहे आणि त्यामुळेंच त्याला अर्थ प्राप्त होतो असा दृष्टीकोन असतो. निराशावाद्यांप्रमाणेंच आशावाद्यांनींहि जर अंतर्मुख दृष्टीचा अंगीकार केला तर निराशावाद्यांनीं उपस्थित केलेल्या प्रश्नांना ते आशावादी उत्तरें देऊं शकणार नाहींत. म्हणूनच आंतरिक जगाचें अस्तित्व जरी ते नाकारीत नसले तरी त्याला शक्य तेवढें कमी लेखण्याकडेच त्यांची प्रवृत्ति असते. इतकेंच नव्हे तर आंतरिक जग म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून सभोंवतालच्या परिस्थितीसंबंधींच्या आत्मनिष्ठ प्रतिक्रिया होत असें ते मानतात. त्यांच्या मतें जीवनाचीं खरीं मूल्यें हीं अखेर बाह्य स्वरूपाचीं, मोजतां–मापतां, हाताळतां येण्यासारखीं असतात आणि व्यक्तीच्या आत्म्याची अनिश्चितता बाजूस ठेवून त्या मूल्यांचें यथा-योग्य मूल्यमापन करतां येतें.

वर उल्लेखिलेल्या विद्यार्थ्यांच्या परिसंवादांत श्री. झीमरली यांचीं जीं वाक्यें दिलीं आहेत त्यांतून हाच आशय ध्वनित होतो. सौख्य आणि त्याग यांत ते जो फरक करीत होते तो कांहीं उगीच नव्हे. लक्षावधि अमेरिकनां-प्रमाणेंच त्यांच्याहि दृष्टीनें सुखाचें मूळ बाह्य जगांतच असायला पाहिजे. आपल्या देशासाठीं ज्यानें आजवर खूप त्याग सहन केला आहे तो अमेरि-केची विशिष्ट जीवनपद्धति टिकून रहावी म्हणून पुढेंहि हवा तेवढा त्याग करायला आणि परिस्थितीचें आव्हान स्वीकारायला सदैव तयार राहील, परंतु हा त्याग करायला प्रवृत्त करणाऱ्या आंतरिक मूल्यांची जाणीव म्हणजेच सुखाची प्राप्ति असें मानायला मात्र तो तयार होत नाहीं. कारण असें करणें म्हणजे आपल्या सुखप्राप्तीच्या हक्कावर पाणी सोडण्यासारखें आहे अशीच त्याची समजूत असते.

आपल्या आशावादी परंपरेनें अशा रीतीनें आपल्याला ह्या विरोधाच्या तात्त्विक सांपळ्यांत आणून सोडलें आहे. आपण उच्च आणि उदात्त अशा उद्दिष्टांसाठीं धडपडत असतों. परंतु तीं उद्दिष्टें मात्र आपण ज्यांना ‘ वास्तव ’ मूल्यें मानतों त्यांच्या नेमकीं उलट असतात. त्यामुळें ध्येयाच्या बाबतींत सबंध राष्ट्राच्या पदरीं एक प्रकारची निराशा येते. आपल्या स्वातंत्र्याच्या ध्येयामागील विचारप्रणाली जगाला समजावून देण्याच्या बाबतींत अमेरिका असमर्थ कां ठरते याचें विवेचन करतांना पहिल्या भागांत याच निराशे-

संबंधीं ऊहापोह केलेला आहे. आंतरिक जगाचें महत्त्व कमी लेखतांना किंवा त्याची कशीबशी संगति लावतांना आशावादी विचारवंत त्याचें अस्तित्व नाहींसें करूं शकत नाहींत. वाळूंत डोकें खुपसलें म्हणून शहामृगाला जसें आपल्या शत्रूपासून निसटतां येत नाहीं, तसाच हा प्रकार आहे. आणि त्यांतूनच हा खोडा निर्माण झाला आहे. माणसाला टाळतां न येण्यासारख्या आणीबाणीच्या प्रसंगीं हीं आंतरिक मूल्यें आपलें अस्तित्व जाणवून देतात. अशावेळीं मग आपलें आपल्याशींच एक द्वंद्व सुरू होतें. त्यागाला तयार झाल्यावांचून राष्ट्र म्हणून आपलें अस्तित्व टिकूं शकणार नाहीं हें आपल्याला दिसत असतें. परंतु त्याची कारणमीमांसा मात्र आपल्याला देतां येत नाहीं. आंतरजगाशीं संबंध असलेले जे नैतिक प्रश्न आपल्या काळांत उपस्थित झालेले आहेत, त्यांचें आकलन आपल्याला होऊं शकत नाहीं. परंतु या प्रश्नाचें आकलन होण्यावरच आपल्या स्वातंत्र्याच्या सिद्धांताचें तगणें अवलंबून असल्याकारणानें तो माणसाच्या परस्परविरोधी महत्त्वाकांक्षांच्या आणि इच्छांच्या कोंडींत सांपडला आहे.

* * *

## ५ : : प्रगतींतील विरोधाभास

इलिनॉसममील विद्यार्थ्यांच्या परिसंवादानंतर कांहीं महिन्यांनीं ‘लाईफ’ मासिकातर्फे त्याच विषयावर अमेरिकेंतील कांहीं विख्यात व्यक्तींची चर्चा घडवून आणण्यांत आली. ह्या व्यक्ति विविध क्षेत्रांतल्या होत्या. त्या चर्चेंत श्री. झिमरली यांनीं केलेल्या सुखाच्या व्याख्येला दुजोरा मिळाला नाहीं. (१९४८ सालांतील उत्कृष्ट माता म्हणून ठरलेल्या) श्रीमती हर्बर्ट डब्लू. हाइन्स यांच्या शब्दांत त्या चर्चेचें सार सांगावयाचें तर “दुसऱ्यांचें जास्तींत जास्त हित व्हावें म्हणून जे स्वतःला विसरुन जायला तयार असतात त्यांच्यापासूनच सुखाची प्रभा फांकते. स्वतःच्या मुलांसाठीं त्याग करायला लागला तर त्यांत त्या मातेला वाईट वाटत नाहीं, आणि तसें करतांना सुख प्राप्त करून घेण्याचा स्वतःचा हक्क तिला गमवावा लागतो असेंहि मला वाटत

नाहीं." त्या चर्चेच्या वेळीं सुखाच्या व्याख्येंत नैतिक कल्पनांचा समावेश करण्याचा प्रयत्न करण्यांत आला. कांहींजणांनीं तर आंतरजग आणि आंतर मनांतील मूल्यें यांवर फार भर दिला. 'अँड नाऊ टु लिव्ह अगेन' या पुस्तकाच्या लेखिका कुमारी बेट्सी बार्टन् यांनीं चर्चेचा समारोप करतांना सांगितलें कीं, "सुख ही मुख्यतः एक मानसिक अवस्था आहे. किंवा निराळ्या शब्दांत सांगावयाचें तर समारोपादाखल मी असें म्हणेन कीं, देवाचें राज्य आपल्या हृदयांतच असतें."

सुखाची प्राप्ति करून घेण्याच्या अधिकारासंबंधीं सर्वसंमत निर्णयाप्रत येण्यासाठीं त्या चर्चेत भाग घेणारांना वादविवादाची एक विशिष्ट पद्धति अवलंबावी लागली; कांहीं बंधन घालून घ्यावें लागलें हें मात्र लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या चर्चेच्या वेळीं नीतिनियमांचें किंवा लोकशाही समाज ज्या महान मानवी तत्त्वांवर अधिष्ठित झाला आहे त्यांचें मूळ कशांत आहे हा प्रश्न वादांत उपस्थित करावयाचा नाहीं असें सर्वांनीं मान्य केल्यामुळेंच चर्चा होऊं शकली. परंतु असें ठरविण्यापूर्वीं जमलेल्या लोकांची या प्रश्नावर बरीच प्रक्षुब्ध चर्चा झाली होती. अर्थात हे मूलगामी प्रश्न उपस्थित न करण्याचा निर्णय एकदां घेतल्यानंतर मात्र चर्चेचें काम सोपें झालें. पण जर तो निर्णय घेतला गेला नसता तर मात्र ती चर्चा अनिर्णितच राहिली असती.

नितिनियमांच्या उगमस्थानासारख्या अत्यंत गुंतागुंतीच्या प्रश्नाचा प्रस्तुत वादाशीं प्रत्यक्ष असा संबंध पोहोंचत नाहीं असें चर्चेत भाग घेणाऱ्यांपैकीं अनेकांना वाटत होतें. परंतु आतांपर्यंत आपण जें विवेचन केलें त्यावरून असें दिसतें कीं, ह्या प्रश्नाचा वादविषयाशीं संबंध आहे. नियमांचें मूळ जर आंतरिकजगांत असेल तर त्या जगाचें स्वरूप काय? असा प्रश्न साहजिकच निर्माण होतो. आणि कुमारी बार्टन् यांनीं प्रतिपादिल्याप्रमाणें जर त्याच्या स्वरूपाचा संबंध देवाच्या राज्याशीं असेल तर सभोंवतालच्या परिस्थितींत सुधारणा करून नीतिनियमांची अंमलबजावणी करतां येईल हा आशावाद्यांचा सिद्धांत लंगडा पडतो. अशा सुधारणांमुळें आत्मिक मूल्यें आचरणांत आणण्यासाठीं अनुकूल अशी परिस्थिति जरूर निर्माण होत असेल, परंतु चांगलें कशाला म्हणावें तें ठरविण्याच्या कामीं किंवा जीवनाचें उद्दिष्ट निश्चित करण्याच्या कामीं त्या सुधारणा अपुऱ्याच पडतात. "हा प्रश्न

उपस्थित करावयाचा नाहीं." असें सर्वांनीं ठरविलें याचा अर्थ हाच होतो कीं, आशावादी तत्त्ववेत्त्यांना खोड्यांत टाकावयाचें नाहीं असें त्यांनीं मान्य केलें; किंवा निराळ्या शब्दांत सांगावयाचें तर सुखाच्या कल्पनेला कांहीं नैतिक अधिष्ठान असतें असें एकसारखें आग्रहानें प्रतिपादीत असतांनादेखील श्री. झिमरली यांनीं उपस्थित केलेल्या प्रश्नाला मात्र सर्वांनीं बगल दिली.

अर्थात् या सर्व प्रश्नांकडे वस्तुनिष्ठ दृष्टीकोनांतून बघणें अमेरिकनांना कठीण आहे. आपलें राष्ट्र हें विचारवंतांचें नसून कृति करणारांचें आहे हें घटकाभर मान्य केलें तरी तसें असण्यांत वाईट काय आहे? आणि औद्योगीकरणाचा सर्वांनीं मनमुराद फायदा करून घ्यावा अशी इच्छा बाळगण्यांत तरी काय चूक आहे? अमेरिकनांनीं आपल्या जीवनमूल्यांची बाह्य जगाशीं परिश्रमपूर्वक सांगड घातली म्हणूनच तर अमेरिका आज इतकी बलाढ्य झाली आहे. आणि अमेरिकेच्या या सामर्थ्याची स्वतंत्र जगाला आज अत्यंत गरज आहे.

परंतु आपण अमेरिकन लोक एक गोष्ट सारखी विसरतों कीं, सुखासंबंधींच्या आपल्या ज्या कल्पना आहेत त्या जगांतील इतर लोकांना अजिबात मंजूर नाहींत. भौतिक दृष्ट्या त्या कल्पनांत कांहींहि गैर नाहीं असें मानलें तरी आध्यात्मिक दृष्ट्या त्या सदोष असण्याचा संभव आहे, म्हणजेच माणसांचें अचूक मूल्यमापन करण्याच्या त्यांच्या वास्तव स्वरूपाच्या दृष्टीनें त्यांत कांहीं उणीवा असतील. माणसाच्या सभोंवतालची परिस्थिति सुधारणें हें केव्हांहि चांगलेंच, परंतु तेवढ्यावरच सारें लक्ष केंद्रित केलें तर जीवनाकडे बघण्याची एक विशिष्ट दृष्टि निर्माण होते आणि त्यामुळें मानवजातीसंबंधानें अनेक महत्त्वाचे प्रश्न आपल्या समोर उभे राहतात. असल्या प्रश्नांचीं समाधानकारक उत्तरें देण्यांत आशावादी परंपरा संपूर्णपणें अयशस्वी ठरल्या आहेत. याच्या पुष्ट्यर्थ दोन प्रत्यक्ष उदाहरणें दाखवतां येतील.

आपण अमेरिकन संस्कृतीचेंच उदाहरण घेऊं. युरोपियन संस्कृतीपेक्षां ती अगदीं निराळी आहे. अमेरिकेला भेट देणारे बहुतेक सर्वच युरोपियन या विषयाची चर्चा करतांना आढतात. त्यांचा अभिप्राय सर्वसाधारणपणें असा असतो कीं, अमेरिकन लोक हे सांस्कृतिक दृष्ट्या रानटी नसले तरी मागासलेले खास आहेत. ते औद्योगीकरणाच्या इतके मागें लागलेले असतात कीं,

जीवनांतील पुष्कळसा आनंद आणि सौंदर्य ते गमावून बसतात. आणि पाश्चात्यांनीं सांस्कृतिक क्षेत्रांत जी महान् कामगिरी बजावली आहे तिचें त्यांना नीट आकलनच होऊं शकत नाहीं.

अर्थात् या विधानाची सत्यता पटवून देणें फार अवघड आहे. कारण एखदा अमेरिकन त्यावर चटकन् असें म्हणूं शकेल कीं, नानाप्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम अमेरिकेच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत सारखे चालूच असतात. या बाबतींत फ्रेडरिक लुईस ॲलन यानें 'द बिग चेंज' या आपल्या पुस्तकांत बरीच आंकडेवारी दिली आहे. तो म्हणतो:—"जॉज ऑरवेलच्या '१९८४' या पुस्तकाच्या साडेसात लाख प्रति अमेरिकेंत खपल्या, 'ओडेसी' या पुस्तकाच्या भाषांतराच्याहि अशाच साडेतीन लाख प्रति खपल्या, १९४८ ते ५० च्या दरम्यान भरलेल्या कला प्रदर्शनांना ५ कोटी लोकांनीं भेटी दिल्या आणि सरकारच्या व्यापार खात्यातर्फे प्रसिद्ध झालेल्या माहितीनुसार १९३९ सालीं चाळीस लाख डॉलर्सच्या कलावस्तू अमेरिकेंत खपल्या; तर १९४९ सालीं तोच आंकडा चार कोटी डॉलर्सवर गेला. संगीताच्या बाबतींत बोलायचें झालें तर अमेरिकेंतील लहान मोठ्या, १५०० गांवीं दर वर्षीं संगीताच्या मैफली भरतात व त्यांना लोकांचा भरगच्च पाठिंबा मिळतो. तसेंच वॅंडा लॅंडोपस्काच्या संगीताच्या वीस हजार ध्वनिमुद्रिका अवघ्या तीन महिन्यांत खपल्या. अमेरिकेच्या सांस्कृतिक क्षेत्रांतील हाल-चालींचीं अशीं शेंकडों उदाहरणें देतां येतील. त्यांवरून हेंच सिद्ध होतें कीं, अमेरिकन नागरिकांनादेखील सांस्कृतिक कार्यक्रमाविषयीं अत्यंत आकर्षण असून फार मोठ्या प्रमाणावर ते असले कार्यक्रम पार पाडीत असतात.

परंतु कलास्वादाचें मूल्यमापन नुसत्या आंकडेवारीनें करतां येत नसतें आणि स्वतः ॲलन यांना याची पुरती जाणीव आहे. किती लाख लोकांनीं प्रदर्शन पाहिलें यापेक्षां त्यांतल्या मूठभर लोकांना तरी त्या प्रदर्शनांतील चित्रांचा रसास्वाद घेतां आला कीं नाहीं हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. खऱ्या अर्थानें चित्रें पाहणाऱ्यांची जी दृष्टि असते ती चर्मचक्षूला दिसणाऱ्या वस्तूपुरती मर्यादित राहत नाहीं. चर्मचक्षूला जें दिसतें त्याच्यामागें आणि पलीकडे असणाऱ्या वस्तूंशीं आणि मूल्यांशीं तिचा संबंध असतो आणि ह्या मूल्यांची अनुभूति म्हणजे खरी सांस्कृतिक अनुभूति, कलात्म अनुभूति.

एखाद्या चित्रवस्तूची सांस्कृतिक अनुभूति प्राप्त करून घ्यावयाची असेल तर बघणाराचा कांहीं एका आंतरअनुभूतीवर विश्वास असला पाहिजे. ज्या समाजांत अशा प्रकारच्या आंतरअनुभूतींना अभिव्यक्ति मिळते आणि जीवनाचें मूल्यमापन करतांना स्थान दिलें जातें तो समाजच युरोपियनांचे दृष्टीनें " सुसंस्कृत " ठरतो.

अमेरिकेंतील सर्वसाधारण जनता प्रत्यक्ष कलानिर्मितींत भाग घेत नसली तरी कलेचें रसग्रहण करण्याची वृत्ति मात्र युरोपांतील कोणत्याहि देशापेक्षां अमेरिकन समाजात अधिक खालच्या थरापर्यंत पोंचली आहे असें कदाचित् म्हणतां येईल. फ्रान्समधील शेतकरी हा कलेचा आश्रयदाता आहे असें खासच म्हणता येणार नाहीं. परंतु अमेरिकन शेतकरी किंवा त्याहिपेक्षां त्याची बायको आपल्या गांवीं भरणाऱ्या संगीताच्या मैफलीला आश्रय देतांना किंवा आपल्या गांवांत उत्तमोत्तम चित्रांचा संग्रह आणवून त्यांचें प्रदर्शन भरवतांना आढळून येते. त्यामुळें अशा कलावस्तूंतून व्यक्त होणाऱ्या आंतर वास्तवाला आपण पारखे झालेले आहोंत असा आरोप आपल्यावर कोणाला करतां येणार नाहीं. पण आपण या आंतरवास्तवाला दुय्यम स्थान देतों. आपण जीवनांत बाह्य मूल्यांना जास्त महत्त्व देत असल्यामुळें आणि त्यावरूनच आपण यशाचें मोजमाप करीत असल्यामुळें आपलें कलाविषयींचें प्रेम प्रत्यक्ष जीवनाला स्पर्श करूं शकत नाहीं. आपलीं गांवें कितीहि ओंगळ असलीं, हमरस्त्यावर कितीहि गर्दी, गोंधळ असला, आपलीं प्रार्थनामंदिरें अगदीं सामान्य असलीं, आपलीं घरें अगदीं कळाहीन असलीं, त्यांतील सामानसुमान अगदीं गचाळ असलें किंवा आपलें अन्न बेचव असलें तरी त्यापैकीं कशाचीच आपणाला कधीं खंत वाटत नाहीं. कारण आपल्या सभोंवारच्या या सर्व बाबींकडे आपण सौंदर्य-दृष्टीनें पाहात नाहीं. त्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन निराळाच असतो. कलादृष्टीला जन्म देणाऱ्या आंतरिक जगापेक्षां उपयुक्तता, काटकसर कार्यक्षमता किंवा वेळाची बचत यांवर भर देणाऱ्या बाह्य जगाच्या दृष्टीनें आपण त्याकडे पहात असतों. अमेरिकेंतील गांवांची रचना ही उपयुक्ततेनुसार करण्यांत आलेली असते आणि या उपयुक्ततावादाचा पगडा इतका जबरदस्त असतो कीं, गांवाच्या रचनेंतहि सौंदर्यदृष्टि असूं शकते हें कोणाच्या खिजगणतींतहि नसतें आणि अमेरिकन लोक

ज्यावेळीं आपल्या गांवांना ‘ सुंदर ’ बनविण्याचें ठरवितात त्या वेळीं त्यांत कृत्रिमपणा फार येतो. त्यामुळें युरोपियनांना त्यांची जास्तच घृणा वाटूं लागते आणि या कृत्रिमपणापेक्षां पूर्वींचीं असुंदर परंतु नैसर्गिक गांवें परवडलीं असें त्यांस वाटूं लागतें.

युरोपियनांनीं आपल्याला आतां संस्कृतिदृष्ट्या “ रानटी ” म्हणण्याचें सोडून द्यावें हें ठीक आहे. पण त्याचबरोबर आपल्याला हेंहि कबूल केलें पाहिजे कीं, आपल्या आशावादी तत्त्ववेत्त्यांच्या व्याख्येबरहुकूम बाह्य साधनांच्या साहाय्यानें सुख मिळविण्याच्या प्रयत्नांत आपण युरोपियनांच्या दृष्टीनें इतकी एकांकिक भूमिका घेतली आहे कीं, त्यामुळें आपल्या संस्कृतीचा कोठें थांगपत्ताच लागेनासा झाला आहे.

आतां आपण दुसऱ्या उदाहरणाकडे वळूं. खाजगी उद्योगधंद्याची आपली पद्धति टिकून कशी राहील हा अमेरिकनांपुढील आजचा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. आणि त्यावरच परदेशाबरोबरचा व्यापार, इतर देशांचा आर्थिक विकास अवलंबून आहे. अर्थात् तांत्रिक बाबींचा जकातविषयक धोरणाशीं घनिष्ठ संबंध असल्याकारणानें डॉलर्स, डॉलर्सचा तुटवडा आणि गुंतविण्यांत येणारें भांडवल याहि अत्यंत महत्त्वपूर्ण बाबी ठरतात. तरीदेखील उद्योगधंद्यामागील तत्त्वप्रणालीचा विचार केल्याशिवाय नुसता तांत्रिक बाजूंवर भर देऊनहि हा प्रश्न अंतीं खाजगी उद्योगधंद्याच्या बाजूनें सुटणार नाहीं. आणि याहि बाबतींत पुन्हां अमेरिकन आशावादी विचारसरणी आपल्याला अडचणींत नेऊन सोडते.

गेल्या कित्येक दशकांपासून अमेरिकेंतील उद्योगपद्धतींत रक्तविहीन क्रांति घडून येत आहे. आणि अमेरिकेच्या इतिहासांतील एक महान कामगिरी म्हणून कदाचित् तिचा नामनिर्देश केला जाईल. भांडवलशाही पद्धतीचें “ जिला ग्राहकांची भांडवलशाही ” म्हणतां येईल, अशा नव्या पद्धतींत होणारें “ संक्रमण ” अशी संज्ञा अनेक अमेरिकन निरीक्षकांकडून याला दिली गेली आहे. मार्क्सवाद्यांनीं मुळांत जिच्याविरुद्ध बंड पुकारलें त्या सनातन भांडवलशाहींत भांडवल हें अंतिम साध्य मानलें जाई. भांडवलशाही

पद्धति ही मुख्यतः भांडवलदारांच्या किंवा मालकांच्याच फायद्यासाठीं राबवली जाई. परंतु अमेरिकेंत जें स्थित्यंतर घडून आलें त्यामुळें भांडवलदाराला भांडवलशाही पद्धतींतील मूळचें महत्त्व उरलें नाहीं व मालक, व्यवस्थापक, कामगार, सर्वसाधारण जनता आणि ग्राहक या पांच घटकांपैकीं एक येवढेंच त्याचें स्थान राहिलें. प्रत्येक उद्योगधंद्यांत या पांचही घटकांना भिन्न भिन्न पण योग्य महत्त्व आहे. विशेषतः उद्योगधंदा जितका मोठा किंवा महत्त्वाचा असेल तितकें या घटकांचें महत्त्वहि जास्त असतें. गेल्या दोन दशकांतील अमेरिकेचा इतिहास याचीच साक्ष देतो. याचा परिणाम असा झाला आहे कीं, आर्थिक सत्ता खऱ्याखुऱ्या लोकशाही पायावर विभागली गेली आहे. आणि सर्वसामान्य जनतेच्या आर्थिक अधिकारांस मान्यता देणें हें भांडवलशाही पद्धतीचें उद्दिष्ट असलें पाहिजे ही नवी व्याख्या रूढ झाली आहे. जेथें मोठमोठ्या कंपन्यांच्या कचेऱ्या आहेत अशा वॉलस्ट्रीटपेक्षां सर्वसामान्य व्यवहार जेथें चालतो त्या मेनस्ट्रीटला आज अधिक महत्त्व आलें आहे.

परंतु तेवढयानें भागत नाहीं. या पांच घटकांत सदैव अंतर्गत संघर्ष सुरू असतो. आणि अगदीं व्यवहारी आर्थिक भाषेंत बोलावयाचें तर या संघर्षाच्या नाड्या शेवटीं सर्वांत महत्त्वाचा घटक जो ग्राहक त्याच्या हातीं असतात. कामगार वर्गाचें प्रभुत्व असलेल्या समाजाप्रमाणें हकालपट्टी झालेल्या भांडवलदाराची जागा या ठिकाणीं कामगारानें घेतलेली नसते. किंवा समाजवादी समाजपद्धतीप्रमाणें भांडवलदारांच्या जागीं राजकीय नोकरशाहि आलेली नसते, तसेंच व्यवस्थापकीय विभागालाहि तें स्थान प्राप्त झालेलें नसतें. मात्र तशी शंका कांहींनीं व्यक्त केली असून त्यांतूनच पुढें संयुक्त स्वरुपाची हुकूमशाही निर्माण होईल असा धोका त्यांना वाटतो. अमेरिकेंत घडून आलेल्या स्थित्यंतरांत भांडवलदारांची जागा ग्राहकानें घेतली आहे. गिऱ्हाइकांच्या फायद्यासाठीं निर्माण झालेल्या अत्यंत गुंतागुंतीच्या अशा औद्योगिक क्षेत्रांतील आर्थिक नाड्या प्रत्येक गिऱ्हाइकाच्या हातीं असतात आणि या नव्या भांडवलशाहीचें उद्दिष्ट काय असावें तें तोच ठरवीत असतो.

ह्या सर्वांचा परिणाम विधायक स्वरूपाचा झाला आहे. मार्क्सवाद्यांच्या आर्थिक सिद्धांताचें बूडच त्यामुळें निखळून गेलें आहे आणि मार्क्सवादी

विचारसरणी या देशांत हास्यास्पद आणि जुनाट ठरली आहे. शिवाय जगांतील प्रत्येक व्यक्ति ही ग्राहक असल्यामुळें या विचारसरणीमागील आर्थिक सिद्धांत सर्वांना लागू पडतील अशी आशाहि वाटूं लागते, आणि असें असूनहि पृथ्वीच्या पाठीवरील जनतेला आकर्षित करून घेण्याच्या कामीं किंवा अमेरिकेच्या ध्येयाविषयीं तिच्या मनांत विश्वास निर्माण करण्याच्या कामीं ही विचारसरणी असमर्थ ठरली आहे.

आपण ज्यावेळीं यामागील कारणपरंपरा शोधून काढण्याचा प्रयत्न करतों त्यावेळीं आपल्यांत आणि युरोपियनांच्यांत संस्कृतिसंबंधानें असलेल्या गैरसमजाचें विवेचन करतांना जो मुद्दा उपस्थित झाला होता तोच पुन्हां अपरिहार्यपणें उभा राहतो. सर्व मानवी मूल्यांना बाह्य स्वरूप देण्याची अमेरिकनांची प्रवृत्ति हाच तो मुद्दा होय. नव्या भांडवलशाही पद्धतींत ग्राहक हाच त्या पद्धतीचें उद्दिष्ट किंवा ध्येय ठरवीत असतो हें खरें, परंतु ग्राहकाचें उद्दिष्ट किंवा ध्येय कोण ठरवीत असतो ? या प्रश्नाचें उत्तर अमेरिकन आशावाद्यांना देतां आलेलें नाहीं. स्थळकाळावर अभूतपूर्व प्रभुत्व मिळवून देणाऱ्या आश्चर्यकारक शोधांत आधिकाधिक भर पडत जावी हा ग्राहकाच्या जीवनाचा उद्देश असूं शकेल का ? त्यासाठींच तो जगतो असें आपल्याला म्हणतां येईल का ? आज आपली उद्योगपद्धति ज्या प्रचंड वेगानें विकास पावत आहे तिच्याकडे पाहतां या प्रश्नाचें उत्तर अस्तिपक्षींच द्यावें लागेल असें वाटतें. मानव हा स्वतः एक अंतिम मूल्य असूं शकेल. परंतु औद्योगिक क्षेत्रांतील नवनवे शोध आत्मसात करून आणि त्यांचीं फळें स्वीकारूनच तो अंतिम मूल्य ह्या नात्यानें पूर्णता पावूं शकेल, अशी परिस्थिति दिसते. अशा प्रकारें आपण एका घातचक्रांत सांपडतों. उद्योगपद्धतीचें योग्य उद्दिष्ट म्हणजे तयार मालाचा उपभोग घेणारा माणूस, आणि ह्या माणसाचें अंतिम उद्दिष्ट म्हणजे तयार मालाचा उपभोग घेणें असें हें चक्र आहे.

आपण हा जो निष्कर्ष काढला त्याचा परिणाम शेवटीं काय होतो ? उद्योधंद्याकडे पाहण्याच्या ह्या विचारप्रणालींतून निराशेशिवाय अमेरिकनांच्या पदरीं दुसरें कांहींच येत नाहीं. ग्राहक-भांडवलशाहीचा सिद्धांत इतर देशांत प्रसृत करण्याचा अमेरिकनांचा प्रयत्न निष्फळ ठरला आहे. जेथें जेथें नजर

टाकावी तेथें तेथें हेंच आढळून येतें कीं, अमेरिकन लोक हे पक्के भौतिकवादी असून त्यांनीं मानवी मनावर जबरदस्त मोहिनी टाकली आहे. अमेरिकेचें अत्यंत समृद्ध असें भौतिक जीवन आणि अमेरिकन कार्यक्रमामुळें होणारे भौतिक फायदे यांचा अमेरिकेकडून जो एकसारखा प्रचार होत असतो त्यामुळें वरील विधानाला बळकटीच येते. ग्राहकभांडवलशाही प्रामुख्यानें असें सांगते कीं, ग्राहकांनीं जास्तींत जास्त वस्तु घेण्यास शिकलें पाहिजे. परंतु जगांतील ग्राहक ही भूमिका स्वीकारण्याला तयार नसल्याचें पाहून अमेरिकेला मोठें आश्चर्य वाटतें. ग्राहकभांडवलशाहीला पाठिंबा मिळविण्यासाठीं आवश्यक असलेल्या प्रमाणांत वस्तूंचा वापर करण्याची त्यांची तयारी नाहीं. ही अडचण दूर करण्याचा आशावादी परंपरेंतला जुना मार्ग म्हणजे शिक्षण, त्याचा अवलंब करण्यांत येतो. यूरोप, आशिया व आफ्रिका खंडांतल्या लोकांना कारखान्यांतून काय काय माल निर्माण होतो तें दाखवून दिलें आणि त्याचा वापर कसा करावयाचा ह्याचें शिक्षण दिलें तर प्रचंड बाजारपेठा निर्माण होतील, आणि 'मागासलेल्या' देशांत औद्योगीकरणाचा झपाट्यानें प्रसार होईल अशी समजूत आहे. परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, जगांतील जनता–अगदीं औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांतील जनतादेखील–औद्योगिक विकासाबरोबर निर्माण होणाऱ्या साधनांचा वापर करून सुखप्राप्ति करून घेणें ही मानवी जीवनाची इतिकर्तव्यता आहे ही जी अमेरिकेच्या औद्योगीकरणांत अभिप्रेत असलेली व्याख्या आहे, ती मान्य करण्यास तयार नाहीं. या बाबतींत अमेरिकनांकडून कांहींहि शिकण्याची तिला इच्छा नाहीं. आणि म्हणूनच या बाबतींत अमेरिकेकडून अगदीं उदारपणेंदेखील जे प्रयत्न केले जातात त्यांबद्दल इतर देशांतील जनता आपली नापसंतीच व्यक्त करते.

भांडवलशाही पद्धतीचें हें रूपांतर करीत असतांना आपण अर्थशास्त्रांत फार मोलाची भर घातली आहे. परिस्थिति थोडीशी वेगळी असती तर ह्या रूपांतरामुळें सबंध जगाचा आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या फायदा झाला असता आणि त्यामुळें आपल्या देशालाहि स्थैर्य आणि मजबुती आणण्याच्या कामीं फार मोठी मदत झाली असती. परंतु माणसाच्या अंतर्यामींच्या आपल्या कल्पना इतरांना विशद करून सांगण्याच्या कामीं आपण असमर्थ ठरल्या-

मुळें किंवा आपण त्या गृहीत धरूनच चालल्यामुळें अर्थशास्त्राच्या क्षेत्रांत आपण जी महान् कामगिरी बजावली आहे तिची आपल्या देशांतील लोकांव्यतिरिक्त इतरांना मातबरीच वाटत नाहीं. उलट भांडवलशाही पद्धतींत आपण घडवून आणलेल्या ह्या रूपांतरामुळें कांहींसा उलटाच प्रकार घडून आला आहे. आपल्या औद्योगिक आशावादांत अभिप्रेत असलेल्या मानवा-संबंधींच्या कल्पना मान्य करण्याऐवजीं, कांहीं अपवाद सोडून, जगांतील सर्व लोक समाजवाद आणि Economic State असल्या कल्पनाच उचलून धरूं लागले आहेत. रशियाच्या प्रचारामुळें, अमेरिकेकडे भांडवल-शाहीची जुनाट पद्धति टाकून देऊन खरीखुरी आर्थिक लोकशाही प्रस्थापित करणारी क्रांतिकारी शक्ति म्हणून पाहिलें जात नाहीं तर खाजगी मालमत्ता आणि स्वार्थसाधूपणा यापलीकडे न पाहणारी आणि सुखाचा एकसारखा हव्यास धरणारी अशी एक प्रतिगामी शक्ति म्हणूनच तिच्याकडे पाहिलें जातें.

विसाव्या शतकाच्या सुरवातीला आशेचें जें युग सुरू झालें त्यांत निर्माण झालेल्या ‘ औद्योगिक मानव ’ ह्या नव्या जातीचें आपण करीत असलेलें विवेचन हें अशाप्रकारें एका पेंचप्रसंगापाशीं, येऊन पोचलें आहे. कारण आपल्याला असें आढळून आलें आहे कीं, हा ‘ औद्योगिक मानव ’ देव तर नाहींच पण तो माणूस म्हणवून घेण्याच्यादेखील लायकीचा नाहीं. अमेरिकनांनीं आपल्या आशावादी परंपरेला अनुसरून त्याचा जो अर्थ लावला आहे तो पाहतां त्याला आंतरिक जीवन किंवा अंतरात्मा असा मुळीं नाहींच. सुखवादी विचारसरणीच्या फेऱ्यांत सांपडलेल्या अत्यंत प्रगत आणि सद्हेतूनें प्रेरित झालेल्या अशा एखाद्या प्राण्याचें स्वरूप त्याला प्राप्त झालें आहे. खऱ्याखुऱ्या माणसांमध्यें जें आंतरवास्तव असतें तें नाकारणारी किंवा त्याच्याकडे डोळेझांक करणारी ही सुखवादी विचारसरणी आहे आणि तिच्या फेऱ्यांत तो सांपडला आहे. अशा तऱ्हेनें “ औद्योगिक मानव ” आणि त्याच्याबरोबर अमेरिकाहि पण—एका निष्ठुर आणि गोंधळांत टाकणाऱ्या विसंगतीच्या भोंवऱ्यांत सांपडली आहे. बाह्य जगांत डोळे दिप-विणारा विजय परंतु आंतरजीवनांत मात्र काळाकुट्ट अंधार अशी कांहींशी त्याची स्थिति झाली आहे. प्रगतींतील विरोधाभास तो हाच ! पूर्वी कधीं झाल्या नसतील इतक्या मानसिक यातना या विरोधाभासामुळें भोगाव्या

लागत आहेत. कारण दीर्घोद्योग आणि प्रखरबुद्धि खर्च करूनहि अखेर ती प्रकाशविरहित अशा आपल्या आंतर्यामांतील अनिश्चिततेंत गडप होऊन जावी असें आपल्या अनुभवाला येत आहे. ज्यांचें स्वरूप त्यांना स्वतःलाच विशद करतां येत नाहीं अशा उद्दिष्टासाठीं माणसें केवळ क्लेश भोगतांनाच नव्हे तर प्रत्यक्ष मृत्यूला मिठी मारतांनाहि आढळतात. ज्या उद्दिष्टासाठीं ते हा त्याग करीत असतात तें उद्दिष्ट कदाचित अस्तित्वांतदेखील नसेल. प्रगतीच्या कल्पनेनें प्रेरित होऊन आपण श्रम करतों. निरनिराळ्या क्षेत्रांत आपली बुद्धि कसाला लावतों आणि दूरदेशीं जाऊन नानाप्रकारचीं साहसें करण्यास उद्युक्त होतों. परंतु आपण हें सर्व कां करतों ? याच्या मागची प्रेरणा कोणती ? या प्रश्नाचा जर आपण शोध घेऊं लागलों तर मात्र आपल्या पदरीं निराशाच येते आणि आपल्याला कोणताहि मार्ग दिसेनासा होतो. कारण ज्या आशावादी परंपरांत आपण वाढलों आहोंत त्या अशा कांहीं प्रेरणा असतात हेंच मुळांत मान्य करीत नाहींत.

या अडचणींचें अस्तित्व लपविण्यासाठीं अमेरिकन लोक अनेक मार्गांचा अवलंब करतात. एक म्हणजे असल्या अडचणींचा विचारच मनांत आणायचा नाहीं. एखाद्या निग्रही माणसाप्रमाणें नुसतें आशावादी ध्येयाच्या पाठीमागें लागावयाचें. किंवा दुसरा मार्ग म्हणजे मध्ययुगीन कालाप्रमाणें त्या आशावादी ध्येयांनाच उदात्त तत्त्वें मानून त्यावर दृढ विश्वास ठेवावयाचा, क्वचित् त्याची अंधभक्तिदेखील पत्करावयाची. असाच आणखी एक मार्ग म्हणजे ‘ लाईफ ’नें घडवून आणलेल्या चर्चेच्या वेळीं जशी मूळ प्रश्नाला सर्वांनीं बगल दिली तशी या अडचणींनाहि बगल द्यावयाची, स्वतःला मानवतावादी म्हणवून घेऊन सहकार्याचा आणि बंधुभावाचा उपदेश करीत सुटावयाचें; मात्र बंधुभाव किंवा सहकार्य म्हणजे नेमकें काय आणि स्वतःच्या जीवाचें मोल देऊन लोकांनीं ते गुण आत्मसात कां करावेत यासंबंधीं मात्र एक चकार शब्दहि काढावयाचा नाहीं. यापैकीं शेवटचा मार्ग हें तर अमेरिकेचें खास वैशिष्ट्य असून आपल्या सरकारी प्रचारांत त्याचा सतत अवलंब केलेला आढळतो. आपण जो एवढा मानवतावादी कार्यक्रम हातीं घेतों त्यापैकीं कशालाहि आपण खऱ्या अर्थानें मानवी स्वरूप देऊं शकत नाहीं किंवा मानवी दृष्टिकोनांतून आपण त्याचें मूल्यमापन करूं शकत नाहीं, ही

गोष्ट ज्यांच्यासाठीं म्हणून आपण प्रचार करतों त्यांच्यापासून दडवून ठेवूं शकलों नाहीं. आपल्याला यश मिळवायचें तर माणसाच्या अंतर्यामाला जाऊन भिडेल असाच मार्ग आपल्याला शोधून काढला पाहिजे. परंतु प्रगतीच्या सिद्धान्ताचें प्रतिपादन तर असें असतें कीं, असल्या भानगडी ह्या फक्त बुद्ध भिक्षूंनींच करावयाच्या असतात.

* * *

## ६ : : अमेरिकेची शोकांतिका

एका शब्दांत हें सारें वर्णन करावयाचें झालें तर 'शोकपूर्ण' असें म्हणून मोकळें होतां येईल. पण तो शब्द तर मुळीं आशावाद्यांच्या शब्दकोशांतच नसतो. जगाच्या सुरुवातीपासून पृथ्वीवरील मानवी जीवनाची जी शोकांतिका द्रष्टे पाहात आले आहेत तीच पुन्हां अमेरिकेपुढें वाढून ठेवली आहे.

आपल्या देशाची अशी शोकांतिका व्हावी ही कल्पनाच अमेरिकनांना सहन होत नाहीं. आपण ज्या आशावादी वातावरणांत वाढलों आहोंत त्याच्याशीं विसंगत असें कांहीं आपल्या देशाच्या नशिबीं यावें यावर आपला एकदम विश्वासच बसत नाहीं. इतकेंच काय, पण आपली शोकांतिका होणार म्हणजे नेमकें काय होणार तेंदेखील आपल्या नीट लक्षांत येत नाहीं. शोकांतिका म्हणजे ज्याचा शेवट वाईट होतो असें कांहींतरी घडणार एवढी खूणगांठ आपण आपल्या मनाशीं बांधलेली असते. हॉलीवुडच्या चित्रपट कंपन्यादेखील जे चित्रपट काढावयाचे टाळतात त्या दुःखपर्यवसायी चित्रपटांतील शोकपूर्ण आणि निराशामय अशा कांहींतरी घटना, एवढीच त्याविषयींची आपली कल्पना असते. परंतु या ठिकाणीं मात्र अशा अर्थानें हा शब्द वापरलेला नाहीं. निराशावादी तत्त्वप्रणालीच्या दृष्टिकोणांतून जगाकडे बघणाराला मानव ही एक दुःखपूर्ण व्यक्ति आहे असें वाटतें. मनुष्य हा नेहमीं दुःखी कष्टी असतो म्हणून त्याचा असा ग्रह होतो असें नव्हे तर निराशावाद्याला त्याच्या अंर्तयामीचें होणारें वास्तव दर्शन आणि बाह्य जग यांत

त्याला अनेकदां विसंगति आढळून येते; म्हणून तो तसा ग्रह करून घेतो. माणूस हा भावना आणि विकार यांच्या तडाख्यांत सांपडलेला असतो. आणि त्या भावना व ते विकार ह्या ना त्या मार्गानें आपलें स्वरूप प्रकट करण्याची धडपड करीत असतात. परंतु सत्य-शिव-सुंदर यांच्या संबंधीं त्यानें मनांतल्या मनांत जें मूल्यमापन केलेलें असतें. त्याच्याशीं त्याच्या भावना-विकारांचा नेहमींच संघर्ष उद्भवतो आणि त्या वासनांच्या तृप्तीपासून जें सुख मिळेल अशी त्याची कल्पना असते तें बहुधा त्याला कधींच प्राप्त होत नाहीं. अशाप्रकारें माणूस सदैव संघर्षात सांपडलेला असतो. आणि स्वतःची प्रकृति आणि सामर्थ्य ह्यांच्या अनुरोधानें त्या संघर्षातून मार्ग काढतां न आल्यामुळें अखेर दुःखच त्याच्या कपाळीं येतें.

अमेरिकेंत ह्या मानवी शोकांतिकेला एक विशिष्ट स्वरूप येत असून तें स्वरूप उत्तरोत्तर अधिक स्पष्ट होत चाललें आहे. ही शोकांतिका केवळ जरूर ती हालचाल न केल्यामुळें ओढवत आहे. आपण ज्या आपत्तींत सांपडलों आहोंत तिची कांहीं आपल्याला हौस नव्हती किंवा आपण ती बळेंच आपल्या-वर ओढून घेतली असेंहि नाहीं. निव्वळ कृतीच्या दृष्टीनें पाहिलें तर आपण साधेसुधे, भोळेभाबडे लोक आहोंत हा जो आपला दावा आहे त्याला एक अर्थ प्राप्त झाला आहे. आपलें राष्ट्र नवोदित आहे म्हणून हा अर्थ प्राप्त झाला आहे, असें नव्हे तर आपण खरोखरीच सद्हेतूनें प्रेरित झालेले असतों म्हणून मनुष्याची परिस्थिति सुधारावी यासाठीं आपण खूप खटत आलों आहोंत. परंतु सद्हेतुपूर्वक इतकी धडपड करून आणि प्रचंड सामर्थ्य पाठीशीं असूनदेखील शेवटीं अमंगलच जन्माला येतें. जें घडून यावें असें आपल्याला वाटतें त्याच्या नेमकें उलटच घडत आहे. आपल्या काळांतील जगाची सुधारणा घडून यावी, त्याला विशिष्ट स्वरूप मिळावें म्हणून आपण केवढा आटापिटा केला, पण प्रत्यक्षांत मात्र आपल्याला नको होतें तेंच स्वरूप जग धारण करीत आहे. युद्धकाळांत आपण ज्यासाठीं लढलों त्याच्या नेमकें उलट युद्धोत्तर काळांत घडत आहे हें युग संघर्ष, भीतिग्रस्तता आणि आक्रमण यांनीं भरलेलें असून सोव्हिएट रशिया हा युद्धकाळांतील आपला थोर मित्रच आज आपला कट्टर शत्रू बनला आहे. उलट त्यावेळीं आपण ज्याला संस्कृति-विध्वंसक समजत होतों तें जर्मन राष्ट्र आज आपलें सच्चे मित्र बनूं पाहत

आहे. जगांतून राष्ट्रवादाच्या भावनोर्मी हळूंहळू नष्ट होत जातील अशीं स्वप्नें आपण रंगवीत होतों. परंतु त्याऐवजीं स्वतंत्र जगांतील दोस्त राष्ट्रांतदेखील राष्ट्रवादाचीच भावना शिगेला पोंचली आहे असें दिसतें. आपण जगांत शांतता नांदेल अशी आशा करीत होतों. परंतु ती आपली आशा तरी कोठें सफल झाली आहे! शांततेचा आभास निर्माण करण्यासाठीं आपल्याला पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र आपलें सैन्य ठेवावें लागत आहे.

या शतकाच्या सुरवातीला असें वाटत होतें कीं, आशेच्या युगाची पहांट झाली. परंतु शतकानें पुरता मध्यहि गांठला नाहीं तोंच त्या आशेच्या युगाचें कसें विडंबन चाललें आहे तें पाहण्याचें आपल्या नशिबीं आलें आहे. 'औद्योगिक मानव' हा नवीन खिस्ती संस्कृति निर्माण करील अशी आपली समजूत होती. परंतु तो तर खिस्ताच्या शिकवणुकीच्या बरोबर विरुद्ध असलेल्या प्रवृत्तीचें प्रतिक बनूं पाहात आहे. आपण विज्ञानावर फार मोठी भिस्त ठेवली परंतु त्या विज्ञानांतून जन्माला आलेलें राक्षसी बालक आपल्याच मुळावर उठल्याचें आपण पाहात आहोंत. तांत्रिक क्षेत्रांतील विस्मयजनक प्रगतीमुळें माणसाला आपल्या अंतःप्रेरणांनुसार उदात्त हेतूंकडे लक्ष पुरविण्यास फुरसत मिळेल असें आपल्याला वाटलें होतें. परंतु तसें होण्याऐवजीं त्या प्रगतीमुळें आपण अधिकच गोंधळांत आणि आपत्तींत सांपडलों आहोंत. विमानें आणि वाहतुकीचीं इतर साधनें यामुळेंच जगाचा संकोच होत जाईल हा आपला सिद्धांत प्रत्यक्षांत मात्र व्यापारी निर्बंध, गोठवलेलें चलन, डॉलर टंचाई, स्थलांतलावर लादण्यांत येणारीं बंधनें, प्रचंड प्रमाणावरील औद्योगीकरणामुळें निर्माण झालेल्या वस्तु ह्यांमुळें परस्परसंबंधांतल्या अडथळ्यांची संख्या फुगत चालली आहे. आणि माणसें जवळ येण्याऐवजीं एकमेकांपासून दुरावत चाललीं आहेत. रेडिओ ही एक अद्‌भुतरम्य कल्पना वाटत होती ना? पण खाजगी व्यापारी सट्टेबाजीसाठीं त्याचा उपयोग करीत आहेत आणि सरकारें असत्य आणि विद्वेष पसरविण्यासाठीं तो राबवून घेत आहेत. मानवजातीच्या ज्ञानांत टेलिव्हिजनमुळें भर पडण्याऐवजीं मुलांचा घरचा अभ्यास करण्याचा किंवा पुस्तकें वाचण्याचा वेळ मात्र त्यांत खर्च होऊं लागला आहे. डॉ. निबूर यांनीं सुचविल्याप्रमाणें अण्वस्त्रांमुळें जसा आपल्या संस्कृतीला धोका निर्माण होतो तसाच तो या

टेलिव्हिजनमुळेंहि होत आहे. औद्योगिक मानवानें नवें सामर्थ्य प्राप्त करून घेतलें आहे हें जरी खरें असलें तरी त्या सामर्थ्याचा उपयोग कसा करावा तें मात्र तो अद्यापपर्यंत नीटसा शिकूं शकलेला नाहीं.

मानवाची ही जी पिछेहाट झाली किंवा त्याचा भ्रमनिरास झाला त्याला अर्थात् अमेरिकाच सर्वस्वीं जबाबदार आहे असें नाहीं. औद्योगीकरणासंबंधींच्या या चुका सर्वच पाश्चात्य राष्ट्रांकडून झालेल्या आहेत; आणि पौर्वात्य देशांतील दारिद्य आणि विकारवशता यांची त्याला जोड मिळालेली आहे. परंतु 'औद्योगिक मानवा'च्या कल्पनेचें जनकत्व मुख्यत्वेंकरून आपल्याकडेच येतें हें नाकरतां येणार नाहीं. ही कल्पना प्रत्यक्षांत उतरल्यामुळें आपल्याइतकी सुबत्ता इतर कोणत्याहि देशांत निर्माण झाली नाहीं. त्याचप्रमाणें जनतेला आपल्याइतकीं भरमसाठ आश्वासनेंहि इततत्र कोठें देण्यांत आलीं नाहींत. त्यामुळें या सर्व चुका निस्तरून जनतेच्या मनांत निर्माण झालेली भीति आणि संदेह दूर करण्याची जबाबदारी आपल्याला अंगाबाहेर टाकतां येणार नाहीं. त्याचबरोबर तांत्रिक विकासामागें असलेला शांतता आणि मानवी प्रगति साधण्याचा आपला मूळ उद्देश कसा साध्य करतां येईल तेंहि दाखवून दिलें पाहिजे. खरें म्हणजे आपला हेतु प्रथमपासून तोच आहे. परंतु सुखवादाच्या आहारीं गेल्यामुळें आपलें हें उदिष्ट जरा मागें पडलें आहे. कारण त्या सुखवादामुळें स्वार्थसाधूपणा, राष्ट्रवाद आणि भीतिग्रस्तता आपल्या बोकांडीं बसलीं आहेत. तात्त्विक प्रगल्भता प्राप्त न झाल्यामुळें माणसाला आपल्या मनांतील सद्भाव आचरणांत आणतां येत नाहींत, त्यामुळें त्याची जी अवस्था होते तीच आज अमेरिकेच्या शोकांतिकेच्या रूपानें आपल्यापुढें उभी आहे.

* * *

## ७ : : संदेह विश्लेषण

इ. स. १९०० च्या दहा वीस वर्षें आगेंमागें नजर टाकली तर आपल्याला असें आढळून येईल कीं, तो काळ शांततापूर्ण होता. परंतु त्या आधीच्या युगांतहि कितीतरी अनिष्ट, इतकेंच नव्हे तर लज्जास्पद अशाहि गोष्टी असलेल्या आपल्याला दिसून येतील. परंतु त्याचबरोबर आपल्या हेंही

लक्षांत येईल कीं, त्या काळांत सर्वत्र एक प्रकारचें बुद्धिप्रामाण्य आढळून येत होतें. अन्याय्य, संकुचित आणि पूर्वग्रहदूषित अशा घटनांमागेंदेखील ही बुद्धिवादी दृष्टि दिसून येत होती. पूर्वग्रहदेखील विशिष्ट कारणपरंपरेंतून निर्माण झालेले होते व त्यामुळेंच लोकांना मोठा आत्मविश्वास वाटे. पण आज मात्र त्या आत्मविश्वासाचा सगळीकडे अभाव दिसत आहे. व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीच्या अखेरच्या काळांत वसत असलेल्या औचित्य भावनेची आणि सुव्यवस्थेची आजच्या पिढीला नुसती कल्पनादेखील करतां येणार नाहीं. बऱ्याच गाजावाजानें जो अमेरिकेचा प्रयोग चालला होता त्याची ही भक्कम आणि भरीव पार्श्वभूमि होती. त्या काळीं नीतिमत्तेचे कांहीं संकेत ठरलेले होते. त्या संकेतांचें–सहज नाहीं पण–पुष्कळ वेळां उल्लंघन होत असे. परंतु " चांगलें " काय आणि " वाईट " काय ह्याबद्दल कोणाच्याहि मनांत कसला संदेह नसे. आपण असें म्हणतों कीं, विसाव्या शतकाची सुरवात अत्यंत आशावादी वातावरणांत झाली. परंतु त्या वातावरणाचा विचार या बुद्धिवादी पार्श्वभूमीवर केला तर आपल्याला असें आढळून येईल कीं, त्यावेळीं माणसांना आपण सत्यासत्याची निवड करूं शकतों असें निदान वाटत तरी होतें.

पण व्हिक्टोरिया राणीच्या काळचे ते दिवस आतां राहिलेले नाहींत. आपला आतां संपूर्ण भ्रमनिरास झाला आहे. मनुष्यप्राणी हा बुद्धिप्रामाण्यवादी असतोच असें नाहीं हें आपल्याला कळून चुकलें आहे. आपल्या काळांत घडून आलेलीं युद्धें आणि राजकीय उलथापालथी, द्वेष, असत्य आणि विध्वंस या सर्वांतून आपण हा धडा शिकलों आहोंत. माणसाच्या बुद्धिप्रामाण्यावरचा विश्वास उडाल्यामुळें आपला आत्मविश्वास नष्ट झाला आहे. व्हिक्टोरियन युगांतील माणसेंहि एक प्रकारच्या आंतरअंधकारांतच वावरत होतीं. परंतु त्यांच्या त्या अज्ञानावर आपण बुद्धिवादी आहोंत अशा समजुतीचें कवच होतें, त्यामुळें त्यांचें तें अज्ञान झांकलें जात असे. आपण मात्र त्याबाबतींत उघडे पडलों आहोंत.

आंतर-जगासंबंधींच्या आपल्या अज्ञानामुळें, आपण शंकेखोर बनत चाललों आहोंत. ' औद्योगिक मानव ' हा संशयात्मा बनला आहे आणि त्या संशयाच्या फेऱ्यांत आपण इतके गुरफटून गेलों आहोंत कीं, तो एक स्थायी-

भावच बनला आहे व त्यामुळें कित्येक वेळां त्याचें अस्तित्वहि आपल्या लक्षांत येईनासें झालें आहे.

या संदेहावस्थेचा एक परिणाम असा झाला आहे कीं, मानवी जीवनाकडे बघण्याचा आपला सारा दृष्टिकोनच पार बदलून गेला आहे. मानसिक विकृति झालेल्या कांहीं रोग्यांच्या बोलण्यांत आणि प्रत्यक्ष वागण्यांत फार विसंगति आढळून येते. आपल्या शत्रूकडून प्रसृत केलीं जाणारीं असत्यें किंवा केला जाणारा विपर्यास–अर्थात् हें सर्व जाणून बुजूनच केलेलें असतें–जरी क्षणभर बाजूस ठेवला तरी आपल्या उक्ति आणि कृति यांच्यांत आजकाल अशीच विसंगति दिसून येते. व्हिक्टोरियाच्या काळांत राष्ट्रीय धोरण म्हणून कांहीं असे. आज स्वतंत्र जगांत मात्र राष्ट्रीय धोरण म्हणून जवळ जवळ कांहीं अस्तित्वांतच राहिलेलें नाहीं. भावी काळावर दृष्टि ठेवून विचारपूर्वक धोरण ठरविण्याऐवजीं आतां वारा येईल तशी पाठ फिरविली जाते. माणसें बोलतात काय आणि करतात काय यांत कसलाच मेळ राहिलेला नाहीं.

आपल्या काळांतील या विसंगतीचा छडा लावणें हा एक विषयच होऊन बसेल. परंतु त्याचे परिणाम किती दूरगामी स्वरूपाचे झाले आहेत, त्याचा पडताळा पाहण्यासाठीं पाश्चात्य मुत्सद्देगिरीचा कळस समजल्या जाणाऱ्या ॲटलांटिक सनदेचेंच उदाहरण घेऊं. मॅग्नाचार्टा ( मानवी हक्कांची सनद ) आणि मानवी इतिहासांतील इतर तत्सम घटना यांच्याइतकेंच यालाहि महत्त्व आहे हें दाखविण्यासाठीं जाणूनबुजूनच या मसुद्याला ‘ ॲटलांटिक सनद ’ असें संबोधण्यांत आलें. प्रदेशाच्या सीमा बदलण्यास, स्वायत्त शासन संस्थेचे सार्वभौम अधिकार “ जगांतील कच्चा माल आणि व्यापार यांबाबत सर्वांना सारखी मुभा ” “ सामाजिक सुरक्षितता; आर्थिक देवाण घेवाण आणि उच्च वेतनश्रेणी प्राप्त करून घेण्यासाठीं जगांतील सर्व राष्ट्रांत जास्तींत जास्त आर्थिक सहकार्य ” “ भीति आणि सर्व प्रकारची ददात यांपासून मुक्तता, ” “ समुद्र संचाराचें स्वातंत्र्य ” आणि “ व्यावहारिक अथवा अध्यात्मिक अशा कोणत्याहि कारणासाठीं शस्त्रबळाचा वापर न करणें ” अशासारखी अगडबंब शब्द योजना त्या सनदेंत करण्यांत आली आहे. सनदेंत निर्दिष्ट करण्यांत आलेल्या या उच्च ध्येयांसंबंधीं सहसा कोणाचाच मतभेद असूं शकणार नाहीं. परंतु त्यांत जीं आश्वासनें देण्यांत आलीं आहेत किंवा ज्या

आशा निर्माण करण्यांत आल्या आहेत त्यांची पूर्ति करण्याची कुवत खरोखरीं आपल्यांत आहे किंवा नाहीं याचा ती सनद तयार करणारांनीं कितपत गंभीरपणानें विचार केला होता हा विचारण्यासारखा प्रश्न आहे. अशी सनद तयार करणें न करणें हा खुशीचा प्रश्न होता. अशा व्यापक आणि समावेशक धोरणाची घोषणा करायला हवीच होती, अशी परिस्थिति नव्हती. ‘युद्धहेतूंची’ जाहीर घोषणा केली तर दोस्त राष्ट्रांची बाजू बळकट होईल, आणि श्री. रूझवेल्ट यांनीं अमेरिकेच्या गळीं उतरविलेल्या उधार-उसनवारीच्या धोरणाचा अवलंब करणें सुलभ जाईल अशी भावना मात्र त्यामागें निश्चितच होती. परंतु त्या उद्दिष्टांपैकीं एकहि उद्दिष्ट म्हणण्यासारखें सफल झालेलें नाहीं हें एक ऐतिहासिक सत्य आहे. आणि त्या विफलतेमधून सबंध जगांत जी मनोवृत्ति निर्माण झाली आहे ती कम्युनिस्टांचें आक्रमण वाढविण्यास फार मोठ्या प्रमाणांत कारणीभूत झाली आहे.

ह्या बाबतींत पोलंडचेंच उदाहरण घेऊं या. पोलंडमधील घटनांचा दोष कोणाकडे जातो ? ह्या प्रकरणाचा दोष कोणाकडे जातो, विशेषतः त्याला इंग्लंड अधिक जबाबदार आहे कीं अमेरिका, याच्याशीं या ठिकाणीं आपल्याला कांहीं कर्तव्य नाहीं. दोष कोणाचाहि असो, पोलंडचा विश्वासघात करण्यांत आला असाच निर्वाळा इतिहास देत राहील. परंतु ह्या विश्वासघाताचें वैशिष्ट्य असें आहे कीं, तो कोणी जाणून बुजून केला नाहीं. त्यासाठीं मुद्दाम कोणी कारस्थान केलें असेंहि नाहीं. अगदीं खोटी वाटावी इतकी त्यावेळीं सनद अस्तित्वांत आलेली नव्हती. विश्वासघात कसा, केव्हां झाला हें सांगावयाचें झालें तर असें म्हणतां येईल कीं, तो प्रत्यक्ष युद्धाच्या घटना घडण्यापूर्वीं, जेव्हां पोलंडला अत्यंत अवास्तव-खोटें वाटण्याइतकें अवास्तव-असें मदतीचें आश्वासन देण्यांत आलें तेव्हांच झाला. “ज्यांचे सार्वभौम आणि स्वयंनिर्णयाचे अधिकार जबरदस्तीनें हिरावून घेतले असतील त्यांना ते परत मिळवून देण्याची” ॲटलांटिक सनदेची हमी होती. हिटलरच्या टांचेखालीं चिरडले गेलेले किंवा नाझी सैन्यानें पादाक्रांत केलेल्या देशांतून परागंदा झालेले जे लोक होते त्यांपैकीं पोलंडमधील जनतेला ॲटलांटिक सनदेंतील आश्वासनांची पूर्ति करण्याबाबत अग्रहक्क मिळावयास हवा होता. कारण ‘युद्धहेतूंचें’ पोलंड हें एक चालतें बोलतें उदाहरण होतें. जर्मन

ब्लिड्झक्रिगच्या पहिल्या हल्ल्याला पोलिश जनतेनें ज्या अतुल धैर्यानें तोंड दिलें त्यामुळें पोलंडच्या स्वातंत्र्याबद्दलचा जनतेमधला उत्साह खूप वाढला होता. मोलोटोव्ह-रिबेनट्रॉब करारानंतर रशियाची जर्मनीबरोबर नव्यानें दोस्ती झाली व पूर्वेकडून रशियाचा पोलंडवर हल्ला झाला तेव्हांहि पोलंडनें आपला प्रतिकार चालूच ठेवला. त्यासाठीं मानवी रक्त आणि अश्रु यांची जबर किंमतहि त्यांनीं मोठ्या धैर्यानें दिली.

पोलंडची बाजू न्यायाची व समर्थनीय आहे, याची चार्चिल व रूझवेल्ट या दोघांनाहि पूर्ण जाणीव होती. तरीहि ॲटलांटिक बैठकीच्या थोड्याच दिवस आधीं म्हणजे ३१ जुलै १९४१ रोजीं ब्रिटिश सरकारनें त्यावेळच्या निर्वासित पोलीश सरकारवर सिकोर्स्की मायस्की करारावर सही करण्यासाठीं कमालीचें दडपण आणलें. त्या करारान्वयें पोलंड व सोव्हिएट रशिया यांमधील राजनैतिक संबंध पुन्हा प्रस्थापित करण्यांत आले. परंतु त्या दोन देशांच्या सरहद्दी निश्चित झाल्या पाहिजेत अशी पोलंडची आग्रहाची मागणी असतांना त्या मात्र निश्चित करण्यांत आल्या नाहीत. असला करार झाल्यानंतरहि ॲटलांटिक सनदेंत नमूद करण्यांत आलेल्या आश्वासनांना संमति देण्यांत कोणाला कांहीं गैर वाटलें नाहीं. आणि पोलीश जनतेलाहि त्यामुळें मोठा दिलासा वाटला. परंतु वरून निर्धास्त वाटत असलें तरी मनांतून मात्र ती अस्वस्थच झाली होती. आणि पुढें घडलेल्या घटनांवरून ती अस्वस्थता कशी वाजवी होती त्याचें प्रत्यंतर पहावयास मिळालें. स्टालीननें पुढें असा आग्रह धरण्याला आरंभ केला कीं, पोलंडची सरहद्द कर्झन रेषेच्या अनुरोधानें निश्चित करण्यांत यावी. पोलीश लोकांना तिरस्करणीय वाटत असलेल्या मोलोटोव्ह-रिबेंट्रॉब करारांत जवळ जवळ तीच सरहद्द ठरविण्यांत आली होती. १९३९ सालीं या रेषेपर्यंतच्या भागाचा पोलंडचा लचका तोडण्यांत आला होता. पोलंडच्या प्रादेशिक सलगतेचें हें सरळ सरळ उल्लंघन होतें ही गोष्ट सगळ्यांना मान्य होती. परंतु प्रथम इंग्लंडनें आणि आणि नंतर अमेरिकेनें स्टालिनच्या या दडपणापुढें मान तुकविली. कारण तसें न केलें तर स्टालीन जर्मनीबरोबर स्वतंत्रपणें शांततेचा तह करील अशी धास्ती त्यांना वाटत होती. १९४३ च्या डिसेंबरांत तेहरान येथें स्टालीनबरोबर प्रत्यक्ष करार घडून आला असावा असें दिसतें. त्या गुप्त करारान्वयें

कर्झन रेषेला मान्यता देण्यांत आली. इतकेंच नव्हे तर १९३९पर्यंत कधींहि रशियाच्या ताब्यांत नसलेलें ल्व्हॉव शहरहि त्यांना देऊन टाकण्यांत आलें. आणि विशेष म्हणजे पोलंडला न विचारतां परस्परच हें सगळें ठरवून टाकण्यांत आलें आणि शेवटीं माल्टा येथें दोस्त राष्ट्रांनीं आजपर्यंत त्यांच्या खांद्याला खांदा लावून शौर्यानें लढलेल्या पोलंडच्या निर्वासित सरकारची मान्यता काढून घेऊन त्याऐवजीं स्टालीननें उभ्या केलेल्या नामधारी सरकारला मान्यता दिली; आणि अशा रीतीनें स्टालीनपुढें पत्करलेल्या शरणागतीवर शिक्कामोर्तब केलें.

परंतु हें सर्व करीत असतांना मनोविकृति झालेल्या रोग्यासारखीच त्यांची अवस्था झाली होती. त्यांच्या कृतींत आणि उक्तींत जी भयानक विसंगति दिसत होती त्याचें त्यांना भानच नव्हतें, त्यामुळेंच पोलंडशीं अशा तऱ्हेनें दगलबाजी करीत असतांना जगाला आणि विशेषतः पोलंडला ते असें भासवीत होते कीं, ते पोलंडला कधीहि दगा देणार नाहींत. तेहरानच्या गुप्त करारानंतर सहा महिन्यांनीं म्हणजे १९४४ च्या जून महिन्यांत पोलंडच्या निर्वासित सरकारचे मुख्य प्रधान स्टॅनीसस्लाव्ह मिकोलायचिक वॉशिंग्टनला गेले होते, त्यावेळीं अध्यक्ष रूझवेल्ट यांनीं त्यांचें मोठ्या उत्साहानें स्वागत केलें आणि त्यांना असें आश्वासन दिलें कीं, "तुम्हांला कांहीं काळजी करण्याचें कारण नाहीं. कारण स्टालीनला पोलंडचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याची इच्छा नाहीं, आणि तशी त्याची हिंमतहि नाहीं. अमेरिकेचें सरकार खंबीरपणें तुमच्या पाठीशीं उभें आहे हें तो ओळखून आहे. युद्धांतून बाहेर पडतांना पोलंडला कसलीहि झळ पोहोंचणार नाहीं याची मी हमी देतों," इतकेंच नव्हे तर त्या वर्षींच्या अध्यक्षीय निवडणुकीची प्रचारमोहीम चालू असतांना पोलीश वंशाच्या अमेरिकन नागरिकांच्या एका शिष्टमंडळाला रूझवेल्टनीं मुलाखत दिली. मुलाखतीच्या वेळीं त्यांच्या पाठीमागच्या भिंतीवर अविभक्त पोलंडचा नकाशा टांगलेला होता. मुलाखतीच्या वेळीं "शाश्वत शांततेचा एक आधारस्तंभ" म्हणून आपल्याला पोलंडबद्दल अत्यंत आस्था वाटत असल्याचेंहि त्यांनीं बोलून दाखविलें. रूझवेल्ट पोलंडची फाळणी होऊं देणार नाहींत असाच त्या शिष्टमंडळानें याचा अर्थ लावला. मग खुद्द रूझवेल्टना तो अभिप्रेत होता कीं नाहीं कोण जाणें! पण वस्तुतः

पोलंडची फाळणी अगोदरच होऊन चुकली होती. आणि अध्यक्षांच्या पाठी-मागें पोलंडचा जो नकाशा टांगला होतो तो नुसता देखावा होता.

१९३९ सालीं ज्या देशाच्या स्वायत्ततेसाठीं दुसऱ्या महायुद्धाची सुरुवात झाली त्याच देशाचा अखेर अॅटलांटिक सनदेनें उघड उघड विश्वासघात केला. वॉरसांतील स्टालीनच्या नामधारी सरकारला तारीख ४ जुलै १९४५ रोजीं अमेरिकेकडून औपचारिकरीत्या मान्यता देण्यांत येणार होती. परंतु त्या ऐतिहासिक दिवसाशीं पोलीश जनतेच्या भावना निगडित झालेल्या असल्यानें ती तारीख एक दिवसानें पुढें ढकलली गेली.

प्रस्तिस्पर्धी सरकारशीं अशाप्रकारें दुटप्पीपणानें वागणें मुत्सद्यांना भाग पडतें. मात्र तसें करतांना प्रत्यक्ष घटनांशीं संबंधित असलेल्या व्यक्तींना ज्यांची जाणीव नव्हती अशा गोष्टी गृहीत धराव्या लागतात. पोलंडच्या दुर्घटनेबद्दल विन्स्टन चार्चिल किंवा फ्रॅंकलीन रूझवेल्ट यांना जबाबदार धरणें म्हणजे वस्तुतः मुख्य प्रश्नाकडे दुर्लक्ष करण्यासारखें आहे. कारण खरोखरी असें घडावें अशी त्यांची मनापासून इच्छा नव्हती. परंतु दगडापेक्षां वीट मऊ या न्यायानेंच त्यांनीं त्या घटना पत्करल्या होत्या. या विश्वासघाताला एकटीदुकटी व्यक्ति जबाबदार नसून काळानें उगवलेला तो सूड आहे. विसाव्या शतकाच्या मध्यांतील पाश्चात्य संस्कृति आपली उक्ति आणि कृति यांत बुद्धिनिष्ठ सुसंगति राखण्याच्या कामीं असमर्थ ठरल्याकारणानें अशा तऱ्हेचीं प्रकरणें उद्भवलीं. त्याचप्रमाणें खंबीर धोरण अवलंबिण्याऐवजीं परिस्थितिनुरूप वागण्याचें धोरण ठेवलें गेल्यानेंच हा अनवस्था प्रसंग ओढवला. त्यांतच स्टालीनला "पोलंडचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याची इच्छा नाहीं अशी नसती आशा अमेरिकन अध्यक्षांनीं बाळगल्यामुळें तर त्याचें स्वरूप अधिकच गंभीर बनलें. सर्वसाधारण लोकांच्या स्वभावधर्माप्रमाणें अध्यक्ष रूझवेल्ट यांनादेखील जागतिक प्रश्नाचें वास्तव स्वरूप आकलन झालें नव्हतें.

अॅटलांटिक सनद प्रसिद्ध झाली त्यावेळीं बहुतेक सर्व अमेरिकनांनीं तिचें स्वागत केलें. परंतु अद्यापपर्यंत एकदांहि तिची अंमलबजावणी आपल्या हातून झालेली नाहीं. पोलंड, बाल्टिक आणि बाल्कन राष्ट्रें, त्याचप्रमाणें चेकोस्लोव्हाकिया, चीन, मांचुरिया किंवा कोरिया (या कोरीयाची आपण

उगीचच मूर्खासारखी एक रेषा आंखून विभागणी करतों.) यांच्या विश्वासघाताचाच केवळ हा प्रश्न आहे असें नाहीं. सनदेंत अंतर्भूत केलेलीं जवळजवळ सर्व तत्त्वें पायदळीं तुडविलीं गेलीं आहेत. "जगांतील कच्चा माल आणि व्यापार यांबाबत सर्वांना सारखी मुभा" मिळावी या ध्येयाचा पाश्चात्य लोकांनीं केवढ्या हिरीरीनें पाठपुरावा केला होता. परंतु ज्या भागांत त्यांचें वर्चस्व आहे तेथेंदेखील ते त्याची अंमलबजावणी करूं शकले नाहींत. युरोप खंडांतील कोळशांचें आणि पोलादांच्या साधनांचें आंतरराष्ट्रीयीकरण करून या दिशेनें त्यानीं एक फार महत्त्वाचें पाऊल टाकलें. परंतु त्याचे निश्चित परिणाम अजूनहि कळलेले नाहींत. युरोपांत व्यापारी निर्बंधांचें जाळें अजून सर्वत्र पसरलें आहे आणि अमेरिकेविषयं. बोलावयाचें तर, "सर्व राष्ट्रांमधील आर्थिक सहकार्य" हें प्रत्यक्ष आर्थिक जीवनापासून इतकें दूर आहे कीं, हें सहकार्य थोपविण्यासाठीं म्हणून अमेरिकेंतल्या प्रत्येक संस्थानावर जकातविषयक निर्बंध कायम ठेवण्यासाठीं कमालीचें दडपण आणलें जात आहे. ॲटलांटिक सनदेंत दिलेलीं आश्वासनें म्हणजे नुसता वरवरचा मुलामा ठरला असून कोणतेंहि राष्ट्र त्यावर विसंबून राहण्याचें धाडस करणार नाहीं. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी कीं, त्या पोकळ आश्वासनांचादेखील आम्हांला अभिमान वाटतो. ॲटलांटिक सनदेचें हें प्रकरण इतिहासांतून पुसून टाकावें असें क्वचितच कोणी म्हणेल. ॲटलांटिक सनदेंत ग्रथित करण्यांत आलेलीं उच्च तत्त्वें हीं नुसतीं चांगल्या हेतूंचीं निदर्शक आहेत, पण वस्तुस्थितीशीं त्यांची सांगड घातली गेली पाहिजे असें कोणालाच वाटत नाहीं आणि हा चांगल्या हेतूंनीं मळविलेला मार्गच कदाचित् नरकाकडे जाईल ह्याची कोणाला जाणीव नाहीं.

* * *

## ८ : : शब्दावडंबर

थोडक्यांत सांगायचें तर, आपल्या काळाचा इतिहास म्हणजे नुसतें शब्दावडंबर आहे आहे. अगडबंब वाक्‌प्रचार रूढ होतात, त्यांना फार मोठमोठे

अर्थ प्राप्त होतात; पण लगेच ते लुप्तहि होऊन जातात. " मृत्यूचे व्यापारी ", " अमुक संपत्तीचे अपकारकर्ते ", " मिरासदारी " किंवा " ठेकेदारी ", " प्रतिगामी ", " उदारमतवादी ", " श्रमशक्ति ", " प्रथम अमेरिका " " पैसा टाका माल उचला ", " बिनशर्त शरणागती ", " याची देहीं याची डोळा शांतता ", " सामुदायिक सुरक्षितता ", " सैन्य परत बोलवा ", " निशस्त्रीकरण ", " लाल संकट ", " सुप्त अणुशक्ति " इ० इ० हे सर्व त्या शब्दावडंबराचे नमुने आहेत. ज्या वेळीं हीं चलतीं नाणीं रूढ झालीं त्या वेळीं तीं खणकन वाजवून पाहण्याची हिंमत फारच थोडयांना झाली आणि तशीं साधनेंहि फार करून कोणापाशीं नव्हतीं. हळूंहळूं ह्या शब्दप्रयोगांना फार मोठी प्रतिष्ठा प्राप्त होते. त्यांच्या जोरावर अनेकांचा नाश केला जातो तर कांहींना वर चढवलें जातें. कांहीं जणांना युद्धास प्रवृत्त केलें जातें, युद्धें पुकारलीं जातात; आणि लोकांना त्यांच्या घरांगांवांपासून हुसकून लावण्यांत येतें. इतका सगळा अनर्थ माजविल्यानंतर अचानक तो शब्दप्रयोग अर्थ-शून्य बनून लुप्त होऊन जातो. त्याचें नांवनिशाणहि न राहतां नेमका त्याच्या उलट अर्थ असलेला नवा शब्दप्रयोग रूढ होतो. शब्दांचा हा उपयोग भयानक असला तरी तो कां व कसा केला जातो तें मात्र बहुधा कोणाच्याच ध्यानांत येत नाहीं. त्या शब्दांमुळें मानवी रक्ताचे आणि अश्रूंचे पाट वाहवले जातात, म्हणूनच केवळ ते भयानक आहेत असें नाहीं तर त्यामुळें अत्यंत कठीण अशा समस्या निर्माण होऊन बसतात. सत्य ही अशीच एक त्यांतून निर्माण झालेली समस्या आहे. या सर्व शब्दजंजाळांत सत्य कोठें आहे ? किंवा सत्य अशी कांहीं चीज तरी अस्तित्वांत आहे का ?

आपल्या पूर्वजांच्या मानसिक शक्तीबद्दलच्या कल्पना अशास्त्रीय व अंध-श्रद्धाळू अशा असल्यानें त्याबद्दल कींव केली पाहिजे असें आजकाल शिकविलें जातें. प्रचलित ज्ञानाच्या आधारें म्हणजेच बाह्य जगाच्या दृष्टीकोनांतून स्वतः विचार करावयास शिकावें म्हणून उत्तेजन दिलें जातें. परंतु सत्य परिस्थिति अशी आहे कीं, ज्या शास्त्रांचें कार्यक्षेत्र आपण कितीहि प्रौढी मारली तरी बाह्य जगापुरतेंच मर्यादित आहे; तीं माणसाला भौतिक घटनांच्या चक्रव्यूहांत नेऊन सोडतात. पण ह्या घटनांचा खरा अर्थ काय, मानवाच्या दृष्टीनें खरा अर्थ काय, ह्याचें मार्गदर्शन तीं करीत नाहींत. आपल्याला असें सांगितलें

जातें कीं, वास्तव घटनांमुळें कांहीं सत्तांना बळकटी येते. परंतु कोणतेंहि मत सर्व घटना लक्षांत घेऊन थोडेंच बनविलें जातें ? जगांत असा कोण आहे कीं, ज्याला सर्वच्या सर्व घटना ज्ञात आहेत ? मग हीं मतें कशावर आधारलेलीं आहेत ? फारच थोडे लोक ह्या प्रश्नाचें उत्तर शोधण्याचा प्रयत्न करतात. आणि जे करतात त्यांनाहि त्या उत्तराची मनोमन भीति वाटते. मतें हीं अखेर मतेंच ठरतात. कोणी कांहीहि मतें बाळगूं शकतो आणि त्याच्या पुष्ट्यर्थ भराभर घटनांचे दाखले गोळा करूं शकतो. कारण जगांत हरघडी हजारों घटना घडत असतात. परंतु यांपैकीं कांहीं मतें नाना भावनांचीं उगमस्थानें बनून जगांत मोठा धुडगूस घालतात, ही सर्वांत भयानक अशी गोष्ट आहे. उक्ति आणि कृति यांतील तफावतीमुळें विशिष्ट परिणाम घडून येतात. ते म्हणजे लोकप्रिय वाक्प्रचारांच्या रूपानें शब्दांना असें कांहीं विचित्र आणि असुरी स्वरूप प्राप्त होतें कीं, त्याविरुद्ध कोणीं कितीहि युक्तिवाद केला तरी त्याची मात्रा चालत नाहीं.

अशातऱ्हेनें मनांत घर करणाऱ्या शंकाकुशंकांमुळें भीति उत्पन्न होते. आपल्या आजच्या काळांत या भीतीचीच छाया सर्वत्र पसरली असून आपल्या निर्णयामधून देखील ती डोकावत असते. ही भीति असते कशाची ? आर्थिक व्यवस्था कोसळेल, मंदी येईल, दुर्भिक्ष ओढवेल किंवा उपास-मारीनें मरावें लागेल अशी एकसारखी भीति वाटत असते. त्याशिवाय कामगार, भांडवलदार, सरकार यांचेंहि भयच वाटत असतें. रशियाची जशी भीति आहे तशी अमेरिकेचीहि आहे. परंतु या सर्वांवर कडी म्हणजे पाश्चात्यांना पौर्वात्यांची व पौर्वात्यांना पाश्चात्यांची वाटणारी भीति ही होय. विसाव्या शतकाच्या मध्यांतील संस्कृतीचा भय हा स्थायीभाव झाला आहे. अमुक एका विशिष्ट संकटाच्या धास्तीमुळें माणसाला भीतीनें ग्रासलें आहे असें नव्हे, तर त्याच्या मनांत निर्माण झालेल्या शंकांमुळें त्याला एवढें समजून चुकलें आहे कीं, आपल्याला प्राप्त झालेलें ज्ञान आपल्या समोरील संकटांचा परिहार करण्यास पुरें पडूं शकणार नाहीं आणि तेंच त्याच्या भीतीचें खरें उगमस्थान आहे. सभोंवतालीं बहुधा सगळीं संकटेंच पसरलेलीं आहेत असें तो मानीत असतो. कारण मतामतांच्या गलबल्यांत तो इतका भांबावून गेलेला असतो कीं, आपल्या स्वतःच्या मतावरदेखील

तो निर्धास्तपणें विश्वास टाकूं शकत नाहीं. त्याला एवढेंच ठाऊक असतें कीं, कोणाचें मत कोणत्या वेळीं प्रभावी ठरेल आणि अजिंक्य होऊन बसेल त्याचा नेम सांगवत नाहीं. तें एखादेवेळीं अल्पसंख्याकांवर उलटेल, किंवा असा एखादा ग्रह पसरवून देईल कीं, त्याच्याविरुद्ध कोणाला ब्रदेखील उच्चारण्याची हिंमत होणार नाहीं, किंवा कामगार संघटनांना, निष्कारण संपांना प्रवृत्त करील. किंवा अचानकपणें एखाद्या फॅशनच्या रूपानें प्रकट होईल, आणि स्त्रियांच्या त्यावेळच्या वेशभूषा एकदम जुनाट ठरवून टाकील. तें कसेंहि असो. निरनिराळ्या प्रतिपादनामुळें ही मूढ आणि अविवेकनिष्ठ शक्ति एकदां का मोकाट सुटून फोफावूं लागली म्हणजे तिला आवरणें अशक्य होऊन सतें. परंतु याहीपेक्षां अधिक चिंतेची बाब कोणती असेल तर ती म्हणजे एवढ्या भावनावेगानें मांडण्यांत येणाऱ्या मतांपैकीं चूक कोणतें आणि बरोबर कोणतें तें सांगणें कठीण झालें आहे. या मतामतांतून चांगलें वाईट पारखून पाठिंबा कोणाला द्यावयाचा आणि विरोध कोणाला करावयाचा तें कळेनासें होऊन गेलें आहे. स्वतःच्या स्वतःला कांहीं निर्णय घेतां येईनासा होतो आणि अशा तऱ्हेनें मति कुंठित झाली म्हणजे मग पुन्हां भय वाटूं लागतें.

आशावाद्यांनीं प्रतिपादलेल्या सिद्धातांनीं आपली ही अशी गत केली आहे. त्या आशावादांत भरपूर आश्वासनें होतीं. तसेंच त्यांतून नवीं नवीं साहसें करण्यास प्रोत्साहनही मिळत असे. पण त्यांत माणससंबंधींच्या ज्ञानाचा मात्र अभाव होता. या ना त्या कारणामुळें प्रत्येक अमेरिकन मनुष्य आशावादी तत्त्वज्ञानांत मग्न झाल्याकारणानें, तसेंच शाळांतून मिळणारें शिक्षण किंवा भोंवतालची सर्व परिस्थिति हीही त्याच प्रकारची असल्यामुळें अमेरिकेचा आतां चांगलाच अपेक्षाभंग होऊं लागला आहे. आजवर अशा प्रकारचा अपेक्षाभंग अमेरिकेला कधींहि सहन करावा लागला नसेल. पहिल्या जागतिक युद्धानंतरच्या भ्रमनिरासाभोंवतीं जें एक अद्‌भुतरम्यतेचें वलय होतें त्याचा मागमूसहि या भ्रमनिरासाच्या बाबतींत आढळत नाहीं. खरें म्हणजे या भ्रमनिरासाबद्दल फारसें कांहीं लिहीलें जात नाहीं. कारण त्याचें विश्लेषणच कोणाला नीटसें करतां येत नाहीं. पण त्याची जबरदस्त धास्ती मात्र सर्वांच्या मनांत बसलेली आहे. आणि कां कोणास ठाऊक, पण

त्यामुळें आपला विनाश ओढवणार आहे अशी सर्वांची भावना झालेली आहे. आपलीं राजकीय वक्तृत्वें व आपलीं वृत्तपत्रें यांमधून त्याचेच पडसाद उमटत असतात, इतकेंच नव्हे तर आपल्या विचारसरणीवरहि त्याचीच छाया पडलेली आहे. आपली पूर्वींची ती आशावादी मनोवृत्ति लोप पावली असून आपल्या साऱ्या आशाआकांक्षांचा चक्काचूर होऊन गेला आहे. "मानवाची प्रतिष्ठा", "मानवी बंधुभाव", "व्यक्तीचें पावित्र्य", "शासितांची संमति", "स्वातंत्र्य वा मरण", "चार स्वातंत्र्यें" यांसारख्या एकाकाळीं अत्यंत आकर्षक वाटणाऱ्या घोषणांतच आपण घोंटाळत राहतों आहों. त्या जुन्या मशाली हवेंत हालविल्या म्हणजे जराशा उजळतात हें खरें, पण त्यांच्या पलीकडचा अंधार आपल्याला सतत दिसतच असतो. पुन्हां पुन्हां वापरल्या गेलेल्या ह्या मशाली केव्हांतरी एकदम विझून जातील हें आपल्याला माहीत आहे. आणि तसें झालें तर हैड्रोजन बॉंबच्या प्रकाशाखेरीज दुसरा कोणताही प्रकाश आपल्याला लाभणार नाहीं हेंहि आपल्याला ठाऊक आहे.

१०२९०
बराज ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ७३८३३ वि: निबंध
क्रमांक ९६८७० नों. दि. २३।६९

# भौतिकतावादाचा विस्तार

## १ : विज्ञान आणि मूलविज्ञान

सत्याला विकृत स्वरूप कसें देण्यांत येत आहे आणि तें देणारांचा पगडा अमेरिकेच्या डोळ्यांदेखत सगळ्या जगावर कसा बसण्याचा संभव आहे तें आपण येथवर पाहिलें. त्याचप्रमाणें आशावादाच्या मागें लागल्यामुळें आज अमेरिकेच्या पदरीं विफलता कशी आली आहे आणि आपल्या सत्प्रवृत्तीला अनुसरून जगाचीं जीं चित्रें ती रंगवीत होती त्यापेक्षां अगदीं निराळें स्वरूप आज त्याला कसें प्राप्त झालें आहे त्याचेंहि विवेचन वर आलें आहे. आपण आतांपर्यंत 'विरोधविकासवादी मानव' म्हणून ज्याचा निर्देश करीत होतों त्या आपल्या शत्रूविषयीं विस्तृत ऊहापोह आतां आपल्याला करतां येईल.

आजकालचा विद्यार्थी 'डायलेक्टिक्स् ऑफ नेचर' या पुस्तकाला फ्रेड्रीक एंगल्सनें लिहिलेला उपोद्घात वाचूं लागेल तर त्यांत त्याला परकीय असें कांहीं आढळणार नाहीं. अत्यंत आकर्षक शैलींत लिहिलेला गद्याचा एक नमुनाच आपण वाचीत आहोंत असें त्याला वाटेल. जे. बी. एस. हाल्डेन-सारख्या विख्यात ब्रिटिश शास्त्रज्ञानें त्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली आहे. एंगेल्सच्या ह्या उपोद्घातांत निसर्गासंबंधीं थोडक्यांत परंतु अत्यंत हृद्य भाषेंत जें शास्त्रीय विवेचन केलेलें आहे त्याचा विसाव्या शतकांतील जवळ जवळ सर्वच विचारप्रणालींवर फार मोठा पगडा बसला आहे. हें पुस्तक मुख्यतः टिपणींच्या स्वरूपाचेंच असून त्यांत शास्त्रीय सिद्धांतांच्या बाबतींत अनेक कालविसंगत विधानें केलेलीं आढळतात. अर्थात् त्याचें कारण असें आहे कीं, तें पुस्तक १८७० नंतरच्या दशकांत म्हणजे आपण सध्यां ज्याला आधुनिक विज्ञान म्हणतों त्याची सुरवात होण्यापूर्वीं लिहिलें गेलेलें आहे. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी कीं, आज "एखाद्या शाळकरी पोराला" देखील पाठ असलेले मानव आणि विश्व या संबंधीचे कांहीं सिद्धांत त्यांत अगदीं स्पष्टपणें मांडलेले आढळतात.

त्याचें अगदीं ठळक उदाहरण म्हणजे जगन्नियन्त्या परमेश्वराची कल्पना त्या पुस्तकांत अशास्त्रीय म्हणून धुडकावण्यांत आली आहे. अर्थात् अनेक पाश्चात्य विचारवंत इतर बाबतींत शास्त्रीय दृष्टिकोणाशीं सहमत असले तरी ईश्वराचें अस्तित्व इतक्या सहजासहजीं धुडकावून लावीत नाहींत हें खरें. त्यापैकीं कित्येकांची अजूनही खिस्ती धर्मावर निष्ठा आहे. दुसरे कांहीं स्वतःला जरी आस्तिक म्हणवीत नसले तरी ईश्वराचें अस्तित्व मान्य करणें तात्त्विक दृष्ट्या आवश्यक आहे असें मानतात. परंतु चर्चेसच्या बाहेर काय किंवा आंत, जगाच्या शास्त्रीय उपपत्तीशीं विरोधक होईल अशा रीतीनें ईश्वरासंबंधीची कल्पना मांडली जात नाहीं. आपलें जग हें "निसर्गक्रमानें" निर्माण झालें असून त्यांची संपूर्ण स्वाभाविक संगति लावून दाखवितां येईल किंवा एंगल्सचेच शब्द वापरावयाचे तर जगाच्या उत्पत्तीची भौतिकवादी कारणमीमांसा लावून दाखवितां येईल या सिद्धांताशीं सर्वसामान्य नागरिकांपासून तों तत्त्वज्ञ आणि शास्त्रज्ञ या सर्वांचेंच मतैक्य आहे.

विश्वांत फिरत असलेल्या बाष्परूप जडवस्तूपासूनच पुढें सूर्यमाला निर्माण झाली. जडवस्तूंच्या अंगभूत गतीमुळेंच हें घडून आलें, या कान्ट, लाप्लास आणि हर्शेल या तत्त्ववेत्त्यांनीं मांडलेल्या, सिद्धांतापासूनच एंगेल्सनें आपल्या प्रतिपादनाला सुरवात केली आहे. अर्थात् आतां हा सिद्धांत टाकाऊ ठरला आहे. परंतु ग्रहमालेच्या उत्पत्तीसंबंधीची अधुनिक उपपत्ति ही त्याच गृहीत कृत्यावर आधारलेली आहे. ती म्हणजे पृथ्वीची उत्पत्ति ही निसर्गजन्यच आहे. आणि यावरूनच भूगर्भ व तत्सम इतर शास्त्रांच्या आधारें प्रत्यक्ष पृथ्वी हीदेखील कालक्रमाला अनुसरून भौतिक किंवा नैसर्गिक शक्तीपासून निर्माण झालेली आहे हें दाखवून देणें एंगल्सला सहज शक्य झालें. त्यानंतर सेंद्रिय रसायनशास्त्राच्या आधारें हेंहि सिद्ध झालें कीं, विशिष्ट प्रमाणांतील तपमान आणि दमटपणा यांच्या संयोगामुळें जीव नांवाची ( भौतिक ) अवस्था निर्माण होते. अशा तऱ्हेनें जडवस्तूमधूनच जीव उत्पन्न झाला हें दाखवून देतां आलें.

"प्रथम पृथ्वीच्या पृष्ठभागावरील तपमान स्थिर होऊन अस्तित्वांत असलेल्या प्रोटीनमध्यें जीवधारणेची क्षमता निर्माण झाली व त्यांतच पुढें रासा-

यनिक अनुकूलतेची भर पडल्यावर अंतीं जीवतत्त्व निर्माण झालें." परंतु भौतिक प्रक्रिया येथेंच थांबत नाहीं. "यानंतरचा प्रगतीचा टप्पा गांठण्यास हजारों वर्षांचा काळ लोटावा लागला असेल, परंतु तो टप्पा म्हणजे प्रोटीनपासून कोणतेंहि विशिष्ट स्वरूप किंवा आकार नसलेल्या जीवपेशी निर्माण झाल्या हा होय. या जीवपेशींचाच पुढें शारीरिक विकास होत जाऊन त्यांतून सबंध सेंद्रिय सृष्टि निर्माण झाली." त्यानंतर एकपेशीमय जीवापासूनच पुढें "वनस्पति आणि प्राणीसृष्टि" असें स्थित्यंतर घडत गेलें. याची अखेरची अवस्था म्हणजे सस्तन प्राणी. या सस्तन प्राण्यांत मज्जासंस्थेची संपूर्ण वाढ झालेली असते. त्यांत देखील ज्याच्या ठिकाणीं निसर्गाला स्वतः संबंधींची जाणीव प्राप्त झाली आहे असा प्राणि म्हणजे—मनुष्य. जीवसृष्टीच्या विकासांतील ही सर्वांत प्रगत अवस्था होय.

एंगल्सनें ज्या गृहीत कृत्यांवरून हा सर्वपरिचित सिद्धांत बसविला त्याच्या खरेखोटेपणाची चर्चा याठिकाणीं करावयाची नसून हा सिद्धांत ज्या 'शास्त्रीय' दृष्टीकोणावर आधारलेला आहे त्याचाच विचार करावयाचा आहे. परंतु "शास्त्रीय" दृष्टिकोण शब्दप्रयोग अत्यंत संदिग्ध आहे. 'शास्त्रीय' दृष्टिकोण म्हणजे तरी काय? त्यानें कशाचा बोध होतो? शास्त्रीय विचारसरणी आणि अशास्त्रीय किंवा दुसरी एखादी विचारसरणी यांत फरक काय असतो? पुढील भागांत ज्यावेळीं आधुनिक जगाला आजचें स्वरूप प्राप्त करून देणाऱ्या निरनिराळ्या विचारप्रक्रियांचा ऊहापोह करूं त्यावेळीं या प्रश्नांची चर्चा थोड्याफार प्रमाणांत होणार आहे. परंतु 'शास्त्रीय' आणि 'तात्त्विक' ह्या दोन विचारसरणींतील मुख्य भेद कोणता याची चर्चा मात्र येथेंच केली पाहिजे.

या ठिकाणीं पहिल्याप्रथम एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं, शास्त्र हें मूलतः तात्त्विक नसून तांत्रिक आहे. एखाद्या विषयाचें शास्त्रीय ज्ञान आपल्याला केव्हां प्राप्त होतें? वस्तुनिष्ठ निरीक्षण, पृथक्करण, मूल्यमापन व नियंत्रित स्वरूपाचे प्रयोग इत्यादि मार्गांनीं त्या विषयाची छाननी केल्यानें तें ज्ञान आपल्याला प्राप्त होतें. या तंत्रामुळें तात्त्विक निष्कर्ष काढतां येतातच असें नाहीं किंवा त्यांतून तात्त्विक प्रश्न उपस्थित होतात असेंहि नाहीं. अगदीं काटेकोर भाषेंत बोलावयाचें तर मानव अगर निसर्ग यांसंबंधीं विज्ञानाला

तात्त्विक अशी भूमिका नाहीं. अणुपरमाणूंचा शोध लावतांना अणुशास्त्रज्ञाला वस्तुमात्राच्या स्वरूपाविषयींचा तात्त्विक काथ्याकूट करीत बसण्याचें कांहींच कारण पडत नाहीं. अर्थात् तसें करण्यास त्याला प्रत्यवाय असतो असें नाहीं. तो त्या वादांत शिरूं शकेल आणि तसें करतांना त्याला आपल्या शास्त्रीय ज्ञानाचा फायदाहि करून घेतां येईल. पण म्हणून शास्त्रीय ज्ञानालाच तात्त्विक ज्ञान असें मात्र म्हणतां येणार नाहीं. आणि तत्त्वज्ञानाची योग्य तयारी असल्याशिवाय त्या प्रांतांत शिरूं पाहणारा शास्त्रज्ञ, शास्त्रज्ञानाची तयारी असल्याशिवाय त्या प्रांतांत शिरूं पाहणाऱ्या तत्त्वज्ञाइतकाच "अडाणी" ठरण्याचा संभव आहे.

तथापि सृष्टवस्तुशास्त्रांचा तत्त्वज्ञानावर प्रत्यक्षाप्रत्यक्षपणें फार मोठा प्रभाव पडलेला आहे. आर्थर ऐडिंगटन् आणि बर्ट्रंड रसेल यांच्यासारख्या विख्यात विचारवंतांनीं मानवासंबंधीचे आपले निष्कर्ष काढण्यासाठीं विज्ञान आणि तत्त्वज्ञान या दोन्ही ज्ञानशाखांचा सारखाच उपयोग करून घेतला असल्याचें आढळून येतें. त्याचप्रमाणें इतर कांहीं तत्त्ववेत्त्यांनीं देखील विज्ञान आणि त्यांतील निरनिराळ्या पद्धति यांचा सखोल अभ्यास केला आहे. एका बाजूला तत्त्ववेत्ते आणि दुसऱ्या बाजूला शास्त्रज्ञ यांच्या विचारधनाचा फायदा घेऊन कांहीं सर्वसामान्य विचारवंत विज्ञानांतील निरनिराळ्या प्रमेयांचा स्वतःच्या मताप्रमाणें होणारा अर्थ जनतेपुढें मांडीत असतात. त्यापैकीं कांहीं प्रमेयें ( उदा. माणसाची उत्पत्ति माकडापासून झालेली आहे ) जनमनांत इतकीं दृढमूल होऊन जातात कीं, तीं मुळांत केवळ प्रमेयें आहेत हें जवळ जवळ कोणाच्या स्मरणांतच रहात नाहीं. याचा परिणाम असा होतो कीं, शास्त्रीय संशोधनावर आणि अनुमानावर आधारलेलीं कांहीं प्रमेयें विज्ञानाच्या कक्षा ओलांडून विज्ञान आणि वस्तुस्वरूप निर्णयशास्त्र या दोन्हींना सामावून घेणाऱ्या विचारचक्रांत शिरतात.

पण गंमत अशी कीं, विज्ञान आणि वस्तुस्वरूप निर्णयशास्त्र यांच्या दरम्यानचें हें विचारविश्व अद्यापपर्यंत अनामिकच राहिलेलें आहे. त्याला विशिष्ट अशी कोणतीहि संज्ञा नाहीं. त्याचा समावेश धड विज्ञानांतहि करतां येत नाहीं किंवा धड तत्त्वज्ञानांतहि करतां येत नाहीं. त्याचें स्वरूप संमिश्र असतें. परंतु त्याला योग्य अशी संज्ञा देतां येणार नाहीं असें मात्र नाहीं. ज्ञान म्हणजे

काय हें पाहणारें शास्त्र = प्रमाणशास्त्र ( Epistomology ) आणि वस्तुरूप शास्त्र ( Ontology ) या दोनहि शास्त्रांतून निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा साकल्यानें विचार करणारें जें शास्त्र तें वस्तुस्वरूप निर्णयशास्त्र ( Metaphysics ). वस्तुस्वरूप निर्णयशास्त्राच्या या व्याख्येमुळें वरील अनामिक विचारविश्वाचें नांव आपोआपच निश्चित होतें, तें म्हणजे विज्ञानार्थशास्त्र ( Metascience ) किंवा त्यालाच मूलविज्ञानशास्त्र असेंहि म्हणतां येईल. या मूलविज्ञानशास्त्राचें वैशिष्ट्य असें कीं, प्रमाणशास्त्र आणि वस्तुरूपशास्त्र या दोहींचाहि त्यांत आपल्याला विचार करावाच लागतो. एडिंगटन् आणि व्हाइटहेड् या विद्वानांच्या लिखाणावरून आपल्याला याची चांगली प्रतीति येईल. यावरून मूलविज्ञानशास्त्राची व्याख्या आपल्याला अशी करतां येईल कीं, शास्त्रीय संशोधन आणि अनुमानें यांवर आधारलेला तात्त्विक इमला म्हणजे मूलविज्ञानशास्त्र. प्रायोगिक विज्ञान आणि वस्तुस्वरूपनिर्णयशास्त्र या दोघांच्या संयोगांतून हें शास्त्र निर्माण होतें.

अर्थात् वस्तुस्वरूप निर्णयशास्त्राप्रमाणेंच मूलविज्ञानशास्त्राच्या बाबतींत निरनिराळ्या विचारप्रणाली प्रचलित आहेत. त्यापैकीं कांहींचा पाया भक्कम आहे, कांहींचा प्रभाव अधिक आहे तर कांहीं इतरांपेक्षां अधिक लोकप्रिय आहेत. या ठिकाणीं आपणांस त्यांतील फरकांकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं. खरोखरीचीं शास्त्रशुद्ध अनुमानें आणि मूलविज्ञानशास्त्रांतील प्रमेयें यांमधील भेद लक्षांत घेणें हेंच सर्वांत महत्त्वाचें आहे. सूर्य आणि ग्रहमंडळ हे आपल्या विश्वगोलाच्या मध्यस्थानीं नसून त्याच्या एका अगदीं टोकाशीं आहेत, असें एक शास्त्रीय प्रमेय आहे, त्याच्या पुष्ट्यर्थ अनेक पुरावे देण्यांत आले आहेत. सूर्यमालेच्या स्थानाप्रमाणेंच मानवी अस्तित्व हादेखील योगायोगाचा भाग आहे, हा निष्कर्ष शुद्ध शास्त्रीय विचारांत मोडत नाहीं तर त्याचा समावेश मूलविज्ञानशास्त्रांत करावा लागेल. ग्रहगोल हे विश्वमंडळाच्या एका टोंकाला असतात असा जो सिद्धांत आहे त्यावरून मूलविज्ञानशास्त्रज्ञ असें प्रतिपादन करतात कीं, ईश्वराचें सर्व लक्ष केवळ मानवावरच केंद्रित झालेलें आहे हें खरें नाहीं. आपल्या पूर्वजांची ती एक चुकीची समजूत होती. संबंध विश्वाच्या मानानें ग्रह किंवा मानव अत्यंत क्षुद्र आहेत, यावरूनहि वरील सिद्धांताला दुजोरा मिळतो असें ते सांगतात.

निराळ्या क्षेत्रांतील उदाहरण घ्यावयाचें तर विशिष्ट जन्मजात गुणधर्मांचें मूळ कांहीं पेशींत सांपडतें. तसेंच त्यांचें एक विशिष्ट स्थान निश्चित झालेलें असतें. यावरून हेंच दर्शविलें जातें कीं, माणसाच्या गुणधर्मांची उपपत्ति लावण्यासाठीं कोणत्याहि दैवी शक्तींचा आधार घेण्याचें कारण नाहीं. उलट माणसाच्या आनुवंशिक परिस्थितीवरच ते सर्वस्वी अवलंबून असतात आणि आनुवंशिकता हीदेखील एक रासायनिक प्रक्रियाच असते. थोडक्यांत म्हणजे मूलविज्ञानशास्त्रांतील अनुमानें त्याच्या कक्षेच्या बाहेरील वस्तुनिर्णयशास्त्राच्या क्षेत्रांत लागूं केली जातात. मानवाची उत्पत्ति, त्याचें स्वरूप आणि त्याच्या अस्तित्वाचा अर्थ किंवा हेतु या प्रश्नांचा विचार करतांना शास्त्रीय प्रयोगांतून निघालेल्या निष्कर्षांचा उपयोग केला जातो.

शास्त्रीय पृथक्करण आणि प्रयोग यांमधूनच आजच्या काळांतील ज्ञानाचा खरा विकास घडून आला असून साहजिकच ज्ञानाच्या त्या क्षेत्रांत निरनिराळीं प्रमेयें मांडण्याला भरपूर वाव आहे. परंतु दुर्दैवानें इतर वैज्ञानिकांप्रमाणें मूलविज्ञानवादी आपलीं अनुमानें कसोशीनें पडताळून पाहत नाहींत. त्याचा परिणाम असा होतो कीं ( विज्ञानाच्या नांवावर ) जे अनेक महत्त्वाचे निष्कर्ष काढण्यांत येतात ते वस्तुतः विज्ञानावर अजिबात आधारलेले नसतात. उदाहरणार्थ विश्व, पृथ्वी किंवा मानव यांपैकीं कशाचीहि उत्पत्ति दैवी शक्तीच्या प्रेरणेशिवाय झालेली आहे, असें विज्ञानानें कधींहि दाखवून दिलेलें नाहीं. तसें अनुमान कदाचित् करतां येईल, पण अनुमानापेक्षां अधिक महत्त्व त्याला देतां येणार नाहीं. आणि या प्रश्नाची उकल करून घेण्याची एखाद्याला खरोखरी इच्छाच असेल तर या सर्वांच्या मुळाशीं कांहींतरी दैवी शक्ति असावी असें मानण्याइतका पुरावा त्याला सांपडूं शकेल. आपल्या आजच्या काळांत माणसाच्या कल्पनाशक्तीवर विज्ञानाचा इतका पगडा बसला आहे कीं, असलीं पोकळ विधानें करण्याचा मूलविज्ञानवाद्यांना जणूं परवानाच मिळालेला आहे. प्रयोगामुळें शास्त्रज्ञांना एक प्रकारची शिस्त लागते. परंतु त्या प्रयोगांची कसलीहि क्षिति न बाळगतां किंवा शिस्तीचें बंधन न पाळतां मूलविज्ञानवादी हे सोयिस्करपणें कधीं विज्ञानाचा तर कधीं तत्त्वज्ञानाचा खुशाल आधार घेत असतात, आणि गैरसोयीचें वाटेल तेथें त्याकडे दुर्लक्ष करण्यासहि ते मागेंपुढें पाहात नाहींत.

अशा तऱ्हेनें ते विज्ञानावर आधारलेल्या आपल्या सिद्धांतांचे मनोरे उभारीत असतात, परंतु शास्त्रीय सत्याच्या कसोट्या किंवा मार्ग नसलेलीं तीं नुसतीं तर्कटेंच असतात. मूलविज्ञानवाद्यांनीं आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर उभारलेले हे प्रचंड मनोरे खरे असोत वा काल्पनिक असोत ते माणसाची कल्पनाशक्ति भारून टाकतात आणि त्याच्या आत्म्यावरहि फार प्रभाव गाजवतात. पूर्वींच्या काळीं कथा–पुराणाची जी महति होती तीच आजच्या काळांत मूलविज्ञानाला प्राप्त झाली आहे. आधुनिक काळांतील बौद्धिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांवर त्याचा फार मोठा पगडा बसलेला आहे. मूलविज्ञानामुळें धार्मिक क्षेत्रांत उलथापालथी घडून आल्या आहेत, नीति कल्पना बदलल्या आहेत. अर्थशास्त्रांत क्रांति घडून आली आहे, राजकारणाला विकृत वळण लागलें आहे, शिक्षणासंबंधींच्या दृष्टिकोनांत आमूलाग्र बदल घडून आला आहे. आणि आजपर्यंत कधींहि न घेतली गेलेली अशी मानवासंबंधीं निराळीच भूमिका घेतली जात आहे.

आतां मार्क्स् आणि एंगल्स यांचा दावा असा आहे कीं, त्यांच्या प्रत्येक लिखाणाला शास्त्रशुद्ध विचारसरणीची बैठक आहे. ‘डायलेक्टिक्स् ऑफ नेचर्’ हें पुस्तक लिहावयास घेण्यापूर्वीं, इतकेंच नव्हे तर निसर्गशास्त्रावर कोणतेंहि लिखाण करण्याच्या आधींच त्यानें हा दावा केला होता, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. वस्तुतः मार्क्स् किंवा एंगल्स यांनीं इतर मार्गांनीं आणि इतर आधारांवर आपलीं अनुमानें काढलीं. त्यानंतर कित्येक वर्षें त्यांनीं कोणत्याहि शास्त्राचा पद्धतशीर असा अभ्यास केला नाहीं. तोंपर्यंतचा त्यांचा शास्त्रांचा जो काय अभ्यास होता तो जुजबी स्वरूपाचाच होता. ‘अँटीड्यूरींग’ या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या पुस्तिकेंत स्वतः एंगल्सनें हें मान्यहि केलेलें आहे. तो म्हणतो कीं, “इतर विषयांत गुंतून गेल्यामुळें आवड असूनहि निसर्गशास्त्राकडे लक्ष देण्यास आम्हांला ( मार्क्स् व एंगल्स यांना ) अवसरच मिळाला नाहीं. आपला धंदा सोडून लंडनला येऊन स्थायिक होईपर्यंत या शास्त्रांचा सखोल अभ्यास करण्याची एंगल्सला संधीच मिळाली नाहीं. लंडनला येऊन राहिल्यानंतर मात्र बाह्यतः आकस्मिक दिसणाऱ्या ऐतिहासिक घटनांच्या मागें जे विरोधविकासात्मक नियम कार्य करीत असतात तेच नियम निसर्गांत प्रत्यहीं घडून येणाऱ्या असंख्य स्थित्यंतरांनाहि लागू पडत असले

पाहिजेत अशी सर्वसाधारणपणें माझी जी समजूत होती तिलाच बळकटी येऊन त्याविषयीं माझी खात्री होऊन चुकली." असें तो पुढें म्हणतो.

असें जर आहे तर मार्क्स्वादी आपली विचारसरणी शास्त्रशुद्ध आहे असें म्हणतात तें कशाच्या जोरावर? प्रश्न सूक्ष्म स्वरूपाचा आहे. त्यांचें हें विधान सर्वस्वी निराधार आहे असें म्हणून भागणार नाहीं. एखादा शास्त्रज्ञ पदार्थविज्ञान, रसायन आदि शास्त्रांबाबत जो दृष्टिकोण स्वीकारतो तोच दृष्टिकोण सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रश्न सोडविण्याचे बाबतींत आपणच प्रथम अंगीकारला असें मार्क्सचें जें प्रतिपादन आहे तें टिकण्यासारखें नाहीं. मार्क्सच्या लिखाणाला प्रयोगाचा किंवा प्रायोगिक दृष्टिकोणाचा कसलाहि आधार नाहीं, इतकेंच नव्हे तर सामाजिक घटनांचें कांटेकोर वस्तुनिष्ठतेनें त्यानें पृथक्करण केलें आहे असेंहि म्हणतां येत नाहीं. इतर बाबतींत मार्क्स्वादी दृष्टिकोण स्वीकारणारांनींहि सामाजिक घटनांबाबतचें मार्क्स्चें विवेचन अगदीं अशास्त्रीय आहे अशी त्यावर टीका केलेली आहे. सिडने हुक म्हणतो त्याप्रमाणें "शास्त्रीय निष्कर्षांचें स्वागत करण्यांत आलें असलें तरी शास्त्रीय पद्धतीकडे मात्र संपूर्ण दुर्लक्ष करण्यांत आलें आहे." तरीदेखील मार्क्स्चा यासंबंधींचा दावा सर्वस्वीं निराधार आहे असें म्हणतां येणार नाहीं. मार्क्स्वाद व निसर्गशास्त्रें यांत परस्पर संबंध आहे ह्यांत शंका नाहीं. परंतु सर्वसाधारणपणें बहुसंख्य लोकांची समजूत असते त्याप्रमाणें तर्कशास्त्र आणि विज्ञान यांच्या क्षेत्रांत हा संबंध पहावयास मिळत नाहीं. तो संबंध फक्त मूलविज्ञानविषयक क्षेत्रांतच काय तो आढळून येतो. मार्क्स्च्या विरोधविकासात्मक भौतिकतावादाचें मूळ खरें म्हणजे तत्त्वज्ञानांत आहे, परंतु त्याबरोबरच तत्कालीन मूलविज्ञानवाद्यांच्या मानवविषयक कल्पनांचाहि मार्क्सनें आपल्या विचारसरणींत समावेश करून घेतला. त्यामुळेंच अखेर एंगल्स जेव्हां निसर्गाकडे वळला तेव्हां त्याला असें दिसलें कीं, मानव आणि त्यांची उत्पत्ति यासंबंधीं जे जे निष्कर्ष शास्त्रांनीं काढले ते ते मार्क्स व एंगल्स यांनीं त्यापूर्वीं जें लिहून ठेवलें होतें त्याच्याशीं तंतोतंत जुळणारे असेच होते. यावरून विरोधविकासवाद शास्त्रशुद्धच आहे हें सिद्ध होत नाहीं. मार्क्सच्या मूलविज्ञानवादी कल्पना या त्या काळच्या रूढ समजुतीला साजेश्या होत्या एवढेंच त्यावरून सिद्ध होतें.

 

नेहमींच्या तात्त्विक किंवा सामाजिक दृष्टीपेक्षां विरोधविकासवादाचा विचार करतांना शास्त्रीय दृष्टिकोणाचाच अंगीकार आपण इथें केला आहे. त्याचें कारण असें कीं, त्यायोगें त्याच्या सामर्थ्याची यथार्थ कल्पना येऊं शकेल. तात्त्विक दृष्ट्या इतका कच्चा पाया असलेली मार्क्स्वादाखेरीज अन्य विचारसरणी क्वचितच सांपडेल. पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांनीं तर त्याविषयीं अनेक शंका उपस्थित केल्या असून त्यांतील विसंगति दाखवून दिलेली आहे. सामाजिक दृष्ट्या पाहिलें तर विरोधविकासवादाला इतके घृणास्पद सिद्धांत दुसरे क्वचितच असतील. अनेक विरोधविकासवाद्यांचेंदेखील तसेंच मत आहे. परंतु मूलविज्ञानवादाच्या दृष्टीनें मात्र विरोधविकासवादांतील सिद्धांत अजूनपर्यंत अविचल राहिले आहेत. गेल्या शतकांत अत्यंत लोकप्रिय झालेला आणि अधिकृत समजला गेलेला मानवासंबंधींचा दृष्टिकोणच विरोधविकासवादांत अभिप्रेत आहे आणि एंगल्सचें ‘ शास्त्रीय ’ लिखाण लिहून होण्यापूर्वींदेखील विरोधविकासवादांत हाच दृष्टिकोण मांडला जात असे. परंतु ज्या ग्रंथांत मार्क्सच्या सिद्धांतांना निसर्गशास्त्रांचाहि आधार मिळाल्यासारखा दिसतो त्या ग्रंथांमुळें त्याच्या सिद्धांतांना मूलविज्ञानाची प्रतिष्ठा प्राप्त झाली ती अद्यापपर्यंत तशीच राहिली आहे. तेव्हांपासून त्याकडे केवळ आर्थिक किंवा सामाजिक सिद्धांत म्हणून पाहिलें जात नाहीं तर मानवासंबंधीचा सर्वंकष–मानवाची उत्पत्ति, त्याची नियति, यासंबंधींचा–ऊहापोह त्यांत केला आहे असेंच गृहीत धरलें जातें. या सर्वंकष कल्पनेच्या उभारणीला शास्त्रीय विचारांचा आधार आहे असेंहि मानलें जातें.

कल्पनांच्या संघर्षांत हा मुद्दा विशेषच महत्त्वाचा ठरतो. गेल्या शतकांत स्वतंत्र जगांतील विचारवंतांनींदेखील मूलविज्ञानासंबंधीं विचार प्रदर्शित केले असून त्या द्वारां मानव आणि निसर्ग यासंबंधीं निराळे ‘ शास्त्रीय ’ दृष्टिकोण पुढें मांडले आहेत. यांपैकीं जर कोणत्या दृष्टिकोणाची सर्वांत जास्त चलती झाली असेल तर ती एंगल्सप्रणीत भौतिकवादाशीं साम्य असलेल्या विचारांचीच होय. अर्थात् बहुतेक सर्व विचारवंत ‘ भौतिकतावाद ’ हा शब्द त्याज्य समजतात. त्याऐवजीं ते ‘ निसर्गवाद ’ असा शब्द वापरतात; आणि भौतिक कारणपरंपरेऐवजीं ते नैसर्गिक कारण-

परंपरा असा शब्दप्रयोग करतात. परंतु मुळांत त्यांचा आणि एंगल्सचा सिद्धांत एकच असतो. वस्तुजाताच्या नियमानुसार जडवस्तुपासूनच हें विश्व निर्माण झालेलें असून त्याच नियमानुसार जीवसृष्टि, प्राणि आणि मानव यांची उत्पत्ति झाली आहे. उत्पत्तीच्या या प्रदीर्घ प्रक्रियेंत कोठल्यातरी दैवी शक्तीचा किंवा बुद्धीचा हात असतो या कल्पनेची जुनाट, अशास्त्रीय म्हणून टर उडविली जाते. प्रत्येक गोष्टीची भौतिक आणि नैसर्गिक दृष्ट्या संगति लावून दाखवितां आली पाहिजे या तत्त्वावर इतका भर देण्यांत आला आहे कीं, तो एक अढळ सिद्धांतच होऊन बसला आहे आणि त्यासंबंधीं कोणी शंका उपस्थित करील तर त्याची गणना गांवढळांत केली जाते; तो बुद्धिवादी नसल्याचा त्याच्यावर आरोप करण्यांत येऊन धार्मिक शिक्षणामुळें त्याची दृष्टि पूर्वग्रहदूषित झाली आहे असा शेरा मारला जातो; किंवा निराळ्या शब्दांत सांगावयाचें तर एक विरोधविकासाचें तत्त्व सोडलें तर मार्कस् आणि एंगल्स यांनीं मांडलेले मूलविज्ञानाविषयक विचार व पाश्चात्य जगांतील त्याच संबंधांतील विचार यांत खूपच साम्य आहे.

स्वतंत्र जगांतील मूलविज्ञानवाद आणि कम्युनिझमला अभिप्रेत असलेला मूलविज्ञानवाद जवळ जवळ एकरूप आहेत. परंतु कम्युनिस्टविरोधी विचारवंतांना त्याबाबत कसलीहि चिंता वाटत नाहीं. हीं भौतिक किंवा निसर्गवादी प्रमेयें जर बरोबर असतील तर त्यांना सार्वत्रिक मान्यता मिळाली पाहिजे. कम्युनिस्टांना तीं मान्य आहेत म्हणूनच केवळ स्वतंत्र जगानें त्यांचा अव्हेर केला पाहिजे असें कोणीच म्हणणार नाहीं! ती भूमिका केव्हांहि शास्त्रशुद्ध ठरणार नाहीं. परंतु भौतिक, निसर्गनिष्ठ सिद्धांत जर अचूक असतील तर स्वतंत्र जीवनपद्धतीपेक्षां कम्युनिझमची बाजू अधिक बळकट असली पाहिजे असें ठरतें. याचा स्वतंत्र जगाला गंभीरपणें विचार करावा लागणार आहे. कोणत्याहि अर्थानें पाहिलें तरी जडवस्तु ही स्वतंत्र नसते. वस्तुनिर्मित पदार्थ म्हणजे मानव अशी कल्पना केली तर साहजिकच स्वातंत्र्य या शब्दाला कांहीं अर्थच राहणार नाहीं. नियम आणि योगायोग यांच्या संयोगांतून मानवाची निर्मिति होत असेल तर त्याचें स्वातंत्र्य हा एक आभासच म्हटला पाहिजे. आणि या आभासाला तोंड देण्याचें मानसिक धैर्य न दाखवितां कम्युनिस्ट मुळीं स्वातंत्र्याची व्याख्याच बदलून टाकतात.

स्वातंत्र्याची ही कम्युनिस्टप्रणीत व्याख्या आपल्या परंपरागत कल्पनेच्या नेमकी उलट असते. सत्ताधाऱ्यांनीं प्रतिपादिलेल्या जडवस्तुविषयक नियमापुढें विनतक्रार मान तुकविणें हीच कम्युनिस्टांची स्वातंत्र्यविषयक कल्पना असते.

वरील विधानाशीं स्वतंत्र जगांतील अनेकजण आपला मतभेद व्यक्त करतील. विशेषतः आपण वर पाहिल्याप्रमाणें अमेरिकेंतील विचारसरणीला विशिष्ट वळण लावणारे आशावादी तर त्याला तीव्र विरोध करतील. सर्वसाधारणपणें या मंडळींनीं भौतिक निसर्गवादी मूलविज्ञानाचा अंगिकार केलेला असतो. आणि तरीदेखील आपण कम्युनिस्ट जगावर विजय मिळविण्याचे कामीं स्वतंत्र जगाला मार्गदर्शन करूं शकूं अशा भ्रमांत ते असतात. परंतु आमच्या मतें असा विश्वास बाळगण्यांत ते फार मोठी चूक करीत आहेत. एंगल्सप्रणीत मूलविज्ञानवाद बरोबर आहे असें मानलें तर मार्क्स् व एंगल्स यांनीं प्रतिपादिलेले अर्थशास्त्राविषयींचे सिद्धांतहि बव्हंशीं अचूक आहेत असेंच मानावें लागेल. कारण मार्क्स व एंगल्स यांनीं प्रतिपादिलेल्या सिद्धांतांत तर्कशास्त्र व विज्ञान यांना गुंडाळून ठेवणारी एक अजब मांडणी पहावयास मिळते. मनुष्य हा जर जड वस्तूपासून झाला असेल आणि वस्तुमानासंबंधींच्या नियमांनीं तो जखडला गेला असेल तर व्यक्तिगत स्वातंत्र्यापेक्षां त्याच्या दृष्टीनें कम्युनिझम फार बरा. आधुनिक इतिहासाचा विचार करतां वरील विचाराची मोहिनी प्रत्ययास येईल.

आतां प्रत्यक्ष विरोधविकासवादासंबंधीं आणि त्याचबरोबर त्यावर आधारलेल्या कल्पनांनुसार मनःचक्षूंसमोर उभ्या राहणाऱ्या विरोधविकासवादी व्यक्तीसंबंधानें अधिक विस्तारानें विवेचन करूं.

* * *

## २ : : सर्वाधिकारवादी क्रांति

विरोधविकासवादाचा प्रणेता कार्ल मार्क्स् ही इतिहासांतील एक अत्यंत विचित्र व्यक्ति होऊन गेली. परस्परांशीं विरोधी अशा गोष्टी त्याच्या जीवनांत एकत्र आल्या होत्या. आणि हा परस्पर विरोध त्यानें प्रतिपादिलेल्या

सिद्धांतांतहि उमटलेला आढळतो. कटुता हा त्याच्या जीवनाचा स्थायीभाव बनला होता. ख्रिश्चन बनलेल्या एका ज्यूच्या पोटीं तो जन्माला आला होता. पण आपली सारी हयात त्यानें ज्याला त्याला विरोध करण्यांतच घालविली —धर्मसमजुती, तो ज्या विश्वविद्यालयांत शिकला तेथील अध्यापक, आणि ज्या ज्या देशांत त्यानें वास्तव्य केलें तेथील सरकारें, इतकेंच नव्हे तर तो ज्यांचें पुढारीपण करूं इच्छित होता त्या समाजवादी नेत्यांनादेखील त्यानें विरोधच केला. कार्ल मार्क्स् हा जणूं साऱ्या जगापुढें दंड थोपटून उभा होता.

मोठा विद्वान् असूनहि त्याचें ज्ञान टाकावू ठरे. कारण प्रत्येक बाबतींत विकृत अर्थ लावण्याचा त्याचा अट्टाहास असे. त्यामुळें मानवी संस्कृतीचीं अनेक महत्त्वाचीं क्षेत्रें त्याला अनाकलनीयच राहिलीं. मार्क्स् हा कामगार-वर्गाचा कट्टा पुरस्कर्ता असला तरी स्वतः मात्र कामगार-वर्गांतून पुढें आलेला नव्हता. तो आदर्शवादी होता. परंतु आदर्शवादासंबंधीच्या त्याच्या कल्पना रूढ समजुतीच्या नेमक्या उलट होत्या. वृत्तीनें तो तत्त्वज्ञानी असला तरी ब्रिटिश पदार्थसंग्रहालयांत बसून तो अर्थशास्त्राचें जें अखंड अध्ययन करीत असे त्यायोगानें सर्व समस्या सुटूं शकतील अशी त्याची समजूत होती. मार्क्स् भांडवलशाही पद्धतीचा कट्टर द्वेष्टा असला तरी त्याची उपजीविका मात्र बव्हंशीं इंग्लंडमध्यें कापड-धंद्यांतील कामगारांच्या पिळवणुकींतून आलेल्या उत्पन्नावरच चालत असे. एरवीं बऱ्याचशा उजाड असलेल्या त्याच्या जीवनाला दोन गोष्टींनीं उजाळा आणला होता. त्यापैकीं पहिली गोष्ट म्हणजे जेनी व्हॉन वेस्टफालेन नांवाच्या मुलीवर जडलेलें त्याचें प्रेम. तिच्याशींच पुढे तो विवाहबद्ध झाला आणि तीहि त्याच्याशीं शेवटपर्यंत एकनिष्ठ राहिली व त्याच्या आपत्काळीं तिनें त्याला साथ दिली. ती एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याची मुलगी होती. त्याच्या आयुष्याला उजळा देणारी दुसरी गोष्ट म्हणजे एंगल्सबरोबरचा त्याचा अकृत्रिम स्नेह. एंगल्स हा त्याचा केवळ मित्र नव्हता तर त्याला भावासारखाच होता. मार्क्स्च्या चरितार्थाचा भारहि तोच उचलीत असे. या दोन गोष्टी वगळल्या तर मार्क्स्चें सारें जीवन दारिद्र्य, अहंकार, विफलता, भ्रमनिरास आणि द्वेष यांनीं भरलेलें आहे.

इतिहासाला नवें वळण लावून साऱ्या जगाला स्तिमित करणाऱ्या मार्क्सचें सारें लिखाण मात्र अगदीं रटाळ आहे. त्याचा सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे ' डास कापिटाल '. तो महाप्रचंड ग्रंथ शेवटपर्यंत अपुराच राहिला. त्यांत त्यानें अत्यंत सुसंगत अशीं आर्थिक प्रमेयें मांडलीं आहेत. पण तीं प्रमेयें त्यानें ज्या गृहीत कृत्यांवर आधारलीं आहेत तीं सिद्ध करणारा कोणताहि बळकट पुरावा त्यानें सादर केलेला नाहीं. आणि तरीहि त्याच्या सर्व लिखाणांत वाचकांना भारून टाकण्याची एक किमया आहे. अर्थात् अमेरिकन वाचक चटकन असे भारले जाणार नाहींत. कारण मार्क्सनें आपलें लिखाण ज्या परिस्थितींत केलें त्यापेक्षां अगदीं भिन्न प्रकारच्या आर्थिक आणि तात्त्विक वातावरणांत अमेरिकेंतील प्रगति घडून आलेली आहे. परंतु मार्क्सच्या लिखाणांत एक प्रकारची जादुगिरी आहे. आणि आधुनिक मानवाची विचारसरणी बनविण्याच्या कामीं ज्यांचा फार मोठा हात आहे अशा शक्तींचें प्रतिबिंब त्याच्या लिखाणांत उमटलें आहे, हें नीट समजून घेतल्याशिवाय आपणाला मार्क्सवादाचें यथार्थ आकलन होणार नाहीं. तसेंच त्याच्या लिखाणांतील जादुगिरीचें रहस्यहि समजणार नाहीं. कित्येक वेळीं वास्तवतेपासून अलग पडलेली कमालीची तर्कशुद्ध विचारसरणी पूर्वग्रह आणि विज्ञान, इच्छाशक्ति वस्तुस्थिति, अत्यंतिक ध्येयवाद दृष्टी आणि अत्यंतिक वस्तुनिष्ठता, यांची त्यानें केलेली गल्लत हें सर्व, एका अर्थानें अमेरिकेच्या बाहेरील औद्योगिक मानवाच्या आशाआकांक्षांचें आणि भ्रमनिरासांचें प्रातिनिधिक असें चित्रणच आहे. स्वतंत्र जगांतील नागरिकांकडून सर्वांत मोठी चूक जर कोणती होत असेल तर तीं म्हणजे ते मार्क्सवादाला विवेकाची बैठक आहे असें मानतात ही होय. कारण मार्क्सवादांत औद्योगीकरणामुळें निर्माण झालेल्या सुप्तशक्तींना बुद्धिवादी विचारसरणीचे मुखवटे चढविण्याचाच मुख्यतः खटाटोप केलेला आहे. मार्क्सच्या लिखाणांतील सारी जादुगिरी तर त्यांतच सांठविलेली आहे आणि त्या जादुगिरींतच मार्क्सवादाचें सारें सामर्थ्य आहे.

१८ व्या शतकांत जी राजकीय उलथापालथ झाली तिच्या मुळाशीं स्वातंत्र्यवादी आणि सर्वाधिकारवादी अशा दोन विचारसरणी होत्या. या गोष्टीकडे पुरेसें लक्ष दिलें जात नाहीं. या दोनहि विचारसरणींच्या आधारें

आपापलें उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न अद्यापहि चालू आहेच. परंतु त्या विचारसरणींत आतां अटीतटींचा संघर्ष सुरू झाला आहे. Mortal मानव-व्यक्ति–त्याचें स्वरूप काय, तें कसें असलें पाहिजे, कसें होऊं शकेल–आणि इतर मानवांबरोबरचे आणि मुख्य म्हणजे शासनसंस्थेबरोबरचे त्याचे संबंध या संबंधीचे परस्परविरोधी विचार हेंच संघर्षाचें मूळ आहे.

अमेरिकनांना परिचित असलेल्या स्वातंत्र्यवादी आदोलनानें स्वातंत्र्याच्या ध्येयाचा उघड दिसणारा आणि व्यावहारिक अर्थ घेतला. माणसाला आपापलें भवितव्य घडविण्याची जास्तींतजास्त संधि प्राप्त करून द्यावयाची, त्यांत शक्यतोंवर राजकीय संस्थांकडून कसलाहि हस्तक्षेप होऊं द्यावयाचा नाहीं, अशी त्यांची धारणा होती. ‘ व्यक्ति तितक्या प्रकृति ’ हें स्वातंत्र्यवादी आदोलनाच्या उपासकांना पटलेलें होतें. आणि जेथें व्यक्तिव्यक्तींतील ही विविधता मान्य केली जाईल, इतकेंच नव्हे तर तिला उत्तेजन दिलें जाईल अशा प्रकारची राज्यपद्धति विकसित करणें हें त्यांच्यापुढील एक महत्त्वाचें राजकीय ध्येय होतें. आधुनिक अमेरिकेचा पाया घालणाऱ्या जवळ जवळ सर्वच विचारवंतांनीं या तत्त्वाला आपला निःसंदिग्ध पाठिंबा दिला होता. त्यांतल्यात्यांत जेम्स मॅडीसन् याचा तर या बाबतींत विशेषच उल्लेख करावा लागेल. त्यानें ‘ गटवादी ’ या मथळ्याखालीं याविषयीं एक स्वतंत्र प्रकरणच लिहिलें आहे. या प्रकरणांत मॅडीसन म्हणतो “ सार्वजनिक शांततेच्या दृष्टीनें गटवादाइतकें अनर्थास्पद दुसरें कांहींहि नाहीं. गटबाजीला आळा घातला गेला नाहीं तर त्यामुळें साऱ्या समाजाचीं छकलें उडून जातील. तेव्हां ह्या गटबाजीचा बंदोबस्त आपल्याला कसा करतां येईल असा प्रश्न उपस्थित करून १७८८ सालीं लिहिलेल्या एका निबंधांत तो त्यावर जो तोडगा सुचवितो तो स्वातंत्र्य-वादी क्रांतिकारकांच्या मूळ सिद्धांताला धरूनच आहे.

गटबाजीला आळा घालण्याचे दोन मार्ग मॅडीसन्नें सूचित केले आहेत. गटबाजीच्या कारणांचा निरास करणें किंवा त्यापासून होणाऱ्या परि-णामांवर नियंत्रण ठेवणें; “ कारणांचा निरास करण्याचेहि पुन्हां दोन मार्ग आहेत… पहिला मार्ग म्हणजे गटबाजीच्या मुळाशीं असलेलें स्वातंत्र्य अजिबात नष्ट करून टाकणें आणि दुसरा मार्ग म्हणजे प्रत्येक नागरिकाचीं मतें, भावना आणि हितसंबंध हें सारें एका छापाचें बनवून टाकणें. ”

यापैकीं पहिल्या मार्गासंबंधीं तो म्हणतो कीं " रोगापेक्षांहि त्याच्यावरचा हा उपाय भयानक ठरण्याचा संभव आहे. " आणि पहिला मार्ग जितका अयोग्य किंवा मूर्खपणाचा तितकाच दुसरा मार्ग अव्यवहार्य आहे. कारण, " गटबाजीच्या कारणांचीं बीजें हीं मुळीं मानवी स्वभावांतूनच अंकुरित होतात. " " जोंपर्यंत मानवी स्वभावांत विविधता आहे ", विवेक आणि आत्मप्रीति हीं एकमेकांशीं निगडित आहेत किंवा धर्म, सरकार इ० अनेक विषयांबाबत भिन्न भिन्न मतें प्रतिपादण्याची माणसाला ईर्षा आहे तोंपर्यंत अशा प्रकारचीं मतमतांतरें हीं राहणारच. सारांश सरळ सरळ जुलूम जबरदस्तीचा अवलंब केल्याशिवाय मतभिन्नतेच्या कारणांचें निर्मूलन करतां येणें अशक्य आहे. म्हणून मॅडीसन् म्हणतो कीं, " त्यापासून होणाऱ्या परिणामांवर नियंत्रण कसें ठेवतां येईल याचाच विचार केला पाहिजे. त्या दृष्टीनें संघराज्यात्मक स्वरूपावर आधारलेली राज्यघटना, सत्तेची त्रिविध विभागणी व अल्पसंख्य गट आणि व्यक्ति यांना देण्यांत आलेलें संरक्षण यांच्या योगानें इच्छित हेतु साध्य करतां येईल."

अशा तऱ्हेनें व्यक्तिगत मतभेदांना अवसर देणाऱ्या स्वातंत्र्याचा पाया घालण्याचें काम स्वातंत्र्यवादी आंदोलनामुळें केलें जात होतें तर तिकडे युरोपांत आणि विशेषतः फ्रान्समध्यें याच्याबरोबर उलट उद्दिष्टांचा पुरस्कार करणारी विचारसरणी प्रभावी होत होती. जनतेच्या भावना भारून टाकणाऱ्या या चळवळीचें कार्ल बेकर यानें " १८ व्या शतकांतील तत्त्ववेत्त्यांचें नंदनवन " असें वर्णन केलें आहे. मारेली, मेब्ली, हेल्वे शियन्स बॅरनद होल्बाश, कोंदोरसे व रूसो हे या विचारसरणीचे आद्य प्रवर्तक होते. रॉबेस स्पिअर, सँजूस्ट, बाबेडफ आणि बोनारो यांनीं ही विचारसरणी प्रत्यक्षांत उतरविण्याचा प्रयत्न केला. मॅडीसनप्रमाणेंच या सर्व क्रांतिकारकांनींहि ' मानवी स्वभाव ' हेंच मूळ धरलें होतें आणि " व्यक्तिगत स्वातंत्र्य " हेंच आपलें ध्येय आहे असें ते आग्रहपूर्वक सांगत. परंतु वरवर पाहतां त्यांत साम्य दिसत असलें तरी त्यामागील मूलभूत कल्पनांमध्यें खूपच मूलगामी स्वरूपाचे फरक आहेत. या दुसऱ्या क्रांतिकारकांना अभिप्रेत असलेला आदर्श मानव हा " वास्तव मानव " नसून जसा असायला हवा तसा म्हणजे " आदर्श मानव " आहे. त्या विचारसरणीच्या पुढाऱ्यांनीं आदर्श किंवा

निर्दोष अशा समाजाचें ध्येय आपल्या डोळ्यापुढें ठेवलें होतें आणि तें ध्येय साध्य होऊं शकेल अशा प्रकारच्या सुधारणा समाजांत घडवून आणण्याचा त्यांना ध्यास लागला होता. ज्या काळांत न्यूटनच्या यंत्रवत् व्यवस्थित सिद्धान्ताचा साऱ्या जगावर विलक्षण पगडा बसला होता त्या काळीं सर्व सामाजिक दुःखांचा नाश करूं शकणारेहि चित्तत्त्व शोधून काढण्याचा कसोशीनें प्रयत्न करीत होते. हें तत्त्व माणसाच्या आत्मप्रीतीमधून विकसित होऊं शकेल असें मॅडीसनप्रमाणेंच त्यांनाहि वाटत होतें. परंतु पूर्णावस्थेच्या स्वप्नांत रंगून गेल्यामुळें त्यांच्या विचाराला मॅडीसन्‌च्या बरोबर उलट वळण मिळालें. ते असें प्रतिपादीत कीं, माणूस हा मुळांत सत्प्रवृत्त आहे. समाजांत अस्तित्वांत असलेली विषमता नाहींशी करून त्या जागीं नैसर्गिक अशी समानता प्रस्थापित केली तर माणसांतील स्वार्थामुळें समाजांत फाटाफूट पडण्याऐवजीं ते एकत्र येतील. एकदां आदर्श समाज निर्माण झाला आणि कोणत्याहि प्रकारचे फाटे न फोडतां त्याची अंमलबजावणी सुरू झाली म्हणजे मग मानवांतील नैसर्गिक सत्प्रवृत्ति बळावून त्यायोगें संपूर्ण लोकशाहीवादी समाज आपोआपच निर्माण होईल.

स्वातंत्र्यवादी क्रांतीवर या आदर्शवादी कल्पनांचा फार मोठा परिणाम घडून आलेला आहे. उदा. थॉमस जेफरसन याच्या लिखाणावर या कल्प-नांचा पडलेला प्रभाव सहज दिसून येतो. विशेषतः सुरवातीच्या काळांत स्वातंत्र्यवादी आणि सर्वाधिकारवादी या दोन विचारसरणींतील तफावत सुस्पष्ट नव्हती. स्वातंत्र्यवादी विचारसरणी इंग्लंड अमेरिकेंत मूळ धरीत होती तर सर्वाधिकारवादी विचारसरणी फ्रान्समध्यें व इतर युरोपीय देशांत दृढमूल होत होती, हें जरी खरें असलें तरी या दोन्हीं विचारसरणींतील निरनिराळ्या कल्पनांची कांहींशी सरमिसळ झाली होती. क्वचित् स्वातंत्र्य-वादी विचार फ्रान्स आदि देशांत व्यक्त केले जात तर सर्वाधिकारवादी विचारसरणींतील कांहीं कल्पनांचा इंग्लंड अमेरिकेंत पुरस्कार केलेला आढळे. व्हाल्टेअर आणि मॉन्टेस्क्यू हे दोघेहि विचारवंत फ्रेंच असले तरी त्यांचा कल बव्हंशीं स्वातंत्र्यवादी परंपरांकडेच होता. लॉक आणि ह्यूम या इंग्रज तत्त्ववेत्त्यांना ते गुरुस्थानीं मानीत. त्याचप्रमाणें अमेरिकेची राज्यघटना तयार करणारावर मॉंटेस्क्यूच्या विचारांचा खूपच पगडा बसलेला होता. या

उलट फ्रेंच तत्वज्ञानाचा वर आपण ज्याचा ऊहापोह केला आहे, त्या अमेरिकन आशावादी तत्त्वज्ञानावरहि फार मोठा परिणाम घडून आलेला आहे.

"जसा आहे तसा माणूस" बदलून त्याला "तो जसा असावयास पाहिजे" तसें स्वरूप कसें देतां येईल म्हणजेच वास्तव मानवाला आदर्श मानवाचें स्वरूप कसें देतां येईल या आदर्शवाद्यांपुढें सतत उभ्या असलेल्या प्रश्नाचा ज्यावेळीं आपण विचार करूं लागतों त्यावेळीं मात्र या दोन आंदोलनांतील विरोध एकदम नजरेंत भरतो. अर्थात् माणसाला जडलेल्या जुन्या संवयी काढून टाकून त्या जागीं खऱ्या स्वातंत्र्यवादाला पोषक अशा नव्या संवयी लावून घेण्याचा सराव करण्यास कांहीं वेळ जाणें अवश्य आहे. सर्वांच्या हितांतच माझें हित सामावलेलें आहे हें सर्व व्यक्तींना मान्य करावयास लावलें पाहिजे. त्यासाठीं कदाचित् रूसोनें म्हटल्याप्रमाणें "स्वतंत्र होण्याचीदेखील मानवावर सक्ती करावी लागेल." सर्वाधिकारशाहीला इतकें गोंडस स्वरूप इतिहासांत आजवर कधींच दिलें गेलें नसेल. मूठभर लोकांची इच्छाशक्ति बहुसंख्य लोकांवर लादण्याचा प्रकार स्वातंत्र्याच्या नांवावर दडपून देण्याचा हा एक धूर्त आणि तार्किक खटाटोप होता. अशा तऱ्हेनें मॅडीसननें जें प्रतिपादन केलें त्याच्या नेमका उलट अर्थ या आदर्शवादी क्रांतिकारी विचारसरणींत अभिप्रेत आहे.

जे. एल्. टालमन यांनीं या आंदोलनासंबंधींच्या आपल्या पुस्तकांत त्याचें विवेचन करतांना "(Totalitarian) लोकशाही" असा शब्दप्रयोग केला आहे, तो जितका अन्वर्थक तितकाच उपयुक्तीहि आहे. मात्र त्यांत दोष एवढाच आहे कीं, अठराव्या शतकांतील ज्या विचारवंतांनीं ही विचारप्रणाली प्रसृत केली त्यांना त्यावेळीं ज्ञात नसलेल्या अशा कल्पना (Totalitarian) या शब्दामुळें आपल्या डोळ्यांसमोर उभ्या राहतात, म्हणून त्या शब्दप्रयोगापेक्षां सर्वाधिकारवादी (absolutist) असा शब्दप्रयोग करणें अधिक सयुक्तिक ठरेल. वर उल्लेखिलेल्या सर्व विचारवंतांच्या विचारसरणींत दिसून येणारा एक विशेष म्हणजे, राजकीय दृष्ट्या कांहीं तत्त्वें स्वयंसिद्ध किंवा निरपवाद म्हणून मान्य करण्याची त्यांची तयारी आणि स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यासाठीं सर्व नागरिकांनीहि तींच तत्त्वें मान्य केली

पाहिजेत असा त्यांनीं धरलेला आग्रह हें होय. त्यांच्या सर्व हालचाली या विचारसरणीवरच आधारलेल्या होत्या असेंहि दिसून येईल. टालमनच्या शब्दांत सांगावयाचें तर "जगांतील सर्व दुःखांचें मूळ एकच आहे आणि त्यावरील उपायहि एकमात्र आहे अशी श्रद्धा एका पूर्वनियोजित, आणि परिपूर्ण अशा नाटकाची अपरिहार्य अखेर साधण्याकरतां सबंध मानवजात अनिवार्यपणें धाव घेत आहे आणि मानवाच्या नियतीचें हें रहस्य आहे, असा दुर्दम्य विश्वास, अशाप्रकारच्या कल्पनांनीं फ्रेंच क्रांतिकारक भारावून गेले होते" साहजिकच त्यांना मॅडीसननें प्रतिपादलेली गटासंबंधींची सहिष्णुता पाखंडासारखी वाटे. त्यामुळेंच समाजाची म्हणून "फक्त एकच इच्छा असली पाहिजे" असें रोबेस्पीअरनें एके ठिकाणीं लिहून ठेवलें आहे. "गट", "मतमतान्तरें" किंवा इच्छाशक्तींतील भेद म्हणजे, "समाज-पुरुषाच्या शरिरांत भिनलेलें महाभयंकर कालकूट" होय. त्यामुळें नागरिकांवर "निरनिराळ्या गुन्ह्यांतून कशाची तरी निवड करण्याची" सक्ति केली जाते, असें तो म्हणे. त्याच्या मतें गटाचें हें पाखंड मोडून काढल्याशिवाय खरेंखुरें लोकराज्य निर्माणच होऊं शकणार नाहीं. गटांना, मतभेदांना वाव असल्याशिवाय, लोकराज्य यशस्वी होऊंच शकणार नाहीं, या मॅडीसनच्या मतांत आणि रोबेस्पीअरच्या वरील मतांत किती जमीन अस्मानाचें अंतर आहे!

परंतु या सर्वाधिकारी स्वरूपामुळेंच युरोपखंडांतील आंदोलनानें सर्वांचीं मनें भारून टाकलीं. मात्र पुढें साध्य करावयाच्या ध्येयासाठीं व त्याला योग्य अशी मनोवृत्ति निर्माण करण्यासाठीं यातनामय आणि रक्तलांछित अशा कालखंडाची किंमत त्यांना मोजावी लागली. तीं उदात्त ध्येयें म्हणजे एकमेकांबरोबर गुण्यागोविंदानें नांदूं शकतील असा एक आदर्श समाज भूतलावर निर्माण करणें. प्रत्येक व्यक्तीच्या भौतिक आणि आध्यात्मिक गरजा भागविण्याची हमी मिळालेली असल्यामुळें कोणाच्याहि व्यक्तिस्वातंत्र्याला बाध येणार नाहीं, अशी समाजव्यवस्था प्रस्थापित करणें ही होत. क्रांतीच्या त्या काळांत रक्तानें लाल झालेल्या पॅरीसमधील रस्त्यारस्त्यांतून क्रांतिकारकांनीं आपल्या जळजळीत भाषेंत रेखाटलेल्या याच कल्पनारम्य चित्रांचे प्रतिध्वनि उमटत असत. उदाहरणार्थ रोबिस्पिअरची ही घोषणा—" समाजांतील सर्व हीन आणि क्रूर भावनांना

आवर घालून कायद्याच्या जोरावर उदार उपकारक अशा भावनांना ज्यांत आवाहन केलें जाईल, मातृभूमीच्या गौरवासाठीं झटणें हीच प्रत्येकाची महत्त्वाकांक्षा असेल, समानतेखेरीज अन्य कशाचीहि दखल घेतली जाणार नाहीं...लोकराज्याच्या कल्पनांनीं सतत भारावून गेल्यामुळें सर्वांचा आत्मिक विकास होत जाईल, अशी समाजव्यवस्था आम्हाला हवी आहे. आमच्या देशांत आम्हाला अहंतेच्या जागीं नीतिमत्तेची प्राणप्रतिष्ठा करावयाची आहे, मानापानाच्याऐवजीं नेकीची जोपासना करावयाची आहे. रूढ समजुती आणि बडेजाव यांच्याऐवजीं उच्च तत्त्वें व कर्तव्यें यांचा आदर केला जावा आणि दुर्दैवाचा तिरस्कार करण्याऐवजीं जेथें दुर्गुणांचा तिरस्कार केला जाईल अशी परिस्थिति आम्हांला आमच्या देशांत निर्माण करावयाची आहे. स्नेहाळू, चंचल आणि सदा दुःखी अशा नागरिकांच्या जागीं आम्हाला आमच्या देशांतील नागरिक उदार, समर्थ आणि सुखी बनवावयाचे आहेत. थोडक्यांत म्हणजे राजेशाहींतील सारे दोष आणि उणिवा नाहींशा करून लोकराज्यांतील सर्व सद्गुणांचा आणि किमयांचा प्रसार आम्हाला आमच्या देशांत करावयाचा आहे."

विसाव्या शतकांतील स्वातंत्र्यवाद्यांना रोबिस्पिअरचें हें भाषण राणा भीमदेवी थाटाचें वाटण्याचा संभव आहे. परंतु त्याच्या या सर्व विचारात अजिबात तथ्य नाहीं असें खासच म्हणतां येणार नाहीं. जणूं ईश्वरी साक्षात्कारानें चालविली जाणारी व म्हणून धर्मभावनेवर विशेष भर देणारी अशी ही चळवळ आहे असेंच तिच्या प्रणेत्यांना वाटे व त्यांचे अनुयायीहि कडव्या धर्मप्रसारकाच्या जिद्दीनें तिचा प्रसार करीत. वस्तुस्थिति अशी आहे कीं, या चळवळीच्या प्रणेत्यांपैकीं अनेक जण स्वतःला खिस्तानुयायी म्हणवीत असले आणि त्यांचीं बरीचशीं ध्येयें खिस्ती शिकवणुकीशीं मिळतीं जुळतीं असलीं तरी एक नवा ऐहिक जीवन धर्म स्थापन करण्याचा हेतूच त्या सर्वांच्या मुळाशीं होता आणि त्यामुळें त्यांना अंतीं खिस्ती धर्माचा विरोधच करावा लागला. रोबिस्पिअर आणि बाबेऊफ यांचा "नागरिक धर्म" म्हणजे खिस्ती चर्चमधल्या उपासनेचें रूढ खिस्ती उत्सवांचें विडंबन वाटूं लागलें. कार्ल बेकर लिहितो, "८ जून १७९४ रोजीं एका हातांत फुलांचा गुच्छ आणि दुसऱ्या हातांत मशाल घेऊन सिटीझन रोबिस्पिअरनें जगांतील अज्ञान,

दुर्गुण आणि मूर्खपणा नाहींसा करून या नव्या धर्माची प्रस्थापना करण्या-साठीं म्हणून प्रचंड अग्नि चेतविला ‘तें दृश्य कांहींसें कौतुकास्पद’ कांहींसें करुणाजनक असें होतें.” माणसाचा विचार म्हणून अभिप्रेत नव्हता तर समष्टि म्हणून होता; तसेंच आध्यात्मिक किंवा पारलौकिक दृष्टीनें केला जाणार नव्हता तर निव्वळ भौतिक आणि ऐहिक जीवनाच्या दृष्टिकोणांतून केला जाणार होता. तें व्यक्तिमत्व स्वयंसिद्ध नव्हतें तर समाजसिद्ध होतें. त्यांच्यासमोर जें ध्येय होतें तें अद्वितीय अशा व्यक्तिसंबंधींचें नव्हतें तर सामाजिक दृष्टीनें आदर्श ठरणाऱ्या म्हणजेच व्यक्तिगत उद्दिष्टांना किंवा आवडीनिवडींना सामाजिक उद्दिष्टांसाठीं मुरड घालणाऱ्या व्यक्तीचें ध्येय त्यांच्या डोळ्यांसमोर होतें. रूसोपासून तो बाब्रेऊफपर्यंतच्या सर्वाधिकारवाद्यांच्या प्रत्येक लिखाणां-तून हेंच ध्येय रंगविलेलें आढळतें. आणि याच ध्येयाच्या पुरस्कारानें भावी काळांत जगाला नवें सामर्थ्य प्राप्त होणार होतें.

नऊ थर्मिडॉर १७९४ रोजीं रोबिस्पीअर आणि सँजूस्त यांचा शिरच्छेद करण्यांत आला. परंतु एखाद्या प्रेषिताप्रमाणें रंगाविलेलीं त्यांचीं ध्येयस्वप्नें, त्यांच्या मागची सत्ता गेली तरी युरोपखंडाच्या राजकीय पार्श्वभूमीवर तरळतच राहिलीं. कधीं तीं त्यांच्या स्मृतिरूपानें जनतेच्या मनांत वसत तर कधीं जनतेच्या आशाआकांक्षांचें रूप धारण करीत. त्यांनीं रंगाविलेलीं हीं ध्येय स्वप्नें आणि कार्लमार्क्सचे सिद्धांत यांमधील परस्पर संबंध हुडकून काढणें ही गोष्ट तितकीशी सोपी नाहीं. कारण, ते संबंध शक्य तितके अस्पष्ट करण्याचीच मुळीं मार्क्सवाद्यांची सदैव धडपड चाललेली असते. १८ व्या शतकांतील “स्वयंसिद्ध” प्रमेयें ढोंगीपणाचीं व “अविरोधविकासवादी” आहेत अशी त्यांनीं भरपूर टीका केलेली आहे. उदाहरणार्थ, ‘क्रिटिक ऑफ गोथा प्रोग्रॅम’ या आपल्या पुस्तकांत १८ व्या शतकांतील समतेसंबंधींच्या कल्पना व्यवहार्य नाहींत असें दाखवून देण्याचा कार्लमार्क्सनें फार आटापिटा केला आहे. सुरवातीच्या विचारवंतांना “निसर्ग नियमांच्या कल्पनेचें मोठें आकर्षण वाटे. परंतु जगाकडे बघण्याच्या शास्त्रीय दृष्टीकोणाशीं त्या विसंगत ठरल्यामुळें १८ व्या शतकांतील गूढगुंजन म्हणून त्यांचा उपहास करण्यांत आला. सर्वत्र लागू पडणारे जर कोणते नियम असते तर ते म्हणजे विरोधविकासवादी नियम. पण ते वरील निसर्गनियमापेक्षां

निराळे असतात. विरोधविकासवादी नियम हे जडवस्तुविषयक असतात आणि जुनाट किंवा टाकाऊ ठरलेल्या वस्तुनिर्णयशास्त्रांतील अस्पष्ट आणि काल्पनिक सिद्धांताला ते कसलाहि थारा देत नाहींत. तथापि टालमन आदिनी दाखवून दिल्याप्रमाणें १८ व्या शतकांतील सर्वाधिकारवादी क्रांति आणि त्यानंतरच्या शतकांतील मार्क्स्वादी आंदोलन यांत निश्चितच कांहीं परस्पर संबंध आहेत. मार्क्स्च्या स्वतःच्याच एका सिद्धांतामुळें ते स्पष्ट होतात. मार्क्स्वादी क्रांति ही एकदम पूर्ण होत नाहीं हें लक्षांत ठेवणें अत्यावश्यक आहे. मार्क्सनें आणि त्याच्या अनुयायांनीं सांगितल्याप्रमाणें मार्क्सवादी क्रांतीच्या तीन अवस्था असतात. त्यांपैकीं पहिली अवस्था म्हणजे नेहमींची लोकशाही क्रांतीची. या अवस्थेंत जनता सरजामशाही किंवा राजेशाही झुगारून देऊन स्वतःचें सरकार प्रस्थापित करते. मार्क्स-वादी क्रांतीची ही नुसती सुरवात समजली पाहिजे. त्यानंतर 'कामगार' क्रांति घडून येते. या अवस्थेंत कामगार वर्ग 'भांडवलशाही' लोकशाहीवर आधारलेली राज्यपद्धति नष्ट करून सत्ता आपल्या ताब्यांत घेतो. आणि "कामगारवर्गाची हुकुमशाही" प्रस्थापित करतो. मार्क्सनें स्वतःच कामगारवर्गाला उद्देशून असें लिहून ठेवलें आहे कीं, "समाजांतील पर-स्पर संबंधांत इतकेंच नव्हे तर खुद्द तुमच्यांतदेखील परिवर्तन घडवून आणून राजकीय सत्ता राबविण्याची पात्रता अंगीं येण्यासाठीं तुम्हांला पंधरा वीस कदाचित् पन्नास वर्षांपर्यंतदेखील अंतर्गत यादवीची किंवा जागतिक युद्धाची तयारी ठेवावी लागेल." मार्क्स्च्या निधनानंतर बऱ्याच वर्षांनीं घडून आलेली रशियन राज्यक्रांति ही अद्यापहि याच मधल्या अवस्थेंत आहे. कम्युनिस्टेतर जग या अवस्थेलाच संपूर्ण क्रांति असें सम-जतें, याचें कारण इतकेंच कीं, कम्युनिस्ट पुढाऱ्यांच्या विचारसरणीची पुरेशी दखल घेतलेली नसते. उदाहरणार्थ रशियन राज्यक्रांतीचा महान शिल्पकार लेनिन् यानें स्वतःच काय म्हटलें आहे पहा :

"कामगारवर्गाच्या हुकुमशाहींत (म्हणजेच क्रांतीच्या दुसऱ्या अवस्थेंत) आपल्याला शेतकरी, छोटे कारखानदार, कचेऱ्यांतून कामाला जाणारे हजारों नोकर आणि भांडवलदार वर्गांतील बुद्धिजिवी यांना नव्यानें शिक्षण द्यावें लागेल. कामगार वर्गाचें राज्य आणि पुढारीपण ह्यापुढें या सर्वांना

दुय्यम लेखावें लागेल, त्यांना जडलेल्या भांडवलशाही संवयीं आणि परंपरा घालवाव्या लागतील....दीर्घकालीन लढ्यांत...खुद्द कामगार वर्गालाच... नवें शिक्षण द्यावें लागेल. कारण, त्यांच्या मनांतील मध्यमवर्गीय समजुती या जादूची कांडी फिरविल्याप्रमाणें....ठराव पास करून किंवा वटहुकूम काढून एका फटक्यासरशी नाहींशा करतां येणार नाहींत. हें कार्य प्रदीर्घ आणि कठिण अशा सामुदायिक लढ्याच्या काळांतच सिद्धीस जाऊं शकेल.

थोडक्यांत म्हणजे कामगारक्रांतीचा एक हेतु शैक्षणिक स्वरूपाचा आहे. लोकांच्या मनाची ठेवण बदलून त्यांना समाजाभिमुख व आदर्श बनवावें लागेल. नवीन तऱ्हेचा म्हणजे समाजवादी तत्त्वांना वाहिलेला, समाजवादी शासनाखालीं आणला गेलेला आणि समाजवादी विचारांच्या व्यक्तींचा बनलेला समाज निर्माण करणें हेंच खरोखरी कामगारक्रांतीचें ध्येय आहे. लेनिनची सुधारून वाढविलेली आवृत्ति शोभणाऱ्या जोसेफ स्टालीननें या बाबतींत संशयाला कसलीहि जागा ठेवली नाहीं. अमेरिकन कामगारांच्या एका शिष्टमंडळानें विचारलेल्या एका प्रश्नाचें उत्तर देतांना १९२७ सालीं त्यानें असें म्हटलें कीं, "कामगार वर्गाच्या हुकूमशाहीचा कालखंड हा बराच मोठा असेल. या कालखंडांत क्रांतिकारी संघर्ष आणि यादवी युद्धें घडून येतील व त्याचवेळीं सत्ताधारी कामगार वर्ग जुन्या भांडवलशाही समाज-पद्धतीच्या जागीं वर्गविहीन व राज्यसंस्थाहीन अशी नवी समाज रचना निर्माण करण्यासाठीं म्हणून आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रांत नव्या नव्या संघटनात्मक मार्गांचा अवलंब करील." मार्क्सवाद्यांची क्रांतीची ही तिसरी अवस्था म्हणजेच सर्वाधिकाऱ्यांनीं रंगविलेलीं वर्गविहीन व राज्य-विहीन अशा समाजाचीं भूतलावर स्वर्ग उतरविण्याचीं स्वप्नें होत.

नव्या मानवाचें—किंवा मानवाच्या नव्या स्वरूपाविषयींचें—स्वप्न हें असें आहे. तें साकार करण्याचें काम कामगार वर्गाच्या पुढाऱ्यांचें आहे. मग त्यासाठीं त्यांना हिंसक आणि अत्याचारी मार्गांचा कां अवलंब करावा लागेना ! समाजाचा एक घटक या नात्यानें मनुष्य पूर्णावस्थेला नेला जाऊं शकेल अशी नितांत श्रद्धा असलेल्या अठराव्या शतकांतील विचारसरणी-तूनच हें स्वप्न उदयास आलें होतें. या स्वप्नांत रंगविलेला माणूस अद्याप अस्तित्वांत आलेला नसला तरी प्रत्येक व्यक्तिमात्रांत जणूं तो सुप्तावस्थेंत

वसत असतो, असा तीं स्वप्नें रंगविणाऱ्यांचा दावा असतो. मार्क्सवाद हें-देखील अशाच प्रकारचें एक स्वप्न आहे. फरक इतकाच कीं, त्याचा मुखवटा अधिक आधुनिक आहे, परंतु त्याची बैठक मात्र प्रेषिताचीच आहे. बुद्धि-वादाच्या किंवा तर्काच्या कसोटीला तो उतरूं शकणार नाहीं. त्याचा मुख्य हेतु माणसाचें नखशिखांत परिवर्तन घडवून आणणें हाच आहे आणि हा हेतु मुख्यतः धार्मिक स्वरूपाचाच म्हटला पाहिजे. हा धर्म ऐहिक आणि सामाजिक स्वरूपाचा आहे. ख्रिस्ती धर्मामधूनच यांतील अनेक कल्पना घेण्यांत आलेल्या असल्या तरी ख्रिस्ती धर्माशीं याचा तीव्र संघर्ष येणें अगदीं अपरिहार्य आहे. कारण या मार्क्सवादी नव्या धर्मानुसार मोक्ष मिळतो तर तो आत्म्याला नव्हे तर माणसाच्या पार्थिव शरीराला. फार काय, पण पुढें जाऊन असेंदेखील म्हणतां येईल कीं, या धर्मांत समाज पुरुषाच्याच मुक्तीची कल्पना असून ती सामाजिक परिभाषेंतील भौतिक मोक्षाची आहे. टॉम पेनच्या काळांत ऐहिक पूर्णावस्थेच्या ज्या कल्पना पुढें आल्या त्यामुळें ती विचार-सरणी स्वीकारणारांना जवळ जवळ नास्तिकवादाचाच स्वीकार करावा लागला. त्याच ऐहिक पूर्णावस्थेच्या कल्पनांतून आतां " नास्तिकतेचा धर्म " उदयास आला असून तीच कम्युनिस्ट सत्तेमागील प्रेरक शक्ति आहे.

आधुनिक कम्युनिझम आणि अठराव्या शतकांतील सर्वाधिकारी क्रांति यांच्यांतील दुवा जोडून दाखविणारा एक पुरावा इतिहासावरूनहि मिळूं शकतो. रोबिस्पिअरच्या मृत्यूनंतर फ्रान्समध्यें खराखुरा आदर्श समाज निर्माण करण्याचा अखेरचा प्रयत्न करून पाहण्यांत आला. बाबूव्हिस्ट चळवळ म्हणून तो प्रयत्न ओळखला जातो. फ्रान्सचा नोगेल बाबफ आणि त्याच्या इतर सहकार्यांच्या मतें " फ्रेंच राज्यक्रांति ही त्याहूनीह गंभीर आणि भव्य अशा अखेरच्या क्रांतीची नांदी होती." बाबफनें असें लिहून ठेवलें आहे कीं, मानवाचें सुख हेंच या महान् क्रांतीचें उद्दिष्ट असून तें सुख मिळण्याची खात्री करून घेण्यासाठीं अत्यंत कठोर अशी समानता प्रस्थापित होणें आवश्यक आहे. समानतेचा अर्थ मुख्यत्वेंकरून आर्थिक समानता असाच होता. कारण एकापेक्षां अधिक पोटें असलेला एक तरी माणूस आढळेल का ?

या बाबूव्हिस्ट चळवळीला ' समतावाद्यांचा कट ' असें संबोधिलें जात असे. त्यांनीं आपल्या चळवळीचा सविस्तर आराखडा तयार केला होता.

विसाव्या शतकांतील आजच्या कार्यक्रमाशीं त्याचें कित्येक बाबतींत साम्य असल्याचें दिसून येतें. पूर्वींच्या विचारवंतांच्या आर्थिक स्वातंत्र्यासंबंधींच्या कल्पना बाजूस सारून बाबूव्हिस्टांनीं आधुनिक कम्युनिझमचा पाया घातला. तोपर्यंत जहाल क्रांतिकारकांमध्यें जमिनीच्या वाटपाची मागणी अत्यंत लोकप्रिय झालेली होती. परंतु बाबूव्हिस्टांनीं ती झिडकारून टाकली. "आमची मागणी ही त्याहीपेक्षां उच्च आणि अधिक समानतेची आहे. आमची कल्पना सामुदायिक संपत्तीची आहे...जमीन ही कोणाच्याच मालकीची नाहीं. आमचा असा दावा आहे कीं, जमिनींतून निर्माण होणाऱ्या उत्पादनाचा सामुदायिक रीत्या उपभोग घेतां आला पाहिजे." त्याचप्रमाणें दुसऱ्याच्या श्रमावर जगणें त्यांना मान्य नव्हतें. त्यांचा दंडक असा होता कीं, सर्वांनीं श्रम केले पाहिजेत, आणि जीवनासाठीं लागणाऱ्या दैनंदिन गरजांचें वाटप अशातऱ्हेनें केलें जावें कीं, त्यायोगें कोणालाहि धनसंचय करतां येऊं नये. कोणाहि व्यक्तीला परदेशाशीं व्यापार करतां येणार नाहीं. तो सरकारच्याच हातीं सोंपविला जाईल आणि या मूलभूत सिद्धांतांत पुढेंमागें कसलाहि फेरफार करतां येऊं नये म्हणून अत्यंत कडव्या स्वरूपाची शैक्षणिक व राजकीय चौकट तयार केली जावयाची होती. हे समतावादी आपल्या जाहीरनाम्यांत म्हणतात, "मूल जन्माला आल्यापासून सरकार त्याचा जो ताबा घेईल तो तें शेंवटीं मरेपर्यंत कधींहि सोडणार नाहीं."

समतावाद्यांच्या या कटाचा शोध लागून बाबफला आणि त्याच्या इतर अनेक सहकाऱ्यांना फांशीं देण्यांत आलें. तथापि बाबूव्हिस्ट चळवळ ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची समजली जाते. कारण तिच्यायोगें अठराव्या शतकांतील सर्वाधिकारी क्रांतींतील अपरिहार्य उणीवा उजेडांत आल्या. सर्वाधिकारवाद्यांनीं मानवासंबंधीं स्वीकारलेली भूमिका इतकी स्वप्नाळू आणि एकांतिक आदर्शवादी होती कीं, त्यांना राजकीय सत्ता ताब्यांत ठेवणें केव्हांच शक्य झालें नाहीं. राजकीय विचारवंतांनीं चालविलेली एक विरोधी चळवळ ह्यापेक्षां अधिक प्रतिष्ठा ती कधीं मिळवूं शकली नाहीं. त्या चळवळींतील कांहीं तत्त्वांचा निरनिराळ्या अल्पसंख्य गटांनीं थोडाफार अंगीकार केला हें खरें असलें तरी तिला सार्वत्रिक मान्यता कधींच लाभली नाहीं. परंतु सर्वाधिकारवाद्यांच्या दृष्टिकोणाचा युरोपखंडाच्या राजकारणावर खूपच प्रभाव

पडला आणि त्यांतूनच आश्चर्यकारक असे नानाप्रकारचे समाजवादी पंथ आणि पक्ष उदयास आले. परंतु रशिया आणि त्याच्या अंकित असलेलीं राष्ट्रें ह्यांच्याखेरीज यूरोपांतल्या इतर कोणत्याही देशांत सर्वाधिकारी क्रांति कधींच घडून आली नाहीं. कारण, ह्या देशांत सनातनी किंवा स्वातंत्र्यवादी शक्ति या एकेकट्या किंवा संयुक्तपणें सर्वाधिकारवादी क्रांतीचा लोंढा परतवून लावण्याइतक्या समर्थ होत्या.

मार्क्स ज्यावेळीं ब्रिटिश म्युझियममध्यें अर्थशास्त्राचें अध्ययन करीत होता, त्यावेळीं सर्वाधिकारवादी क्रांति अगदीं ओहोटीला लागली होती. निरनिराळे समाजवादी गट एकमेकांशीं झगडण्यांत दंग होऊन गेले होते. तत्त्वज्ञान किंवा प्रत्यक्ष कार्यक्रम या दोहींबाबत त्यांच्यात तीव्र मतभेद होते. ज्याच्यावर साऱ्या क्रांतीची उभारणी करण्यांत आली होती, त्या अठराव्या शतकांतील बुद्धिवादाचीच औद्योगीकरणामुळें वाताहत होऊन गेली होती. 'स्वातंत्र्य, समता, आणि बंधुत्व' ही क्रांतीची प्रेरणा देणारी अठराव्या शतकांतील त्रयी सामुदायिक उत्पादनाच्या रेट्यापुढें अर्थशून्य व निष्प्रभ बनली होती. मूठभर लोकांच्या हातांत धनाच्या राशींचा संचय होऊं लागला होता. परंतु इतकी अवाढव्य संपत्ति निर्माण करणारी उत्पादन पद्धति समान वाटपाचा मात्र कोणताही मार्ग दाखवून देऊं शकत नव्हती. त्यामुळें 'नवा' सामाजिक मानव जन्माला येईल आणि तो समाजांतील सर्व व्यक्तींचें कल्याण साधूं शकणाऱ्या संस्था निर्माण करील हें क्रांतीचें मूळ ध्येय पूर्वीं कधीं नव्हतें इतकें असाध्य वाटूं लागलें होतें. कारण, अशा संस्था निर्माण करण्याची सत्ता कोठें होती? आणि ती आहे असें क्षणभर मानलें तरी त्या संस्था निर्माण कशा करावयाच्या तें कोणाला माहीत होतें?

अठराव्या शतकांतील या स्वप्नदर्शी क्रांतिकारकांचीं ध्येयें आणि एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला प्रत्यक्ष घडून आलेल्या सामाजिक घटना यांमधील ही भयानक पोकळी कशी भरून काढावयाची, तें कार्ल मार्क्सनें दाखवून दिलें आणि तीच त्याची विशेष कामगिरी होय. सर्वाधिकारवादी क्रांतीचा पाया असलेला जुना "प्रगत" बुद्धिवादी दृष्टिकोण झुगारून त्या जागीं त्यानें मानवासंबंधींच्या सर्वस्वी भिन्न अशा कल्पना पुढें मांडल्या.

आपल्या कल्पना शास्त्रशुद्ध आहेत, असा त्याचा दावा होता. .अर्थात् तो निराधार होता ही गोष्ट निराळी. मार्क्स्चें हें सर्वाधिकारवादी तत्त्वज्ञान त्या युगांतील सहज प्रेरणांतून विकसित झालेलें होतें. निव्वळ तर्कशास्त्राची कसोटी लावून त्याचें वैय्यर्थ्य सिद्ध करतां आलें नसतें. मानवासंबंधीचा त्याचा दृष्टिकोण त्या काळच्या औद्योगिक विकासाइतकाच वैशिष्ट्यपूर्ण होता. क्रांतिकारक आतां नव्यानें संपादन केलेल्या साऱ्या ज्ञानभांडाराचा मुक्त हस्तानें उपयोग करून घेऊं लागले. एंगल्सनें आपल्या 'डायलेक्टिक्स् ऑफ नेचर' या पुस्तकांत या ज्ञानभांडाराचें मोठें आकर्षक वर्णन केलें आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय आणि विवेक यासंबंधीं पसरलेल्या वैचारिक धुक्यांतून क्रांतीच्या सामाजिक आणि आर्थिक सिद्धांतांची सोडवणूक करून त्यांना "विज्ञानाची" भक्कम बैठक देण्यांत आली. मानव आणि विश्व या संबंधींच्या शास्त्रीय अनुमानाकडे औद्योगिक जगांतील प्रत्येक व्यक्तीहि जणुंकांहीं एका अंतःप्रेरणेनें खेचली जात होती. परिणामांची फिकीर न करतां विज्ञानाची कांस धरण्याची आधुनिक मानवाची ईर्ष्या आणि ईश्वरी संकेतानुसार आदर्श मानवाची निर्मिति करण्यासाठीं आत्मसर्मपण करण्याची क्रांतिकारी परंपरा या दोहोंची मार्क्सनें अभूतपूर्व सांगड घालून दाखविली.

स्वतंत्र जगाच्या आड येणाऱ्या शक्तींचें स्वरूप आणि आकारमान हें अशा प्रकारचें आहे. मार्क्स्वादाकडे दुर्लक्ष केलें जाऊं नये म्हणून त्याबाबतचें विवेचन येथवर करण्यांत आलें. कारण मार्क्स्वादी विचारसरणी ही अकस्मात् योगायोगानें पुढें आलेली नाहीं. कांहींजण समजतात त्याप्रमाणें मार्क्स्वाद म्हणजे नुसतें शब्दजंजाळ किंवा पाखंडही नव्हे. मार्क्स्वादी विचारसरणीचीं पाळेंमुळें पाश्चात्य संस्कृतींत फार खोलवर रुजलीं असून युरोपीय इतिहासांतील कांहीं नामांकित व्यक्तींचा वारसा तिनें पुढें चालविला आहे. इतकेंच नव्हे तर पाश्चात्यांच्या मोठेपणांत ज्या ज्या विचारांमुळें भर पडली ते सर्व बीजरूपानें मार्क्स्वादांत अंतर्भूत आहेत. शास्त्रीय कल्पना आणि मानवानें आजवर उराशीं बाळगलेल्या राजकीय आकांक्षा यांची मार्क्सनें सांगड घालून दाखविली आहे. मग ती चूक असो वा बरोबर असो किंवा ती तर्काच्या कसोटीला उतरो वा न उतरो!

म्हणून मार्क्स्वादाकडे उपेक्षणीय किंवा अकस्मिकपणें निर्माण झालेला शत्रु म्हणून पाहून चालणार नाहीं. आपल्या संस्कृतींतील उणीवांमुळेंच त्याची वाढ होत असून आपली सारी बैठकच त्यामुळें हादरून जात आहे, याकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं. या शत्रूचा मुकाबला करावयाचा असेल तर तो केवळ आर्थिक आणि लष्करी डावपेचांनीं करतां येणार नाहीं. तर त्यासाठीं मानवाच्या सत्यस्वरूपाची ज्यायोगें ओळख पटूं शकेल अशा तऱ्हेची बौद्धिक आणि सांस्कृतिक आघाडी आपल्याला उघडावी लागेल. मार्क्स्वादाचें हें आव्हान स्वीकारावयाचें असेल तर त्याच्या मुळाशीं असलेल्या सिद्धांतांचा आतां आपल्याला अधिक तपशिलवार परिचय करून घेतला पाहिजे.

* * *

## २ : : विरोधविकासवाद

मार्क्स्वादांत गूढ आणि कर्णकटु शब्दांचा अमूप भरणा असून त्यांतील कांहीं शब्दांकडे तर गंभीरपणें लक्ष द्यावें असेंसुद्धां वाटत नाहीं. अशा शब्दांपैकीं सामान्य माणसाच्या दृष्टीनें विचित्र पण कदाचित् तितकाच महत्त्वाचा शब्दप्रयोग जर कोणता असेल, तर तो म्हणजे "विरोधविकास". मार्क्सनें मुळांत हा शब्दप्रयोग जगांतील एक महान् तत्त्वज्ञ जॉर्ज विल्हेल्म फ्रीड्रीग हेगेल याचेपासून उचलला. विकास हें हेगेलच्या विचारसरणीचें मध्यवर्ति सूत्र होतें. त्यानें असें दाखवून दिलें कीं, माणसाच्या अनुभवाची सुरुवात नेहमीं एका विशिष्ट "सिद्धान्तानें" होत असते. या सिद्धान्ताचें किंवा अनुभवाचें वैशिष्टय असें असतें कीं, सुरुवातीला संपूर्ण सत्य किंवा निरपवाद वास्तव असें वाटलें तरी तें तसें नसतें. वस्तुतः तो अनुभव किंवा तो सिद्धान्त हें अर्धसत्य किंवा वास्तवतेचा एक भाग असतो. त्या सिद्धान्ताची आणखी छाननी केली किंवा अनुभवाचा आणखी मागोवा घेत गेलें तर, पहिल्याच्या बरोबर विरुद्ध निष्कर्ष निघूं लागतात. यालाच 'प्रतिसिद्धान्त' म्हणतात. आपण अशी कल्पना करूं कीं, 'मन मानेल तसें वागणें' असा आपला सुरुवातीचा सिद्धान्त ( Thesis ) आहे. पण थोड्याच वेळांत आपल्याला

असें आढळून येईल कीं, प्रत्येक जण जर मन मानेल तसें वागूं लागला तर, त्यामुळें सर्वांचेंच स्वातंत्र्य धोक्यांत येईल. म्हणून त्यांतून पहिल्याच्या नेमका उलट निष्कर्ष निघतो, तो असा कीं, प्रत्येक व्यक्तीच्या, मन मानेल तसें वागण्यावर कांहीं निर्बंध लादले तरच स्वातंत्र्य लाभूं शकेल. हा झाला त्या सिद्धान्ताचा प्रतिसिद्धान्त ( Antithesis ). या दोन्ही सिद्धान्तांत सत्याचा अंश आहे. परंतु त्यांत परस्पर संघर्षहि आहे. या परस्पर संघर्षालाच हेगलनें, ' डायलेगो ' म्हणजे वादविवाद या ग्रीक शब्दावरून, ' डायलेक्टिकल ' म्हणजे ' विरोधविकासी ' अशी संज्ञा दिली.

पण ही क्रिया येथेंच थांबत नाहीं. सिद्धांत आणि प्रतिसिद्धांत यांच्या परस्पर संघर्षांतून एक नवीनच तत्त्व पुढें येतें. यालाच समन्वय (Synthesis) असें म्हणतात. यांत सिद्धांत आणि प्रतिसिद्धांत यांचा तर समावेश झालेलाच असतो, पण त्याशिवाय, तें तत्त्व त्या दोहोंतून निर्माण झालेलें असूनहि भिन्न आणि नवें असें असतें. व्हि. ॲडोराट्स्किनें म्हटल्याप्रमाणें प्राचीन ग्रीसमध्यें असें मानलें जात असे कीं,....वादविवादाच्या ओघांत....वाद करणारांच्या मनांत स्थित्यंतर घडून येऊन एखादें नवीन आणि उच्च असें तत्त्व निष्पन्न होतें.' वर दिलेल्या उदाहरणांतील समन्वय सर्व अमेरिकनांच्या परिचयाचा आहे- तो म्हणजे स्वातंत्र्य हें सर्वस्वी अनिर्बंधहि असतां कामा नये; किंवा निर्बंधांनीं तें सर्वस्वी जखडलेलेंहि असतां कामा नये. तर परस्परांना मान्य असतील अशा तऱ्हेचीं कांहीं मर्यादित बंधनें घातलीं गेलीं तरच स्वातंत्र्य उपभोगतां येतें. याबाबत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे या समन्वयांत खरोखरीच परिवर्तन किंवा विकास घडून आलेला असतो. आपण ज्याला स्वतंत्र जीवनपद्धति असें म्हणतों, ती केवळ मनःपूत आचरणांतून, त्यावर लादलेले निर्बंध वजा केल्यानें सिद्ध होत नाहीं. मनःपूत आचरण आणि त्यावरील निर्बंध यांच्यांतील विरोधांतून विधायक स्वरूपाचा मार्ग काढून देणारी अशी ती एक निराळीच जीवनपद्धति असते. निव्वळ सिद्धांत किंवा प्रतिसिद्धांत यांच्यापेक्षां या समन्वयांतून आपणाला वास्तवाची जास्त सखोल जाणीव होते. पण त्यामुळें अंतिम सत्याचें स्वरूप आकलन होतेंच असें मात्र नाहीं. आणि हा समन्वय हा सुद्धां एक सत्यांशच असतो,

असें ऐतिहासिक विकासक्रमावरून दिसून येतें. साहजिकच पुन्हां त्याचा प्रति-सिद्धांत उद्भवणें क्रमप्राप्त असतें. परिणामीं एक नवा संघर्ष निर्माण होतो व तो सोडविण्यासाठी पुन्हां नव्या आणि पहिल्यापेक्षां अधिक परिपूर्ण अशा समन्वयाची जरूर भासूं लागते. हेगेलला अभिप्रेत असलेल्या "विकासा"चा अर्थ आणि स्वरूप हें असें आहे.

मानवी मनाला प्रतीत झालेल्या वास्तवाच्या घडणीचें सूक्ष्म आकलन ह्यांत आहे, हें कबूल करण्यासाठीं एखाद्यानें हेगेलचें अनुयायित्व पत्करून त्याच्या तत्त्वज्ञानाची ओढाताण केली पाहिजे असें नाहीं. इतिहासाचा प्रवाह आणि स्थित्यंतरें यांतून सिद्धान्त प्रतिसिद्धांत आणि समन्वय उदित होतात. इतिहासांतील हीं स्थित्यंतरें किंवा घटना सर्वस्वी अर्थशून्य असत नाहींत तर त्यांतूनच इतिहासांतील निरनिराळ्या समस्यांचा उलगडा होत असतो, असें आश्वासन त्यायोगें मिळूं शकतें. त्या त्या परिस्थितींत निर्माण झालेला संघर्ष किंवा विरोध दूर करुन उच्च पातळीवरील प्रगतीचा टप्पा गाठण्यांत तो एक तात्पुरता मार्ग असतो आणि हें चक्र अव्याहतपणें सुरुं असतें. यावरून आपल्याला हें दिसून येईल कीं, इतिहास हा कधीं स्थिर किंवा गतिशून्य नसतो तर विरोधविकासवादी प्रक्रियेनुसार संपन्न आणि अधिकाधिक प्रगत अशा तऱ्हेचे अनुभव तो आपल्याला सतत प्राप्त करून देत असतो.

हेगेलच्या मतें विश्वाचें रहस्य चित् तत्त्वांत साठविलेलें आहे. परंतु त्याच्या मतें हें चित्तत्त्व म्हणजे एखादी पारलौकिक किंवा दूरवर्ती वस्तु नाहीं; तर प्रत्यक्ष अनुभव होय. ए. के. रॉजर्सनें म्हटल्याप्रमाणें हेगेलच्या दृष्टीनें "अनुभूतीची प्रक्रिया म्हणजेच वास्तव, म्हणजेच ईश्वर + + + + + आणि म्हणून ईश्वराचें अस्तित्व निर्विवाद असतें. कारण तें वास्तवांतूनच उद्भवलेलें असतें...........चित्तत्त्व आणि त्यासंबंधीचे नियम हे विश्वाचें खरें मूलतत्त्व असून त्या अनुरोधानेंच यच्चयावत् सर्व गोष्टींचें स्वरूप सम-जावून घेतलें पाहिजे." विवेक हें चित्तत्त्वाचें अंगभूत वैशिष्ट्य असतें आणि हा विवेक विरोधविकासाच्या रूपानें व्यक्त होतो. हेगेलची तत्त्वप्रणाली ही तांत्रिक अर्थानें बोलावयाचें तर मूलतः आदर्शवादी किंवा चैतन्यवादी आहे हें यावरून दिसून येईल.

परंतु कार्ल मार्क्सनें या सर्वालाच फाटा दिला. त्यानें हेगेलची चित्तत्त्वाची कल्पना " अशास्त्रीय " म्हणून त्याज्य ठरविली. आणि त्याजागीं त्याच्या नेमकी उलट कल्पना प्रसृत केली. त्यालाच तो ' जडतत्त्व ' अशी संज्ञा देतो. सत्य हें फक्त भौतिक म्हणजे जडवस्तुविषयकच असूं शकतें, असें तो आग्रहानें प्रतिपादन करतो. साहजिकच वास्तवाची यथार्थ मीमांसा जर कशामुळें होऊं शकणार असेल तर ती चिद्वादानें होणार नाहीं, जडवादानेंच होईल.

जडवस्तुविषयक किंवा भौतिक असा शब्द वापरतांना मार्क्स् आणि एंगल्स यांना नेमकें काय ध्वनित करावयाचें होतें ? मध्य एकोणिसाव्या शतकांतील विज्ञानाच्या दृष्टीनें बोलावयाचें तर, यासंबंधींची त्यांची कल्पना अत्यंत सूक्ष्म बालिश अशी आहे. त्यांच्यामतें जडवस्तु ही सदैव गतिमान असलेल्या अत्यंत सूक्ष्म, अणुरेणूंपासून बनलेली असली पाहिजे. जोसेफ स्टालीन एके ठिकाणीं म्हणतो, " मार्क्स्वादी भौतिक तत्त्वज्ञानानुसार जडवस्तु, निसर्ग किंवा जें आहे तें आपल्या मनापेक्षां निराळें आणि मनाच्या पलिकडचें असें जें वस्तुनिष्ठ सत्य आहे. संवेदना, विचार आणि मन यांचा उगम जड वस्तूंतून होतो. म्हणून जडवस्तु हें मूळ कारण आणि मन हें दुय्यम ठरतें. कारण मन हें जडवस्तूचें प्रतिबिंब व वास्तवाचें प्रतिरूप असतें. जडवस्तूच्या अतिशय विकसितावस्थेंत मेंदू हें विचारेंद्रिय निर्माण होतें. अशा प्रगत जडतत्त्वाचा परिपाक म्हणजेच विचार होय. "

मार्क्सवादाचा प्रवक्ता म्हणून स्टालीनचा निर्देश केल्याबद्दल अनेक मार्क्सवादी आक्षेप घेतील. कारण बौद्धिक क्षेत्रांत स्टालीनची फारशी कोणी दखल घेत नाहीं. उलट स्टालीननें ( आणि लेनिननेंही ) " खऱ्या " मार्क्सवादी आंदोलनाची वाताहत करून टाकली अशी समजूत असल्यानें बरेच मार्क्सवादी हे स्टालीनवादाचा निषेधच करतात. अशा लोकांत इंग्लंडांतील फेबियन समाजवादी व जगांतील निरनिराळ्या भागांतील लोकशाही समाजवाद्यांचा अंतर्भाव होतो. ते मार्क्सवादाला सौम्य आणि लोकशाहीनिष्ठ सुधारणावादाचें स्वरूप देत असतात. ट्रॉट्स्कीवादी किंवा जहाल गटांतील इतर स्टालीनविरोधी क्रांतिकारकांचाही–ते स्टालीनच्या तडाख्यांतून बचावले असतील तर–अशा लोकांत समावेश होतो. स्टालीनची

गणना विचारवंतांत खासच केली जात नाहीं. परंतु आज आपल्याला कम्युनिझमचें जें स्वरूप दिसतें तें मुख्यतः त्याच्यामुळेंच प्राप्त झालेलें असल्याकारणानें आणि आपल्या पुढील आपत्ति दूर करण्याच्या दृष्टीनें प्रत्यक्ष मार्क्सचें मत काय होतें यासंबंधीं काथ्याकूट करीत बसण्याऐवजीं स्टालीननें त्यासंबंधीं काय म्हटलें, याचा विचार करणें हेंच अधिक महत्त्वाचें ठरणार आहे. शिवाय एंगल्सनें स्वतःचें आणि मार्क्सचें म्हणून जें मत अनेक ठिकाणीं मांडलेलें आहे त्यापैकींच एक उतारा स्टालीननें या ठिकाणीं उद्धृत केलेला आहे. "आपण स्वतः ज्यांत वावरतों तें भौतिक आणि इंद्रियगोचर जग हेंच एक सत्य आहे....आपली जाणीव आणि विचार हे इंद्रियातीत वाटत असले तरी अखेर ते भौतिक म्हणजेच, मेंदू या शारीरिक इंद्रियापासूनच निर्माण झालेले असतात. मनापासून जडवस्तु निर्माण होत नाहीं, तर मन हीच मुळीं जडवस्तूची सर्वश्रेष्ठ निर्मिति होय."

'वास्तव सत्य' हें चित्स्वरूप न मानतां जड व भौतिक आहे असें मानलें पाहिजे, हा सिद्धान्त हेगेलच्या सिद्धांतांच्या पूर्णपणें विरुद्ध आहे, हें मान्य करण्यावाचून कोणाहि मार्क्सवाद्याला गत्यंतर नाहीं. परंतु, हेगेलच्या सिद्धांताला असें उफराटें स्वरूप दिलें तरी त्यामुळें सत्याप्रत पोंहोंचण्याची हेगेलची पद्धति त्याज्य ठरवली गेली नाहीं. पण मार्क्सवादी सिद्धांतानुसार 'जें आहे' तें जड असल्याकारणानें 'विरोधविकास' या शब्दप्रयोगाचा अर्थ फार निराळा होऊन बसतो. जड हेंच स्वतः विरोधविकासी ठरतें. आणि जडवस्तु (अस्तित्व) म्हणजेच विरोधविकास अशीच जणूं त्याची व्याख्या बनते. मार्क्स, एंगल्स किंवा त्यांचे अनुयायी ह्यांपैकीं कोणी एकानेंहि जडवस्तु ही अशाप्रकारें विरोधविकासी 'कां' असते त्याचा खुलासा केलेला नाहीं. विरोधविकासी प्रक्रिया हा जडवस्तूचा स्वभावविशेष आहे, असेंच ते धरून चालतात आणि 'जडवस्तु' व विरोधविकासी प्रक्रिया हे शब्दप्रयोग जवळजवळ समानार्थी आहेत असेंच ते मानतात.

आधुनिक काळांतील माणसासंबंधींच्या अत्यंत आक्रमक अशा सिद्धांताचें वस्तुनिर्णयवादी किंवा मूलविज्ञानवादी अधिष्ठान हें अगदीं थोडक्यांत अशा स्वरूपाचें आहे. या मानवी आणि सामाजिक सत्यासंबंधीं जी सिद्ध करतां येण्यासारखीं आहेत असा त्यांचा दावा आहे—अधिक विवेचन करण्या-

पूर्वी ज्यावर तीं आधारलेली आहेत त्या मूलविज्ञानवादासंबंधीं एक मुद्दा लक्षांत घेतला पाहिजे. कारण त्याचें महत्त्व ह्या पुढच्या विवेचनांत आपल्या अधिकाधिक लक्षांत येईल.

मार्क्सवादी विरोधविकासी प्रक्रियेचे कांहीं ठराविक नियम आहेत. परंतु त्यापैकीं फक्त एकाच नियमाची आपणाला या ठिकाणीं दखल घ्यावी लागणार आहे. हा नियम म्हणजे संख्यात्मक स्थित्यंतरामुळें गुणात्मक स्थित्यंतर होतें हा होय. ( उदा. द्रवपदार्थाचें घनपदार्थांत होणारें रूपांतर ). एंगेल्स म्हणतो कीं, रसायनशास्त्रांत या नियमाची अत्यंत नाट्यपूर्ण रीतीनें प्रचीति पहावयास मिळते. ऑक्सिजनच्या बाबतींत नेहमीप्रमाणें दोन अणूंऐवजीं तीन अणूंचा संयोग झाला तर ओझोनची निर्मिति होते. प्राणवायूच्या नेहमीच्या गुणधर्मापेक्षां ओझोनचे गुणधर्म फार निराळे असतात आणि त्याच्या प्रतिक्रियाही प्राणवायूपेक्षां निराळ्या स्वरूपाच्या असतात. अणूपासून परमाणूकडे जातांना तर या सिद्धांताची सत्यता अधिकच प्रत्ययास येते. प्राणवायु, गंधक यासारख्या निरनिराळ्या मूलद्रव्यांत प्रचंड गुणात्मक स्थित्यंतरें मानवाला आढळून येतात. रसायन आणि पदार्थविज्ञानशास्त्राच्या आधारें हें सिद्ध करून दाखवितां येतें कीं, अणूंच्या वजनांतील फरकामुळें हें स्थित्यंतर होतें आणि हा वजनांतील फरक अणूंच्या केंद्राच्या संख्येमुळें झालेला असतो. त्याचा परिमाण इलेक्ट्रॉन्सच्या संख्येंत पडलेल्या फरकावरूनहि दिसतो. शुद्ध विज्ञानाच्या दृष्टीनें प्राणवायूंतील किंवा गंधकांतील केंद्रें आणि इलेक्ट्रॉन्स हे गुणदृष्ट्या सारखेच असतात. परंतु या मूलद्रव्यांत जो फरक आढळून येतो, तो त्यांच्यांतील अणूपरमाणूंच्या संख्येमुळेंच.

भौतिकवादी सिद्धांताच्या दृष्टीनें हा नियम अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण त्यामुळें भौतिक शास्त्राला आकलनीय असणाऱ्या अशा वास्तवाच्या किंवा सत्याच्या कल्पनेला पाठिंबा मिळतो. ह्या शास्त्राचा संबंध हा मुख्यतः परिमाणाशीं म्हणजेच संख्यात्मक घटनांशीं असतो. जीवनांत येणाऱ्या सर्व अनुभवांची संगति–उदा० रंगाची संख्या जर भेदाच्या आधारें लावून दाखवितां आली तर पृथक्करण आणि मापन हेंच काय तें सत्यशोधनाचें स्वरूप होऊन बसेल, आणि त्याची ठेकेदारी विज्ञानाच्या हातीं जाईल. जीव किंवा चैतन्य या गोष्टी जरी जड वस्तूंपेक्षां गुणात्मकरीत्या भिन्न असल्या

तरी प्रत्यक्षतः जड तत्त्वांच्याच संख्यात्मक स्थित्यंतरांतून त्या निर्माण होतात, असें अनुमान काढणें वावगें होणार नाहीं. अशा तऱ्हेनें जड वस्तूंचें पृथक्करण करणाऱ्या शास्त्रांच्या आधारें जीवाचें स्वरूप आणि उत्पत्ति यांची संपूर्ण संगति लावून दाखवितां येईल. आध्यात्मिक सौंदर्यात्मक, इतकेंच नव्हे तर नैतिक बाबींना देखील त्यामुळें दुय्यम स्थान प्राप्त होतें. लेनिन म्हणतो, " जें जें शारीरिक, भौतिक, नैसर्गिक, प्रत्यक्ष आणि जड तें तें प्रधान आणि जें जें मानसिक, संवेदनात्मक, जाणीवयुक्त तें तें दुय्यम ठरतें. " साहजिकच मानवी संघर्षाचा—जीवनाचा सारा अर्थच वरील विचारसरणीमुळें अजिबात बदलून जातो. सत्य, शिव, सुंदर, प्रेम, त्याग, प्रतिष्ठा, उद्धाराचा आर्य अष्टांगमार्ग, ख्रिस्ती धर्मातील मुक्तीचें स्वप्न, ईश्वराशीं तादात्म्य पावण्याची इस्लामची कल्पना हीं सर्व उच्च आणि उदात्त तत्त्वें किंवा ज्या महान् ध्येयासाठीं मानवानें मोठमोठे लढे दिले आणि आत्मसमर्पणाची तयारी दाखविली तें सर्व मिथ्या ठरतें. वास्तवावर पसरलेलें आवरण जडाच्या उद्वेगांतून बाहेर फेकलें गेलेलें कांहीं तरी ठरतें. त्यांनीं इतिहासांत जी एवढी प्रचंड कामगिरी बजावली, नव्हे, प्रत्यक्ष इतिहास घडविला, तो तीं ध्येयें सत्य होतीं म्हणून नव्हे, तर मानवानें त्यांच्यावर विश्वास ठेवण्याची चूक केली म्हणून. इतिहासांतील सत्य हें मार्क्सवाद्यांच्या दृष्टीनें अगदीं निराळेंच असतें.

* * *

## ४ : : सामाजिक अक्षरतत्त्व

विरोधविकासी प्रक्रियेचें विवेचन करतांना हेगेलनें इतिहासाकडे विशेष लक्ष पुरविलें होतें. कार्ल मार्क्सनें देखील इतिहासांतील विरोधविकासी प्रक्रिया पाहिली. परंतु सत्याची सांगड चित्तत्त्वाऐवजीं जडवस्तूंशीं घातल्या कारणानें इतिहाससंबंधींचे त्याचे निष्कर्ष हेगेलपेक्षां अगदीं निराळे निघाले. सत्य म्हणजे जर जडवस्तूच असेल तर, ऐतिहासिक सत्यें हीं देखील जडवस्तूंच्या संदर्भात म्हणजेच भौतिकतावादी दृष्टीनें मांडून दाखवितां येतील. त्यांचीं किती तरी उदाहरणें देतां येतील. उदाहरणार्थ, भौगोलिक आणि

हवामानविषयक परिस्थितीचे इतिहासवर निश्चितपणें परिणाम घडून येतात; आणि भौगोलिक किंवा हवामानविषयक परिस्थिति म्हणजे भौतिक घटनाच होत. लोकसंख्या, नैसर्गिक साधनसामुग्री, आनुवंशिक वैशिष्ट्यें इ. देखील अशाच स्वरूपाच्या बाबी आहेत. मार्क्सवादी त्यांचें महत्त्व मान्य करीत असले तरी त्यांना प्राधान्य देत नाहींत. त्यांच्या मतें प्रधान किंवा सर्वांत महत्त्वाची अशी एकच भौतिक बाब असूं शकते, आणि ती म्हणजे **उत्पादन पद्धति**. मार्क्सवाद आणि आधुनिक कंम्युनिझम यांमधील मुख्य सूत्र हेंच आहे.

मार्क्सवादी विचारसरणींचा पहिला सिद्धांत असा कीं, सर्व मानवी उत्पादन हें सामाजिक स्वरूपाचेंच असतें. त्याचे सामाजिक परिणाम घडून येतात, इतकेंच नव्हे तर तो खास सामाजिक प्रयत्न आहे. तो असा प्रयत्न आहे कीं, ज्यावांचून समाजाचें अस्तित्व खरोखरी टिकूंच शकणार नाहीं. यावरून हें ओघानेंच येतें कीं, उत्पादनपद्धतिवरून त्या त्या समाजाचें स्वरूप ठरत असतें. सर्वसाधारणपणें उत्पादनपद्धति अगदीं प्राथमिक स्वरूपाची असेल तर समाजहि प्राथमिक अवस्थेंतच असतो. उत्पादनपद्धतींत जसजशी प्रगति होत जाईल तसतसा समाजहि " विकसित " होत जातो. म्हणून समाजांतील निरनिराळ्या उत्पादनपद्धति व त्यांचा विकास ह्यांच्या अभ्यासानें इतिहासाचें आकलन होऊं शकतें. मार्क्स म्हणतो, " मानवाची संवेदनाशक्ति–किवा आत्मज्ञान त्यांच्या अस्तित्वाचें स्वरूप निश्चित करीत नाहीं, तर त्याचें सामाजिक अस्तित्व त्याच्या संवेदनाशक्तीचें–आत्मज्ञानाचें स्वरूप निश्चित करतें.

इतिहासाकडे बघण्याच्या या दृष्टिकोणामुळें विरोधविकासी प्रक्रियेचें कार्य कसें चालतें, हें अधिक स्पष्टपणें पहायला मिळतें. विकासाच्या विशिष्ट अवस्थेंत उत्पादनपद्धतीचा प्रस्थापित हितसंबंधांशीं संघर्ष उद्भवतो. विशेषतः मालमत्ताविषयक हितसंबंधाशीं हे संबंध पूर्वींच्या उत्पादनपद्धतींतून निर्माण झालेले असतात. त्यानंतर सामाजिक क्रांतीचीं चक्रें फिरूं लागतात. समाजाच्या आर्थिक घडणींत स्थित्यंतर घडून आलें म्हणजे पूर्वीची " संबंध समाजधारणा " कोसळूं लागते.

" भांडवलशाहींतील आंतार्विरोधाचा जो मार्क्सवादी सिद्धांत आहे, त्यांत हें तत्त्व वापरण्यांत येत असलेलें आपण आजच्या काळांतही पाहतों. मार्क्सनें आपल्या 'दास कापिटाल' या ग्रंथांत असें प्रतिपादन केलें आहे कीं, आपल्या औद्योगिक पद्धतींतील उत्पादनाचें स्वरूप हें समाजवादी धर्तीचें आहे. परंतु आपले सामाजिक संबंध (म्हणजे मुख्यतः उत्पादन साधनांवरील खाजगी मालकी) हे मात्र जुन्या जमान्यांतील आहेत. त्यामुळें आपल्या उत्पादनपद्धतींत अडथळे निर्माण होतात. श्रमविभाग, कारखाने, इमारती इत्यादि स्वरूपाच्या प्रचंड प्रमाणावर स्थावर भांडवलाची जमवाजमव, कामगारांना मोठ्या संख्येनें कामावर नेमणें, ह्या सर्व बाबतींत आपण तांत्रिक दृष्ट्या समाजवादी पद्धतींत झाली असती इतकी प्रगति केली आहे. समाजवादाचें ध्येय साध्य करण्यासाठीं आतां एकच गोष्ट करणें आवश्यक आहे, आणि ती म्हणजे उत्पादनसाधनांवरील खाजगी मालकी नष्ट करून (दुसऱ्यांच्या संपत्तीचें अपहरण करणारांची संपत्ति काढून) उत्पादन साधनांशीं सुसंगत अशाप्रकारचे अद्यावत् सामाजिक संबंध प्रस्थापित करणें. त्या दृष्टीनें आजचे भांडवलशाही संबंध हाच समाजवादाच्या प्रस्थापनेंतील अखेरचा अडथळा म्हटला पाहिजे.

या सर्वांचा मथितार्थ थोडक्यांत असा सांगतां येईल कीं, सर्व शास्त्रांत अर्थशास्त्र हें सर्वांत महत्त्वाचें असून केवळ इतिहासाचेंच नव्हे तर प्रत्यक्ष मानवाचें आकलन करून घेण्याच्या दृष्टीनें देखील तेंच अत्यावश्यक आहे. आर्थिक संघर्ष हा भौतिक स्वरूपाचा असून इतिहासांतील सत्यें जणूं त्यांत प्रतीत झालेलीं असतात. त्या संघर्षाशीं (आर्थिक) कायमच्या निगडित झालेल्या शक्तीमधून विरोधविकासी प्रक्रिया व्यक्त होत असते—उदा०, आर्थिक झगडयांत गुंतलेले सामाजिक "वर्ग" सिद्धांत आणि प्रतिसिद्धांत यांतूनच धनी आणि दास, मालक आणि मजूर हे परस्परविरोधी असे वर्ग निर्माण होतात. उत्पादनसाधनांत जसजसा विकास होत जातो, तसतसे प्रस्थापित सामाजिक संबंध कालविसदृश ठरू लागून नव्याच उच्च पातळीवरील सामाजिक संबंध निर्माण होण्याजोगी क्रांतिकारी परिस्थिति (समन्वय) उद्भवते. उपयोगांत न आणलेली नैसर्गिक संपत्ति वगळून बाकीची सर्व मालमत्ता ही श्रमांतून निर्माण होत असल्यामुळें आणि आजपर्यंतच्या

कोठल्याच सामाजिक संबंधांतून ही गोष्ट प्रत्ययास येत नसल्यामुळें अखेरचा असा समन्वय अद्यापपर्यंत उपलब्ध झालेला नाहीं; आणि मालक व धनी हे वर्ग कायमचे नष्ट करून सर्व सत्ता कामगारवर्ग आपल्या हातीं घेईपर्यंत तो उपलब्ध होणें शक्यहि नाहीं. तसें झालें म्हणजे, मगच विरोधविकासी प्रक्रियेचा परमोच्च बिंदु गांठला जाऊन खरीखुरी समाजवादी समाज व्यवस्था, ज्यांत सारे वर्ग आणि त्याबरोबरच राज्यसंस्था यांचें संपूर्ण उच्चाटन झालेलें असेल—प्रस्थापित होऊं शकेल.

या विचारसरणींतून निघणारे निष्कर्ष फार दूरगामी ठरतात आणि त्यांपैकीं एक निष्कर्ष तर मार्क्सवादेतर भांडवलदारी मनोवृत्तीच्या लोकांना चांगलाच गोंधळून टाकणारा आहे. तो निष्कर्ष म्हणजे असा कीं; सर्व इतिहासाचें, इतकेंच नव्हे तर, प्रत्यक्ष सत्याचेंदेखील मोजमाप निरपवाद घेण्याचा एक निर्णायक निकष मिळणें शक्य होतें. याला आपण "सामाजिक अक्षरतत्त्व" असें म्हणूं. आणि आपण त्याचें स्वरूप जसजसें समजावून घेऊं, तसतसें आपल्या काळांतील मार्क्सवादी सिद्धांताची खरी शक्ति कशांत आहे आणि त्या मानानें स्वतंत्र जगाचें दौर्बल्य कशांत आहे, त्याचा आपल्याला अंदाज बरोबर लागूं शकेल.

जगाकडे पाहण्याचा जो अ-मार्क्सवादी दृष्टिकोन पाश्चात्य देशांत प्रचलित आहे, त्यानुसार सत्यशोधनामध्यें एक सापेक्षभाव निश्चितपणें अभिप्रेत असतो. निरनिराळ्या दिशांनीं करण्यांत येणारे प्रयत्न आणि मनोव्यापार यांत तारतम्य बाळगणें, त्यांना आवश्यक वाटतें. माणूस हा नीतीची चाड असलेला प्राणी आहे, हें तत्त्ववेत्ता सुसंगतपणें पटवून देऊं शकेल, त्याचप्रमाणें एखादा प्राणिशास्त्रज्ञ निरनिराळ्या प्रयोगांच्या आधारें असें दाखवून देऊं शकेल किंवा असें अनुमान काढील कीं, पेशीच्या विशिष्ट हालचालीमुळें मनुष्याचीं स्वभाववैशिष्ट्यें बनत असतात; आणि अशा तऱ्हेनें त्यांचें मूळ हें मुख्यतः रासायनिक स्वरूपाचें आहे. त्याचबरोबर, विशिष्ट अध्ययनानंतर एखादा समाजशास्त्रज्ञ असाहि निष्कर्ष काढूं शकेल कीं, उत्पादनव्यवस्थेंतील मालकहक्क आणि व्यवस्थापद्धति यांमध्यें कांहीं फरक घडवून आणला तर मानवजात आजच्यापेक्षां अधिक कार्यक्षम, सुखी इतकेंच नव्हे तर, अधिक नीतिमानदेखील बनूं शकेल. हे तीन निष्कर्ष म्हणजे मानवासंबंधींच्या एकाच

सत्याच्या तीन बाजू आहेत अशी पाश्चात्य विचारवंतांची धारणा असते. आपापल्या क्षेत्रापर्यंत हे तीनहि निष्कर्ष बरोबर असूं शकतील. निरनिराळ्या बाजूंनीं पर्वताकडे पाहणाऱ्यांनीं काढलेल्या पर्वताच्या चित्रांत जसा फरक पडतो, तसाच निरनिराळ्या दृष्टिकोनांतून निरीक्षण केल्यामुळें मानवासंबंधींदेखील असे निरनिराळे निष्कर्ष निघूं शकतात.

परंतु सत्याला अशा निरनिराळ्या बाजू असू शकतात किंवा त्यांत सापेक्षभाव असूं शकतो हें विरोधविकासवादाला मंजूर नाहीं. विरोधविकासवादी सिद्धांतानुसार प्राणिशास्त्रापासून नीतितत्त्व अलग करणें किंवा सामाजिक शास्त्रापासून प्राणिशास्त्र अलग करणें अशक्य आहे. एकाला जें सत्य प्रतीत होईल तेंच इतर सर्वांनाहि झालें पाहिजे. जगांतील सर्व धर्म आणि महान् तत्त्ववेत्ते हे सत्याच्या एकतेविषयीं निर्वाळा देत आले असल्याकारणानें वरवर पहातां वरील दृष्टिकोणांत कांहीं नाविन्य आहे असें वाटणार नाहीं. परंतु विरोधविकासवादामध्यें दोन गोष्टी अशा आहेत कीं, त्यामुळें तो इतर सर्व विचारसरणींपासून वेगळा पडतो. एक म्हणजे, आपण वर लिहिल्याप्रमाणें विरोधविकासवादी हा सत्याची एकता ईश्वर, चित्तत्त्व, तर्कशुद्धता, निरनिराळ्या कल्पना, निसर्ग आणि इच्छाशक्ति यांच्यावर आधारित नाहीं. त्यांच्या मतें सत्याच्या एकतेचा एकमेव आधार जडवस्तु हाच असूं शकतो. आणि त्यांतहि पुन्हां जडवस्तूचें वैशिष्ट्य जी विरोधविकासी प्रक्रिया तीवरच त्यांची सारी भिस्त असते. आणि दुसरी गोष्ट म्हणजे ही विरोधविकासी प्रक्रिया इतिहासामधूनदेखील प्रतीत होत असते. परंतु सत्य हें जडस्वरूप असल्यामुळें तें फक्त एकाच प्रकारें प्रगट होऊं शकतें आणि तो प्रकार म्हणजे दारिद्र्याचा नाश करून सबंध जगभर वर्गविहीन समाज स्थापन करण्यासाठीं चालू असलेला कामगारांचा लढा हें होय. विरोधविकासवादी जीं गृहीत कृत्यें घेतात त्यांची तर्कशुद्ध परिणति अखेर याच निष्कर्षांत होते. ह्याचा अर्थच असा होतो कीं, वर्गविहीन समाजाचें ध्येय जें मान्य करणार नाहीं किंवा तें पुढें नेण्यासाठीं जें कार्यप्रवृत्त होणार नाहीं ते मुळीं सत्य असूंच शकणार नाहीं. हें सामाजिक ध्येय अगदीं निरपवाद मानलें पाहिजे. एखादा नीतितत्त्ववेत्ता सत् आणि असत् यांची व्याख्या यापेक्षां निराळ्या तऱ्हेनें करील तर ती जशी त्याची चूक ठरेल त्याचप्रमाणें पदार्थविज्ञान-

वाद्यांचीं अनुमानें जर कामगारवर्गाच्या सामाजिक गरजा आणि आशा-आकांक्षा ह्यांच्याशीं विरोधी अशीं निघालीं तर तीदेखील त्याची चूकच ठरेल. या संबंध सिद्धांताला वस्तुतः एक प्रकारची सोपानकृति आहे. नीतितत्त्व-वेत्त्यानें प्राणिशास्त्रज्ञापुढें नमलेंच पाहिजे. कारण विरोधविकासवाद हा जड-वादी आहे. आणि प्राणिशास्त्रज्ञानें समाजशास्त्रज्ञापुढें नमलेंच पाहिजे कारण हा जडवाद विरोधविकासी आहे; म्हणजेच कामगारवर्गाच्या श्रेष्ठत्वाच्या द्वारां त्याची अभिव्यक्ति होत असते. कोणत्याहि यंत्रांतील शास्त्रीय अनुमानें जर कामगारवर्गाच्या या सामाजिक प्रेरणांशीं विरोधी अशीं निघालीं तर तीं-देखील चूक असलीं पाहिजेत. मनुष्याच्या सर्व संशोधनाचें आणि ज्ञानसंपादनाचें नियंत्रण वर उल्लेखिलेल्या "सामाजिक अक्षरतत्त्वा" नुसार होत असतें.

अर्थात् या ठिकाणीं यासंबंधीं जेवढें विवेचन झालें आहे त्यापेक्षां ही भूमिका विशद करण्यासाठीं आणखी कितीतरी अधिक विवेचन करावें लागेल. सर्वच्या सर्व मार्क्सवादी तत्त्वप्रणालीचा थोडक्यांत सारांश देण्याचा प्रयत्न या ठिकाणीं केलेला नाहीं. एवढेंच नव्हे तर अतिरिक्त मूल्य किंवा राज्यसंस्थेसंबंधींचा मार्क्सवादी सिद्धांत यांसारख्या महत्त्वाच्या प्रमेयांचा या ठिकाणीं नामनिर्देश देखील केलेला नाहीं. आज जो विचारांचा संघर्ष चालला आहे त्यांत स्वतंत्र जगाचें स्थान काय आहे किंवा असावें ह्यासंबंधीं आपण जें विवेचन करीत आहों त्याशीं ज्याचा मूलगामी स्वरूपाचा संबंध पोंचतो अशा, मार्क्सवादाच्या कांहीं तात्त्विक अंगांचा या ठिकाणीं विचार केला आहे. सारांशरूपानें करण्यांत आलेल्या ह्या विधानाची सत्यता मार्क्स-वादी वाङ्मयावरून वाचकांना सहज पटूं शकेल. उदा. जॉर्ज प्लेखानॉव्ह यानें केलेलें हें विधान पहा; "कायद्याचा इतिहास, नितिमत्तेसंबं-धींचा इतिहास, तत्त्वज्ञानाचा इतिहास असा भिन्नभिन्न प्रकारचा इतिहास मानवाकडून घडविला जात नाहीं तर इतिहास हा एकच असतो आणि तो निरनिराळ्या कालखंडांतील उत्पादनसाधनांवर आधारलेल्या मानवाच्या सामाजिक संबंधांचाच असतो. ज्यांना निरनिराळ्या तत्त्वप्रणाली म्हणून संबोधिलें जातें त्या तत्त्वप्रणाली म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून या अवि-भाज्य आणि एकात्म इतिहासाच्याच माणसाच्या मनांत उमटलेल्या नाना-विध छटा असतात."

माणसाच्या सर्व व्यवहारांना शब्दशः लागू करण्यांत येणाऱ्या जडवादी तत्त्वज्ञानांतूनच पुढें येणाऱ्या सामाजिक अक्षरतत्त्वाचा, मूलवादाचा परिणाम शेवटीं सत्यशोधनाच्या प्रयत्नाला कायमची तिलांजली देण्यांत होतो. कारण एकदां तो दृष्टीकोण स्वीकारला म्हणजे या अक्षरतत्त्वाप्रत जाणाऱ्या जडवस्तूंतील विरोधविकासी शक्तींशीं जें सुसंगत नसेल तें 'सत्य' असूंच शकत नाहीं, ह्या दृष्टीकोणामुळेंच जी कार्यपद्धति अस्तित्वांत येते ती पाश्चात्यांना त्या अक्षरतत्त्वापेक्षांहि अधिक बुचकळ्यांत टाकते. या पुस्तकाच्या पहिल्या भागांत कम्युनिझम आणि हिंसेचा किंवा पाशवी बलाचा उपयोग यांमधील परस्पर संबंधाविषयींचें विवेचन आलें आहे. त्यावेळीं आपण असें पाहिलें होतें कीं, कम्युनिझमकडून हिंसात्मक सामर्थ्याचा अवलंब केला जातो, तो कोणतेंहि एखादें प्रसिद्ध ऐतिहासिक ध्येय साध्य करण्यासाठीं म्हणून केला जातो असें नव्हे, तर सामर्थ्याचा वापर हें कम्युनिझमचें एक अंगच आहे. त्यांच्या प्रतिपादनपद्धतीचा तो एक भाग आहे. त्याची प्रचीति आतां अधिक स्पष्टपणें येऊं शकेल. बाबफनें आणि सुरवातीच्या सर्वाधिकारवाद्यांनीं वास्तव स्वरूपांतील मानवाचें आदर्श मानवांत रूपांतर घडवून आणण्यासाठीं जरूर तर हिंसेचा अवलंब करावा असें प्रतिपादन केलें होतें. टालमन म्हणतो त्याप्रमाणें "मानवी प्रगतीचा वेग" वाढविण्यापुरताच बाबफवाद्यांना सामर्थ्याचा उपयोग मान्य होता. कम्युनिझमला बाबफवाद्यांची सामर्थ्याच्या उपयोगासंबंधीची ही सर्वाधिकारवादी विचारसरणी तर मान्य आहेच, पण त्याची मजल त्याच्याहि पुढें गेली आहे. कम्युनिझमची उभारणी शास्त्रशुद्ध पायावर झालेली आहे. हें सिद्ध करण्यासाठीं त्यांना प्रत्यक्ष ऐतिहासिक घटनांचा पुरावा मिळविणें आवश्यक वाटतें. आणि तेवढ्यासाठीं आपल्या सिद्धांतानुसार घटना घडून याव्यात म्हणून कम्युनिस्ट हिंसेचा अवलंब करतात. आपल्या दृष्टीनें हा सारा प्रकार कमालीचा अशास्त्रीय आणि तर्कदुष्ट असला तरी कम्युनिस्ट मात्र त्यालाच कम्युनिस्ट सिद्धांताचा तर्कशुद्ध परिणाम समजतात. "भांडवलशाही" जग ज्याला 'सत्यशोधन' समजतें त्याचें विरोधविकासी दुसरें टोक म्हणजे हिंसा. त्यामुळें स्वतंत्र जगानें चालविलेल्या सत्यशोधनाला शह देण्यासाठीं म्हणून हिंसेचा अवलंब केला तर त्यांतून विरोधविकासी समन्वय निर्माण होईल. कम्युनिझमला अभिप्रेत असलेल्या

सामाजिक म्हणजे अक्षरतत्त्वाच्या दिशेनें आणखी एक पाऊल पुढें पडेल. अशा तऱ्हेनें विरोधविकासी प्रक्रियेचा एक भाग म्हणून कम्युनिस्टांकडून हिंसेचा अवलंब केला जात असल्यानें त्या प्रक्रियेचा एक अविभाज्य घटक म्हणूनच त्याचा विचार करावा लागेल. हिंसेचा अवलंब केला नसता तर विशिष्ट घटनांना निराळें स्वरूप प्राप्त झालें असतें का ? हा निव्वळ तात्त्विक प्रश्न झाला. त्यांच्या मतें इतिहासांत अनुस्यूत असलेलें विरोधविकासी तत्त्वच मुळीं हिंसेचा अंगिकार करतें आणि ती हिंसाच मग वर्गविहीन समाजाचें अंतिम Synthesis गांठण्यासाठीं "भांडवलशाही" सरकारचा पाडाव करते.

सर्वाधिकारवादी क्रांतीमागील विचारसरणीची फेरमांडणी करून त्यांना नवा जोम प्राप्त करून देण्यासाठीं मार्क्सनें वरील कल्पनांचा आधार घेतला होता. कालविसदृश ठरलेल्या अठराव्या शतकांतील बुद्धिवादाच्या जागीं तत्कालीन मूलविज्ञानवादी सिद्धांतावर आधारलेल्या भौतिकवादाची कास धरून त्यानें त्या भौतिकवादाची क्रांतीच्या ध्येयाशीं सांगड घातली. क्रांतीच्या या ध्येयाला सामाजिक अक्षरतत्त्वाचें तर्कशुद्ध अधिष्ठान देऊन त्यानें वरील गोष्ट साध्य केली. सर्वाधिकारवादी क्रांति आणि विज्ञानवादी दृष्टि या दोन प्रचंड शक्तींचा संयोग ही खरोखरच मानवी इतिहासांतील एक अत्यंत महत्त्वाची घटना म्हटली पाहिजे. तत्पूर्वी आदर्शवाद्यांच्या शेखमहंमदी समतावादांत तिचीं ध्येयें गुरफटून गेलीं होतीं. त्याऐवजीं एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकांतील दारुण अशा आर्थिक कलहाची जाणीव क्रांतिशास्त्रास करून देण्याचें कार्य मार्क्सच्या भौतिकवादानें पार पाडलें. त्याचबरोबर क्रांतिकारी प्रेरणेमुळें मार्क्सवादी भौतिकवादाला एक विशिष्ट स्थान प्राप्त करून दिलें. तें स्थान त्यावर मोठमोठीं गूढ भाष्यें करणारांकडूनहि होऊं शकलें नसतें. केवळ तत्त्वज्ञानापेक्षां त्याला अधिक आशय प्राप्त झाला. ऐहिक धर्मांत त्याचें रूपांतर घडून आलें. अशा तऱ्हेनें त्याचें रूपांतर घडून येऊन मानवासंबंधींच्या कल्पनांच्या रूपानें तें इतिहासांत समाविष्ट होऊन बसलें. मानवासंबंधींच्या या कल्पनांनाच आपण 'विरोधविकासी व्यक्ति' अशी संज्ञा दिली आहे. मार्क्सच्या अत्यंत रटाळ अशा वाङ्मयांत निर्माण झालेली ही एक भव्य कल्पना आहे. एका मोक्षदात्या प्रेषिताचें तें कल्पनाचित्र आहे. तें साकार कधींच झालें नाहीं, परंतु त्याच्याभोंवतींच शेलक्या मंडळींच्या

आशा केंद्रित झाल्या आहेत. बुद्धिवाद्यांनीं आणि आदर्शवाद्यांनीं रंगवलेला आदर्श मानव नव्हे तर वैज्ञानिकांनीं अनुमानिलेला आदर्श मानव. जे भौतिकवादी विरोधविकासाच्या परिभाषेंत बोलतात त्यांनाच काय तो त्याच्या-संबंधीं बोलण्याचा अधिकार असतो.

स्वतंत्र जगाच्या दृष्टीनें 'विरोधविकासी व्यक्ति' हा एक भयानक, किंबहुना किळसवाणा प्राणी आहे. एक तर केवळ जडवस्तूच तेवढी सत्य असल्यामुळें विरोधविकासी माणूस हा निव्वळ जडवस्तुमय असतो. मानवा-संबंधींचीं इतर सर्व स्वरूपें (उदा० आध्यात्मिक किंवा नैतिक मानव) हीं अर्थातच भ्रममूलक ठरतात. दुसरें म्हणजे विरोधविकासी मानव हा एक व्यक्ति नसतो (कारण प्रत्येक माणसाचे ठिकाणीं वेगळें असें व्यक्तिमत्व असूं शकतें हें मान्य केलें तर इतिहासांतील विरोधविकासी प्रक्रियेंतून तो निसटूं शकेल. ). विरोधविकासी मानव हा मुख्यतः विरोधविकासी प्रक्रियेंतील सामाजिक जीवन-रासायनिक घटक असतो. त्याचें सुख, त्याचें कल्याण आणि त्याचा जीवित हेतु तो ज्या समाजांत वावरतो त्या समाजांतच सांठलेला असतो. तिसरी गोष्ट म्हणजे त्याच्या दृष्टीनें चांगलें काय, वाईट काय हें त्या समाजांतील गरजांवरून ठरत असल्यानें त्याबद्दल त्याला सर्वस्वीं त्याच्या पुढाऱ्यांवर विसंबून रहावें लागतें. कारण ते पुढारी समाजाच्या ज्या गरजा ठरवतील त्यावरून तो बऱ्यावाईटाची कसोटी ठरविणार. अशा-तऱ्हेनें त्याला समाजांतील निव्वळ एखाद्या बाहुल्यांचें स्वरूप प्राप्त होतें, त्याची वैयक्तिक प्रतिष्ठा हिरावून घेतली जाते, सत्य शोधून काढण्याचा-देखील अधिकार त्याचेपाशीं उरत नाहीं. आणि चांगल्या वाईटाची निवड करण्यासहि तो असमर्थ ठरतो. हजारों वर्षांच्या लढयांतून प्राप्त करून घेतलेल्या अंतर्गामी दृष्टीला, सत्याकडे जाणाऱ्या सर्व भव्य मार्गांना, सौंदर्याच्या नाजुक आणि संवेनादशील आस्वादाला, अनिर्बंधपणें स्वतःचे निर्णय स्वतः घेण्यामुळें मिळणाऱ्या गाढ समाधानाला मनुष्य पारखा होतो. ह्या सगळ्या गोष्टी "विरोधविकासी मानवांत" शून्यवत् बनतात. कारण सामाजिक कल्याण म्हणजेच 'विरोधविकासी मानव' अशी सर्वाधिकारवाद्यांची व्याख्या आहे.

* * *

उद्दिष्टासंबंधींच्या या एकात्मतेमुळेंच ‘ विरोधविकासी मानवाला ’ एवढी ईर्षा आणि एवढें सामर्थ्य प्राप्त होतें. विशेषतः पाश्चात्त्यांशीं त्याचा संघर्ष येतो त्यावेळीं तर हें प्रकर्षानें जाणवतें. दुसऱ्या भागाच्या सुरवातीला आपण आशावादी तत्त्वज्ञान म्हणजे काय तें पाहिलें आहे. ऐहिक जीवन, त्याचें उद्दिष्ट आणि परिपूर्ति यासंबंधीं आशादायक निष्कर्ष ज्यांतून निघतात तो दृष्टिकोण म्हणजे आशावादी तत्त्वज्ञान अशी आपण व्याख्या केली होती. त्यावेळीं आपण हेंहि पाहिलें होतें कीं, आशावादी मानवाच्या परिपूर्ततेसाठीं “ परलोका ” कडे पाहावें लागत नाहीं. किंवा स्वतःच्या मुक्तीसाठीं अतींद्रिय शक्तीची किंवा दैवी हस्तक्षेपाची गरज असते, असें तो मानीत नाहीं. अर्थातच असत् प्रवृत्ति या मानवांत अंगभूत नसतात, तर बाह्य स्वरूपाच्या असतात. व त्यामुळें त्याचें निराकरण करता येतें अशी त्यांची धारणा असते. आपण विरोधविकासवादाचें जें विश्लेषण केलें त्यावरून एक स्फोटक गोष्ट आढळून आली, ती म्हणजे आजवर मानवानें पुरस्कारिलेल्या नानाविध तत्त्वप्रणालींपैकीं विरोधविकासवाद ही सर्वांत जास्त आशावादी तत्वप्रणाली आहे. ऐहिक जीवनांतच संपूर्ण मुक्ति मिळूं शकेल, अशी विरोधविकासवाद हमी देतो, इतकेंच नव्हे तर, एकदां तें ऐहिक ध्येय साध्य झालें म्हणजे मग मानवसमाजांतील परस्परसंघर्षास कारणीभूत होणारी आजची विरोधविकासी प्रक्रियादेखील लुप्त होऊन जाईल, हें विधान करण्याचीदेखील त्याची तयारी आहे. हा आशावाद सर्व क्षेत्रांत कसा लागू पडतो तें अत्यंत पद्धतशीरपणें त्यांनीं दाखवून दिलें आहे. आणि त्याला निरपवाद अशा सर्वंकष आशावादाचें स्वरूप प्राप्त करून दिलें आहे. आशावादी अक्षरतत्त्ववादांत न बसणारा असा जर कोणी एखाद्या घटनेचा अर्थ लावील तर तो त्यांच्या व्याख्येप्रमाणें असत्य ठरतो. त्याचप्रमाणें जर कोणी त्या तत्त्वाला पाठिंबा देण्यासाठीं हिंसेचा अवलंब केला तर तो समर्थनीय ठरतो.

अतिआशावादाच्या या उच्चासनावर उभें राहून विरोधविकासवादी-भौतिकवादी हा जगांतील जनतेला कांहीं रोख सवाल विचारीत असतो. “ भांडवलशाही ” वातावरणांत केलेल्या सत्यशोधनामुळें जी तथाकथित थोर अंतर्गामी दृष्टि प्राप्त झाली त्यामुळें जगांतील जनतेचा असा कोणता फायदा झाला आहे ? तसेंच भांडवलशाही जग ज्याला सत्य, सौंदर्य, कला इतकेंच

नव्हे तर प्रत्यक्ष स्वातंत्र्य ह्यांच्याकडे जाण्याचे भव्य मार्ग म्हणून संशोधतें, त्यानें तरी मानवाचा असा कोणता फायदा करून दिला आहे ? स्वतःच्या ऐहिक कल्याणापेक्षां निराळ्या ध्येयांचा ध्यास घेऊन आपलें वैयक्तिक हित गौण मानावयास लावणाऱ्या विचारसरणीपेक्षां–जरूर तर हिंसेचाहि अवलंब करून–श्रमजीवी जनतेची सोडवणूक करण्याइतकें दुसरें कोणतें ध्येय उच्च असूं शकेल ? असे प्रश्न उपस्थित करून पुढें तो भांडवलशाही समाजांतील विसंगति, तसेंच भांडवलशाही जगांतील शास्त्रज्ञ, तत्त्ववेत्ते, नीतिवादी आणि राजकारणी यांतील मतभेद व त्यांच्या उक्ति व कृतींतील तफावत तो दाखवून देतो. त्याचें म्हणणें असें कीं, अशा प्रकारची विसंगति पाहिली म्हणजे मनापासून सत्यशोधनाचा प्रयत्न केला आहे असें कोणी म्हणूंच धजणार नाहीं. उलट त्या विसंगतीमुळें भांडवलशाही पद्धति कुचकामी आणि स्वार्थानें बुजबुजलेली असल्याचा निर्वाळा मिळतो. त्या पद्धतींतच आत्मनाशाचीं बीजें सांठविलेलीं असून भ्रष्टता, स्वार्थ, अस्थिरता, हांव आणि संदेह यांनीं ती पद्धत पोखरून निघाली आहे, याचा भरपूर पडताळा मिळतो.

स्वतःच्या खास अशा आशावादी परंपरांत मुरलेल्या सर्वसामान्य अमेरिकनाला अशा तऱ्हेच्या समस्या कोणी पुढें उभ्या केल्या तर स्वस्थ बसणें जवळजवळ अशक्यच आहे. मार्क्सवाद्यांच्या अक्षरतत्त्ववादी आशावादावर मात तर तो करूं शकत नाहीं. उलट स्वतःचा आशावाद मार्क्सवादी टीकेला पुरून उरणारा आहे असें दाखविण्याचा ज्यावेळीं तो प्रयत्न करतो त्यावेळीं तो गोंधळून जातो. त्याचा तो प्रयत्न सफळ होत नाहीं. मार्क्सवाद्यांचें प्रतिपादन असें असतें कीं, "विरोधविकासी व्यक्ति" चा समाज एकदां अस्तित्वांत आला म्हणजे आजच्या समाजांतील सर्व अपप्रवृत्ति आपोआप नष्ट होतील, परंतु स्वातंत्र्यवादी परंपरांत वाढलेला आणि म्हणूनच व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वावर नितांत श्रद्धा बाळगणारा अमेरिकन असा दावा करूं शकत नाहीं. त्याच्या मतें व्यक्तिस्वातंत्र्याचा चांगुलपणा सिद्ध करावा लागत नाहीं. तो स्वयंसिद्धच असतो. परंतु स्वतंत्र जगांतील ज्या दुष्ट प्रवृत्तींचा मार्क्सवादी निर्देश करतात, त्याचें निर्मूलन करण्याची हमी व्यक्तिस्वातंत्र्यामुळें मिळूं शकत नाहीं. त्यामुळें तो मोठ्या अडचणींत सांपडतो व त्याचा

आशावाद देखील त्याला त्या अडचणींतून पुरतेपणीं सोडवूं शकत नाहीं. याबाबतींत मार्क्सवादी प्रतिपादनांत विशेष अभिनिवेश असतो. व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून समाजाच्या आणि विशेषतः कामगारवर्गाच्या जीवावर स्वतःचा स्वार्थ साधण्याचीं आर्थिक साधनें आणि सत्ता ज्यांच्या हातीं आहे त्यांना मिळालेला मतदानाचा राजकीय हक्क, अशी मार्क्सवाद्यांची धारणा असल्यामुळें ते व्यक्तिस्वातंत्र्याचा नेहमीं उपहास करीत असतात. त्यांच्यामतें स्वातंत्र्य ही, दुष्ट प्रवृत्तींना पायबंद घालतां येऊं नये म्हणून भांडवलशाही जगानें शोधून काढलेली एक क्लृप्ति आहे; आणि असें जर आहे तर अमेरिकन आशावादी तरी त्यांच्यासाठीं एवढा अट्टाहास कां करतात? व्यक्तिस्वातंत्र्याची जपणूक केल्यानंतरहि सामाजिक दुःखें जर कायमच राहतात, तर त्या तत्त्वाचा तरी अमेरिकन लोक पुरस्कार कां करीत राहतात?

आपल्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाच्या चौकटींत राहून अमेरिकन आशावादी या प्रश्नांचीं समाधानकारक उत्तरें देऊं शकत नाहींत. व्यक्तिस्वातंत्र्याचें तत्त्व हें स्वभावतःच चांगलें आहे हें सिद्ध करण्याची आणि त्याचें समर्थन करण्याची जबाबदारी त्याच्यावर येऊन पडते. परंतु मार्क्सवाद्याप्रमाणेंच निसर्गवादी आणि भौतिकवादी सिद्धांतांचा त्यानें अंगीकार केलेला असल्यामुळें ही जबाबदारी त्याला पार पाडतां येत नाहीं. त्याचीदेखील आधुनिक विज्ञानावर श्रद्धा आहे. मार्क्सच्या काळांतल्यापेक्षां आजच्या काळांतील विज्ञान हें खूपच पुढें गेलेलें आहे. परंतु, तरीदेखील आजहि पाश्चात्य विचारवंत ज्या नीतिकल्पनांना चिकटून आहेत त्यांना पाठिंबा देणारा असा मानवासंबंधींचा दृष्टिकोण त्या विज्ञानाला प्राप्त झालेला नाहीं. उलट सध्यां तर विज्ञानांतील जुनीं भौतिकवादी तत्त्वें बरोबर होतीं किंवा नाहीं यासंबंधींच वैज्ञानिकांत वाद सुरू झाला आहे. या वादाचें स्वरूप आपण आतां समजावून घेतलें पाहिजे. त्यामुळें कदाचित् असाहि निष्कर्ष निघेल कीं, मार्क्सवाद हा वाटतो तितका अभेद्य किंवा अजिंक्य नाहीं; आणि कल्पनांचा जो महान् संघर्ष सध्यां सुरू आहे, त्यांतील अग्रेसरत्व पुन्हां पाश्चात्यांना प्राप्त करून घ्यावयाचें असेल तर त्यांनीं नव्या दृष्टिकोणाचा अंगीकार केला पाहिजे असेंहि त्यावरून आपल्याला आढळून येईल.



* * *

भाग चौथा

# संशोधनांतील शास्त्रीय दृष्टिकोण

## १ : : शास्त्रीय पद्धति

अशाप्रकारें अमेरिकन आशावाद्यांची परिस्थिति फार चमत्कारिक झाली आहे. कारण, मानवासंबंधींच्या निव्वळ शास्त्रीय दृष्टिकोणाच्या आधारें स्वातंत्र्याचें तत्त्व सिद्ध करून देतां येत नाहीं. शास्त्रीय दृष्टिकोणांत मानव आणि त्याची उत्पत्ति यासंबंधींचें संपूर्ण सत्य समाविष्ट झालेलें असेल तर आज चाललेल्या विचारसंघर्षांत स्वतंत्र मानवाला कधींच यशस्वी होतां येणार नाहीं. पण स्वातंत्र्य हें जर एक सत्य किंवा वास्तव असेल तर मानवासंबंधींचा शास्त्रीय दृष्टिकोण सर्वस्वीं बरोबर असूं शकणार नाहीं.

अर्थात्, विज्ञान आणि स्वातंत्र्य यांमध्यें मूलभूत संघर्ष तर असूंच शकत नाहीं. शास्त्रज्ञ हे सत्य शोधून काढण्याच्या कामीं गढून गेलेले असतात असें सांगितलें जातें. माणसाला जोपर्यंत विश्व, निसर्ग, समाज किंवा तो स्वतः ह्याबद्दलचें सत्य समजलेलें नाहीं तोंपर्यंत तो स्वतंत्र होऊं शकणार नाहीं. या सत्याचें ज्ञान त्याला प्राप्त झालें नाहीं, तर मनांत नसतांनाहि अभावितपणें त्याच्या हातून चुका होत जातील. आणि त्या चुकांचा स्वीकार त्यानें स्वेच्छेनें केला नसल्याकारणानें त्या त्यानें बुद्धिपुरस्सर केलेल्या नसणार. आजची सर्वांत तापदायक गोष्ट जर कोणती असेल, तर ती हीच कीं, मार्क्स-वाद ही सर्वस्वीं अशास्त्रीय अशी विचारसरणी आहे. आणि मार्क्स आणि एंगल्स ह्यांचा दावा कांहींही असला तरी त्यांच्या सिद्धांतांना आज जें एवढें यश मिळत आहे, तें मानवजातींत पसरलेलें अज्ञान आणि भावनांनीं भारून गेलेलीं तिचीं मनें यांचा जास्तींत जास्त गैरफायदा घेतला जात आहे म्हणूनच.

विज्ञान हें स्वातंत्र्यविरोधी आहे आणि विज्ञानाशिवाय स्वातंत्र्याची कल्पनाच करतां येत नाहीं, या विज्ञानासंबंधींच्या दोनही विधानांत सत्यांश आहे, परंतु मानवासंबंधींचा शास्त्रीय दृष्टिकोण किंवा प्रत्यक्ष विज्ञान म्हणजे तरी काय, तें आपण प्रथम समजावून घेतलें पाहिजे.

" विज्ञान म्हणजे काय ? " या प्रश्नाचें उत्तर सर्वसाधारणपणें " संशोधनाची विशिष्ट पद्धति म्हणजे विज्ञान " असें दिलें जातें. या पद्धतीचें सर्वांत महत्त्वाचें वैशिष्ट्य म्हणजे एखाद्या घटनेसंबंधींचे केवळ व्यक्तिगत किंवा अगदीं योगायोगानें प्राप्त झालेले निष्कर्ष किंवा अनुमानें विचारांत न घेतां प्रत्यक्ष प्रमाणावर आधारलेले वस्तुनिष्ठ निष्कर्ष तेवढेच खरे मानावयाचे. अशा तऱ्हेच्या निष्कर्षाप्रत पोहोंचण्यासाठीं ज्या घटनासंबंधीं संशोधन करावयाचें असेल त्यांचें अत्यंत काळजीपूर्वक नियंत्रण केलें जातें. त्याचप्रमाणें त्यापासून जे निष्कर्ष निघतात त्याचीहि कसून छाननी केली जाते. आणि नियंत्रित घटनांच्या अनुषंगानें त्यांची पुन्हां तपासणी केली जाते. अशातऱ्हेनें प्रत्येक गोष्ट ही पुन्हां पुन्हां तपासून पाहिली असल्याकारणानें त्यापासून जो निष्कर्ष निघेल तो व्यक्तिगत अनुभवामुळें किंवा पूर्वग्रहामुळें दूषित बनलेला असूं शकत नाहीं, तर सत्याच्या कसोटीला तो संपूर्णपणें उतरलेला असतो. निराळ्या शब्दांत सांगावयाचें तर, शास्त्रीय अनुमानें हीं सर्वांच्या बाबतींत समान किंवा खरीं असतात, ( Inductive Logic )

अनेक दिवसपर्यंत शास्त्रीय पद्धति ही मुख्यतः तर्कशास्त्रांतल्या विगमन पद्धतीवर आधारलेली असते असें मानलें जात असे. तिचें वैशिष्ट्य असें कीं, निरनिराळ्या घटना तपासून त्यांतून जो समान अनुभव येईल त्यावरून सर्वसाधारण अनुमान काढावयाचें ही पद्धत ( Deductive Logic ) तर्कशास्त्रांतल्या निगमन पद्धतीच्या बरोबर उलट असते. निगमन तर्कपद्धतीमध्यें सर्वसाधारण सिद्धांत किंवा तत्त्व घेऊन तें सर्व घटनांना लावून पाहावयाचें व त्यांतून एक विशिष्ट अनुमान किंवा निष्कर्ष काढावयाचा असें असतें. पहिल्या पद्धतीचा अंगीकार करण्यासाठीं माणसाच्या पृथक्करण करण्याच्या सामर्थ्याचा उपयोग करून घ्यावा लागतो. या पद्धतीनुसार ज्यावेळीं माणसापुढें एखादी पूर्वी न सुटलेली समस्या उभी राहते, त्यावेळीं आपल्या अंतःप्रेरणेनुसार त्याची उकल न करतां प्रथम तो त्या घटनेचें पृथक्करणाच्या अनुषंगानें त्या घटनेविषयीं विगमन पद्धतीनुसार कांहीं नियम बसवतो.

प्रत्यक्ष प्रमाणाशिवाय कोणतीहि गोष्ट खरी मानावयाची नाहीं या गृहीत कृत्यावर या पद्धतीची उभारणी झालेली असते, आणि त्यामुळें या पद्धतींत प्रयोग हीच सत्याची अंतिम कसोटी ठरते, प्रयोगानें जें सिद्ध करून दाख-

वितां येणार नाहीं. तें अज्ञात किंवा अज्ञेय म्हणून सोडून देण्यांत येतें. त्यामुळें प्रत्यक्ष व्यवहारांत शास्त्रीय पद्धतीहि प्रत्यक्ष अनुभवाशीं आणि वास्तवतेच्या बाह्य स्वरूपाशीं निगडित होऊन गेलेली आहे आणि विज्ञान क्षेत्रांतील अनेक तत्त्ववेत्त्यांनीं शास्त्रीय पद्धतीची व्याख्या तशीच बनविली आहे. म्हणून जॉन ड्युअी म्हणतो कीं, "प्रयोगनिष्ठ संशोधना"चीं तीन "ठळक वैशिष्ट्यें" आहेत.

"त्यापैकीं पहिलें वैशिष्ट्य म्हणजे अर्थातच प्रत्येक प्रयोग हा उघडपणें केला जात असतो हें होय. आपल्या सभोंवतालच्या परिस्थितींत किंवा आपल्या तिच्याशीं असलेल्या परस्परसंबंधांत त्यासाठीं कांहीं निश्चित फेरफार करावे लागतात. दुसरें वैशिष्ट्य म्हणजे कोणताहि प्रयोग उगाच हवा तसा केला जात नाहीं. त्यामागें कांहीं निश्चित दृष्टि असावी लागते...तिसरें वैशिष्ट्य म्हणजे....अशा तऱ्हेच्या प्रयोगांतून एक नवी अनुभाव्य अवस्था निर्माण होते."

विज्ञान म्हणजे काय हा प्रश्न सोडविण्याचा हा प्रायोगिक मार्ग कांहीं एका मर्यादेपर्यंत टीक असतो. परंतु पुढें त्यांत अनेक अडचणी उपस्थित होतात. हॉवर्ड विद्यापीठाचे भूतपूर्व प्रमुख जेम्स बी. कॉनंट यांनीं याबाबत देऊन ठेवलेला इशारा आपण अवश्य ध्यानांत ठेवला पाहिजे. ते म्हणतात कीं, "शास्त्रीय संशोधनांत वस्तुतः अनेक पद्धतींचा अंतर्भाव झालेला असतो." गणितापासून तो मानववंशशास्त्रांपर्यंतचे, नाक्षत्र-पदार्थविज्ञानशास्त्रापासून मानसशास्त्रापर्यंतचे आणि रसायन शास्त्रापासून तों मानवी वर्तणुकीच्या निरीक्षणापर्यंतचे सर्व विषय शास्त्रीय सशोधनाच्या कक्षेंत येतात. या सर्व बाबतींत आपल्याला एकाच पद्धतीवर विसंबून चालावयाचें नाहीं. कारण त्यामुळें ठोकळेबाजपणा निर्माण होण्याचा धोका आहे. शिवाय डॉ. कॉनंट म्हणतात त्याप्रमाणें विज्ञान किंवा शास्त्रीय पद्धति यांचें नेहमींच्या रूढ पद्धती-प्रमाणें अनुभवांच्या अनुशंगानें विवरण करणें अधिकाधिक कठिण होत चाललें आहे. ॲटम बॉंबच्या निर्मितीला प्रयोगांतून सिद्ध होण्यापूर्वी कोठ-ल्याहि प्रत्यक्ष प्रमाणाचा आधार नव्हता. केवळ गणित-शास्त्रांतील अनु-मानावरून ती सिद्ध झाली. एकोणिसाव्या शतकांतील प्रायोगिक पद्धती-

संबंधींच्या पूर्व समजुतीपेक्षां आजच्या काळांतील प्रगत विज्ञानांत वापरल्या जाणाऱ्या पद्धति फार निराळ्या आहेत.

त्यांपैकीं एक मुख्य समजूत म्हणजे केवळ विगमन तर्कपद्धतीच्या सहाय्यानें जो आपलें उद्दिष्ट साध्य करतो तोच खरा शास्त्रज्ञ. परंतु विज्ञानाच्या इतिहासावरूनच असें आढळून येईल कीं, वस्तुस्थिति तशी नाहीं. कॉनंटनें दाखवून दिल्याप्रमाणें वैज्ञानिकांनीं लाविलेल्या बहुतेक सर्व मोठमोठ्या शोधां पाठीमागें त्या त्या वैज्ञानिकाचे ' उत्स्फूर्त विचार ', ' अंतःप्रेरणा ' किंवा ' तरल कल्पनाविलास ' यांपैकीं कशाची तरी बैठक होती. त्यानंतर निगमन तर्कपद्धतीच्या आधारानें अनुमानें काढून पुढें प्रयोग केले गेले........निराळ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे प्रयोगाचें आणि विगमन तर्कपद्धतीचें मुख्य कार्य नवीन शोध लावणें हें नसून आधींच काढलेलीं अनुमानें किंवा केलेल्या कल्पना खऱ्या असल्याचें निदर्शनास आणून देऊन ती सिद्ध करून देणें हें असतें.

यावरून हें सहज लक्षांत येईल कीं, केवळ विगमन तर्कपद्धतीचा अवलंब केल्यानें कोणतेंहि नवीन, खरोखरी नवीन, सत्य प्रतीत होत नाहीं. उदा० मंगळावरील माणसाचा नेहमींचा दाखला घेऊं. आपण एकाद्या घड्याळाचे सर्व भाग सुटे सुटे करून त्यांचा एक ढीग केला आणि तो ढीग कसला आहे म्हणून त्या मंगळावरच्या माणसाला विचारलें, तर त्याला त्याचें बरोबर उत्तर देतां येणार नाहीं. निरनिराळ्या आकाराच्या छोट्या छोट्या वस्तु असें फार तर तो त्याचें वर्णन करील. परंतु कालदर्शक यंत्राचे ते सुटे सुटे भाग असतील असें त्याच्या डोक्यांतहि येणार नाहीं. कारण तशी कल्पना त्याच्या डोक्यांत येण्यासाठीं त्याला त्यासंबंधीं सर्वसाधारण ज्ञान असावयास पाहिजे. मंगळावर जर कालदर्शक यंत्रें म्हणजे घड्याळें असतील तर त्या सुट्या भागांकडे दृष्टि टाकतांना त्यासंबंधीं कांहीं कल्पना त्याच्या मनांत अगोदरच रुजलेल्या असतील आणि त्यामुळें ते भाग जुळविण्याचा तो ज्यावेळीं प्रयत्न करूं लागेल त्यावेळीं ते घड्याळाचे सुटे भाग आहेत हें त्याच्या लक्षांत येईल. कदाचित् त्यासाठीं त्याला खूप कष्टहि पडतील. घड्याळासारख्या एखाद्या यंत्रासंबंधीं त्याला पूर्वकल्पना नसली तरीहि त्याला जर यंत्रासंबंधीं कांहीं ठोकळ कल्पना असेल तर ते सुटे भाग कशाचे आहेत तें ओळखून काढणें कठीण पडलें तरीदेखील विगमन तर्कपद्धतीच्या आधारावर त्याचा छडा

लावणें तांत्रिक दृष्ट्या शक्य आहे. मग तो अशीं अनुमानें काढीत जाईल कीं, निरनिराळे सुटे भाग जुळूं शकतात. कांहींतरी हेतुपूर्ण अशी वस्तु त्याच्यापुढें आहे आणि ते सर्व भाग जुळविल्यानंतर तो पुन्हां असें अनुमान बांधील कीं, त्या यंत्राची गति ही ज्याअर्थीं सूर्याच्या गतीसारखी आहे, त्याअर्थीं तें कालदर्शक यंत्र असावें. परंतु हेतुपूर्ण अशा यंत्राविषयीं त्याला जर कांहींच कल्पना नसेल तर त्या सुट्या भागांपासून त्याला कोणतेंच अनुमान काढतां येणार नाहीं. कारण, ते यंत्राचे सुटे भाग आहेत हेंच मुळीं त्याला समजणार नाहीं. त्यामुळें निरनिराळ्या विचित्र आकाराच्या त्या छोट्या छोट्या वस्तूंची मांडणी करण्याचा त्याचा प्रयत्न एखाद्या हेतुरहित क्रियेसारखा ठरेल. ऑरी प्वॉकारे यानें एके ठिकाणीं लिहून ठेवलें आहे कीं, " कसल्याहि पूर्वकल्पनांशिवाय प्रयोग केले पाहिजेत असें पुष्कळदां म्हटलें जातें, पण तें अशक्य आहे. त्यामुळें सर्व प्रयत्न निष्फळ ठरतील. इतकेंच नव्हे तर, अप्राप्याचा प्रयत्न करण्यासारखेंच तें ठरेल." त्याचप्रमाणें प्वॉकारेनें दाखवून दिल्याप्रमाणें " दगडापासून घर बांधतात त्याप्रमाणें निरनिराळ्या घटनांवरून विज्ञानाची उभारणी केली जाते. परंतु नुसता दगडांचा ढीग रचणें म्हणजे ज्याप्रमाणें घर नव्हे, त्याप्रमाणें घटना नुसत्या एकत्र करणें म्हणजे विज्ञान नव्हे."

एक महत्त्वाचा मुद्दा लक्षांत आणून देण्यासासाठीं वरील विवेचन करण्यांत आलें आहे. प्रायोगिक पद्धतीच्या कांटेकोर चौकटींत विज्ञानाची व्याख्या बसवण्याचा प्रयत्न प्रयत्न केला तर त्याचें पर्यवसान असमाधानकारक निष्कर्ष निघण्यांतच होणार. विज्ञान हें पृथक्करणशील असलें तरी केवळ पृथक्करणशीलच असतें असें नाहीं, तसेंच विगमन तर्कपद्धतीवर आधारलेलें असलें तरी केवळ त्याच पद्धतीवर अधिष्ठित असतें असेंहि नाहीं. प्रायोगिक असलें तरी तें केवळ प्रायोगिकहि असत नाहीं. कारण पृथक्करणाची प्रक्रिया ही तशी अमर्याद असूं शकते आणि निरीक्षणाचा किंवा प्रायोगिक प्रक्रियांचा अलगपणें विचार केला तर त्या स्वभावतःच अपूर्ण किंवा अनिर्णायक अशा असल्याचें आढळून येतें. मंगळावरील माणसासमोर अशी अडचण उभी राहते कीं, त्याच्यासमोर पृथक्करणात्मक अशी जी परिस्थिति असते त्यांतून समन्वय निघण्याची कोणतीहि शक्यता त्याच्या ध्यानांत आलेली नसते. पृथक्करणात्मक

प्रक्रियेंतून कांहीं निष्कर्ष काढावयाचे असतील तर पृथक्करणांतून न निघालेल्या अशा एखाद्या घटकाची त्याला जोड मिळाली पाहिजे. म्हणजे कल्पनेची. परंतु त्याचा अर्थ असा होईल कीं, ज्याचें पृथक्करण करावयाच्या पूर्वींपासूनच ती अस्तित्वांत असल्यामुळें ती पृथक्करणाचा–परीक्षणाचा–विषय झालेली नाहीं. त्यामुळें प्रायोगिक पद्धतीच्या दृष्टीनें रूढ कल्पनेंतल्या शास्त्रीय पद्धतीचाच अवलंब केला असता, तर त्यांना कशाचाहि शोध लावतां आला नसता. परंतु, वस्तुस्थिति अशी असते कीं, त्यांना ज्यावेळीं स्फूर्ति येते, त्यावेळीं ते शास्त्रीय पद्धति कांहीं काळ विसरतात. आणि त्यामुळेंच ते कल्पनांच्या मोठमोठ्या भराऱ्या मारूं शकतात. नंतर त्या कल्पनांचा आपल्या प्रयोगांत उपयोग करून त्या दोघांच्या एकत्रीकरणांत ते नवीन शोध लावतात.

तर मग, या कल्पना येतात तरी कोठून? संशोधकांच्या मनोव्यापारावर त्यांचे अनुभव, स्वभावधर्म, बुद्धिमत्ता–थोडक्यांत म्हणजे माणसाच्या स्वभावावर या प्रश्नाचें उत्तर अवलंबून आहे. म्हणजे मानव आणि विश्व यांचें स्वरूप काय ह्या, आपण सुरवातीला उपस्थित केलेल्या प्रश्नाकडेच पुन्हां आलों.

* * *

## २ : : शास्त्रविषयक अंतःप्रवृत्ति

कोठल्याहि विशिष्ट युगांतली तात्त्विक दृष्ट्या महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुद्दाम केलेल्या संशोधनांतून निघालेले सिद्धांत ही नव्हे, तर त्या संशोधनाच्या मुळाशीं असलेला दृष्टिकोण किंवा त्या त्या युगांतल्या ज्ञान-साधनामागील प्रेरणेची प्रवृत्ति ही महत्त्वाची असते. माणसाचीं पाळेंमुळें हीं त्याच्या मनाच्या अज्ञात भागांत खोलवर गेलेलीं असतात. माणसाच्या हालचाली, तो घेत असलेले निरनिराळे निर्णय, इतकेंच नव्हे, तर त्याचें प्रत्यक्ष अस्तित्वदेखील त्याच्या जागृत मनापेक्षां सुप्त मनोव्यापारावरच अधिक अवलंबून असतें असें आधुनिक मानसशास्त्रानें सिद्ध करून दाखविलें आहे. या मानसशास्त्रीय सिद्धांतावरूनहि वरील विधानाची प्रचीति येऊं शकेल. मानवाच्या जागृत आणि सुप्त मनोव्यापारांना अनेक मानसशास्त्रज्ञ हिमनगाची (ice berg) ची

उपमा देतात. हिमनगाचा फक्त एकपंचमांश भाग पाण्याबाहेर असतो आणि बाकीचा चारपंचमांश भाग पाण्यांत बुडालेला असतो. जागृत आणि सुप्त मनोव्यापारांचें असेंच आहे. कांहीं मानसशास्त्रज्ञ तर मन हें समुद्राच्या पृष्ठभागावरील बेटासारखें आहे असेंच मानतात. जागृत आणि सुप्त मनोव्यापारांचें प्रमाण कांहींहीं असो, एक गोष्ट निश्चित आहे कीं, सुप्त मनोव्यापारांचेंच, माणसाच्या मूलभूत प्रवृत्ति निश्चित करण्यांत प्रमुख अंग असतें. ते सुप्त मनोव्यापार कितीहि जरी तर्कदुष्ट किंवा विचित्र वाटले तरी, जागृत मनावरील त्याचे परिणाम सहज दिसून येण्याइतके उघड असतात.

या सुप्त मनोव्यापारांतहि सत्याकडे किंवा संशोधनाकडे बघण्याची एक विशिष्ट दृष्टि असते, असें इतिहासावरून दिसून येईल. निरनिराळ्या माणसांच्या अवलोकनांत येणाऱ्या वस्तु सारख्याच असल्या तरी, त्यासंबंधींच्या त्याच्या निष्कर्षांत मात्र युगपरत्वें इतका विलक्षण फरक पडत जातो कीं, त्याकडे पाहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला निरनिराळा दृष्टिलाभ झाला असला पाहिजे असें वाटूं लागलें. उदा० प्राचीन इजिप्शियन लोकांचा आणि आपला, प्राण्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोण घ्या. प्राचीन इजिप्शियन लोकांना निरनिराळे प्राणी म्हणजे माणसाच्या आत्म्याच्या, किंबहुना प्रत्यक्ष विश्वाच्याच वेगवेगळ्या अंगांचे आविष्कार आहेत असें वाटे. आपल्याला हा दृष्टिकोण अगदीं बालिश किंवा अंधश्रद्धाळू वाटेल. परंतु एक गोष्ट मात्र त्यावरून स्पष्ट होते कीं, प्राण्याकडे बघण्याच्या त्यांच्या आणि आपल्या दृष्टिकोणांत केवढें तरी स्थित्यंतर घडून आलें आहे; अर्थात्, प्राण्यांमध्येंच स्थित्यंतर घडून आल्यामुळें त्याविषयींच्या निष्कर्षांत हें स्थित्यंतर घडून आलें असें म्हणणें तर शक्यच नाहीं. माणसाच्या मनोवृत्तींत घडून आलेल्या बदलामुळेंच वस्तुतः हा फरक पडलेला आहे.

या पुस्तकाच्या पहिल्या भागांत आपण ज्याचा 'संशोधन-वृत्ति' म्हणून उल्लेख केला होता त्या संशोधनवृत्तीचें अधिक स्पष्टीकरण करणें आतां सुलभ होईल. संशोधन वृत्ति हा शब्दप्रयोग या पुस्तकांत माणसाच्या सुप्त मनांतील प्रवृत्ति आणि तिला मिळणारी अभिव्यक्ति याच अर्थानें वापरण्यांत आला आहे. त्यामुळें जागृत मन व त्याच्या विकासाची दिशा यासंबंधींचाहि बोध होतो. इतकेंच नव्हे, तर या संशोधन-वृत्तीवरून मानवाचें ज्ञान,

निदान त्याच्या ज्ञानाचें स्वरूप, काय असेल हें आधींच निश्चित होत असतें. उदाहरणार्थ आज आपल्याला पदार्थविज्ञानशास्त्रासंबंधींचें जेवढें ज्ञान प्राप्त झालें आहे, तेवढें प्राचीन ग्रीकांच्या संशोधनवृत्तींतून आत्मसात् करतां आलें असतें कीं नाहीं तें सांगतां येणें कठिण आहे. परंतु प्राचीन किमयाकाराला ज्या गोष्टी तोंडपाठ होत्या त्या आजच्या पदार्थविज्ञानशास्त्रज्ञाला त्याच्या संशोधनवृत्तीमधून प्राप्त होऊं शकतील असें वाटत नाहीं. अर्थात्, याठिकाणीं किमयाकार याचा अर्थ शास्त्रीय दृष्टिकोणांतून घेतला पाहिजे. किमयाकार म्हणजे केवळ जादूटोणा करणारा असा अर्थ येथें अभिप्रेत नाहीं. आधुनिक रसायनशास्त्राचा पाया घालण्यांत ज्याप्रमाणें कांहीं शोधांचा फार मोठा वाटा आहे, त्याचप्रमाणें मानसशास्त्रीय संशोधनाच्या क्षेत्रांत किमयाकारांच्या ज्ञानानेंही फार मोठी कामागिरी बजावली आहे, हें सी. जी. युंग यांनीं मुद्देसूदपणें दाखवून दिलें आहे. मानवी अस्तित्वाच्या दृष्टीनें तें ज्ञान फार महत्त्वाचें होतें व त्याची माणसाच्या मनःप्रवृत्तीचे धागेदोरे उलगडण्याच्या कामीं खूपच मदत होऊं शकते. गेल्या कित्येक शतकांपासून विकसित होत आलेली शास्त्रीय संशोधकवृत्ति हाच सत्यसंशोधनाचा एकमेव अचूक मार्ग आहे, असें गृहीत धरलें तर ज्यांना आधुनिक शास्त्रीय पद्धतीची गंधवार्ताहि नव्हती अशा प्राचीन विचारवंतांनीं मानवाच्या आणि जगाच्या स्वरूपाविषयीं इतकें सखोल ज्ञान कसें प्राप्त करून घेतलें ह्याचा उलगडा होत नाहीं. परंतु प्राचीन विचारवंतांचे यासंबंधीचे सिद्धांत तर स्वयंसिद्ध आणि जवळ जवळ त्रिकालाबाधित असल्याचें आढळून येतें. दोन कालखंडांतील माणसांच्या ज्ञानांत जरी फार मोठी तफावत असली तरी, त्या कालखंडांतील विचारवंतांनीं विज्ञानाच्या महतीशिवाय दाखवून दिलेल्या सत्याचा पडताळा आजही आपल्याला पहावयास मिळत आहे व आपल्या जीवनावर आद्यपही ती फार मोठा परिणाम घडवून आणीत आहे. हिंदु लोकांचे वेद किंवा इजिप्तमधील लोकांचें "बुक ऑफ द डेड" यांतील बरीचशी परिभाषा आज आपणांस समजेनाशी झालेली असली तरी त्यांच्या वाचनानें आपण आजहि भारावून जातों.

आपण ज्याला विज्ञान असें म्हणतों, ती संशोधनवृत्ति तेवढीच बरोबर असें मानलें तर प्राचीन विचारवंतांना मानव, त्याचा आत्मा आणि त्याचें

कार्य यासंबंधीं इतकें अचूक निदान कसें करतां आलें ? या प्रश्नाचें शास्त्रशुद्ध उत्तर द्यावयाचें असेल तर आपण अक्षरतत्त्ववादी पूर्वग्रह टाकून देऊन माणसानें सत्यशोधनासाठीं प्रदीर्घ कालपर्यंत प्रयत्न चालविलेले आहेत ही वस्तुस्थिति मोकळ्या मनानें लक्षांत घेतली पाहिजे. त्यावरून एक गोष्ट निश्चित-पणें दिसून येते कीं, माणसाच्या मनोवृत्तींत कालपरत्वें मूलभूत स्थित्यंतर घडून येत असून त्या मनोवृत्तीनुसार सत्यसंशोधनासंबंधींचे निरनिराळे दृष्टि-कोण बनलेले आहेत; आणि अशा निरनिराळ्या दृष्टिकोणांमुळें निरनिराळ्या प्रकारचें ज्ञान प्राप्त झालें आहे; मात्र तें मर्यादित क्षेत्रांपुरतें आहे. म्हणून आपण ज्याला विज्ञान म्हणून संबोधतों तो सत्यसंशोधनाचा मार्ग अक्षर किंवा त्रिकालाबाधित आहे असें नव्हे; तर माणसानें आजपर्यंत अवलंबि-लेल्या मार्गांपैकीं तो सगळ्यांत अलिकडचा मार्ग आहे इतकेंच.

आजच्या काळांतील शास्त्रशुद्ध संशोधन वृत्ति आणि इतर काळांतील वृत्ति यांमधील फरक अनेक प्रकारांनीं दाखवून देतां येईल. प्रत्येक गोष्टीला सैद्धांतिक स्वरूप देण्याची माणसानें विलक्षण हातोटी आजकाल प्राप्त करून घेतली आहे, हें त्या दोहोंमधील फरकाचें मुख्य स्वरूप आहे. एखाद्या गोष्टीला सैद्धांतिक स्वरूप देणें ही एक मूलभूत मानसिक शक्ति आहे, आणि प्राचीन विचारवंतांनीं तिचा भरपूर उपयोग करून घेतला होता. युक्लिडचे भूमितीचे सिद्धांत किंवा टॅलेमीचे खगोलशास्त्रासंबंधीचे सिद्धांत हीं त्याचींच उदाहरणें आहेत. परंतु त्या पद्धतीचा प्राचीनकाळीं केला गेलेला उपयोग आणि विसाव्या शतकांत केला जाणारा तिचा अवलंब यांत इतका फरक आहे कीं, दुसऱ्याच एखाद्या मानसिक शक्तीचा या कामीं अवलंब केला जात आहे कीं काय असें वाटूं लागतें. आधुनिक आणि प्राचीन विचारवंतांतील या प्रचंड तफावतीवरून देखील हेंच दिसून येतें कीं, निरनिराळ्या युगांतील संशोधनवृत्तीचें मूळ हें सुप्त मनांत असतें; जागृत मनाला तें सहसा हुडकून काढतां येत नाहीं.

प्राचीन वाङ्मय आणि तत्त्वज्ञान यांचें परिशीलन करणाराला एक गोष्ट स्पष्टपणें आढळून येते कीं, त्या वेळच्या माणसांची वास्तवासंबंधींची दृष्टि गुणसापेक्ष होती. म्हणजेच रंग, आवाज आणि संवेदना यांच्या अनुभवांतून त्यांना वास्तवाची प्रचीति मिळत असते. त्याचबरोबर " सद्गुण ", " चांगुल-

पणा " यासारख्या संवेदनातीत इतकेंच नव्हे तर आत्मिक गुणांच्या माध्यमाच्या द्वाराहि त्यांना वास्तवाचें ज्ञान होत असे. त्यांपैकीं आत्मिक गुण अशी कांहीं चीज आहे हें देखील आपण आतां मान्य करीनासे झालों आहोंत....पण गुणसापेक्ष अशी ही संशोधनवृत्ति मध्ययुगाच्या अखेरीपर्यंत चालू होती.

सोळाव्या शतकांत संशोधनाच्या दृष्टिकोणांत फार मोठें स्थित्यंतर घडून आलें. तोंपर्यंत गुणात्मक कल्पनांवर जो भार दिला जात असे, त्याऐवजीं सोळाव्या शतकापासून संख्यात्मक कल्पनांवर तो देण्यांत येऊं लागला. सतराव्या शतकांत गॅलिलियो आणि डेकार्ट या दोन महान् तत्त्ववेत्त्यांनीं या संख्यात्मक कल्पना तत्त्वज्ञानाच्या परिभाषेंत मांडून दाखविल्या. त्यांपैकीं गॅलिलियो हा प्रयोगशील होता तर डेकार्ट हा सैद्धांतिक होता. निसर्गांतील प्रत्येक घटनेची संगति संख्यात्मक परिभाषेंत लावून दाखवितां येईल, या कल्पनेनें या दोन तत्त्ववेत्त्यांना आणि त्यांच्या अनुयायांना पुरतें भारून टाकलें होतें. गॅलिलियोच्या मतें आकृति ( आकार, विस्तार ), संख्या आणि गति हीं वास्तवाचीं अंतिम मूलतत्त्वें होतीं, तर डेकार्ट असें मानीत असे कीं, भौतिक जगाचें मूलतत्त्व फक्त विस्तार ( आकार ) आणि गति यांतच सामावलेलें आहे. हॉब्सनें तर मानवी बुद्धि आणि संवेदना यांसकट सर्वांचें मूळ गति हेंच आहे असें प्रतिपादन केलें. या सर्वांचा परिणाम असा झाला कीं, गणित हें एक निर्णायक अक्षरशास्त्र समजलें जाऊं लागलें, आणि त्यापुढें इतर सर्व शास्त्रें दुय्यम समजलीं जाऊं लागलीं. गणितांत न बसणारे असे गुणात्मक भेद कमी महत्त्वाचे समजले जाऊ लागले. इतकेंच नव्हे तर त्यांचें आस्तित्व देखील लक्षांत न घेण्याची प्रवृत्ति बळावूं लागली. गणितशास्त्राच्या आधारें ज्याची संगति लावून दाखवितां येईल तेंच काय तें सत्य अशी समजूत होऊन बसली.

आधुनिक विज्ञानानें केलेल्या प्रगतीच्या मानानें सोळाव्या आणि सतराव्या शतकांतील वैज्ञानिकांनीं सुरवातीला केलेले प्रयत्न हे अगदींच प्राथमिक स्वरूपाचे वाटतात, सर्वसाधारण वाटतात. सर्वसामान्य निरीक्षणापुरतें पाहिले तर इलेक्ट्रो मॅग्नॅटिक रेडीएशनच्या वेगवेगळ्या प्रकारांत फार मोठे गुणात्मक भेद असतात असें दिसतें. इलेक्ट्रानिक आणि रेडिओ लहरींमुळें उष्णता निर्माण होते असें क्वचितच कोणी म्हणेल. त्याचप्रमाणें आपणाला जो प्रकाश

दिसतो त्यापेक्षां ऊष्णतेचें स्वरूप निराळें असतें आणि सप्तरंगी प्रकाशापेक्षां अल्ट्रा व्हायोलेट किंवा एक्स रे, गामा रे वगैरेंचें स्वरूप सर्वस्वी भिन्न असतें, हेंही आपण जाणतों. परंतु सिद्धांतिक पदार्थविज्ञानशास्त्राच्या दृष्टीनें या सर्व घटनांतील फरक हा निव्वळ संख्यात्मक फरक आहे. व्यावहारिक निरीक्षणाच्या दृष्टीनें बोलावयाचें झाल्यास प्रत्येक जडवस्तु ही गुणात्मकच असते. परंतु आधुनिक पदार्थविज्ञान शास्त्रज्ञांनीं जडवस्तु ही निव्वळ संख्यात्मक कल्पना बनवून टाकली आहे. उपलब्ध असलेल्या सुमारें १०८ मूलद्रव्यांत अगदीं निरनिराळे गुणधर्म असतात. परंतु आधुनिक विज्ञानाच्या दृष्टीनें मात्र प्रत्येक मूलतत्त्वांतील हे फरक त्यांतील अणुपरमाणूंच्या संख्येमुळें घडून येत असतात.

डेकार्टनें आणि त्याच्या अनुयायांनीं गणितशास्त्र हेंच काय तें निर्णायक शास्त्र आहे अशी भूमिका घेतली होती. ती आज राहिलेली नाहीं हें अर्थात् खरें. निरीक्षण, तुलनात्मक विश्लेषण किंवा पृथक्करण आणि निरनिराळ्या प्रकारचे " नियंत्रित " असे प्रयोग, यांमुळें विज्ञानाला असें एक क्षेत्र उपलब्ध झालें आहे कीं, ज्यांत गणितशास्त्राला दुय्यम स्थान प्राप्त झालें आहे. उदाहरणार्थ, डार्विनचा उत्क्रांतिवाद हा कांहीं मूलतः गणितशास्त्रावर आधारलेला नाहीं. परंतु ज्या क्षेत्रांत गणितशास्त्रांतील सिद्धांतांना कमीत कमी महत्त्व आहे, अशा क्षेत्रांतदेखील आधुनिक शास्त्रज्ञांचा सत्यासंबंधींचा दृष्टिकोण हा मुख्यतः संख्यात्मकच असतो. या ना त्या स्वरूपाचें मोजमाप ही त्यांच्यामतें अखेरची कसोटी असूं शकते. ही कसोटी कॉंटम् सिद्धांताला हत्तीच्या आणि तत्सम प्राचीन प्राण्यांच्या कवट्यांच्या तुलनेला आणि माणसांच्या लैंगिक आचरणाला सारखीच लावली जाते. वस्तु मुळांत काय आहे हें पाहण्याऐवजीं तिच्यांत मोजतां येण्यासारखें काय आहे हें पाहिलें जातें. प्राणवायूच्या एका अणूंत किती इलेक्ट्रॉन्स असतात हें आपणांला निश्चितपणें सांगतां येतें. परंतु प्रत्यक्ष प्राणवायु ही काय चीज आहे हें मात्र आपल्याला सांगतां येत नाहीं. शास्त्रीय सत्य शोधून काढणाराचे दृष्टीनें हा प्रश्नच मुळीं गैरलागू ठरतो. प्राणवायु म्हणजे आठ इलेक्ट्रॉन्स असलेलें मूलद्रव्य एवढें आपल्याला माहीत असतें. आणि त्या मूलभूत परिमाणाच्या परिभाषेंत व्यक्त होणाऱ्या घटनेच्या आधारावर आपण प्राणवायु-

संबंधीच्या ज्ञानाचा विस्तार करीत असतां. सर विल्यम् डॉम्पिअर म्हणतो, " एखाद्या वस्तूंतल्या घटकांच्या आंतरप्रकृतीशीं शास्त्रज्ञाला कांहीं कर्तव्य नाहीं. तो त्यांचे फक्त परस्परसंबंध पाहतो. ह्या परस्परसंबंधाची "वास्तवता" त्या घटकांच्या " वास्तव प्रकृतीवर " मुळींच अवलंबून नसते. "

* * *

## ३ : : ' एकाक्ष आणि रंगांध '

गुणात्मक कल्पनांचा त्याग केल्यामुळें मानवी स्वातंत्र्याच्या मार्गावरील फार मोठा टप्पा एकदम गांठता आला. त्यायोगें गुणात्मक जगाशीं जखडलेलें मन मुक्त झालें. कांहीं शास्त्रज्ञ म्हणतात, त्याप्रमाणें गुणात्मक जग हें आभासात्मक नसलें तरी अनेक आभास त्याच्याशीं निगडित झाले आहेत. मनाच्या या मुक्ततेमुळें एक फार महत्त्वाचा परिणाम घडून आला. तो म्हणजे निसर्गाशीं नुसतेंच तादात्म्य पावण्याऐवजीं त्यावर विजय मिळविण्याचें स्वातंत्र्य मानवाला प्राप्त झालें.

गुणात्मक दृष्टिकोणाचा त्याग केल्यामुळें मानवाला निसर्गावर प्रभुत्व मिळवण्याच्या कामीं फार मोठी कामगिरी बजावतां आली असली तरी त्याचबरोबर त्यामुळें बौद्धिक आणि आध्यात्मिक स्वरूपाचे इतर कांहीं महत्त्वपूर्ण परिणामहि घडून आलेले आहेत. आधुनिक कालाचें यथातथ्य आकलन होण्यासाठीं हे परिणाम नीट समजावून घेणें आवश्यक आहे. मानवानें ही जी एवढी प्रगति करून घेतली, त्यासाठीं शास्त्रशुद्ध संशोधन-दृष्टीचा त्यानें जो अवलंब केला, त्यामुळें त्याला फार जबर किंमत द्यावी लागली.

आजच्या काळांतील विख्यात विज्ञानविषयक तत्त्वज्ञ मरहूम आर्थर एडिंग्टन यांनीं हा मुद्दा एक उदाहरण घेऊन सुस्पष्ट करून दाखविला आहे. ते म्हणतात :—" गणितबद्ध विज्ञानांत कोणत्या प्रकारच्या ज्ञानाचा प्रपंच केला जातो तें आपण पाहूं या. त्या दृष्टीनें पदार्थविज्ञान या विषयांतील सहज समजण्यासारख्या प्रश्नासाठीं आपण कांहीं प्रश्नपत्रिका पाहिल्या तर आपल्याला पुढीलसारखा एखादा प्रश्न आढळेल. ' गवताळ टेकडीकरून एक हत्ती

घसरत जातो....' या हत्तीकडे विशेष लक्ष देण्याची जरूर नाहीं हें अनुभवी विद्यार्थ्याला माहीत असतें. केवळ त्या प्रश्नाला वास्तवतेचा साज चढविण्या-साठीं अशी सुरवात केलेली असते. नंतर तो वाचूं लागतो. 'हत्तीचें वजन दोन टन आहे.' ही त्या प्रश्नाची खरी सुरुवात आहे. सुरुवातीचा तो हत्ती मागें पडून आतां त्याच्या दोन टन वजनाला महत्त्व प्राप्त होतें. या दोन टन वजनाचें स्वरूप नेमकें काय आहे हा त्या प्रश्नाचा खरा गाभा आहे. बाह्य जगाच्या विशिष्ट भागांतील "अवजडपणा" म्हणून आपण ज्याला संबोधतों त्याच्याशीं याचा कांहीं तरी संबंध आहे. परंतु बाह्य जगाचें स्वरूप हें अभेद्य किंवा गूढ असल्याकारणानें त्याबाबतींत कांहीं प्रगति होऊं शकत नाहीं; आणि पुढें चाललोंच तर आपण अवर्णनीयाच्या गर्तेत खोल खोल जाण्याचा संभव आहे. म्हणून मग त्या दोन टनाचा निर्देश कशाच्या संद-र्भात केला आहे ह्याचा विचार न करतां, दोन टन म्हणजे नेमकें काय ? एवढेंच बघावें...त्याचें उत्तर येतें :—हत्तीला वजनाच्या कांट्यावर घातलें असतां कांटा जें वजन दाखवितो तें म्हणजे दोन टन. आतां आणखी पुढें जाऊं." टेकडीचा उतार ६०° चा आहे. त्यांतली टेकडी मागें पडून तिचा साठ अंशांचा कोन तेवढा पुढें येतो. साठ अंश म्हणजे काय? दिशे-संबंधींच्या गूढ कल्पनांचा या ठिकाणीं घोळ घालीत बसण्याची जरूर नाहीं. साठ अंशांचा कोन म्हणजे कोनमापकांत विशिष्ट जागेसमोर रेषा येते ती...

यावरून आपल्या हें लक्षांत येईल कीं, त्या प्रश्नांतला काव्यात्मक भाग मागें पडतो आणि जेथें गणितबद्ध विज्ञानाचें क्षेत्र सुरू होतें तेथें रेषांच्या किंवा आकड्यांच्या मोजमापाव्यतिरिक्त दुसरें कांहीं शिल्लक राहात नाहीं. ........आणि शास्त्रीय गणितें करणाऱ्या यंत्रांतून........आंकड्यापलीकडे दुसरें काय हातीं लागणार ?....गणितबद्ध विज्ञानाचें मुळीं तेंच कार्य आहे. ....बाह्य जगांतील वस्तूंविषयीं आपल्या विशिष्ट कल्पना बनलेल्या असतात. परंतु, गणितबद्ध विज्ञानशास्त्र त्यांची दखल घेत नाहीं किंवा त्यांना पुष्टीहि देत नाहीं. एखादा विशिष्ट प्रश्न, गणितबद्ध विज्ञानाच्या सुपूर्त केला जाण्या-पूर्वीं त्याच्यासंबंधींच्या कल्पनांच्या जागीं मोजमापानें आलेल्या संख्यांची स्थापना करावी लागते."

अशा तऱ्हेनें हत्ती आणि टेकडीचा गवताळ उतार यांच्यासंबंधीचें गुणात्मक ज्ञान बाजूस सारलें जाऊन त्यांच्यासंबंधीं निराळ्याच स्वरूपाचें ज्ञान निष्पन्न होतें. या ज्ञानाला उद्देशून एडिंग्टननें योजलेला शब्दप्रयोग मोठा अन्वर्थक आहे. अर्थात् त्यानें तो शब्दप्रयोग निराळ्या संदर्भात वापरला होता. पण येथें तो चांगला लागू पडतो. तो म्हणतो, अशा स्वरूपाचें ज्ञान प्राप्त करून घेतांना आपण जणूं एकाच डोळ्याचा उपयोग करीत होतों आणि तो डोळादेखील ' रंगांध ' होता. अर्नेस्ट लेहर्सच्या भाषेंत सांगावयाचें तर पदार्थविज्ञानशास्त्रज्ञांनीं संख्यात्मक सिद्धांतावर इतका भर दिला आहे कीं, जणुं कांहीं जगाकडे बघण्याची त्यांची दृष्टीच एकाक्ष बनली आणि तो एकाक्ष सुद्धां रंगांध बनून गेला. आपण सर्वसाधारणपणें ज्याला वास्तव म्हणून संबोधतों त्याच्या छायांचें एक कल्पानिक जग—अणुपरमाणूंचें जग—त्यांनीं उभें केलें आहे. आणि जग म्हणजे एक पोकळी आहे. जडवस्तूला आधारभूत धरलेले इलेक्ट्रॉन्स हे नुसते गृहीत आहेत. भौतिक दृष्ट्या ते अस्तित्वांत नाहींत. अशा तऱ्हेनें अनुभवांतीं खोटें ठरणाऱ्या आणि कल्पनाशक्ति गोठून सोडणाऱ्या अथांग पोकळीपाशीं मानव येऊन ठेपतो. त्याला ज्ञात असलेलें असें जग किंवा माणूस म्हणून त्याला परिचित असलेला रंग, शब्द, गंध, स्पर्श आणि सौंदर्य यांपैकीं कांहींहि त्या पोकळींत नसतें. त्याची अंतिम कसोटी आंकड्याची आहे, नीति-निरपेक्ष आहे, हेतुनिरपेक्ष आहे. इंद्रिय—संवेदनांच्या द्वारां जें अनुभवाला येतें त्यापेक्षां तें सर्वस्वीं निराळ्या प्रकारचें असतें. इतकेंच नव्हे तर, मानवी आशा आकांक्षांच्याहि तें अतीत असतें. आणि एखाद्या कलाकाराची कलाकृत्ति किंवा नीतिवाद्याचें नीतितत्त्व यापैकीं कशाचीच दखल तिथें घेतली जात नाहीं.

संशोधनाच्या बाबतींत संख्यात्मक पद्धतीचा अवलंब केला म्हणजे असें होणें क्रमप्राप्तच आहे. संख्यात्मक जगाच्या दृष्टीनें सर्वांत वास्तव गोष्टी म्हटल्या म्हणजे जडवस्तूंसंबंधींच्या गणितशास्त्राच्या आधारें सिद्ध करतां येण्याजोग्या गोष्टी. विज्ञानाच्या प्रगतीबरोबर हें वास्तव अधिकाधिक अमूर्त होत जातें. आणि सरतेशेवटीं मानवी अनुभवाच्याच नव्हे तर मानवी कल्पनाशक्तिच्याहि कक्षेच्या पलीकडे जातें. ज्या सुव्यवस्थित अशा त्रिपरिमाणात्मक ( Space ) अवकाशाच्या संदर्भात न्यूटननें आपले युगप्रवर्तक

घसरत जातो....' या हत्तीकडे विशेष लक्ष देण्याची जरूर नाहीं हें अनुभवी विद्यार्थ्याला माहीत असतें. केवळ त्या प्रश्नाला वास्तवतेचा साज चढविण्या-साठीं अशी सुरवात केलेली असते. नंतर तो वाचूं लागतो. 'हत्तीचें वजन दोन टन आहे.' ही त्या प्रश्नाची खरी सुरुवात आहे. सुरुवातीचा तो हत्ती मागें पडून आतां त्याच्या दोन टन वजनाला महत्त्व प्राप्त होतें. या दोन टन वजनाचें स्वरूप नेमकें काय आहे हा त्या प्रश्नाचा खरा गाभा आहे. बाह्य जगाच्या विशिष्ट भागांतील "अवजडपणा" म्हणून आपण ज्याला संबोधतों त्याच्याशीं याचा कांहीं तरी संबंध आहे. परंतु बाह्य जगाचें स्वरूप हें अभेद्य किंवा गूढ असल्याकारणानें त्याबाबतींत कांहीं प्रगति होऊं शकत नाहीं; आणि पुढें चाललोंच तर आपण अवर्णनीयाच्या गर्तेंत खोल खोल जाण्याचा संभव आहे. म्हणून मग त्या दोन टनाचा निर्देश कशाच्या संद-र्भांत केला आहे ह्याचा विचार न करतां, दोन टन म्हणजे नेमकें काय? एवढेंच बघावें...त्याचें उत्तर येतें:—हत्तीला वजनाच्या कांट्यावर घातलें असतां कांटा जें वजन दाखवितो तें म्हणजे दोन टन. आतां आणखी पुढें जाऊं." टेकडीचा उतार ६०° चा आहे. त्यांतली टेकडी मागें पडून तिचा साठ अंशांचा कोन तेवढा पुढें येतो. साठ अंश म्हणजे काय? दिशे-संबंधींच्या गूढ कल्पनांचा या ठिकाणीं घोळ घालीत बसण्याची जरूर नाहीं. साठ अंशांचा कोन म्हणजे कोनमापकांत विशिष्ट जागेसमोर रेषा येते ती...

यावरून आपल्या हें लक्षांत येईल कीं, त्या प्रश्नांतला काव्यात्मक भाग मागें पडतो आणि जेथें गणितबद्ध विज्ञानाचें क्षेत्र सुरू होतें तेथें रेषांच्या किंवा आकड्यांच्या मोजमापाव्यतिरिक्त दुसरें कांहीं शिल्लक राहात नाहीं. ........आणि शास्त्रीय गणितें करणाऱ्या यंत्रांतून........आंकड्यापलीकडे दुसरें काय हातीं लागणार?....गणितबद्ध विज्ञानाचें मुळीं तेंच कार्य आहे. ....बाह्य जगांतील वस्तूंविषयीं आपल्या विशिष्ट कल्पना बनलेल्या असतात. परंतु, गणितबद्ध विज्ञानशास्त्र त्यांची दखल घेत नाहीं किंवा त्यांना पुष्टीहि देत नाहीं. एखादा विशिष्ट प्रश्न, गणितबद्ध विज्ञानाच्या सुपूर्त केला जाण्या-पूर्वीं त्याच्यासंबंधींच्या कल्पनांच्या जागीं मोजमापानें आलेल्या संख्यांची स्थापना करावी लागते."

अशा तऱ्हेनें हत्ती आणि टेकडीचा गवताळ उतार यांच्यासंबंधीचें गुणात्मक ज्ञान बाजूस सारलें जाऊन त्यांच्यासंबंधीं निराळ्याच स्वरूपाचें ज्ञान निष्पन्न होतें. या ज्ञानाला उद्देशून एडिंग्टननें योजलेला शब्दप्रयोग मोठा अन्वर्थक आहे. अर्थात् त्यानें तो शब्दप्रयोग निराळ्या संदर्भांत वापरला होता. पण येथें तो चांगला लागू पडतो. तो म्हणतो, अशा स्वरूपाचें ज्ञान प्राप्त करून घेतांना आपण जणूं एकाच डोळ्याचा उपयोग करीत होतों आणि तो डोळादेखील ‘ रंगांध ’ होता. अर्नेस्ट लेहर्सच्या भाषेंत सांगावयाचें तर पदार्थविज्ञानशास्त्रज्ञांनीं संख्यात्मक सिद्धांतावर इतका भर दिला आहे कीं, जणुं कांहीं जगाकडे बघण्याची त्यांची दृष्टीच एकाक्ष बनली आणि तो एकाक्ष सुद्धां रंगांध बनून गेला. आपण सर्वसाधारणपणें ज्याला वास्तव म्हणून संबोधतों त्याच्या छायांचें एक कल्पानिक जग—अणुपरमाणूंचें जग—त्यांनीं उभें केलें आहे. आणि जग म्हणजे एक पोकळी आहे. जडवस्तूला आधारभूत धरलेले इलेक्ट्रॉन्स हे नुसते गृहीत आहेत. भौतिक दृष्ट्या ते अस्तित्वांत नाहींत. अशा तऱ्हेनें अनुभवांतीं खोटें ठरणाऱ्या आणि कल्पनाशक्ति गोठून सोडणाऱ्या अथांग पोकळीपाशीं मानव येऊन ठेपतो. त्याला ज्ञात असलेलें असें जग किंवा माणूस म्हणून त्याला परिचित असलेला रंग, शब्द, गंध, स्पर्श आणि सौंदर्य यांपैकीं कांहींहि त्या पोकळींत नसतें. त्याची अंतिम कसोटी आंकड्याची आहे, नीति-निरपेक्ष आहे, हेतुनिरपेक्ष आहे. इंद्रिय—संवेदनांच्या द्वारां जें अनुभवाला येतें त्यापेक्षां तें सर्वस्वीं निराळ्या प्रकारचें असतें. इतकेंच नव्हे तर, मानवी आशा आकांक्षांच्याहि तें अतीत असतें. आणि एखाद्या कलाकाराची कलावृत्ति किंवा नीतिवाद्याचें नीतितत्त्व यापैकीं कशाचीच दखल तिथें घेतली जात नाहीं.

संशोधनाच्या बाबतींत संख्यात्मक पद्धतीचा अवलंब केला म्हणजे असें होणें क्रमप्राप्तच आहे. संख्यात्मक जगाच्या दृष्टीनें सर्वांत वास्तव गोष्टी म्हटल्या म्हणजे जडवस्तूंसंबंधींच्या गणितशास्त्राच्या आधारें सिद्ध करतां येण्याजोग्या गोष्टी. विज्ञानाच्या प्रगतीबरोबर हें वास्तव अधिकाधिक अमूर्त होत जातें. आणि सरतेशेवटीं मानवी अनुभवाच्याच नव्हे तर मानवी कल्पनाशक्तिच्याहि कक्षेच्या पलीकडे जातें. ज्या सुव्यवस्थित अशा त्रिपरिमाणात्मक ( Space ) अवकाशाच्या संदर्भांत न्यूटननें आपले युगप्रवर्तक

सिद्धांत काढले त्या अवकाशाची कल्पना करणें तरी शक्य होतें. परंतु पदार्थविज्ञानशास्त्रांनीं आतां त्याहि पुढील टप्पा गांठला असून ते आतां चतुर्मितीच्या परिभाषेंत अवकाश–काल सातत्यासंबंधीं बोलूं लागले आहेत. परंतु त्याचें अस्तित्व मानवी अनुभवाच्या जगांत नसून पदार्थविज्ञान-शास्त्रांतील गहन सिद्धांतांत आहे. जडवस्तूसंबंधींच्या न्यूटनच्या सिद्धांताची देखील अशीच गत झाली आहे. न्यूटनच्या मतें जडवस्तु ही परस्परांवर आदळणाऱ्या घनकणांची मिळून बनलेली असते. परंतु आधुनिक विज्ञानशास्त्रज्ञ असें मानतात कीं, जडवस्तु ही एक स्वयंपूर्ण अशा घटकावयवांची मिळून बनलेली असते. या घटकावयवांचें स्वरूप काय आहे कोणालाहि सांगतां येत नाहीं. सर्वसामान्य माणूस ज्याला भौतिक किंवा जड म्हणून ओळखतो, तसें त्याचें स्वरूप नसतें इतकेंच काय तें त्याबद्दल म्हणतां येईल. एकाच आणि तेंहि रंगांध डोळ्यांनीं पाहिलें असतां दिसणारें जग हें अशा-प्रकारचें आहे.

तेव्हां असा प्रश्न पडतो कीं, हीं शास्त्रशुद्ध अनुमानें त्याज्य ठरविणारें तत्त्वज्ञान खरें कीं, आतांपर्यंत अनेक वैज्ञानिकांनीं आणि मूलविज्ञानवाद्यांनीं बसविलेली शास्त्रीय संशोधन पद्धति खरी ? हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. या बाबतींतील रसेलसारख्या शास्त्रज्ञांचें म्हणणें खरें धरलें तर कार्यकारण भावासंबंधींचा मार्क्सवादी सिद्धांत मान्य करावा लागेल आणि स्वतंत्र जगाला त्याच्याशीं कसेंबसें जमवून घ्यावें लागेल. परंतु उलटपक्षीं उपरिनिर्दिष्ट शास्त्रीय संशोधनपद्धति ही संपूर्ण सत्य काढण्याच्या दृष्टीनें सदोष किंवा तोकडी आहे असें ठरलें तर मग त्यांतले दोष शोधून काढण्याची उमेद स्वतंत्र जगाला बाळगतां येईल. थोडक्यांत म्हणजे विज्ञानावर आधारलेली परंतु केवळ संख्यात्मक कसोटीपुरती मर्यादित नसलेली अशी नवी संशोधनपद्धति शोधून काढणें शक्य होईल.

शास्त्रीय संशोधनपद्धतीचा प्रधान हेतु सत्याचें आकलन करून घेणें हा असतो, असें नेहमीं सांगितलें जातें. परंतु अगदीं प्रामाणिकपणें बोलावयाचें तर हें विधान तरी सत्याच्या कसोटीला उतरूं शकेल काय ? रंगाचेंच आपण उदाहरण घेऊं. रंग म्हणजे तरी काय ? प्रकाशलहरींच्या विशिष्ट कंपनामुळें डोळ्यांच्या आंतल्या पडद्यावर होणारा यांत्रिक आणि रासायनिक

परिणाम असें म्हणता येईल का ? परंतु कलाकार असें मानतो कीं, प्रत्येक रंगाला केवळ रंग म्हणून स्वतःचें जीवन असतें. लाल रंग आणि निळा रंग यांतील फरक हा शास्त्रज्ञाच्या मोजमापापेक्षां अगदीं वेगळ्या प्रकारचा फरक आहे. मग लाल रंग डोळ्यांना भडक वाटतो, तर निळा रंग डोळ्यांना सुखावह व सौम्य वाटतो. हा फरक खरा फरक नाहीं का ? रंगांतील या निरनिराळ्या गुणधर्मांत कांहींच का सत्य नाहीं, आणि निरनिराळ्या रंगासंबंधीचे हे अनुभव सार्वत्रिक स्वरूपाचे असतात हें तरी कसें ? परंतु लाल आणि निळ्या रंगांतील ही गुणात्मक तफावत विज्ञानवाद्यांना अवास्तव वाटते, कारण ती त्यांच्या संख्यात्मक मोजमापनाशीं सुसंगत ठरत नाहीं, अचूक मूल्यमापन करण्यासाठीं विज्ञानाला रंगाकडे रंगविहीन दृष्टीनेंच पहावें लागतें.

आतां असा प्रश्न उभा राहतो कीं, एखाद्या वस्तूचा गुणात्मक दृष्टीनें विचार करण्याचें पदार्थ-विज्ञानवादी नाकारतो, त्यावेळीं तो वास्तवतेकडेच तर पाठ फिरवीत नाहीं ना ? तो ज्याला जडवस्तु म्हणून संबोधतो तें वस्तुतः त्या जडवस्तूचें केवळ काल्पनिक–आभासात्मक स्वरूप तर नसेल ! सिनेमा म्हणजे देखील पडद्यावर पडलेल्या छायाच नसतात का ? आपण खूप मोठी दुर्बिण तयार केली तर आपल्याला खूप दूरचें दिसूं शकेल व त्यामुळें पुष्कळ नव्या गोष्टी शिकतां येतील. तथापि एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, जोपर्यंत दुर्बिणीच्या मदतीनेंच आपण विश्वासंबंधींचें ज्ञान प्राप्त करून घेत आहों, तोंपर्यंत आपल्याला ज्ञात झालेलें विश्व त्या दुर्बिणीमुळेंच निर्माण झालें असलें पाहिजे अशी शंका मनांत आल्यावांचून राहात नाहीं. विश्वाचें भव्य, उदात्त स्वरूप पाहतांना आपल्या मनांत भयमिश्रित आश्चर्याचे जे भाव उमटतात त्याची नोंद दुर्बिणीवर कधींच केली जात नाहीं, पण म्हणून ते भावच मुळांत नसतात किंवा त्यांना विशिष्ट स्थान नसतें असें म्हणतां येईल का ? असें तर आपल्याला खासच म्हणतां येणार नाहीं. आणि त्यांत आधुनिक शास्त्रीय संशोधनवृत्तीशीं विसंगत असेंहि कांहीं नाहीं. संख्यात्मक मूल्यमापनामुळें भीति आणि आश्चर्य हे भाव नष्ट होत असले तरी अंतर्यामीं आपली अशी खात्री पटलेली असते कीं, सत्यशोधनाच्या योगानें ते भाव अजिबात नष्ट होत नाहींत.

विज्ञानाच्या कांटेकोर चौकटींत जखडले गेल्यामुळें कांहीं ठळक वस्तुस्थितीकडे आपलें दुर्लक्ष होतें व त्यामुळेंच संघर्ष उद्‌भवतो. ही वस्तुस्थिति म्हणजे मानवाच्या दृष्टीनें सर्व वास्तव हें गुणात्मकच असतें. माणसाला नुसत्या संख्यात्मक जगांत जगतां येणें अशक्य आहे. मग त्याचें मन त्या प्रांतांत किती का उंच भरारी घेई ना! त्याच्या इंद्रियांना होणाऱ्या सर्व संवेदना या मुख्यतः गुणात्मकच असतात. त्याचप्रमाणें त्याच्या सर्व भावना, इतकेंच नव्हें तर त्याच्या विचारांपैकीं पुष्कळसा भागदेखील असाच गुणात्मक असतो. हा माणूस चांगला कीं, तो माणूस चांगला याविषयीं निर्णय घेतांनादेखील त्याला गुणात्मक कसोटीच लावावी. शिवाय, क्षणोक्षणीं त्याला नीतिविषयक निर्णय देण्याची आंतरिक जरूर भासत असते. केवळ संख्यात्मक पृथक्करणाच्या आधारावर हे नीतिवादी निर्णय देतां येत नाहींत. अनेक तत्त्वज्ञांनीं या निर्णयांनादेखील संख्यात्मक आधार देण्याचा प्रयत्न केला आहे. उदा० मोठ्या आणि लहान सुखाची ते तुलना करून दाखवतात आणि अनेक लोक मग त्यांचेंच अनुकरण करूं लागतात. तरीदेखील या मार्गांतसुद्धां अखेरीस गुणात्मक कसोटीच लावावी लागते, हें सुखवाद आणि उपयुक्ततावाद यांच्या इतिहासावरून सहज सिद्ध होण्यासारखें आहे. एक म्हणजे मानवाला आपल्या अनुभवाच्या सहाय्यानें अचूक संख्यात्मक मूल्यमापन करणें अशक्य असतें आणि दुसरें म्हणजे संख्यात्मक अचूकपणा त्याच्या उपयोगीहि फारसा पडत नाहीं.

सत्य हें फक्त संख्यात्मकच असतें, अशी माणसाची खात्री होऊन चुकल्याबरोबर सर्व मानवी अनुभवांच्या सत्यतेचा पायाच ढासळूं लागतो. कारण मूलविज्ञानवाद्यांच्या दृष्टीनें हें मानवी जग हा सत्यशोधनाच्या मार्गांतील एक मोठा अडथळा आहे आणि बदलणाऱ्या मानवी अनुभवांना संख्यात्मक स्वरूप देणें शक्य नसल्यामुळें ते वास्तव असूंच शकत नाहींत. मानव प्राणी म्हणून माणसाला होणारें ज्ञान किंवा जाणवणारी भावना हीं निव्वळ आभासात्मक असतात. संस्कृति, काव्य, कला, श्रद्धा आणि आत्मज्ञान या क्षेत्रांत माणसांनीं मिळविलेल्या यशाला कांहीं अर्थ नाहीं. त्याला वास्तव म्हणतां येणार नाहीं किंवा विश्वामध्यें त्याला कसलें स्थानहि नाहीं. चतुःपरिमाणात्मक अवकाशांत जो कोट्यावधि प्रकाश-वर्षें पसरून राहिला आहे आणि

जो केवळ योगायोगाच्या आंकडेवार सरासरीनें नियमित झाला अशा अंधःकारांत लोप पावणें हेंच त्या यशाचें भवितव्य आहे.

ह्या सर्व परिस्थितीसंबंधीं अनिवार्यपणें जी तात्त्विक प्रतिक्रिया घडून आली आहे ती म्हणजे सर्वंकष द्वैत. एक बाह्य आणि एक आंतरिक, अशीं दोन तात्त्विक जगें निर्माण झालीं आहेत. बाह्य जगाचें संख्यात्मक मूल्यमापन करणें शक्य असल्याकारणानें शास्त्रीय संशोधनवृत्तीनें त्या जगाला मूळ सत्य मानलें आहे. आंतरिक जग हें गुणात्मक असून त्याच्या वास्तवतेसंबंधीं अनेकदां शंका घेण्यांत येते, इतकेंच नव्हें, तर तें अजिबात नाकारण्यांतहि येतें. आंतरिक जगाचे पुरस्कर्ते जे आदर्शवादी त्यांची पीछेहाट करून त्यांना उधळून लावण्यांत आलें आहे. कारण, विज्ञानाची शक्ति बाह्य जगाची तरफदारी करणाऱ्या भौतिकवाद्यांच्या पाठीशीं उभी राहते आणि विज्ञान हें प्रत्यक्षपणें तत्वज्ञानविषयक वादांत उतरलें नाहीं तरी तें संख्यात्मक पुराव्यांच्या द्वारा त्या लोकांना भरपूर खाद्य पुरवूं शकतें.

* * *

## ४ : : गुण आणि संख्या

शास्त्रीय संशोधन वृत्तीसंबंधींच्या वरील विश्लेषणावरून हें दिसून येईल कीं, त्यांत विशेषतः गणित, पदार्थविज्ञान आणि रसायन यासारख्या तथाकथित गणितबद्ध विज्ञानशास्त्रांचा मानवी विचारावर जो परिणाम घडून येतो त्यावर विशेष भर दिलेला आहे. आणि गणिताशीं घनिष्ठ संबंध नसलेल्या प्राणिशास्त्र, शरीरशास्त्र यांसारख्या सेंद्रिय शास्त्रांकडे कांहींसें दुर्लक्ष केलें गेलें आहे. ए. एन. व्हाईटहेड यांनीं दाखवून दिल्याप्रमाणें वास्तवसंबंधीं शुद्ध गणिती दृष्टिकोणाऐवजीं सेंद्रिय दृष्टिकोण स्वीकारला तर एक नवेंच दृश्य उभें राहतें. गणिती दृष्टिकोणापेक्षां तें अगदीं निराळें असतें. तरीदेखील गणितासारख्या शास्त्रावर देण्यांत येणारा भर अनिवार्य असाच आहे. कारण त्या शास्त्रांत झालेल्या प्रगतीमुळेंच माणसाला मध्ययुगीन कोंडी फोडून शास्त्रीय संशोधनाच्या क्षेत्रांत झपाट्यानें प्रगति करून घेतां आली.

या शास्त्रीय संशोधनवृत्तीचें एक विचित्र वैशिष्ट्य असें आहे कीं, माणसाला एकसारखा त्याचाच ध्यास लागलेला आहे.

सोळाव्या आणि सतराव्या शतकांत जागृतीचे पडसाद प्रथम उमटूं लागल्यापासून पाश्चात्य जगानें संख्यात्मक कसोटी लावून सत्य हुडकून काढल्यावर आपलें सारें लक्ष केंद्रित केलें असून तें कशामुळेंहि विचलित होऊं शकलेलें नाहीं. कारण, मानवानें ज्या संशोधनपद्धतीचा अवलंब केला आहे त्या पद्धतीमुळें त्याच्या आस्तित्वाच्याच सत्यतेबद्दल संशय निर्माण झाला आहे. तीन शतकांपेक्षांहि अधिक काळपर्यंत वास्तवासंबंधींची ही अ–मानवी कल्पना त्यानें उराशीं बाळगली आहे; आणि आतां त्या कल्पनेनें माणसाची सारी विचारशक्ति, त्याचें सारें मूल्यमापन आणि इतरांबरोबरचे त्याचे संबंध या सर्वांवर आपला पगडा बसविला आहे. स्वतःला येणारे गुणात्मक अनुभव विश्वासार्ह नसतात एवढेंच नव्हे तर ते चुकीचे असतात अशी आधुनिक माणसानें स्वतःची ठाम समजूत करून घेतलेली असते. सत्यासंबंधीं त्याला स्वतःला कसलेंच ज्ञान नसतें–असलेंच तर तें अत्यल्प असतें. सत्यसंशोधन हें ‘ तज्ञ ’ आणि तंत्रविशारद यांचें क्षेत्र आहे. त्यांना त्यासाठीं संशोधनाच्या ज्या सवलती उपलब्ध असतात त्या सर्वसामान्य माणसाला असूं शकत नाहींत. म्हणून ‘ सत्या ’साठीं त्यांच्यावरच विसंबायला पाहिजे असें त्याला वाटतें.

सर्वसामान्य माणूस हा जवळजवळ संपूर्ण अंधारांत चांचपडतो आहे. आणि आपण वर पाहिल्याप्रमाणें अमेरिकेंतील तत्वज्ञानविषयक परंपरांनींच त्याला त्या अंधाराकडे नेलें आहे.

माणसाला हा ध्यास लागण्याचीं कारणें कांहींही जरी असलीं आणि आजच्या काळांत ही प्रवृत्ति कितीहि प्रभावी बनलेली असली तरी माणसांमध्यें, निदान त्यांच्यापैकीं कांहीं जणांत तरी, त्यांतून मुक्त होण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली आहे, अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं आहेत. “ आज स्वतंत्र जगाला जर कशाची जरूरी असेल तर ती म्हणजे ‘आध्यात्मिक जागृति ’ची, अशी मागणी सर्व थरांतून होऊं लागली आहे. सर्वसामान्य जनतेला ह्या मागणीचा अर्थ नीटसा उमगला नसेल. परंतु येथवर केलेल्या विवेचनावरून आपल्याला येवढें अनुमान काढतां येईल कीं, आध्यात्मिक जागृति याचा,

सामान्य माणसाला अभिप्रेत असलेला अर्थ इतकाच असतो कीं, वास्तवाकडे बघण्याचा दृष्टिकोण संख्यात्मकच असला पाहिजे हा शास्त्रीय संशोधनपद्धतीचा अट्टाहास त्यांना सहन होत नाहीं. त्याचबरोबर गणितबद्ध विज्ञानाच्या क्षेत्रांतहि फार मोठी क्रांति घडून येऊं पहात आहे, याची विज्ञानाच्या सर्व विद्यार्थ्यांना जाणीव झालेली आहे. या क्रांतीची परिणति अखेर कशांत होणार आहे तें अद्यापि आपल्याला समजलेलें नाहीं. परंतु विज्ञानविषयक वाङ्मय वाचलें तर त्यांत सर्वत्र नव्या कल्पना आणि नवे दृष्टिकोण मांडण्यांत येत असल्याचें आढळून येईल. ह्या क्रांतीची गुतागुंत सोडविणें हें ह्यावेळीं काम नाहीं. पण जो एक विशेष दृष्टिकोण प्रकट होऊं लागला आहे, त्याची दखल मात्र आपल्याला घेतलीच पाहिजे.

आधुनिक काळांतील एक महान् शास्त्रज्ञ प्रो. वेर्नर हैझेनबर्ग यांनीं यांनीं १९३२ सालीं सॅक्सन ॲकॅडमी ऑफ सायन्समध्यें एक व्याख्यान दिलें. कांहीं थोडे शास्त्रज्ञ सोडले तर इतर सर्व शास्त्रज्ञांपेक्षांहि अधिक हिरीरीनें शुद्ध संख्यात्मक सिद्धांताचा पुरस्कार त्यांनीं केला आहे. या संशोधनपद्धतींच्या परिणामांचें मूल्यमापन करण्याचा प्रयत्न त्यांनीं या भाषणांत केला. त्यासाठीं त्यांनीं विज्ञानांतील सर्व विख्यात शोधांकडे दुर्लक्ष केलें आणि त्याऐवजीं ह्या शोधांसाठीं ज्ञानाची जी किंमत द्यावी लागली तिच्यावर सर्व भर दिला. तपशील आणि ज्ञान जसें वाढत चाललें आहे तसतसा, जगाचें आकलन झाल्याचा शास्त्रज्ञांचा दावा कमकुवत होऊं लागला आहे असें ते म्हणतात.

डॉ. हायझेनबर्ग यांना या ठिकाणीं काय ध्वनित करावयाचें आहे ? थोर जर्मन कवि-वैज्ञानिक गएटे यांच्या १००व्या स्मृतिदिनाच्या सभेंत भाषण करतांना त्यांनीं वरील शब्द वापरले आहेत. यावरून त्यांना कोणता अर्थ अभिप्रेत होता तें उघड होतें. विज्ञानाच्या इतिहासाशीं ज्यांचा परिचय आहे त्यांना हें माहीतच असेल कीं, न्यूटननें मांडलेल्या दृष्टिविषयींच्या सिद्धांताला गएटेनें कसून विरोध केला व त्यासाठीं रंगासंबंधींचा स्वतःचा एक विचित्र सिद्धांत मांडला. ( आज आपल्याला तो सिद्धांत मान्य करतां येण्याजोगा नाहीं ) अर्थात् या वादांत न्यूटनचाच विजय झाला. दृष्टि-विषयींचा न्यूटनचा सिद्धांत, प्रकाशासंबंधींचा उलगडा करण्याच्या कामीं

अत्यंत अपुरा पडला आहे; आणि गण्टेनें मांडलेल्या सिद्धांताला केवळ एक शास्त्रीय कुतूहल म्हणूनच महत्त्व राहिलेलें आहे हें वेगळें. पण हा फारसा महत्त्वाचा मुद्दा नाहीं. गेल्या जवळजवळ दीड शतकाच्या अनुभवावरून आपल्याला आतां असें म्हणतां येईल कीं, न्यूटन आणि गएटे यांच्या वादांत केवळ प्रकाशाविषयींच्या सिद्धांतापेक्षांही अत्यंत मूलभूत आणि दूरगामी असा एक प्रश्न घसाला लागलेला होता. आपण जो प्रश्न हाताळण्याचा प्रयत्न करीत आहोंत त्याचें स्वरूप नेमकें तसेंच असल्यामुळें गएटेचें त्या बाबतींतलें म्हणणें थोडक्यांत समजून घेणें अत्यंत उपयुक्त ठरेल.

सर आयझॅक न्यूटन यांनीं शास्त्रीय संशोधनाच्या संख्यात्मक पद्धतीचा विकास घडवून आणण्याच्या कामीं फार महत्त्वाची कामगिरी बजावली. गएटेचा मुख्य आक्षेप असा होता कीं, निसर्गाच्या बाबतींत ही संख्यात्मक पद्धति लागू करण्यानें सत्याचें आकलन होऊं शकणार नाहीं. निसर्गाचा विचार करतांना त्यांतील आशय अवश्य ध्यानांत घेतला पाहिजे असा गएटेचा आग्रह होता. विशिष्ट लहरीचा संख्यात्मक कंप म्हणजे लाल रंग, अशा तऱ्हेची व्याख्या करणें, हें गएटेला मान्य नव्हतें. त्याच्या मतें इंद्रियजन्य ज्ञान हें आभासात्मक असण्याचा संभव असला तरी तें ज्ञान म्हणजे केवळ आभास नव्हे; त्यांत अनेक फाटे फुटण्याचा, तें विकृत होण्याचा आणि व्यक्ति-व्यक्तीच्या मतप्रकृतिनुसार त्यांत फरक पडण्याचाहि संभव असतो. परंतु तेवढ्यावरून तें कशाचेंच ज्ञान नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. उलट, तें गुणात्मक वास्तवाचें निकट आणि प्रत्यक्ष ज्ञान असतें. तें ज्ञान म्हणजे निसर्गाच्या एका विशिष्ट गुणाचें ज्ञान असून तें सत्य असतें; आणि तृषार्ताची तहान ज्याप्रमाणें पेल्यांतल्या पाण्याचें घनफळ कळल्यानें भागणार नाहीं त्याचप्रमाणें केवळ संख्यात्मक सिद्धांतावरून ज्ञान संपादन करतां येणार नाहीं.

गएटेच्या मतें इंद्रियजन्य ज्ञानासंबंधीचे नियम इतर स्वरूपाच्या ज्ञानांनाहि लागू पडण्यासारखे आहेत. कारण निरीक्षक आणि तो जिचें निरीक्षण करतो ती वस्तु यांमध्यें एकप्रकारचें आंतरिक ऐक्य वसत असतें. मानव आणि निसर्ग यांचाहि या ऐक्यांत अर्थात्, भाग असतो. या ऐक्याचें स्वरूप हें एक गूढ असलें तरी प्रत्ययशक्ति आणि कल्पनाशक्ति यांच्या साहाय्यानें ह्या गूढाचा भेद करून त्या त्या वस्तूचें प्रत्यक्ष ज्ञान संपादन करून घेतां

येतें. तें एक आंतरिक ज्ञान असतें असेंहि म्हणतां येईल. त्यामुळें निरीक्षकाला निरीक्षण–वस्तूचा नुसता विचार करूनहि त्यासंबंधींचें ज्ञान प्राप्त करून घेतां येईल. " माझा विचार हा वस्तूपेक्षां निराळा अथवा अलग असत नाहीं... माझें मनन हा एक प्रकारचा विचारच असतो; आणि विचार हें एक प्रकारचें मनन असतें. " अमूर्त स्वरूपाचीं तांत्रिक विधानें करून माणसाला निसर्गाचें आकलन करून घेतां येणार नाहीं. तर मनन-चिंतनाच्या साहाय्यानें आपण निसर्गाचाच एक भाग आहोंत ह्याचा साक्षात्कार करून घेतल्यानें होईल.

संख्यात्मक आणि गुणात्मक दृष्टिकोणांतील फरक लक्षांत आणून देण्यासाठींच गएटेनें मांडलेल्या ज्ञानासंबंधींच्या भूमिकेचा याठिकाणीं उल्लेख केला आहे. अर्थात् त्यापैकीं कोणताहि एक दृष्टिकोण पूर्णांशानें मान्य करण्याची आवश्यकता नाहीं. संख्यात्मक सत्य म्हणून कांहीं चीज आहे हें गणितादि सर्व सैद्धांतिक आणि प्रयोगिक शास्त्रांवरून सिद्धच आहे. परंतु गएटे आणि न्यूटन यांच्यांत जो वाद निर्माण झाला त्याचें मुख्य कारण असें होतें कीं, निसर्ग आणि विश्व यांच्याविषयींचें सत्य हें सर्वस्वी संख्यात्मक दृष्टिकोणाचा अंगीकार केल्यामुळेंच आकलन होऊं शकेल, असा अधिकाधिक आग्रह शास्त्रीय संशोधनवृत्तीचा पुरस्कार करणारांकडून धरला जात होता. वास्तवाची गुणात्मक बाजू–जी वस्तुतः मानवाच्या दृष्टीनें खरी असते–ती बाजूला काढून फेकून देतां येईल असें त्यांचें म्हणणें होतें. या भूमिकेवर त्यानें कडाडून हल्ला चढविला. तो असें प्रतिप्रादीत असे कीं, आपण गुणात्मकतेपासूनच सुरुवात केली पाहिजे. त्यासंबंधीचें ज्ञान आपण मनन आणि प्रत्ययशक्ति यांच्या साहाय्यानें प्राप्त करून घेऊं शकूं आणि तें प्राप्त करून घेतल्यानंतरच आपल्याला प्रयोगांचा आणि मोजमापांचा अवलंब करतां येईल. गएटे भूमिकेंतील महत्त्वाचा भाग असा कीं, संशोधनपद्धतींत प्रयोगांना अवसर असला तरी त्यासंबंधींचे निष्कर्ष सिद्ध करण्यापुरताच आहे. त्या दृष्टिकोणांत शास्त्रीय संशोधनपद्धतींतील महत्त्वाचा भाग अबाधित राहतो. शरीरशास्त्रासंबंधीं स्वतः गएटेनें केलेल्या तुलनात्मक संशोधनावरून याचा चांगला पडताळा येतो. परंतु, केवळ विगमन तर्कपद्धतींचा अवलंब करून पूर्वी अज्ञात असलेल्या सत्याचें आकलन करून घेतां येतें ही कल्पना त्याज्य

ठरविली गेली आहे. निसर्गासंबंधीं कोणतीहि नवी माहिती मिळवायची असेल तर माणसानें तर्काधिष्ठित पृथक्करणापेक्षां अन्य कोणत्या तरी मार्गाचा अवलंब केला पाहिजे.

ज्ञानासंबंधींचा गएटेचा सिद्धांत आणि शास्त्रीय संशोधनवृत्तीचें निवेदन करतांना उल्लेखिलेली डॉ. कॉनंट यांची भूमिका हीं मूलतः एकच आहेत. गएटेला अभिप्रेत असलेलें ज्ञान हें केवळ परिमाणात्मक नसतें आणि या अर्थानें तें गुणात्मक दृष्ट्या वास्तव असतें. त्याचबरोबर वस्तूंच्या गुणात्मक आशयावर तें नेमकें बोट ठेवतें. डॉ. हायझेनबर्ग यांनीं उल्लेखिलेलीं "निकट आणि प्रत्यक्ष" हीं वैशिष्ट्येंहि त्यांत समाविष्ट झालेलीं असतात. अशा ज्ञानाला आपण 'गुणात्मक' म्हटलें काय, किंवा 'निकट आणि प्रत्यक्ष' म्हटलें काय, वादाचा मुद्दा तोच राहतो. डॉ. हायझेनबर्ग यांनीं याबाबतींत व्यक्त केलेले विचार आपल्या सिद्धांताशीं अगदीं मिळतेजुळते असेच आहेत. आपल्याला असेंच म्हणतां येईल कीं, गुणात्मक दृष्टिकोणाचा त्याग केल्यामुळें विज्ञानाची मूल्यमापनाची शक्ति वाढली आहे व त्यायोगें निसर्गावर प्रभुत्व मिळविण्याची शक्तीहि वाढली आहे. पण निसर्गावरील हें प्रभुत्व प्राप्त करून घेण्यासाठीं त्याला निसर्गासंबंधीच्या सम्यग् ज्ञानावर तिलांजली सोडावी लागली आहे.

* * *

भाग पांचवा

# साहसासाठीं नवी दिशा

## १ : : जड आणि वास्तव

' स्वातंत्र्याच्या प्रश्नावर सुरू असलेला जागतिक संघर्ष हा आपला मूळ विषय. त्या विषयापासून भरकटत जाऊन विचारासंबंधींच्या निरनिराळ्या शाखोपशाखांचें एवढें पाल्हाळ लावीत बसण्याची कांहीं जरूर नव्हती असें वाटण्याचा संभव आहे. परंतु विचारा-कल्पनांसंबंधीं सध्यां जो संघर्ष सुरू आहे त्याच्या मुळाशीं असलेले प्रश्न किती महत्त्वाचे आहेत तें नीट लक्षांत आणून देण्याच्या दृष्टीनें तें आवश्यक होतें. कारण ह्या संघर्षाशीं माणसाचें, मानवजातीचें, भवितव्य निगडीत झालें आहे. माणूस आहे तरी कोण ? त्याचें भवितव्य काय ? पृथ्वीवरील त्याच्या अस्तित्वाचा उद्देश तरी कोणता ? या प्रश्नांच्या उत्तरावरच मानवी स्वातंत्र्याची व्याख्या अखेर अवलंबून आहे.

निसर्गावर प्रभुत्व गाजावण्याचा ज्यावेळीं विज्ञानानें चंग बांधला होता, अशा अत्यंत रोमहर्षक काळांत, विज्ञानाला अभिप्रेत असलेल्या संख्यात्मक कल्पना मानव आणि विश्व यासंबंधींच्या सत्याची प्रचीति आणून देऊं शकतील कीं नाहीं, हा प्रश्न फारसा महत्त्वाचा नव्हता. त्याकडे फारसें कोणाचें लक्षही नव्हतें. परंतु आज मुत्सद्यांनीं सर्व महत्त्वाच्या सांस्कृतिक केंद्रांवर हायड्रोजन बॉंबच लटकत ठेवलेला असतांना निसर्गावर ताबा मिळविण्याचा हव्यास आतां पुरे नाहीं का झाला, असें कोणाच्याही मनांत आल्यावांचून रहाणार नाहीं. कारण निसर्गावर प्रभुत्व मिळवून आपण काय साधणार आहोंत ? आपल्याला कोणता हेतु साध्य करावयाचा ? कोणाचा मागोवा घ्यावयाचा आहे ? स्वतंत्र जगाला निसर्ग आणि मानव यांच्या विषयींचा संख्यात्मक दृष्टिकोण मान्य आहे का ? आपण तो मान्य करूं शकूं का ? आणि आपल्याला जर तो मान्य नसेल तर त्याच्याऐवजीं दुसऱ्या कोणत्या दृष्टिकोणाचा आपल्याला अंगीकार करतां येईल ? गएटेची " प्रत्य-

ठरविली गेली आहे. निसर्गासंबंधीं कोणतीहि नवी माहिती मिळवायची असेल तर माणसानें तर्काधिष्ठित पृथक्करणापेक्षां अन्य कोणत्या तरी मार्गाचा अवलंब केला पाहिजे.

ज्ञानासंबंधींचा गएटेचा सिद्धांत आणि शास्त्रीय संशोधनवृत्तीचें निवेदन करतांना उल्लेखिलेली डॉ. कॉनंट यांची भूमिका हीं मूलतः एकच आहेत. गएटेला अभिप्रेत असलेलें ज्ञान हें केवळ परिमाणात्मक नसतें आणि या अर्थानें तें गुणात्मक दृष्ट्या वास्तव असतें. त्याचबरोबर वस्तूंच्या गुणात्मक आशयावर तें नेमकें बोट ठेवतें. डॉ. हायझेनबर्ग यांनीं उल्लेखिलेलीं "निकट आणि प्रत्यक्ष" हीं वैशिष्ट्येंहि त्यांत समाविष्ट झालेलीं असतात. अशा ज्ञानाला आपण 'गुणात्मक' म्हटलें काय, किंवा 'निकट आणि प्रत्यक्ष' म्हटलें काय, वादाचा मुद्दा तोच राहतो. डॉ. हायझेनबर्ग यांनीं याबाबतींत व्यक्त केलेले विचार आपल्या सिद्धांताशीं अगदीं मिळतेजुळते असेच आहेत. आपल्याला असेंच म्हणतां येईल कीं, गुणात्मक दृष्टिकोणाचा त्याग केल्यामुळें विज्ञानाची मूल्यमापनाची शक्ति वाढली आहे व त्यायोगें निसर्गावर प्रभुत्व मिळविण्याची शक्तीहि वाढली आहे. पण निसर्गावरील हें प्रभुत्व प्राप्त करून घेण्यासाठीं त्याला निसर्गासंबंधीच्या सम्यग् ज्ञानावर तिलांजली सोडावी लागली आहे.

* * *

भाग पांचवा

# साहसासाठीं नवी दिशा

## १ : : जड आणि वास्तव

' स्वातंत्र्याच्या प्रश्नावर सुरू असलेला जागतिक संघर्ष हा आपला मूळ विषय. त्या विषयापासून भरकटत जाऊन विचारासंबंधींच्या निरनिराळ्या शाखोपशाखांचें एवढें पाल्हाळ लावीत बसण्याची कांहीं जरूर नव्हती असें वाटण्याचा संभव आहे. परंतु विचारा-कल्पनांसंबंधीं सध्यां जो संघर्ष सुरू आहे त्याच्या मुळाशीं असलेले प्रश्न किती महत्त्वाचे आहेत तें नीट लक्षांत आणून देण्याच्या दृष्टीनें तें आवश्यक होतें. कारण ह्या संघर्षोशीं माणसाचें, मानवजातीचें, भवितव्य निगडीत झालें आहे. माणूस आहे तरी कोण ? त्याचें भवितव्य काय ? पृथ्वीवरील त्याच्या अस्तित्वाचा उद्देश तरी कोणता ? या प्रश्नांच्या उत्तरावरच मानवी स्वातंत्र्याची व्याख्या अखेर अवलंबून आहे.

निसर्गावर प्रभुत्व गाजविण्याचा ज्यावेळीं विज्ञानानें चंग बांधला होता, अशा अत्यंत रोमहर्षक काळांत, विज्ञानाला अभिप्रेत असलेल्या संख्यात्मक कल्पना मानव आणि विश्व यासंबंधींच्या सत्याची प्रचीति आणून देऊं शकतील कीं नाहीं, हा प्रश्न फारसा महत्त्वाचा नव्हता. त्याकडे फारसें कोणाचें लक्षही नव्हतें. परंतु आज मुत्सद्यांनीं सर्व महत्त्वाच्या सांस्कृतिक केंद्रांवर हायड्रोजन बॉंबच लटकत ठेवलेला असतांना निसर्गावर ताबा मिळविण्याचा हव्यास आतां पुरे नाहीं का झाला, असें कोणाच्याही मनांत आल्यावांचून रहाणार नाहीं. कारण निसर्गावर प्रभुत्व मिळवून आपण काय साधणार आहोंत ? आपल्याला कोणता हेतु साध्य करावयाचा ? कोणाचा मागोवा घ्यावयाचा आहे ? स्वतंत्र जगाला निसर्ग आणि मानव यांच्या विषयींचा संख्यात्मक दृष्टिकोण मान्य आहे का ? आपण तो मान्य करूं शकूं का ? आणि आपल्याला जर तो मान्य नसेल तर त्याच्याऐवजीं दुसऱ्या कोणत्या दृष्टिकोणाचा आपल्याला अंगीकार करतां येईल ? गएटेची " प्रत्य-

यात्मक मानवाची " कल्पना आणि डॉ० हायझेनबर्ग यांची ' निकट आणि प्रत्यक्ष ' ज्ञान यांविषयींची कल्पना आणि वास्तवासंबंधींचा आपला गुणात्मक दृष्टिकोण यांच्या मदतीनें या प्रश्नांचीं उत्तरें आपल्याला सांपडूं शकतील. आपण अंतःप्रेरणेनें ज्यांचें स्वागत करतों अशा स्वतंत्र कल्पनांचा पाठपुरावा करूं शकणाऱ्या मानवाचें चित्र आपल्या डोळ्यांसमोर उभें करणें हेंदेखील त्या उत्तराचें विस्तृत विवेचन केल्यानें शक्य होणार आहे.

आणि ह्या पुस्तकाच्या उरलेल्या भागांत तोच प्रयत्न केला जाणार आहे. जड म्हणून ओळखतां येण्यासारख्या बहुतेक सर्व गुणाधर्मांची जडवस्तु-पासून फारकत करून पदार्थविज्ञानशास्त्रानें जडवादाचा सिद्धांतच खोडून काढला आहे असें वाटण्याचा संभव आहे. पण प्रत्यक्ष वस्तुस्थिति मात्र तशी नाहीं. जडवस्तूहि जडापासून बनलेली नसते असें आधुनिक पदार्थ-विज्ञानशास्त्रान्वयें दाखवून दिलें जात असलें तरी आधुनिक भौतिकवाद हा पहिल्याइतकाच भौतिकवादी राहिलेला आहे. आणि त्यामुळें कांहीं आश्चर्य-कारक निष्कर्ष निघतात. भौतिकवाद हा जडवस्तूविषयींच्या कोणत्याहि एका विशिष्ट दृष्टिकोणावर अवलंबून नसतो हें मान्य करणें आपल्याला भाग पडतें. इतकेंच नव्हे तर, तें जडवस्तुविषयक तत्त्वज्ञान आहे असेंदेखील आपल्याला म्हणतां येत नाहीं. फार तर जगाकडे बघण्याचा तो एक दृष्टिकोण आहे असें म्हणतां येईल. जडवस्तु ही कठिण, घन किंवा जड यापासून बनलेली नाहीं. जडवस्तु म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून कोठलेंहि जडत्व नसलेल्या सूक्ष्म लहरींची एकमेकींवर होणारी क्रिया आणि प्रतिक्रिया—असें जरी विज्ञानानें सिद्ध करून देतां आलें तरीदेखील निदान बाह्यतः सुसंगत दिसणारें जीवनविषयक तत्त्वज्ञान मानवाला उपलब्ध करून देण्याचें भौतिकवादी सिद्धांताचें कार्य अप्रतिहतपणें चालू राहील.

हा मुद्दा महत्त्वाचा आहे कारण तो जर खरा असेल तर मार्क्सवादांतील एक अत्यंत मोलाचें गृहीतकृत्य एका फटक्यासरशीं कोलमडून पडतें. अत्यंत शास्त्रशुद्ध पायावर सामाजिक तत्त्वज्ञानाची उभारणी करण्याचें कार्य करीत असल्याचा मार्क्सवादी नेहमीं दावा करीत असतात, हें आपण पाहिलेंच आहे. पृथ्वी आणि मानव यांच्या उत्क्रांतीचा उलगडा केवळ भौतिक दृष्टि-कोणांतूनच होऊं शकतो हें दाखवून देणाऱ्या शास्त्रीय शोधामुळेंच आपल्याला

भौतिकवादी सिद्धांतांचा अनिवार्यपणें अंगिकार करावा लागतो असेंहि ते प्रतिपादन करतात. परंतु वस्तुतः अस्तित्व आणि जडवस्तु या दोन गोष्टी ते समान समजत नव्हते हें त्यांच्या स्वतःच्या आणि त्यांच्या टीकाकारांच्या लक्षांत आलें नाहीं. वस्तुतः ते अस्तित्व आणि जडवस्तुविषयींचें एक विशिष्ट गहीत कृत्य यांना समान समजले होते—किंवा त्यांची सांगड घालत होते—अर्थात्, हें समीकरण अगदींच निराळे होतें. जडवस्तु म्हणजे कांहींतरी टणक आणि ओळखतां येण्याजोगा पदार्थ हा जो एकोणिसाव्या शतकांत मान्यता पावलेला जडवस्तुविषयक दृष्टिकोण त्याच्याशींच त्यांनीं अस्तित्वाची सांगड घालून दिली. म्हणजे हीं दोही समान आहेत असें त्यांनीं कल्पिलें. परंतु आधुनिक विज्ञानानें तो दृष्टिकोण त्याज्य ठरविला आहे. जडवस्तूचें अंतिम स्वरूप सर्वस्वीं अज्ञात असल्यामुळें असें समीकरण मांडणें म्हणजे अस्तित्व हें 'क्ष'च्या समान आहे असें मानण्यासारखेंच आहे. यावरून शास्त्रीय अर्थानें असें म्हणतां येईल कीं, खुद्द मार्क्सवाद्यानांच अक्षरतत्त्व सापडलेलें नाहीं. एकोणिसाव्या शतकांतील गृहीत कृत्य ते दडपून विसाव्या शतकाला चिकटवून देत आहेत.

परंतु मार्क्स आणि एंगल्स यांनीं जर स्वतःच्या कल्पनांचा विस्तार करण्यासाठीं खरोखरच विज्ञानाचा आधार घेतला नसेल तर मग घेतला तरी कशाचा ? या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, वास्तवासंबंधीं त्यांनीं एका विशिष्ट दृष्टिकोणाचा अंगीकार केला आणि आपण बघितल्याप्रमाणें त्या दृष्टिकोणाचाच आपल्या सबंध जीवनपद्धतीवर पगडा बसलेला आहे. ह्या दृष्टिकोणाचें मूळ जगासंबंधींच्या बहिर्मुख जाणीवेंत आहे. त्या दृष्टिकोणान्वयें बाह्य निरीक्षण आणि पृथःकरण यांमुळेंच आपल्याला सत्याप्रत पोहोंचण्याचा मार्ग उपलब्ध होऊं शकतो. निराळ्या शब्दांत सांगावयाचें तर, वास्तव म्हणजे आपण आपल्या इंद्रियांच्या आणि उपकरणांच्या साहाय्यानें आपल्यापेक्षां अन्य ठिकाणीं जें पाहूं शकतों तें. उलटपक्षीं अंतर्मुख जाणीव ही अनंत आभासांत गुरफटलेली असते, असें या लोकांचें म्हणणें. वस्तूचें बाह्य निरीक्षण आणि विश्लेषण करतां आलें तरच वस्तुनिष्ठ सत्यापर्यंत पोहोंचण्याची कांहीं शक्यता आहे; सत्य हें फक्त बाह्य जगांतच सांपडूं शकेल, असा हा दृष्टिकोण.

अशातऱ्हेनें मार्क्स्‌वादाचें विश्लेषण केलें तर त्याचें नीट आकलन करून घेण्याच्या दोन खुब्या ध्यानांत येतात—एक भौतिकवाद आणि दुसरी वस्तुनिष्ठवाद किंवा बाह्यवाद ( Externalism ). भौतिकवाद आणि वस्तुनिष्ठवाद हे वस्तुतः मुळांत एकच आहेत. असें कां ? खरें म्हणजे भौतिकवाद हें नांव चुकीनें पडलें आहे. कारण भौतिकवाद हा वस्तुतः जडवस्तुविषयींचा सिद्धांतच नव्हे. तो सत्यासंबंधींचा सिद्धांत किंवा बाह्य जगाकडे बघण्याचा एक दृष्टिकोण आहे. बाह्यजाणीवेचा उपयोग करून घेतला तरच मानवी मनाला सत्याचें आकलन होऊं शकेल असें हा दृष्टिकोण सांगतो. आपल्याला याहिपुढें जाऊन असें म्हणतां येईल कीं, एकोणिसाव्या शतकांतील विज्ञानावर आपला पगडा बसविणारी—जडवस्तुसंबंधींची कल्पनाच मुळीं वरील गृहीत कृत्यावर आधारलेली आहे. आजहि सर्वसाधारण माणूस त्याच कल्पनेच्या आधारें विचार करीत असतो. निराळ्या शब्दांत सांगावयाचें तर जडवस्तूनें जडवस्तुवाद ( भौतिकवाद ) निर्माण केला नाहीं. मार्क्स्‌ आणि एंगल्स त्याचप्रमाणें एकोणिसाव्या शतकांतील सर्व विचारवंत ह्यांच्या बाह्यवादामुळें जडवस्तूची निर्मिति झाली.

याठिकाणीं खरा प्रश्न आहे तो मूळ विज्ञानवादासंबंधीचा. डेमॉक्रीटस, ल्यूक्रीशियस्‌ या जुन्या जडवाद्यांनीं त्यासंबंधीं थोडाफार विचार केला होता हें खरें. परंतु आपल्या माहितीप्रमाणें पाहतां विशिष्ट प्रकारचें बाह्य आणि संख्यात्मक सत्य स्वीकारून बाकी सर्वांचा त्याग करण्याच्या शास्त्रीय संशोधनपद्धतींतूनच मूलविज्ञानवादाचा जन्म झालेला आहे. आणि या पद्धतीचा प्रभाव मार्क्स्‌वाद्यांप्रमाणेंच स्वतंत्र जगावरहि पडलेला आहे. बाह्य जगाच्या जीवनमूल्यांचा अर्थ लावण्याची अमेरिकनांची धडपड उत्तरोत्तर वाढत चालली आहे. मानवी जीवनाचा हेतु हा मुख्यतः ऐहिक जीवनापुरताच मर्यादित आहे असें अमेरिकन आशावादी सांगूं लागतो त्यावेळीं अपरिहार्यपणें त्या हेतूंना मार्क्स्‌वाद्यांना अभिप्रेत असलेलें आर्थिक आणि सामाजिक स्वरूप प्राप्त होतें. त्याचा परिणाम असा होतो कीं, ज्यावेळीं अमेरिकन आशावादाला मार्क्स्‌वादी सर्वंकश आशावादाला तोंड देण्याची पाळी येते, त्यावेळीं तो आपल्या क्रांतीमधल्या केन्द्रवर्ति—कल्पनेचें—व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाचें—समर्थन करूं शकत नाहीं.

* * *

## २ : : मानवाची प्रतिष्ठा

व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाचें समर्थन करतां येणार नाहीं असें जें विधान मागच्या प्रकरणांत केलें आहे त्याला बहुतेक सर्वच अमेरिकन कसून विरोध करतील. व्यक्तिस्वातंत्र्य समर्थनीय ठरतें कीं नाहीं, हा खरा प्रश्न असून आशावादी तत्त्वज्ञानांचीं जीं गृहीत कृत्यें असतात त्यांच्या संदर्भात तें समर्थनीय ठरूं शकतें कीं नाहीं हा महत्त्वाचा मुद्दा आहे. आजपर्यंत विकसित होत गेलेल्या शास्त्रीय संशोधनवृत्तीला समजूं शकेल असें या ऐहिक जीवनांत काय आहे, कीं ज्याच्यामुळें अमेरिकन आशावादी वरील विवाद्य तत्त्वाचें, व्यक्तिस्वातंत्र्य तत्त्वाचें समर्थन करूं शकेल ?

तसें करण्याचा एकच मार्ग उपलब्ध आहे, आणि अमेरिकेंतील निरनिराळे आशावादी पंथ त्याचाच अंगीकार करतात. मानवाच्या प्रतिष्ठेसंबंधींच्या त्या सर्वांच्या कल्पना समान असतात. मानवाची किंवा व्यक्तीची प्रतिष्ठा याला एक विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आहे. तो म्हणजे मनुष्य हा दुसऱ्या कोणाच्या ( उदा. सरकारच्या ) हातचें—साधन—बनतां कामा नये, तर त्याचें स्वतंत्र व्यक्तित्व मान्य करण्यांत आलें पाहिजे. व्यक्तीचा संपूर्ण विकास हाच मानवी जीवनाचा प्रधान हेतु आहे, आणि जो समाज हा हेतु सिद्धीस नेऊं देत नाहीं, तो समाज मागासलेला, अन्यायी, इतकेंच नव्हे तर दुष्ट समजला पाहिजे. आपल्याला असें म्हणतां येईल कीं, या विचारसरणीच्या आधारावरच अमेरिकेंतील आशावादी परंपरा मार्क्सवादाला टक्कर देऊं शकते.

ह्या व्यक्तिप्रतिष्ठेच्या तत्त्वामुळें मार्क्सवादाच्या संपूर्ण विचारसरणीला पायबंद घालण्याचा तात्त्विक मार्ग आशावाद्यांना उपलब्ध होतो असें प्रथमदर्शनीं वाटेल. कारण व्यक्ति ही स्वयंपूर्ण आहे किंवा तिला स्वतंत्र अस्तित्व आहे, असें एकदां मानल्यानंतर इतिहासाच्या विरोधविकासी प्रक्रियेंतील केवळ एखाद्या प्याद्याप्रमाणें व्यक्तीला वागवतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें कामगारवर्गाची हुकूमशाही हें सर्वांत मोठें संकट आहे, असें या तात्त्विक भूमिकेवरून दाखवून देतां येईल. वर्गविहीन समाजरचना हें एक अत्यंत उच्च असें सामाजिक ध्येय असूं शकेल. परंतु हिंसेच्या जोरावर तें साध्य होऊं शकणार नाहीं. तें साध्य करावयाचें असेल तर व्यक्तींना शिक्षित आणि जागृत कर-

ण्याच्या दीर्घकालीन मार्गाचाच अवलंब केला पाहिजे. समाजांतील सर्व व्यक्तींना त्याची जाणीव झाली म्हणजे सारा समाज ही अशा व्यक्तींची एक सेंद्रिय संघटना बनेल. त्यांतील सर्व व्यक्तींना स्वतंत्र अस्तित्व असेल. पण त्याचबरोबर समाजांतील इतर व्यक्तींच्या कल्याणाच्या अनुषंगानें—म्हणजेच समाजहिताच्या अनुषंगानें—स्वतःचा विकास घडवून आणणें प्रत्येक व्यक्तीला अधिकाधिक शक्य होत जाईल. थोडक्यांत म्हणजे मानवी प्रतिष्ठेच्या तत्त्वामुळें आपखुशीनें सामाजिक ध्येय साध्य करण्याचा मार्ग अमेरिकन आशावाद्यांना मोकळा होता.

अनुभवप्रामाण्य मानणाऱ्या आशावाद्यांपाशीं आणखीहि एक मुद्दा असतो, आणि बहुतेक सर्व अमेरिकन त्याचा केव्हांना केव्हां उपयोग करतात. तो नेहमीं 'पुराव्या'चा आधार घेत असतो. माणसाला स्वभावतःच प्रतिष्ठा असते, आणि तिचा आधिक्षेप होतां कामा नये असें एकदां गृहीत धरलें म्हणजे समाजधारणा उत्तम होते आणि माणसें अधिक सुखी बनतात, असें त्यांचें म्हणणें आहे. आणि ज्याअर्थीं ह्या गृहीत कृत्याचे परिणाम चांगले दिसतात, त्याअर्थी तें खरें असलेंच पाहिजे असें ते धरून चालतात.

मानवाची प्रतिष्ठा हा स्वतंत्र जगाचा तात्त्विक स्वरूपाचा मूलाधार आहे असें आपल्याला म्हणतां येईल. गेलीं जवळजवळ शंभर वर्षें विरोधविकासवादाची व्याप्ति वाढत आहे. अखेर आतां मध्य-विसाव्या शतकांत त्यानें आपल्याला पूर्णपणें वेढून टाकलें आहे. त्यांतून आपली सोडवणूक जर कशानें होणार असेल तर ती या व्यक्तिप्रतिष्ठेच्या कल्पनेमुळेंच. आपलें एकंदर धोरण केवळ सत्तास्पर्धेतून आंखलें गेलें नाहीं हें यामुळेंच सिद्ध होऊं शकतें. मुसोलिनी आणि हिटलर यांच्यासारख्या हुकूमशहांचें आक्रमण थांबविण्यासाठीं आत्मसमर्पण करण्यास आपण सिद्ध होतों, यामागें हीच कल्पना असते. त्याचप्रमाणें क्रेमलीनचे डावपेंच उजेडांत आणून त्यांना आव्हान देण्यास आपण सिद्ध होतों, ते देखील व्यक्तिप्रतिष्ठेच्या या तत्वामुळेंच. आपण वर पाहिल्याप्रमाणें अमेरिकेंतील आशावादी तत्त्वज्ञानानें बऱ्याच बाबतींत आपला भ्रमनिरास केला आहे हें खरें.परंतु व्यक्तिप्रतिष्ठा हा स्वातंत्र्याचा मूलाधार आहे असें ते मानतात, आणि तो टिकवून धरण्यासाठीं ते आटापिटा करतात त्याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत.

परंतु स्वातंत्र्याचा मूलाधार असलेल्या या व्यक्तिप्रतिष्ठेसंबंधीच आतां आपल्याला अधिक खोलवर विचार केला पाहिजे. मानवी अनुभव आणि अमेरिकेंतील तत्त्वज्ञानांतील एतद्विषयक कल्पना व्यक्तिप्रतिष्ठेला पोषक आहेत का ? अमेरिकन आशावादी जे पुरावे म्हणून पुढें मांडतो तेच नेमके मार्क्सवाद्यांना अमान्य असतात. मार्क्सवाद्यांच्या मतें व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाची कास धरल्यानें समाजांतील दुःखें आणि अडचणी कधींहि सुटूं शकणार नाहींत. त्यामुळें तीं कायम राहातील, इतकेंच नव्हे तर उलट वाढीस लागतील. म्हणून आमचा मार्ग हाच सर्वोत्तम आहे. कारण त्यामुळें जरूर ते हेतु तडीस जाऊं शकतात हें अमेरिकन आशावाद्यांचें म्हणणें मार्क्स-वाद्यांच्या मतें पूर्वग्रहदूषित आणि निव्वळ स्वार्थीपणाचें असून त्याला कोठल्याहि पुराव्याचा आधार नाहीं. मार्क्सवाद्यांची ही विचारसरणी आपल्याला मान्य होण्यासारखी नसली तरी तिच्यामागील सामर्थ्य जाणवल्या-शिवाय राहात नाहीं.

शिवाय अमेरिकन आशावादी व्यक्तिप्रतिष्ठेबाबत जी भूमिका स्वीकारतात ती तत्त्वज्ञानाच्या कसोटीला उतरूं शकत नाहीं. कारण मानवासंबंधींचा आणि त्याच्या उत्पत्तीसंबंधीचा शास्त्रीय दृष्टिकोण अमेरिकन आशावाद्यांना दगा देणारा आहे. मानव आणि त्याचें सुप्त विकाससामर्थ्य ह्यापुरतेंच पाहिलें तर हा दृष्टिकोण त्याला आशेच्या कळसापर्यंत घेऊन जातो. पण मानवप्रतिष्ठेच्या किंवा व्यक्तिप्रतिष्ठेच्या आपल्या कल्पनेला आधार शोधण्यासाठीं म्हणून जेव्हां हा आशावादी शास्त्रीय दृष्टिकोणाकडे वळतो तेव्हां तो त्याला कोठें आढळत नाहीं. (आणि आशावाद्यांच्या क्रांति-स्तोत्राच्या प्रगतीला तर व्यक्तिप्रतिष्ठा अत्यंत आवश्यक आहे) त्यामुळें मेफि-स्टॉफालिस अदृश्य झाल्यामुळें फाऊस्टची जशी अवस्था झाली तशी आशावाद्यांची अवस्था होते.

मानवाच्या प्रतिष्ठेची वास्तवता सिद्ध करण्यासाठीं कोणत्या शास्त्रीय सिद्धांताचा किंवा शोधांचा आशावाद्याला आधार मिळण्यासारखा आहे ? सूर्यमंडळाच्या निर्मितीसंबंधानें कांट, लापलास यानीं मांडलेला सिद्धांत किंवा त्यापासून निघालेले विश्वरूप–निर्णय–शास्त्रांतील इतर नवे सिद्धांत यांचा त्या दृष्टीनें त्याला कांहींहि उपयोग होऊं शकणार नाहीं. उत्पत्तीसंबंधींच्या

केवळ भौतिक किंवा निसर्गवादी सिद्धांताच्या दृष्टीनें पाहतां मानव म्हणजे अनंत विश्वांतील केवळ एक कणमात्र ठरतो. सेंद्रिय उत्क्रांतीच्या सिद्धांताचाहि त्याला आधार घेतां येत नाहीं. कारण ह्या उत्क्रांतितत्त्वानुसार प्राचीन काळीं चिखलापासून उत्पन्न झालेल्या जीवपेशींची उत्क्रांति होतां होतां आधीं सरपटणारे प्राणि अस्तित्वांत आले आणि शेवटीं माकडापासून माणसाची उत्पत्ति झाली. मानवप्रतिष्ठेचें तत्त्व सिद्ध करण्यासाठीं आशावाद्याला पदार्थविज्ञानशास्त्राचाहि आधार घेतां येत नाहीं. कारण पदार्थविज्ञानशास्त्राच्या भाषेंत बोलावयाचें तर प्रतिष्ठा अशी कांहीं चीजच मुळीं अस्तित्वांत नाहीं. जीवनरसायनशास्त्राच्या सिद्धांतानुसार मानव अनंत पेशींचा एक जुडगा. तेव्हां तो सिद्धांत मानवप्रतिष्ठेला पोषक कसा ठरावा? प्राणीशास्त्राच्या दृष्टीनें मानव म्हणजे इतर प्राण्यांसारखाच एक प्राणी, तेव्हां आशावाद्याला त्या शास्त्राचाहि आधार घेतां येत नाहीं. आधुनिक मानसशास्त्रान्वयें मानव आणि इतर प्राणि यांत अंतर्गत भेद केला जातो खरा. परंतु या भेदाच्या मुळाशीं सुद्धां सर्व प्राणिजगाला समान असलेल्या नैसर्गिक ऊर्मि किंवा प्रेरणाच असतात असेंच प्रतिपादिलें जातें* त्यामुळें जवळजवळ कोणत्याच नैसर्गिक शास्त्रांतील सिद्धांत मानवाच्या प्रतिष्ठेला पोषक ठरत नाहींत. नैसर्गिक शास्त्रांत मानवप्रतिष्ठेच्या तत्त्वाला दुजोरा मिळत नाहीं, इतकेंच नव्हे तर तीं तिचा आधारच काढून घेतात.

* * *

## ३ : : अ पासून क्ष पर्यंतचीं माणसें

आशावाद्यांपुढील या आपत्तीची जबाबदारी सर्वस्वीं नैसर्गिक शास्त्रांवर टाकतां येणार नाहीं. आशावादी विचारसरणीचा पुरस्कार करणारीं अनेक मानवी आणि सामाजिक शास्त्रें आहेत. मानवाचें आकलन करून घेणें हें त्यांचें उद्दिष्ट असतें. पण आपलें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं हीं शास्त्रें नव्या संशोधनपद्धतीचा अवलंब करण्याऐवजीं गणितबद्ध शास्त्रांनीं अवलंबिलेल्या

* याबाबत सी. जी. युंगचा आणि इतर कांहींचा अपवाद केला पाहिजे.

जुन्याच शास्त्रीय संशोधनपद्धतीची नक्कल करसात. अर्थात् पदार्थविज्ञान-शास्त्राइतकें या समाजशास्त्रांत गणिताला प्राधान्य नसतें हें खरें. तथापि आपण वर ज्याचें विवेचन केलें आहे त्या शास्त्रीय संशोधनपद्धतींतील सर्व ठळक वैशिष्ट्यांचा त्यांतही समावेश झालेलाच असतो. अमेरिकेंतील समाज शास्त्राभ्यासकांतर्फे दरवर्षी भाराभर आंकडे प्रसिद्ध होत असतात. सार्व-जनिक व्यवहार, जनतेनें व्यक्त केलेलीं मतें, मुलांत आढळणाऱ्या विकृति, कामगार, घटस्फोटाचें प्रमाण, गुन्हेगारी, शिक्षणपद्धति अशा नाना विषयां-वरील आंकडेवारी त्यांत असते. त्यांपैकीं अनेक पत्रकांमधून अत्यंत महत्त्वाची माहिती व तुलनात्मक विवेचन उपलब्ध होतें. तरीदेखील ही माहिती गोळा कर-तांना ज्या पद्धतीचा अवलंब केलेला असतो ती पद्धति अखेर परिमाणात्मक आणि बाह्य वर्णनावर आधारलेली असते हें विसरून चालणार नाहीं. त्यापासून मानवप्राणी म्हणजे काय त्यासंबंधीं कांहींच बोध होत नाहीं, तसा उद्देशहि ती आंकडेवारी जमविण्यांत नसतो. रसायनशास्त्र ज्याप्रमाणें ऑक्सिजनचा अणु म्हणजे काय हें आपल्याला सांगत नाहीं तसेंच हें आहे. या सर्व खटाटोपीचा मुख्य हेतु विशिष्ट परिस्थितींत मानवाच्या क्रिया-प्रतिक्रिया कशा प्रकारच्या होतात तें शोधून काढणें, क्रिया-प्रतिक्रियांचीं नजीकचीं व दूरचीं कारणें शोधून काढणें आणि क्वचित् प्रसंगीं त्यामुळें घडून येणाऱ्या परिणामाविषयींचे अंदाज बांधणें हाच असतो. सर्व प्रकारच्या जाणीवेच्या मुळाशीं असलेला " अहमस्मि " म्हणणारा मानव-व्यक्ति-ह्या संशोधनाच्या बाहेरच ठेवलेला असतो. तें " व्यक्तित्व " अज्ञातच राहतें आणि त्याचा उल्लेख क्ष म्हणून करावा लागतो. त्यामुळें हा " क्ष " आणि त्याच्या भोंवतालच्या, निरीक्षण करतां येण्यासारख्या घटना यांच्यांतील अत्यंत गुंतागुंतीचे असे परस्पर संबंध निश्चित करणें एवढेंच समाजशास्त्रज्ञांचें काम होऊन बसतें.

व्यक्ति ज्यांत राहते तो समाज किंवा जात यासंबंधींच्या प्रश्नाशींच सामाजिक शास्त्रांचा मुख्यतः संबंध येतो. त्यांत व्यक्तीच्या गुणदोषांची जी परीक्षा केली जाते ती परीक्षा त्याच्या आत्मविकासाच्या दृष्टीनें नाहीं तर इतरांना भोगाव्या लागणाऱ्या त्यांच्या परिणामाच्या दृष्टीनें.

नीतिवादाची अंतिम कसोटी म्हणून समाजहितावर अलीकडे अधिकाधिक भर दिला जातो. शास्त्रीय संशोधनवृत्तीचाच तो परिणाम आहे. संख्यात्मक आणि बहिर्मुख दृष्टिकोणाचा अवलंब करणाऱ्या संशोधकाला, अभिजात नीतिशास्त्राच्या प्रदेशांत अगदीं चुकल्याचुकल्यासारखें वाटतें. कारण त्यांत परिमाणांचा आणि मोजमापांचा कोठें संबंधच येऊं शकत नाहीं. चांगलें म्हणजे काय हें ठरविण्यासाठीं सुखाची कसोटी लावण्याचा प्रयत्न जेरेमी बेंथमनें करून पाहिला, पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. संख्यात्मक दृष्टिकोणांतूनच मानवाकडे बघावयाचें असें एखाद्यानें ठरविलें तर त्यांतून सामाजिक स्वरूपाचेच कांहीं निष्कर्ष निघूं शकतील. कारण परिमाणांचा उपयोग करणें सामाजिक स्वरूपाच्या प्रश्नांच्या बाबतींतच तेवढें थोडें फार शक्य आहे.

माणसाचें सामाजिक उद्दिष्ट काय असावें, इतकेंच नव्हे तर तें कसें साध्य करावें यासंबंधीं सामाजिक शास्त्रवेत्ता आपल्याला पुष्कळच सांगूं शकेल. परंतु मनुष्य हा काय आहे? कोण आहे? या प्रश्नावर मात्र तो जरासुद्धां प्रकाश पाडूं शकणार नाहीं. कामगार वर्गाचे हक्क, संपत्तीचें वांटप, दारूबंदीचे फायदेतोटे, यांची कारणमीमांसा करण्याच्या कामीं समाजशास्त्राची मदत होऊं शकेल. परंतु एखाद्या साधूच्या "चांगुलपणा"ची मीमांसा करण्याच्या कामीं मात्र तीं शास्त्रें लंगडीं पडतील.

शास्त्रीय संशोधनपद्धति ही व्यावहारिक संशोधनाच्या बाबतींत उपयुक्त ठरत असली तरी "सत्य आणि सत्" म्हणजे काय हें हुडकून काढण्यासाठीं जर आपण त्याच पद्धतीची कांस धरली तर मात्र स्वातंत्र्य-क्रांतींतली जी मुख्य कल्पना–म्हणजे व्यक्तिसंबंधींची कल्पना–तिच्यावरच आघात होतो. आणि तिचें महत्त्व कमी होऊन जातें. त्यांत व्यक्ति ही नष्ट तरी होते किंवा समाजाचा केवळ एक भाग बनते.

स्वतंत्र जगांतील सर्वच जण या किंवा अशा प्रकारच्या तत्त्वज्ञानाचा अंगीकार करतात असें नाहीं. तरीहि सर्व देशांतील लक्षावधि लोक–भिन्न भिन्न मार्गांनीं कां होईना पण–याच भूमिकेपाशीं येऊन ठेपले आहेत. मनुष्याला वास्तवाचें जें प्रत्यक्ष ज्ञान होतें तें गुणात्मकच असतें. परंतु तें

खाजगी किंवा व्यक्तिगत असतें ह्या सबबीवर त्याज्य ठरविलें जातें. आणि त्याच्या जागीं सामाजिक वास्तवाची कल्पना उभी केली जाते संख्यात्मक परिभाषेंत तिचें मोजमाप करतां येत असल्यामुळें आणि बहिर्मुख दृष्टीनें तिचें वर्णन करतां येत असल्यामुळें 'सत्' चेंच नव्हे तर वास्तवाचेंसुद्धां परिमाण म्हणून सर्वत्र मान्यता पावतें. अशा रीतीनें माणूस समाजांत पार विलीन होऊन जातो.

परंतु यांतील सर्वांत जास्त खटकणारी गोष्ट म्हणजे स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या आशावाद्यांच्या आणि मार्क्सवाद्यांच्या विचारसरणींतील साम्य. असें कां होतें हें उघड आहे. सर्वाधिकारवादी क्रांति आणि स्वातंत्र्य-क्रांति या दोहींनाहि संख्यात्मक संशोधन पद्धतीनें झपाटून टाकलें आहे हें ह्याचें कारण आहे. स्वातंत्र्यवादी परंपरा अद्यापहि जोरदारपणें टिकून राहिल्या आहेत आणि त्यांनीं आपल्या भोंवतीं भावनांचा तट उभारला आहे. त्यामुळें हें झपाटण्याचें काम अजून पूर्ण झालें नाहीं. परंतु स्वातंत्र्यवादी परंपरांना आतां तडा मात्र खास पडला आहे. आणि तो अगदीं मधोमध पडला आहे. पाश्चात्य विचारवंत हे आतां नुसते व्यक्तीबद्दल बोलत नाहींत तर व्यक्ति आणि समाज अशा दोन्हीसंबंधानें ते बोलतात. ते म्हणतात कीं, "व्यक्तीला प्रतिष्ठा असते आणि म्हणून तिचें स्वतंत्र आस्तित्व मान्य केलें पाहिजे. अर्थात् स्वतंत्र जगानें जी संशोधनपद्धती स्वीकारली आहे तिच्या आधारें त्याला ह्या विधानाला पाठिंबा देतां येत नाहीं. त्याचबरोबर पाश्चात्य विचारवंत असेंहि प्रतिपादतात कीं, 'सत्' त्याचप्रमाणें 'सत्य' यांचादेखील अंतिम निकष सामाजिकच असतो. मात्र त्यांतून निघणाऱ्या तर्कशुद्ध निष्कर्षापर्यंत ते जात नाहींत, कारण व्यक्तिप्रतिष्ठेचें तत्त्व तसें करण्याच्या आड येतें. अशातऱ्हेनें पायापासूनच तडा गेल्यामुळें अमेरिकन आशावाद कोणाचेंच समाधान करूं शकत नाहीं. संख्यात्मक आणि मानवीय अशा सत्याच्या संदर्भातच ऐहिक जीवनांत निरपवादपणें मुक्ति मिळूं शकते असें आश्वासन देणाऱ्या मार्क्स-वाद्यांच्या, अक्षरतत्त्वावर आधारलेल्या, आशावादापुढें प्रत्येक ठिकाणीं त्याला नमतें घ्यावें लागतें.

अमेरिका आणि रशिया यांच्या विचारसरणींतील भेदापेक्षां साम्यापासूनच स्वतंत्र जगाला जास्त धोका आहे. अशा आशयाचें फ्रेंच कॅथॉलिक बुद्धिवादी

फ्रान्स्वा मोरियाक यांचें एक विधान या पुस्तकाच्या पहिल्या भागांत उद्‌धृत केलें होतें, त्याची या ठिकाणीं आठवण करून द्यायला हरकत नाहीं. आशावादी तत्त्वज्ञान हा त्यांच्यांतील साम्याचा भाग आहे. रशियाचा आशावाद हा सर्वाधिकारवादी आणि उद्धट आहे, तर अमेरिकेचा सापेक्षतावादी आणि बुजरा आहे. परंतु दोघांनाहि आशावाद मान्यच आहे आणि त्या दोघांचाहि आशावाद असें मानतो कीं, मानव हा भौतिक प्राणी आहे, सामाजिक उद्दिष्टांच्या अनुषंगानेंच त्याच्या मुक्तीचा विचार केला पाहिजे आणि विपुल औद्योगिक उत्पादन, आर्थिक सुबत्ता आणि परस्पर सहकार्याची मानसिक तयारी यांच्याद्वारांच ती मुक्ति साधतां येईल. हुकूमशाहीचा पुरस्कार करणारा आशावाद आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारा आशावाद यांमधून ‘ विरोधविकासी मानव ’ आणि ‘ औद्योगिक मानव ’ अशा मानवासंबंधींच्या दोन अगदीं भिन्न कल्पना पुढें आल्या आहेत हें अगदीं खरें आहे. परंतु ‘ औद्योगिक मानव ’ हा ‘ विरोधविकासी मानवा’पेक्षां वेगळा असला तरी तो पुरेसा वेगळा नाहीं हीच स्वातंत्र्याचा प्रगतीच्या दृष्टीनें खरी अडचण आहे. ‘ औद्योगिक मानवा’च्या कल्पनेंतूनच ‘ विरोधविकासी मानवा’ची कल्पना जन्मास आली आहे हें मार्क्सवादाच्या इतिहासावरून दिसून येण्यासारखें आहे. बापाच्या अंगीं नसलेलीं अशीं हिंसात्मक वैशिष्ट्यें मुलांमध्यें दिसून येत आहेत. आणि त्यांचें समर्थन करण्यासाठीं त्यानें सर्वाधिकारवादी तत्त्वज्ञान शोधून काढलें आहे. ध्येयांविषयीं आदर बाळगण्याची बापाला ( औद्योगिक मानवाला ) शिकवण मिळालेली असल्याकारणानें तो गोंधळून गेला आहे. पण पिता-पुत्रांत संघर्ष उत्पन्न झाला आणि त्यांत कोणाचाहि विजय झाला तरी त्यामुळें काय साधणार आहे ? हा खरा प्रश्न आहे. आज सबंध जगांतील स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते हाच प्रश्न विचारीत आहेत. अमेरिका ह्या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर देऊं शकत नसल्यामुळेंच गेल्या कित्येक वर्षांपासून स्वतंत्र जगांतील जनता रशियाला विरोध करायला बिचकत आहे.

* * *

## ४ : : समन्वयाच्या शोधांत

आज आपण ज्या एका महान् लढ्यांत गुंतलों आहोंत त्याच्या मुळाशीं कोणत्या समस्या दडल्या आहेत त्याची बरीचशी कल्पना अमेरिकेपुढील आपत्तीचें जें विवेचन वर केलें आहे त्यावरून येऊं शकेल. आज या शतकाच्या मध्याला औद्योगिक मानवानें विरोधविकासी मानवाबरोबर दोन हात करण्याची तयारी चालविली आहे. तिचें भविष्य फारसें उज्ज्वल दिसत नाहीं. तो एक प्रकारच्या आंतरिक अंधारांत चांचपडतो आहे. महत्त्वाच्या जीवनविषयक प्रश्नांचें निश्चित उत्तर त्याला सांपडलेलें नाहीं. आणि त्यामुळें त्याच्यापुढें मोठा पेचप्रसंग उभा राहिला आहे. या शतकाच्या सुरवातीची परिस्थिति यापेक्षां निराळी होती. मानवासंबंधीचा आशावादी दृष्टिकोण अवास्तव वाटत नव्हता. साहाजिकच आपल्यापुढें असा प्रश्न उपस्थित होतो कीं, त्या आशावादी दृष्टिकोणासंबंधीं आपण आतां कोणती भूमिका स्वीकारावी. त्या दृष्टिकोणामुळेंच जर आज आपल्याला अंधारांत आणि संशयाच्या वातावरणांत चाचपडावें लागत असेल तर तो आशावाद अजिबात त्याज्य कां मानूं नये? अर्थात् निराशावादी तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते या प्रश्नाचें उत्तर होकारार्थीच देतील. भौतिक विकासाच्या योगानें मानवाला मुक्ति मिळावी ही आशा त्यांच्यामतें आज ना उद्यां फोल ठरणारच होती. कारण मानवी जीवनासंबंधींची वास्तव परिस्थिति लक्षांत घेतां कसल्यातरी भ्रामक सिद्धांतावर त्या आशेची उभारणी झाली होती. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी कीं, आजच्या काळांतील या भावनांशीं सहभागी होणारे लक्षावधि स्त्रीपुरुषदेखील पुन्हां असेंच मानीत असतात कीं, आर्थिक साहाय्य, शिक्षण, लोकशाही इ. च्या साहाय्यानें औद्योगिक मानव शांततेच्या नव्या युगाची प्रभा फांकविणार आहे.

आशावादी आणि निराशावादी यांतील संघर्ष ही सर्व तत्त्वज्ञानांतील एक मूलभूत समस्या असून ती सोडवावयाची म्हटलें तर त्यासाठीं फार मोठें निरूपण करीत बसावें लागेल. पण तसें करीत बसण्याचें प्रयोजन नाहीं आणि त्याचें अगदीं व्यावहारिक कारण असें आहे कीं, आशावादी तत्त्व-

ज्ञान अमेरिकेच्या परंपरेंत इतकें दृढमूल होऊन बसलें आहे कीं, त्यावांचून अमेरिकनांचें एक पाऊलहि पुढें पडणार नाहीं. आशावादी तत्त्वज्ञानांत ते अगदीं मुरून गेले आहेत. त्यांचा सगळा दृष्टिकोण त्या तत्त्वज्ञानानें भारला गेला आहे आणि त्यांच्या विचारपद्धतीवरदेखील त्याचा पगडा बसलेला आहे. ती विचारसरणी चुकीची आणि परस्पर विसंगतींनें भरलेली आहे असें आपण कितीहि जरी पटवून देण्याचा प्रयत्न केला तरीहि ती नष्ट होऊं शकणार नाहीं.

शिवाय ही आशावादी परंपरा नष्ट करणें शक्य आहे असें मानलें तरी तसें करणें इष्ट आहे का ? हा प्रश्न शिल्लक राहतोच. ऐतिहासिक दृष्ट्या विचार केला तर आपल्याला असें दिसून येईल कीं, आशावादी परंपरांमुळें जगाला सतत एकप्रकारचें सामर्थ्य प्राप्त होत गेलें आहे आणि आज तर अशा सामर्थ्याची जगाला विशेषच जरूर आहे. त्या परंपरांमधूनच आधुनिक अमेरिकेचा जन्म झाला. त्यापासूनच तिचें ध्येय निश्चित झालें. या परंपरांच्या प्रभावामुळेंच अमेरिका सामर्थ्यशाली बनली. तिला लढाया देतां आल्या आणि ती विजयीहि होऊं शकली. मानवासंबंधीं जगांत कोणीहि बाळगलीं नसतील इतकीं उच्च आणि उदात्त ध्येयें आपण आपल्या डोळ्यापुढें उभीं केलीं तींदेखील या आशावादामुळेंच. हीं ध्येयें किंवा या आशा फलद्रूप करण्यासाठीं आशावाद्यांनीं केलेले प्रयत्न अजिबात निष्फळ ठरले आहेत असेंहि म्हणतां येणार नाहीं. आशावाद्यांनीं बजावलेल्या कामगिरीमुळें जनतेच्या हालअपेष्टा थोड्या कमी झाल्या आहेत; शिक्षणाचा प्रसार झाला आहे, आणि भीति व अज्ञान यांच्या तावडींत सांपडलेल्या माणसांची त्यापासून सुटका झाली आहे. निराशेनें ग्रासलेल्या जगाला आशावादामुळेंच नवा दिलासा मिळाला आहे.

हें केवळ अमेरिकेच्या नव्हे तर सर्वसामान्यपणें आधुनिक मानवाच्या बाबतींतच लागू पडण्यासारखें आहे. माणूस केवळ ऐहिक जगाशींच निगडीत आहे असें नाहीं. त्यामुळें केवळ ऐहिक उद्दिष्टांची पूर्तता झाली म्हणजे त्याचा आत्मविकास होईल असें नाहीं. मात्र हीं आर्थिक उद्दिष्टें अजिबात सोडून देऊनहि त्याचें भागणार नाहीं. केवळ त्याच्या स्वार्थासाठींच नव्हे

तर नैतिक दृष्ट्याहि त्याचें भौतिक जीवन सुधारणें आवश्यक आहे. दुःख आणि दारिद्र्य नष्ट करणें शक्य असतांना जनतेच्या जीवनांत त्यांचा धुडगूस चालूं देणें अक्षम्य आहे. या बाबतींत बुद्ध भिक्षूंचें मत बहुसंख्य मानवांना मानवण्यासारखें नाहीं. आजच्या काळांतील अर्थशास्त्राच्या दृष्टीनें ही वस्तुस्थिति अत्यंत महत्त्वाची असून लक्षावधि लोकांना त्याची जाणीव होऊं लागली आहे; आणि त्या जाणिवेसाठीं अमेरिकेंतील आशावादी तत्त्वज्ञानाची अत्यंत आवश्यकता आहे.

या शतकाच्या मध्याला अमेरिकेपुढें जी समस्या उभी राहिली आहे तिचें मूळ त्यांतच आहे. मानवाचें आंतरिक जीवन आणि त्यासंबंधींच्या त्याच्या गरजा यांच्या अनुषंगानें जर प्रगतीच्या सिद्धांतांचा विचार केला तर, अनेक बाबतींत आपला भ्रमनिरास होतो. पण त्याचबरोबर आधुनिक संस्कृतींतील केवळ गोमच नव्हे तर तिचें अस्तित्व टिकून राहण्याच्या दृष्टीनेंदेखील तो सिद्धांत अत्यावश्यक ठरतो. राहणीचें मान अत्यंत निष्कृष्ट असलेल्या पौर्वात्य देशांना, त्याचप्रमाणें तें जेथें कळसाला पोहोंचलें आहे अशा पाश्चात्य देशांनाहि हें सारखेंच लागू आहे. आपल्या देशांतील लक्षावधि लोकांची उपासमार आणि दैन्य यांपासून सोडवणूक करण्यासाठीं पौर्वात्य देशांनीं जसा या सिद्धांताचा अंगीकार करणें जरूर आहे, तसाच आजपर्यंत मिळविलेलें यश गमावून बसण्याची पाळी येऊं नये म्हणून पाश्चात्य देशांनाहि त्या सिद्धांताला पाठिंबा देणें भाग आहे. मानवी नियतीच्या दृष्टीनेंच आशावादी परंपरांना चिकटून राहणें क्रमप्राप्त असून त्यांतून आपली आतां सुटका होणें शक्य नाहीं...मग त्याचे परिणाम कांहीं का होईनात.

पण एक तर या आशावादाचा स्वीकार करावयाचा किंवा त्याकडे अजिबात पाठ फिरवावयाची यापरता अन्य मार्गच उरलेला नाहीं का ? या दोन परस्परविरोधी दृष्टिकोणांचा समन्वय साधतां येणार नाहीं का ? अधिक स्पष्टपणें विचारावयाचें तर सुखाच्या प्राप्तीसाठीं वास्तवाकडे बघण्याची बौद्ध भिक्षूंची अंतर्मुख दृष्टि व त्यांतून निघणारे ऐहिक जीवनाविषयींचे निराशावादी निष्कर्ष आणि अमेरिकन जीवनावर जिचा खोल ठसा उमटलेला आहे आणि ज्यांतून आशावादी मूल्यांची जोपासना होते

ती बहिर्मुख दृष्टि या दोहींत घनिष्ट संबंध असूं शकेल का? मानवी जीवनाकडे बघण्याच्या या दोन दृष्टिकोणांपैकीं एक बरोबर आहे, दुसरा चूक आहे आणि म्हणून माणसानें त्यांपैकीं एकाचीच निवड केली पाहिजे असें खरोखरच आहे का? मानवी संघर्षाच्या दोन वेगळ्या बाजू या दोन दृष्टिकोणांच्या द्वारा व्यक्त केल्या जातात, म्हणून ते परस्परपूरक तसेच परस्परावलंबी आहेत असें म्हणतां येणार नाहीं का? आणि मनापासून प्रयत्न केला तर, त्यांचा समन्वय साधतां येणार नाहीं का? असा समन्वय साधतां आला तर आज स्वातंत्र्याच्या सिद्धांताचें निरपवादित्व—जें आपण सिद्ध करूं शकत नाहीं तें—सहज सिद्ध करून दाखवतां येईल. अमेरिकनांना सबंध मानवजातीबद्दल वाटणारी थोर आशा आणि शतकानुशतकें द्रष्ट्यांच्या अंतःकरणाला जाणवत आलेली वैय्यर्थ्याची भावना ह्यांच्यात जर एक भव्य समन्वय आपल्याला साधतां आला तर आज आपल्या स्वातंत्र्याच्या सिद्धांतांत जी विश्वात्मकतेची उणीव भासते आहे, ती दूर होईल आणि स्वातंत्र्याच्या सिद्धांताचा पाया भक्कम होईल.

या सर्व विवेचनावरून निदान आपल्या पुढील प्रश्नाचें स्वरूप तरी स्पष्टपणें आपल्या नजरेस येईल. पण आज खरी गरज जर कशाची असेल तर ती नुसत्या वादविवादापेक्षां हा समन्वय साधणारा परिणामकारक मार्ग शोधून काढण्याची. त्यासाठीं आपल्याला केवळ तात्त्विक काथ्याकूट करून चालणार नाहीं. नवीन प्रदेश शोधून काढणारा धाडसी संशोधक बनावें लागेल. नुसता तात्त्विक विचार करणाऱ्या मंडळींत क्वचितच आढळणाऱ्या विचार-स्वातंत्र्याचा उपयोग करून मानवी तत्त्वाचें आकलन करून घेण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. केवळ बुद्धिवादी दृष्टिकोणांतून पाहतां असें करणें कदाचित् धोक्याचें ठरण्याचा संभव आहे. परंतु बुद्धिवादावर जगत नसलेल्या सर्वसाधारण माणसाच्या दृष्टिकोणांतून पाहतां, जर नवा आणि उपयुक्त मार्ग शोधून काढावयाचा असेल तर, आपल्याला या दिशेनें पाऊल टाकलेंच पाहिजे.

अशा प्रकारचा समन्वय तत्त्वज्ञानांतील कोठल्याहि पंथापासून मिळूं शकणार नाहीं. कारण त्यामध्यें सध्यांचीच संशोधनवृत्ति प्रतिबिंबित झालेली दिसेल. आपल्याला संशोधनाची नवी पद्धतीच शोधून काढली पाहिजे. मग

ती कितीका मंदगतीनें विकासित होईना. यावरून अमेरिकेला या बाबतींत केवढें प्रचंड कार्य करावें लागणार आहे, याची कल्पना येईल. हें कार्य म्हणजे आजच्या संशोधनवृत्तीला ज्याची कल्पना नाहीं अशा मार्गानें मानवी स्वभावाचें आणि नियतीचें आकलन कसें करून घ्यावयाचें तें शिकावें लागेल. त्यामुळें कदाचित् आजपर्यंत अवगत नसलेलें ज्ञान प्राप्त होईल. कदाचित् अद्यापपर्यंत आपल्याला माहीत नसलेलीं नवीं क्षेत्रें आपल्याला सांपडतील. आणि अखेरीस या नव्या ज्ञानांत आणि नव्या क्षेत्रांत आपल्याला अमेरिकेपुढील समस्यांचीं उत्तरेंच सांपडतील असें नव्हे, तर कदाचित् स्वतंत्र मानवाच्या कल्पनेला आधारहि सांपडतील.

* * *

## ५ : : अध्यात्माचा उल्लेख

आपल्यापुढील समस्यांवर तोडगा शोधण्याचा किंवा सुचविण्याचा प्रयत्न करणारांच्या लेखांत आणि भाषणांत आजकाल "अध्यात्मा"चा प्रत्यक्षाप्रत्यक्षपणें वारंवार उल्लेख केला जातो, हें निरीक्षकांच्या नजरेंतून खासच सुटलें नसेल. केवळ राजकीय विचारवंतच नव्हेत, तर राजकारणी व्याख्याते, धंदेवाले, पंडित आणि टीकाकार हे सर्वच लोक आपल्याला पुन्हां पुन्हां बजावून सांगत असतात कीं, आपलें लोकशाही जीवन आध्यात्मिक अधिष्ठानावर आधारलेलें आहे. आध्यात्मिक जागृति किंवा पुनरुज्जीवन होण्यावरच आपलें भवितव्य अवलंबून आहे असेंदेखील ते प्रतिपादितात.

मानवासंबंधींच्या आपल्या सध्याच्या दृष्टिकोणांत कांहीं तरी कमी आहे असें वाटूं लागल्यामुळेंच हे पुढारी इतक्या तळमळीनें "अध्यात्माचा उल्लेख" करूं लागले आहेत. पण यांचें वैशिष्ट्य हें आहे कीं, ते उल्लेख करीत असलेल्या 'अध्यात्मा'चा संस्थारूप संघटित धर्माशीं कसलाहि संबंध नाहीं. वर उल्लेखिलेल्या व्यक्तींची धर्मावर श्रद्धा आहे हें खरें. पण अध्यात्माचें महत्त्व प्रतिपादन करणाऱ्यांपैकीं अनेकजण उघडपणानें नाहीं तरी अप्रत्यक्षपणें संघटित धर्मावर कांहीं तरी कोरडेच ओढीत असतात.

त्यांचें म्हणणें असें असतें कीं, सर्वसाधारण माणसाची अध्यात्मासंबंधीं जिज्ञासा या संघटित संस्थाबद्ध धर्मांनें पुरी केलेली नाहीं; किंवा अध्यात्मिक आकांक्षांना खाद्य पुरविलें नाहीं. परंतु, या ठिकाणीं त्यांच्या धर्मविषयक टीकेची छाननी करण्याचें कारण नाहीं. सर्व जगांत लक्षावधि लोक असे आहेत कीं, ज्यांना अध्यात्माचा उल्लेख केल्यामुळें मुळींच बिचकल्यासारखें होत नाहीं. उलट, तसा उल्लेख त्यांना नित्य परिचयांतला वाटतो; आणि निरनिराळे धार्मिक पंथ किंवा संघटना यांना अभिप्रेत असलेल्या अर्थांच्या अनुषंगानेंच ते त्याकडे पाहतात. आपण ज्या प्रश्नाचा एवढा ऊहापोह करीत आहोंत तो अशा लोकांच्या डोक्यांतही नसतो. त्यांच्या धर्मपंथानें घालून दिलेल्या तत्त्वानुसार त्यांनीं तो केव्हांच सोडवून टाकलेला असतो. सद्भावनेनें प्रेरित होऊन आध्यात्मिक ज्ञान प्राप्त करून घेण्यास निघालेल्यांचें अशा धार्मिक लोकांशीं भांडण नाहीं. उलट, त्यांच्यापासून त्यांना कितीतरी नवीन गोष्टी शिकतां येतील. अमेरिकन लक्षावधि माणसें अशीं आहेत कीं, ज्यांना आध्यात्मिक मार्गाची गरज अत्यंत तीव्रतेनें भासत असते. परंतु संस्थाबद्ध धर्मातून तो मार्ग त्यांना सांपडत नाहीं. आपण ज्याला आंतरिक जग अशी संज्ञा दिली आहे, त्या जगांत चालणाऱ्या मानवी व्यवहारांचें असाधारण महत्त्व अशा लोकांच्या ध्यानीं आलेलें असतें. परंतु त्यांना त्या जगांत विज्ञानाच्याहि साहाय्यानें जातां येत नाहीं; किंवा संस्थाबद्ध धर्माच्या साहाय्यानेंहि जातां येत नाहीं.

त्या पुढाऱ्यांच्या मनात अत्यंत महत्त्वाचें असें कांहींतरी घोळत असतें हें निश्चित. पण तें निश्चितपणें काय आहे तें मात्र सांगतां येत नाहीं. मानवाच्या कांहीं खास वैशिष्ट्यांचा ते उल्लेख करतात. आणि मानवजातीचें अस्तित्व, कल्याण आणि स्वातंत्र्य टिकून रहावें येवढ्यासाठीं त्या वैशिष्ट्यांचें आकलन होणें आवश्यक आहे असेंहि ते सांगतात. परंतु, मानवाचें हें वैशिष्ट्य त्यांना विशद करून सांगतां येणार नाहीं, किंवा त्यांत वास्तववादी आशय भरतां येणार नाहीं, असें मात्र एकसारखें मनांत येत असतें. पाश्चात्य लेखक आणि वक्ते ज्यावेळीं अध्यात्माचा उल्लेख करतात, त्यावेळीं ते अध्यात्म आणि ख्रिस्ती तत्त्व हीं दोन्ही साधारणपणें एकरूप समजत असतात, असें कित्येक वेळां आढळून येतें. अर्थातच एकरूपत्व मान्य

करतां येण्याजोगें नाहीं कारण, ख्रिस्तीधर्माला अभिप्रेत असलेल्या मार्गापेक्षां निराळे असेहि अध्यात्माचे मार्ग असूं शकतात आणि कामचलाऊ म्हणून क्षणभर हें एकरूपत्व आपण मान्य केलें तरीदेखील फारसें कांहीं पदरांत पडणार नाहीं. कारण, " ख्रिस्तीतत्त्व " या शब्दाविषयींच मुळीं गोंधळ आहे. स्वतंत्र जीवनपद्धतीच्या दृष्टीनें ख्रिस्ती तत्त्वाला फार महत्त्व आहे, ही गोष्ट स्वयंसिद्ध आहे आणि अनेक विद्वानांनीं तसें दाखवून दिलें आहे. तरीदेखील 'ख्रिस्ती' किंवा 'ख्रिस्तानुयायी' म्हणजे काय? त्याची आजच्या काळाला मान्य होईल अशी व्याख्या आपण करूं लागलों तर अनेक अनिवार्य अशा अडचणी उभ्या राहतात. येशू हा एक थोर परंतु कांहींसा अव्यवहारी असा धर्मशिक्षक होता, ह्या मतापासून तो येशू हा ईश्वराचा अवतार किंवा ईशपुत्र होता येथपर्यंत अनेक तऱ्हेचीं मतें आढळतात. या निरनिराळ्या मतांमधून अध्यात्म या शब्दाचा आशय तर स्पष्ट होत नाहींच; पण उलट, त्या शब्दाचा अर्थ निरनिराळ्या प्रकारानें लावल्यामुळेंच ख्रिस्ती धर्मतत्त्वांसंबंधीं हीं भिन्न भिन्न मतें पुढें आलीं असावींत असें वाटूं लागतें. एखाद्या व्यक्तीच्या अध्यात्मासंबंधींच्या कल्पनांचा त्याच्या ख्रिस्तीधर्मविषयक कल्पनांवर प्रभाव पडतो......परंतु ख्रिस्ती धर्म मानणारे अध्यात्माचा अर्थ काय करतात तेवढेंच पाहून भागणार नाहीं. ख्रिस्ती धर्म न मानणाऱ्यांच्या त्यासंबंधींच्या कल्पना काय आहेत, तेंदेखील समजावून घेतलें पाहिजे.

अध्यात्माचा उल्लेख करणाऱ्यांच्या मनांत ईश्वरविषयक कल्पनेशीं निगडित असलेलें असें कांहीं तरी असतें, हें सर्वजण कबूल करतील. परंतु ईश्वरासंबंधींच्या कल्पनाहि कितीतरी प्रकारच्या असूं शकतात.....अनेक विख्यात शास्त्रज्ञहि आपल्या भाषणांतून व लेखांतून अध्यात्माला आवाहन करीत असतात. ते मोठ्या आग्रहानें ईश्वराच्या अस्तित्वाची ग्वाही देतात. त्यांचें म्हणणें असें कीं, विज्ञानामुळें जीं अनेक आश्चर्यें उजेडांत आलीं आहेत ते ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करणारे पुरावेच आहेत. अर्थात्, क्वचित् एखादा अपवाद सोडला तर असें विधान शास्त्रज्ञाच्या भूमिकेंतून मात्र केलें जात नाहीं. सर्वसामान्य नागरिक म्हणूनच ते शास्त्रज्ञ अशा तऱ्हेचें विधान करीत असतात. अध्यात्माचा उल्लेख करतांना ते आपलें विज्ञानाचें क्षेत्र क्षणभर

बाजूस ठेवतात आणि ज्यावेळीं ते पुन्हां आपल्या क्षेत्रांत प्रवेश करतात त्या वेळीं आपल्या संशोधनांत अध्यात्म घुसडलें जाणार नाहीं, याची ते काळजी घेतात. आज आपल्या जीवनांत जो संघर्ष निर्माण झाला आहे, तसाच संघर्ष त्यांच्या या वृत्तीमुळें निर्माण होतो. ज्या वेळीं एखादा आइन्स्टाइन किंवा एखादा मिलीकन ईश्वरावर आपली श्रद्धा असल्याचें सांगतो, त्या वेळीं अध्यात्माच्या बाजूनें भक्कम पुरावाचा उपलब्ध झाल्यासारखें दिसतें. पण लगेच तो शास्त्रीय संशोधनाच्या क्षेत्रांत शिरला म्हणजे मात्र, अध्यात्माचा सत्याशीं सुतराम् संबंध पोहोंचत नाहीं अशा भावनेनें तो अध्यात्म बाजूस सारतो, आणि अशा रीतीनें तो आपण स्वतःच दिलेल्या पुराव्याविरुद्ध जातो. तो घेत असलेल्या या दोन भूमिका परस्परविरोधी असल्यामुळें सर्वसाधारण बुद्धिवादी माणसापुढें असा प्रश्न उभा राहतो कीं, अध्यात्मिक बाजू जर इतकी महत्त्वाची मानली जाते, तर विज्ञानाकडून त्याची इतकी उपेक्षा कशी केली जाते ? आध्यात्मिक आवाहनला कसलेंहि महत्त्व नाहीं असें मानणारा विज्ञानवादी दृष्टिकोण एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला आध्यात्मिक दृष्टि-कोण, यांपैकीं कशाची तरी एकाची निवड करण्याखेरीज आपल्याला गत्यं-तरच नाहीं का ?

या पेंचप्रसंगांतून मार्ग काढण्याच्या बाबतींत आपण पुरतेपणीं अयशस्वी ठरलों असून त्या अपयशामुळेंच आपल्याला अंधारांत चाचपडावें लागत आहे. हा प्रश्न कोठल्याहि एका धर्मापुरता मर्यादित नाहीं, तर मानवासंबंधींच्या आपल्या कल्पनेशींच तो निगडित आहे. आधुनिक मानव सत्यशोधनासाठीं ज्या विज्ञानाची कास धरतो तें विज्ञान अध्यात्माची अजिबात दखल घेत नाहीं. त्यामुळें धर्मांत काय सांगितलें आहे, तिकडे त्याचें लक्षच नसतें. आपण ज्याला वास्तव समजतों त्यापासून ‘ अध्यात्म ’ या शब्दाची फारकत झाली आहे. भावना आणि विचार यांच्या जगांतून त्याची जणूं हकालपट्टी झाली आहे.

अध्यात्माचा उल्लेख करणाऱ्यांच्या मनांत त्याविषयीं कांहीं कल्पना असतात. पण त्याचें नेमकें स्वरूप मात्र त्यांना समजलेलें नसतें. जन्मांध माणसा-सारखीच त्यांची स्थिति असते. जन्मांधाला स्वतः जरी दृष्टि नसली तरी दृष्टीसंबंधींची कल्पना त्याला असते. कारण दृष्टि असलेले त्याच्याभोंवतालचे

लोक त्याला त्याबद्दल सांगत असतात. त्याचप्रमाणें स्वतःची कल्पनाशक्ति वापरून त्यानें दृष्टीसंबंधाची कांहीं माहिती प्राप्त करून घेतलेली असते. अध्यात्मिकता ही वास्तव आहे अशा तऱ्हेची शिकवण आधुनिक मानवाला प्राचीन ग्रंथांतून आणि कलावस्तूंतून मिळत असते आणि त्या जन्मांधाप्रमाणें त्याला त्यासंबंधीं कांहीं ज्ञान असतें. पण तो ती वास्तवता पाहूं शकत नाहीं. तो ज्या जगांत वावरत असतो त्या जगाच्या दृष्टीनें ती कल्पना परकी आणि अमूर्त अशी असते. त्यामुळें तो फक्त त्याचा उल्लेख करूं शकतो. पण त्या-संबंधीं प्रत्यक्ष ज्ञान असें त्याला कांहींच नसतें.

तेव्हां आंतरिक जगाचा ठाव घेऊं पाहणाऱ्यापुढें तीन पर्याय उरतात. पहिला म्हणजे धर्माचा आश्रय घेऊन त्याची शिकवण आत्मसात् करणें, तें शक्य नसेल तर दुसरा पर्याय म्हणजे विज्ञानानें दाखवून दिलेल्या मनो-गहनाच्या मार्गाचा अवलंब करावयाचा आणि हे दोनहि पर्याय पसंत नसतील तर ‘ अध्यात्मिक ’ या शब्दांत आंतरिक जगाचें गूढ उकलूं शकेल अशा प्रकारचा आशय मनांत आणण्याचा प्रयत्न करावयाचा. यापैकीं कोण-त्याहि मार्गाचा जरी अवलंब केला तरी त्यांत कांहीं धोके हे असणारच. शिवाय हे तीनहि मार्ग कष्टसाध्य आहेत. परंतु म्हणून जर हे तीनहि मार्ग सोडून द्यावयाचें म्हटलें तर मग आंतरिक जगाचें गूढ उकलण्याचा प्रयत्नच जवळजवळ सोडून द्यावा लागेल. आणि ज्या अंधारांत आपण सांपडलों आहोंत त्यांतच चांचपडत राहण्यांत समाधान मानावें लागेल.

ज्या अध्यात्माचा नुसता उल्लेख केला जातो त्याचें स्वरूप नीट समजावून घेतल्याशिवाय विसाव्या शतकांतील माणसाला आंतरिक अंधारापासून स्वतःची सोडवणूक करून घेतां येणें शक्य नाहीं, अशी प्रस्तुत लेखकाची पक्की खात्री होऊन चुकली आहे. वरवर पाहतां अध्यात्मासंबंधींचें धर्माचें आणि विज्ञानाचें प्रतिपादन परस्परविरोधी वाटत असलें तरी वस्तुतः तसें नाहीं. त्या दोहोंचा समन्वय साधतां येईल. अर्थात् त्याचें संपूर्ण विवेचन करावयाचें म्हटलें तर एक स्वतंत्र ग्रंथ लिहावा लागल.

परंतु सामान्य माणसाची याबाबतची प्रतिक्रिया अशी असते कीं, ज्या अर्थीं आजपर्यंत हे प्रश्न सुटलेले नाहींत त्याअर्थीं ते यापुढेंहि कधीं सुटणें

शक्य नाहीं. कदाचित् तसें असेलहि, परंतु ह्या बाबतींत सर्वसामान्य माणसानें एक गोष्ट अवश्य लक्षांत ठेवली पाहिजे. बाह्य जगांतील एखादें गूढ उकलण्याच्या बाबतींत इतके दिवस आलेल्या अपयशाचा हवाला देऊन आपण आपल्या अज्ञानाचें समर्थन करीत बसतों का ? अणुविभाजन यापूर्वीं कोठें शक्य झालें होतें ? परंतु म्हणून अणुविभाजनाचे प्रयत्न आपण सोडून दिले नाहींत. परंतु आपण आंतरिक जगाचा किंवा मानवाच्या स्वरूपा-संबंधीचा म्हणजेच सर्वसामान्यपणें ज्याला 'अध्यात्मिक' म्हणून संबोधलें जातें अशा प्रश्नाचा विचार करूं लागलों म्हणजे मात्र आपण त्याबाबतींत आजवर आलेल्या अपयशाची सबब पुढें करून मोकळे होतों.

* * *

भाग ५ वा

# मायकेलचें खड्ग

## १ : : आंतरिक जग

जगाकडे बघण्याच्या अंतर्मुख आणि बहिर्मुख दृष्टींत आतांपर्यंत आपण जो फरक दर्शविला आहे तो तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकाला कांहींसा नवीन आणि अपरिचित वाटण्याचा संभव आहे. पुस्तकी तत्त्वज्ञानांत या फरकांचा विचार अनेक प्रकारांनीं आलेला आहे. परंतु जे फरक स्पष्ट करण्यासाठीं आपण साधे शब्द वापरले आहेत ते सर्वसाधारणपणें त्यांत टाळण्यांत आलेले आहेत. अर्थात् या ग्रंथांत मीं तत्त्वज्ञानाची पुस्तकी चर्चा केलेली नाहीं. उदा. आदर्शवादासंबंधीं उहापोह करून तत्त्वज्ञानांतील त्याच्याविरुद्ध असलेल्या निरनिराळ्या पंथांची पारिभाषिक शब्दांत तुलना करणें हा या ग्रंथाचा हेतु नाहीं. आपल्या काळांतील शक्तींचा ज्याच्यावर जबरदस्त पगडा बसलेला आहे, आणि त्यांच्यावर प्रभुत्व मिळविण्यासाठीं ज्यांची मनापासून धडपड चालली आहे अशा सर्वसाधारण बुद्धिवान् माणसाचा या प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टिकोण या पुस्तकांत मांडण्यांत आलेला आहे. अशा माणसानें तत्त्वज्ञानांतील प्रमुख प्रश्नांची चर्चा करण्याची तयारी ठेवली पाहिजे हें खरें. पण ही चर्चा करतांना त्याला समजूं शकणारे शब्दप्रयोग करण्याचा त्याला अधिकार असला पाहिजे. पुस्तकी दृष्टिकोण टाळल्यामुळें आपण जे निरनिराळे फरक दाखवून दिले आहेत ते समजणें सोपें झालें आहे. आंतरिक जगांत प्रवेश करून आपण आपल्या जागृत मनाच्या साहाय्यानें जेव्हां तिथें चाललेल्या घडामोडींचें निरीक्षण करूं लागतों तेव्हां त्यांत निरनिराळे थर किंवा पातळ्या असल्याचें आपल्याला स्पष्टपणें जाणवतें. जाणीव, अर्धवट जाणीव, आणि जाणिवेचा अभाव अशा निरनिराळ्या अवस्थांना आपल्याला तोंड द्यावें लागतें. हें सर्वच प्रकरण अगदीं तज्ञ मानसशास्त्रज्ञालादेखील गोंधळांत टाकणारें आहे. आणि या आंतरिक जगांतील घटना बाह्य जगांतील घटनांपेक्षां अगदीं निराळ्या असल्यामुळें त्या गोंधळांत भरच पडते. ह्यांतील फरक

शब्दानें व्यक्त करण्यासाठीं आपण वापरतों ती भाषा बहिर्मुख दृष्टिकोणाला साजेशी असते. आपल्या रोजच्या जगांतील नियमांना आणि संघटनांना न जुमानणाऱ्या ह्या आंतरिक घटनांचें यथातथ्य वर्णन करणारे शब्द आपल्याला सांपडत नाहींत. त्यामुळें आंतरिक घटनांचें आकलन करून घ्यावयाचें असेल तर त्यांचा प्रत्यक्ष अनुभवच घेतला पाहिजे. त्या घटनांचा आपल्या जीवनांत साक्षात्कार झाला पाहिजे.

हें साध्य करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे ज्या ज्या परिस्थितींत अंतर्मुख जाणीवेचा उपयोग करावा लागतो अशा परिस्थितीशीं आपल्या कल्पना-शक्तीच्या जोरावर तादात्म्य पावून तिचा पुन्हां अनुभव घेण्याचा प्रयत्न करणें. अर्थात् आंतरिक जगाचें संपूर्ण संशोधन करण्याची आपल्याला गरज नाहीं. सत्यसंशोधनाच्या दृष्टीनें आवश्यक अशीं या आंतरिक जगाचीं कांहीं ठळक वैशिष्ट्यें ओळखणें आपल्या प्रस्तुत विषयाच्या दृष्टीनें पुरेसें आहे.

आपण फूटबॉलच्या खेळाचें अगदीं साधें उदाहरण घेऊं. एखाद्या फूट-बॉलच्या सामन्यांत अमूक एकजण असें असें खेळला आणि त्यामुळें असे असे गोल झाले ही सर्वसाधारण अमेरिकनाच्या दृष्टीनें बाह्य घटना झाली. पण जरा विचार केला तर असें दिसून येईल कीं, हा फार वरवरचा दृष्टि-कोण झाला. एखाद्या पहिल्या दर्जाच्या सामन्याच्या वेळचें दृश्य डोळ्यां-समोर आणण्याचा प्रयत्न केला तर आपल्याला काय आढळेल—फरचे कोट, सभोंवतालचीं झाडें, मैदानांत फडकत असलेलीं सीमारेषेवरील छोटीं निशाणें, सामना पाहायला आलेल्या मुली, आणि आरोळ्या मारीत असलेली त्यांच्या बरोबरची मंडळी. सीमारेषेवर उभे राहून खेळाडूंना प्रोत्साहान देण्यासाठीं त्यांच्या म्होरक्यांनीं मारलेल्या ललकाऱ्या आणि गारठ्यांत मैदानावर उतर-णारे संघ. खेळ जसजसा रंगांत येतो, तसतसा प्रेक्षकांत एकच हलकल्लोळ उसळतो आणि शेवटीं हजारों प्रेक्षक विजयी संघांतील खेळाडूंना खांद्यावर घेण्यासाठीं किंवा गोलाचे खांब उपटून टाकण्यासाठीं मैदानांत घुसतात. हें सगळें दृश्य डोळ्यांपुढें आणून ज्यानें फूटबॉल म्हणजे काय तें कधीं ऐकलें सुद्धां नाहीं असा एखादा माणूस त्या गजबजाटांत बसला आहे अशी कल्पना करा. त्याहीपुढें जाऊन या उदाहरणांतील आशय नीट स्पष्ट होण्यासाठीं तो माणूस जेथें चढाओढ हा शब्द—पाश्चात्य लोक ज्या अर्थानें

तो वापरतात त्या अर्थानें—देखील माहीत नसलेल्या चीनसारख्या एखाद्या परक्या संस्कृतीचा आहे असें समजा. अशा परिस्थितींत त्या सामान्याबद्दल त्याची प्रतिक्रिया काय होईल?

या सर्व देखाव्याकडे तो माणूस अर्थातच बाह्य किंवा अलिप्ततेच्या भावनेनेंच पाहील आणि तसा तो पाहूं लागला म्हणजे, त्याच्या दृष्टीनें त्या खेळांत त्याला कसलाही हेतु किंवा अर्थ जाणवणार नाहीं. सामन्यांत अ चा विजय झाला का ब चा, याची त्याला यत्किंचितही क्षिति वाटणार नाहीं. कारण, आधीं ह्याचा 'गोल' झाला काय किंवा त्याचा झाला काय, जगाचें भवितव्य थोडेंच बदलणार आहे? मग त्याला असा प्रश्न पडतो कीं, जणुं कांहीं स्वतःच्या प्राणांचीच बाजी लागली आहे, अशा ईर्ष्येनें हे प्रेक्षक त्या खेळाशीं कसे तद्रूप होतात? त्या चिनी साधूपुढें – तो साधु असेल तर— दोन पर्याय उभे राहतात. एकतर, हीं सर्व माणसें वेडीं असलीं पाहिजेत किंवा या देखाव्याचें वास्तव स्वरूप – दिसत असलेलें— त्याला जसें बाहेरून दिसतें तसें नसून तो त्रयस्थ असल्यामुळें, त्याला दिसूं न शकणारें असें वेगळेंच— आंतरिक – असलें पाहिजे. आतां सगळे प्रेक्षक वेडे नाहींत, हें त्याला माहीत आहे. त्याच्या दृष्टीनें ते चुकीच्या ध्येयामागें लागलेले असतील, पुरेसे प्रौढ नसतील, चटकन् बेभान बनत असतील इ. इ. पण त्याबरोबर तो हेंही जाणून आहे कीं, खेळ संपल्याबरोबर हींच माणसें सर्वसामान्य बुद्धिवादी माणसाप्रमाणें आपले नित्याचे व्यवहार करूं लागतील. त्यामुळें त्याला दुसरा पर्याय मान्य करण्यावांचून गत्यंतर उरत नाहीं. त्यांतील 'वास्तव' हा त्या खेळाडूचा आणि त्यांच्या पाठीराख्यांचा आंतरिक अनुभव असतो. म्हणजेच, ती एक आंतरिक जगांतील घटना असते.

वास्तवाचें हें आंतरिक स्वरूप वस्तुतः कोणत्याहि खेळाचें वैशिष्ट्यच असतें. गोल्फ खेळणाऱ्याच्या बाबतींतही असाच अनुभव येतो. हें आंतरिक स्वरूप कशा प्रकारचें असतें, तें समजून घेण्याचा प्रयत्न करूं. याबाबत फ्रिट्झ विटेल्सनें एक मोठें समर्पक उदाहरण दिलें आहे तो म्हणतो........

लहान मूल आपल्याच तंद्रींत बिछान्यावर पडलेलें असतें. ‘ तूं कसला विचार करीत आहेस ’ असें त्याला विचारलें, तर त्याला नीट उत्तर देतां येत नाही. “ कसला नाही ” असें तो प्रथम सांगेल, पण नंतर तो सांगेल कीं, मीं फूल फूल खेळत होतों – तरीदेखील तो गोंधळलेल्या मनःस्थितींत असेल. त्यावर त्याला प्रश्न विचारणारा माणूस, जर आपली तर्कशुद्ध बुद्धि चालवून त्याला म्हणूं लागेल कीं, “ हो खरंच ! तूं फूल आहेस. तुझे हातपाय म्हणजे फांद्या, तुझा चेहरा म्हणजे त्यावरचें फूल किंवा फुलोरा. तर तो लगेच म्हणेल कीं, “ छे छे तसें नाहीं – ” कारण, मुलांचा खेळ हा कांहीं केवळ तर्कावर आधारलेला नसतो. त्याला आपली तर्कशुद्ध भाषा समजत नाही. पण स्वतःची आणि मोठ्या माणसाची कल्पना अगदीं निराळी असते, एवढें त्याला कळूं लागलेलें असतें. त्यामुळें आपल्या हातापायांची फांद्यांची तुलना त्याला आवडत नाहीं. तो फुलाशीं नुसतें साम्य पाहात नसतो, तर त्याच्याशीं तदाकार झालेला असतो. जोपर्यंत तो ‘ फूल फूल ’ खेळत असतो, तोपर्यंत तो मुळीं मानवी आकाराचें मूल नसतोच. तो स्वतःच्या अवयवाची, एखाद्या झाडाच्या निरनिराळ्या भागांशीं तुलना करीत नाहीं....त्याला जें वाटेल तें तो सहज बनूं शकतो. तो ‘फूल फूल’ खेळतो तेव्हां फूलच असतो. फुलासारखा नसतो. मुलांचे सगळेच खेळ असे असतात. मुलें ज्यावेळीं ‘ गाडी गाडी ’ खेळतात, त्यावेळीं तीं अशींच प्रत्यक्ष गाडी बनलेली असतात. गाडी ही नुसती कल्पना राहिलेली नसते. खेळांतले ठोकळे पुढेंमागें सरकवून तीं ज्यावेळीं मोटारीचा खेळ खेळतात, त्यावेळींदेखील तो ठोकळा हें मोटारीचे प्रतीक नसतें. मुलांच्या दृष्टीनें त्यावेळीं तो ठोकळा आणि मोटारगाडी यांत कसलाहि फरक नसतो.

गोल्फ खेळणारा ज्यावेळीं शेवटचा टोला मारीत असतो, त्यावेळीं ‘ फूल फूल ’ खेळणाऱ्या त्या मुलाइतकाच जग विसरलेला नसतो, परंतु तो जर आंतरिक जगाशीं तादात्म्य पावूं शकला तर, त्याला टोलाही अगदीं बिनचूक मारतां येईल. आणि नेमका पाहिजे तेथें चेंडू पडल्याचें समाधानहि त्याला लाभूं शकेल. हें समाधान त्याला कोठून प्राप्त होतें ? आपल्या इच्छाशक्तीनें आपण चेंडू नेमक्या ठिकाणीं मारूं शकलों, या एक प्रकारच्या सामर्थ्याच्या भावनेंत त्याचा उगम असतो का ? त्याच्या समाधानांत सामर्थ्याच्या भावनेंत त्याचा उगम असतोच, पण त्याशिवाय, आणखीहि कांहीं

असतें. ज्यावेळीं खेळाशीं तद्रूप झालेला असतो, त्यावेळीं त्याला जें गाढ समाधान मिळतें, तें तो बाह्य उपाधि विसरून संपूर्णपणें अंतर्मुख झालेला असतो म्हणून; आणि त्यावेळीं एकप्रकारच्या सत्याशीं तादात्म्य पावलेला असतो. म्हणून हें सत्य म्हणजे आपण विवेकानें आकलन करूं शकतों तें सत्य नव्हे. तें मोजतां येणार नाहीं. तें मांडून दाखवतां येणार नाहीं, किंवा दुसऱ्या कोणाला त्याचा अनुभवहि आणून देतां येणार नाहीं. वास्तवाच्या अनुभवाच्या स्वरूपांतच आपल्याला तें प्रतीत होऊं शकतें. लहान मूल ज्याप्रमाणें खरोखरीच फूल बनलेलें असतें, त्याप्रमाणें गोल्फ खेळणारादेखील तो टोला मारतांना चेंडूनें किंवा त्या काठीनें खेळत नसतो, तर प्रत्यक्ष चेंडू आणि काठीच बनलेला असतो आणि अशा तऱ्हेनें तो त्या वस्तूंशीं एकरूप होतो, त्यावेळीं दूरान्वयानें तो विश्वाशीं एकरूप झालेला असतो.

म्हणून आपण ज्यावेळीं अंतर्मुख जाणिवेबद्दल बोलत असतों, त्यावेळीं आपण कांहीं तरी विचित्र किंवा क्वचितच अनुभवास येणाऱ्या घटनेबद्दल बोलत असें असतों नाहीं. वरील खेळाडूच्या उहाहरणांत याचा पडताळा चटकन् येऊं शकेल. पण आपल्यापैकीं प्रत्येकाला रोजच्या जीवनांत पदोपदीं हाच अनुभव येत असतो, हें अनेक उदाहरणांवरून दाखवून देतां येईल.

आंतरिक जग हें केवळ आत्मनिष्ठ, केवळ "द्रष्टयां"चें, त्याच्या पुरतेंच खरें असतें; अशी एक सर्वसाधारण समजूत आहे. पण ती खरी नाहीं, कारण तसें असतें तर, आंतरिक अंगातल्या शक्तींच्या योगानें त्या जगाबाहेरील घटनांचा किंवा अवस्थांचा यथातथ्य आविष्कार कसा होऊं शकला असता? परंतु, वस्तुस्थिति अशी आहे कीं, ज्यावेळीं आपण आपल्या स्वतःच्या आंतरिक जगांत पुरेशी खोल बुडी मारतों, त्यावेळीं आपण बाह्य जगांत वर येतों. आपल्याबाहेर किंवा अतीत असलेल्या घटनांचें आपापल्यापरीनें करणाऱ्या शक्ति ( प्रज्ञा ) आपल्यामध्यें आहेत. त्या शक्तींचें मूळ आणि कार्य जरी आत्मनिष्ठ असलें तरीं, सर्वसाधारणपणें वस्तुनिष्ठ या शब्दानें जें ध्वनित होतें, त्यालाही त्या लागू पडण्यासारख्या असतात. आत्मनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ यांत फरक निश्चितच आहे. परंतु त्यासंबंधींच्या आधुनिक कल्पना मात्र चुकीच्या आहेत.

आंतरिक आणि बाह्य जगांच्या परस्पर संबंधाचें आकलन करून घेतांना एक शब्द असा येतो कीं, जो आपण गृहीत धरलेला असतो. किंवा क्वचित् त्याज्य ठरविलेला असतो. ‘गूढ’ हा तो शब्द. कोणत्याहि ‘गूढ’ वस्तु-विषयीं आज सर्वत्र तिटकारा वाटत असलेला दिसतो. आणि तें स्वाभाविकहि आहे. परंतु विश्वांतील गूढ जाणण्यासाठीं आपण स्वतः “गूढवादी” बनलें पाहिजे, असें मुळींच नाहीं. पण मोठमोठ्या शास्त्रज्ञांचीसुद्धां यांतून सुटका झालेली नाहीं. प्रत्येक प्रयोगाच्या शेवटीं, मग त्यामागील प्रेरणा बहिर्मुख जाणीवेची असो वा अंतर्मुख जाणीवेची असो, ‘गूढ’ हें उभें राहतेंच. हें नाकारणें म्हणजे, मानवानें आपल्या ज्ञानानें सिद्ध केलेली गोष्ट नाकारण्या-सारखेंच आहे.

मात्र त्या गूढाचा अर्थ दरवेळीं अगदीं निरनिराळा असूं शकतो. आपण त्याकडे कोणत्या जाणीवेंतून पाहतों त्यावर तो अर्थ अवलंबून असतो. जाणीव बहिर्मुख असेल तर, गूढ नकरात्मक भासतें. सबंध मानवी जगा-भोंवतीं तें अंधाराचें वलय निर्माण करतें आणि तें वलय दूर करणें अशक्य होऊन बसतें, असा आजवरचा अनुभव आहे. शास्त्रज्ञाला येणारा अनुभव अशाच प्रकारचा असतो. जड वस्तूविषयींच्या आपल्या ज्ञानांत अधिका-धिक भर घालून तो अणूचें ज्ञान प्राप्त करून घेतो. त्यापुढें मात्र त्याला अंधार दिसूं लागतो. तो आणखी संशोधन करतो आणि त्याला परमाणूचें रहस्य समजतें. मग पुन्हां त्याच्यासमोर अंधाराची भिंत उभी राहते. अशा तऱ्हेनें बहिर्मुख जाणीवेच्या द्वारां ज्ञान प्राप्त करीत जाण्याची ही प्रक्रिया अखंड चालूच राहते आणि त्या प्रक्रियेच्या प्रत्येक क्षितिजाशीं अंधाराचें वलयहि कायम राहतें. म्हणून ज्ञान हें मर्यादित किंवा सांत असतें, तर अंधार मात्र अमर्याद किंवा अनंत असतो. त्यामुळें आपल्या संशोधनाला शेवट असूंच शकत नाहीं.

परंतु आपण अंतर्मुख जाणीवेच्या द्वारां गूढाकडे पाहूं लागलों म्हणजे मात्र असें घडतेंच असें नाहीं. अंतर्मुख जाणीवेला भेडसावणारे गूढ हेंदेखील अंधकारमय असतें. पण तो अंधार नुसती पोकळी नसते. आपल्याला ज्ञात असलेल्याच्यापुढें अज्ञातच असलें पाहिजे असें अंतर्मुख जाणीवेबद्दल म्हणतां येत नाहीं. कारण आपण अंतर्मुख बनलों म्हणजे जें अज्ञात असतें तें ज्ञात

होऊं शकतें. आंतरिक जगांतील गूढाचें सबंध स्वरूप बदलून जाऊं शकतें, म्हणजे अंधाराचें एकदम प्रकाशांत रूपांतर होतें. अचानक अशी कांहीं घटना घडते कीं, आपण प्राप्त करून घेतलेल्या ज्ञानाच्या कितीतरी पलीकडचा टप्पा आपल्याला एकदम गांठतां येतो—एखाद्या सत्याचा एकदम आपल्याला साक्षात्कार होतो—

बहिर्मुख जाणीवेइतकीच अंतर्मुख जाणीवदेखील वास्तव आणि खरी आहे हें मानायला आधुनिक मन तयार होत नाहीं, ही सत्यशोधनाच्या मार्गांतील आजची सर्वांत मोठी अडचण आहे. मानसशास्त्र, मानसोपचार आणि मनोविश्लेषण या आधुनिक शास्त्रांच्या कट्टया पुरस्कर्त्यांची अशी पक्की खात्री आहे कीं, या शास्त्रांच्या आधारें माणसाला आंतरिक जगांवर संपूर्ण प्रभुत्व मिळावितां येईल आणि त्यायोगें .आजच्या गुंतागुंतीशीं जुळतें घेऊन सुखाची प्राप्ती करून घेणें शक्य होईल. परंतु लक्षावधी माणसांच्या मनांत एक प्रश्न घर करून राहिलेला असतो कीं, आंतरिक जीवनासंबंधीं शास्त्रज्ञांनीं हें जें संशोधन चालवलें आहे त्याचा आंतरिक जीवनाच्या वास्तवाशीं खरोखरच संबंध पोंचतो आहे का ? आंतरिक जीवनासंबंधींचा सगळ्यांत कूट प्रश्न जर कोणता असेल तर तो म्हणजे बाह्यजीवनाशीं जमवून घेण्याचा. ह्या सिद्धान्ताबद्दलच मुळीं हे लोक साशंक असतात. अर्थात् आपल्या समाजाशीं किंवा सभोंवतालच्या वातावरणाशीं जमवून घेणें केव्हांहि चांगलेंच असतें; दैनंदिन सुखाची प्राप्ति करून घेण्यासाठीं तसें करणें आवश्यक असतें, हेंदेखील ते कबूल करतात. परंतु हे लोक अशी शंका काढतात कीं, माणसाच्या ऐहिकजीवनाचे हेतु काय तेवढ्यानें स्पष्ट होऊं शकतील का ? काहीं मूल्यें अशीं असूं शकणार नाहींत का कीं, जीं इतरांबरोबर जमवून घ्यायला तयार होणार नाहींत ? किंवा जमवून घेण्याच्या प्रक्रियेंत दुबळीं किंवा अजिबात नष्ट होऊन जातील ?

परिस्थितीशीं नुसतें जुळतें घेण्यास शिकलेला सैनिक गोळीबार होत असतांनादेखील आपली कामगिरी उत्कृष्टपणें बजावूं शकतो. परंतु कांहीं माणसें अशींहि असतात कीं, आंतरिक मूल्यामुळें तीं याहूनहि आश्चर्यकारक गोष्टी करून दाखवूं शकतात— आणि अशाच माणसांचा आपण गौरव करतों. आपण ज्यावेळीं सैनिकाचा सन्मान करतों; त्यावेळीं परिस्थितीशीं

तादात्म्य पावण्याच्या त्याच्या गुणाची आपण वाहवा करीत नसतों तर तो परिस्थितीनुरूप वागत नाहीं–बाह्य परिस्थितीशीं जुळतें घेण्याचें तो नाकारतो—म्हणून आपण त्याचें कौतुक करतों आणि सैनिकाच्या अंगच्या धैर्य या गुणाप्रमाणेंच इतर सर्व गुणांनाहि हें लागू आहे. जगांतील सर्व मोठ्या व्यक्तींनीं आपआपल्या अंतःप्रेरणेनुसार आपल्या सभोंवतालच्या परिस्थितीशीं किंवा समाजाशीं दोन हात करण्याचें असेंच धैर्य दाखविलें आहे. असें करणें हा खरोखरी गुण आहे कीं नाहीं आणि त्याहिपुढें जाऊन गुण अशी कांहीं चीज तरी अस्तित्वांत असते का असले प्रश्न मानसोपचारतज्ञ विचारांत घेत नाहींत. कारण त्यामुळें ते मांडीत असलेल्या सिद्धांताला कदाचित् बाध यावयाचा. त्यामुळेंच आंतरिक जीवनांतील वास्तवतेचें स्वरूप समजावून घेण्याचा प्रयत्न करणारीं सर्वसामान्य माणसें—मग त्यांचा तो प्रयत्न जाणीवपूर्वक केलेला असो वा नसो सध्यां प्रचलित असलेल्या शास्त्रीय दृष्टिकोणामुळें गोंधळून जातात. ज्यांना आंतरिक जीवनांतील खोल सत्याचें आकलन करून घ्यावयाचें असेल, मानवाला प्रतिष्ठा आहे किंबहुना एकप्रकारचें पावित्र्य आहे असें ज्यांना जाणवलें असेल आणि त्या जाणीवेची गुणात्मक संगति लावावयाची असेल किंवा तींत आशय ओतावयाचा असेल त्यांनीं त्यासाठीं अन्य मार्ग शोधला पाहिजे.

या लक्षावधि लोकांना असा मार्ग दाखवून देण्याच्या कामीं अमेरिकन तत्त्वज्ञान सर्वस्वीं अपेशी ठरलें असून त्यामुळेंच कम्युनिझमविरोधी लढ्यांतहि तें अपेशी ठरत आहे. अर्थात् हें कार्य सोपें आहे असें कोणीच म्हणणार नाहीं त्यासाठीं आजपर्यंत न सांपडलेला असा संशोधनाचा एखादा नवा मार्ग शोधून काढावा लागेल. परंतु हा नवा मार्ग–मग तो कोणताहि असो–अमेरिकेच्या आशावादी परंपरांतील बालिश फुटकळ सिद्धांतांतून निघूं शकणार नाहीं अशी आधीं खात्री बाळगली पाहिजे. जोंपर्यंत ती आशावादी परंपरा आपल्या विचारसरणीवर प्रभुत्व गाजवून इतर विचारसरणींचा आपल्याला अंगीकारच करूं देत नाहीं, तोंपर्यंत 'विरोधविकासी मानवा' संबंधींच्या कल्पनांवर मात करणें आपल्याला शक्य होणार नाहीं.

* * *

## २ : स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर

मानवी जाणिवेचीं दोन प्रमुख अंगें आणि त्यांचे परस्परसंबंध समजावून घेत असतांना अखेर आपल्याला सत्यसंशोधनासंबंधींच्या वास्तव स्वरूपाची कांहींशीं कल्पना आली. सत्यसंशोधनाचें हें कार्य जाणीवेच्या अंतर्मुख किंवा बहिर्मुख अशा कोणत्याहि एकाच अंगापुरतें मर्यादित ठेवूं तर, आपलें निष्कर्ष चुकीचे निघाल्यावांचून राहाणार नाहींत. कारण, आपण वर पाहिल्या-प्रमाणें बहिर्मुख जाणीवेचा संबंध फक्त बाह्य जगाशींच पोंहोचूं शकतो. तें जग आभासात्मक असतें आणि त्यांतील आंतरिक तत्त्व सदैव अज्ञातच राहतें. त्याचप्रमाणें अंतर्मुख जाणीवेमुळें मनाचा गोंधळ उडून जातो. आणि त्यांतून ज्या विसंगति निर्माण होतात, त्या बाह्य कसोट्या लावून पाहिल्या-शिवाय दूर होऊं शकत नाहींत. म्हणून सत्याच्या शोधाचा मार्ग या दोहींच्या समन्वयांत असला पाहिजे.

आपल्या आंतरिक जगांतील शक्ति आपल्या भोंवतालच्या जगांतील घटनांचें— त्यांच्या आंत शिरून आंतून— खरोखरीच आकलन करूं शकत असतील तर, मानवासंबंधींच्या आपल्या दृष्टिकोणांत आमूलाग्र फरक पडतो. न्यूटनच्या यंत्रशास्त्राच्या सिद्धांतावर आधारलेल्या त्रिपरिमाणात्मक जगांत राहणारा आणि जागृत जाणीवेच्या क्षितिजांत वावरणारा, ही जी मानवासंबंधींची एकोणिसाव्या शतकांतील कल्पना होती, तिला त्यामुळें चांगलाच धक्का बसतो, एवढेंच नव्हे तर, मानवासंबंधींचा रूढ भौतिक दृष्टि-कोणदेखील ढांसळून पडतो. माणसाच्या आंतरिक जगांतल्या शक्ति जर जाणीवेच्या मध्यस्थीवांचून बाह्य परिस्थितींचें आकलन करूं शकत असतील तर, आंतरिक जग आणि बाह्य जग ह्यांना निगडित करणारे कांहीं दुवे आहेत, हें मान्य करावें लागेल. हे दुवे कशा प्रकारचे आंहेत ह्याची सविस्तर चर्चा आपल्याला ह्या ठिकाणीं करतां येणार नाहीं, परंतु इतकें मात्र खरें कीं, तें भौतिक किंवा शास्त्रीय स्वरूपाचे आहेत असें म्हणून भागणार नाहीं. हवें तर ते "मानसिक" आहेत, असें म्हणूं या. पण 'मानसिक' या शब्दाची व्याख्या करणें आपल्याला कठिण जाईल. हे दुवे काय आहेत, हें आपल्याला माहीत नाहीं. कारण ते आपल्या जाणीवेच्या आवांक्या-

पलीकडे आहेत. पण आपल्याला ते माहीत नाहींत म्हणून त्यांचें अस्तित्व अजिबात नाकारणें योग्य ठरणार नाहीं. उलट सत्याचे शोधक ह्या नात्यानें त्यांचें अस्तित्व दुर्लक्षून आपल्याला चालणार नाहीं.

अर्थातच मग हे संबंध जोडणारे दुवे हुडकून काढणें हा सत्यशोधनाचाच एक अनिवार्य भाग होऊन बसतो. 'सत्य म्हणजे काय?' हा तत्त्वज्ञानांतील सर्वांत कूट प्रश्न आहे. आपण येथें त्या प्रश्नाचें उत्तर देण्याचा प्रयत्न करीत नाहीं. मात्र, आपण असें म्हणतों कीं, सत्याशीं संबंध जोडल्यावांचून माणूस स्वतंत्र होऊं शकणार नाहीं. म्हणजे आपण अगदीं निराळ्या मार्गानें परंतु, सेंट जॉनच्या, "तुम्ही सत्याचें आकलन करून घ्या म्हणजे, सत्य तुम्हांला स्वतंत्र करील" या सुप्रसिद्ध वचनाशीं येऊन ठेपतों. केवळ राजकीय सिद्धांतांच्या वादंगांत न शिरतां स्वातंत्र्य म्हणजे काय, हें समजावून घेण्याचा जो कोणी प्रयत्न करील, त्याचा वरील वचनाशीं संबंध आल्या-वांचून राहणार नाहीं. जो कोणी ह्या वचनाचें मोकळ्या मनानें चिंतन करील त्याला आधुनिक जगासंबंधीं कांहीं आंतरिक अनुभवांची प्राचीति येऊं लागेल. आजच्या काळच्या प्रश्नाचें स्वरूप त्याला नव्यानें उमगूं लागेल. आणि स्वतःची समाजाची उद्दिष्टेंहि पण त्याला नव्यानें निश्चित करतां येतील.

जीवनांत निर्माण झालेल्या एखाद्या संघर्षाचें उदाहरण घेऊं या. कल्पना करा कीं, एकत्र धंदा करणाऱ्या दोन भागीदारांत एखाद्या व्यवहारावरून मतभेद उत्पन्न झाले आहेत. जोंपर्यंत ते मतभेद चालू राहतील, तोंपर्यंत धंद्यावर त्याचा अनिष्ट परिणाम होत राहील. शिवाय, प्रत्येकाच्या स्वातंत्र्यावर बंधनें पडतील. आणि दोघांच्याहि मनांत वैफल्याची भावना निर्माण होईल. त्यांच्यांत निर्माण झालेला हा संघर्ष कसा मिटूं शकेल? धंद्यासंबंधींची खरी परिस्थिति सत्य शोधून काढलें तरच ती मिटूं शकेल. कदाचित् त्यांना तें सत्य सांपडणार नाहीं. परंतु तें हुडकण्याचा त्यांच्या प्रयत्नांतच एवढें सामर्थ्य असेल कीं, त्यामुळें परिस्थितीला संपूर्ण कलाटणी मिळेल. कारण, ज्याअर्थीं सत्य म्हणून कांहींतरी आहे, हें मुळीं ते कबूलच करतात. त्या ठिकाणीं सत्य म्हणजे त्यांच्या संयुक्त धंद्यासंबंधींची खरी परिस्थिति— ती त्यांच्या वैयक्तिक मतापेक्षां फार निराळी असते— आणि एकदां हें दोघांनीं मान्य केलें म्हणजे मग धुसफूस, दमदाटी याला अवसर

राहात नाहीं आणि धंद्याच्या दृष्टीनें काय करणें उचित ठरेल, याचा दोघेहि शांतपणें विचार करूं लागतात. त्यामुळें त्यांचे परस्परसंबंध सुधारून धंद्यालाहि बरकत येऊं लागते. मात्र त्यासाठीं त्यांनीं सत्याचें अस्तित्व आधीं मान्य केलें पाहिजे.

हें उदाहरण अगदीं क्षुल्लक असेल, तरी त्यामागील तत्त्व व्यापक आहे. सत्यशोधनांत सत्याचें अस्तित्व आधीं गृहीत धरलेलें असतें. त्यामुळें त्यांतून नवा प्रकाश दिसूं लागतो. आणि या प्रकाशाच्या आधारेंच आपण स्वातंत्र्यासंबंधीं कांहींतरी बोलूं शकतों. विकार आणि लालसा यांनीं प्रभावी झालेल्या खास व्यक्तिगत जीवनांत स्वातंत्र्य आढळूं शकणार नाहीं. तेथें स्वातंत्र्याचा केवळ आभास असतो. वर दिलेल्या उदाहरणांत सत्यशोधनाला सुरवात करण्यापूर्वीं दोघेहि भागीदार स्वातंत्र्य उपभोगूं शकत होते, पण तें स्वातंत्र्य केवळ स्वतःचा आणि धंद्याचा विनाश ओढवून घेण्याचेंच होतें. माणूस ज्यावेळीं भोंवतालच्या जगाशीं संबंध प्रस्थापित करतो, त्याचवेळीं खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याची शक्यता निर्माण होते, असें आपणांस म्हणतां येईल. हे संबंध कोणत्याहि तात्त्विक विचारांतून निर्माण झालेले नसतात; सत्याच्या संशोधनांतूनच ते निर्माण झालेले असतात. कोठल्याहि एखाद्या घटनेसंबंधीचें, समस्येसंबंधींचें किंवा परिस्थितीसंबंधीचें सत्य हुडकून काढण्याचा प्रयत्न करूं लागतांच, माणूस आणि भोंवतालचें जग ह्यांत एक-प्रकारचें नातें निर्माण होतें. मग तें नातें किती का सूक्ष्म असेना, त्यांच्या या परस्पर संबंधांतच स्वातंत्र्याची शक्यता संभवते.

वस्तुस्थिति अशी असते कीं, ज्यावेळीं आपण मानवी स्वातंत्र्यासंबंधीं बोलत असतों, त्यावेळीं आपल्या मनांत कांहींतरी अगदीं असामान्य अशी कल्पना असते. आपण ज्याला मानवी स्वातंत्र्य असें म्हणत असतो तें बाह्य नैसर्गिक जगांत सांपडूं शकत नाहीं. सृष्टींतल्या घटना एका अर्थानें स्वतंत्र म्हणतां येतील, पण आपण जो अर्थ समजतों, त्या अर्थानें नाहीं.

मानवी स्वातंत्र्यासंबंधींच्या आपल्या मनांतल्या अर्थाची छाननी करूं लागलों तर आपणाला असें दिसून येतें कीं, बाह्य अर्थानें तो शब्द वापरल्यानें त्याचा आशय नीट स्पष्ट होत नाहीं. आपण असें म्हणतों कीं, हवा ही स्वतंत्र आहे, पण आपली ही नुसती बोलायची रीत झाली. आपण हें

संग्रहालय,
दि.

जाणून असतों कीं, केवळ वरवर पाहतां ती स्वतंत्र आहे, असें वाटलें तरी तो कार्यकारण नियमानें बांधलेला आहे किंवा हरिण स्वतंत्र आहे असें आपण म्हणतों तेव्हां बाह्य अर्थानें तें खरें असलें तरी तीं निसर्गाच्या नियमांनीं बांधलेली आहे हें आपल्याला माहीत असतें. " माणूस हा त्याच्या नैसर्गिक अवस्थेंत स्वतंत्र असतो. " हा रूसोचा सिद्धांत प्रत्यक्ष वस्तुस्थितीच्या अगदीं विरुद्ध आहे. नेमका नैसर्गिक अवस्थेंतच माणूस स्वतंत्र नसतो, तर उलट तेथें तो निसर्गानियमांनीं जखडलेला असतो आणि त्याला त्याचें उल्लंघन करतां येत नाहीं. त्याचें अस्तित्वच त्या नियमांची अंमलबजावणी करण्यावर अवलंबून असतें. निसर्ग आणि भौतिक जग यांपासून माणूस ज्याप्रमाणांत स्वतःची सुटका करून घेईल त्याप्रमाणांतच स्वातंत्र्यविषयक कल्पनेचा उदय होऊं शकेल.

" स्वतंत्र " या शब्दाच्या मूळ अर्थाचा विचार केला तर, मानवी स्वातंत्र्यासंबंधींच्या आपल्या कल्पना अधिक स्पष्ट होऊं शकतील. आपल्या या भौतिक जगांत आपली दृष्टि अतिशय बहिर्मुख झालेली असल्याकारणानें शब्दाचा मूळ अर्थ आपण पार विसरून गेलों आहोंत. ' प्रियो ' या प्राचीन आर्य शब्दावरून आणि ' प्रिय ' या संस्कृत शब्दांवरून ' फ्री ' हा शब्द आला आहे. प्रिय या संस्कृत शब्दांतील मूळ धातु प्री. प्री म्हणजे आनंद होणें ' किंवा ' प्रिय होणें. ' प्राचीन भाषेंत हा शब्द ' फ्रेऑन ' झाला त्याचा अर्थ ' प्रेम करणें ' असा आहे. फ्री ( स्वतंत्र ) आणि फ्रेंड ( मित्र ) या शब्दांतील मूळ धातु एकच आहे. रक्तसंबंधाच्या नात्यानें कुटुंब–प्रमुखाशीं जोडल्या गेलेल्या सर्वांना याच अर्थानें ' फ्रेंड ' किंवा ' मित्र ' असत, ते गुलाम किंवा दुसऱ्या टोळींतले परके नाहींत हें त्या शब्दावरून ध्वनित होत असे. आपल्याला एखादी व्यक्ति विशेष आहे असें दाखविण्यासाठीं ' फ्री ' ( ' स्वतंत्र ' ह्या शब्दाचा केला गेलेला हा आर्यन किंवा गोथिक प्रयोग ज्यावेळीं आपण पाहतों तेव्हां माणसांमाणसांत एक नातें निर्माण होतांना आपल्याला दिसतें. ह्या नात्याची जर माणसांना जाणीव झाली तर आजपर्यंत आपल्याला माहीत असलेल्या मानवी समाजापेक्षां एक वेगळाच समाज अस्तित्वांत येईल.

* * *

## ३ : : बंधुभावाचें स्थान

दुसऱ्या जागतिक युद्धांत लाल सेनेचें उद्देश्य स्वातंत्र्य आणि बंधुता हें होतें असें एका रशियन अधिकाऱ्यानें विधान केलें होतें. तियपासून आपण आपल्या विवेचनास आरंभ केला. या विवेचनाच्या ओघांत आपल्याला असें आढळून आलें कीं, कम्युनिस्टांबरोबर आपला जो संघर्ष चालला आहे तो केवळ लष्करी व राजनैतिक स्वरूपाचा नाहीं तर दोन तात्त्विक भूमिकांमधला संघर्ष आहे आणि त्यावर स्वातंत्र्याचें अस्तित्व अवलंबून आहे. परंतु जर आपणाला संपूर्ण विनाश ओढवून घ्यावयाचा नसेल तर या संघर्षाकडे आपल्याला संकुचित आणि पंथनिष्ठ दृष्टीनें पाहून चालणार नाहीं. सत्यसंशोधनाचें मूळ तत्त्वच या संघर्षांत धसाला लागलेलें आहे आणि आजचें महत्त्वाचें कार्य जर कोणतें असेल तर तें हेंच कीं, स्वातंत्र्याच्या उपासकांना सर्व क्षेत्रांत एक नवी दृष्टि उपलब्ध करून द्यावयाची. मानवासंबंधींच्या आपल्या कल्पनेंत जर सत्याच्या अस्तित्वावरची श्रद्धा समाविष्ट असेल तर संघर्षाचें स्वरूपच पालटून जातें. मानवासंबंधींचें कम्युनिस्टांचें ध्येय अधिक सामर्थ्यशील आहे कीं आपलें हा प्रश्न मनांत येण्याऐवजीं कोणाचें ध्येय सत्याच्या अधिक जवळचें आहे ? असा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. आणि या प्रश्नांचें उत्तर शस्त्रास्त्रांच्या खणखणाटांतून मिळणार नाहीं, तर त्यासाठीं मानवाच्या मनांत आणि अंतःकरणांत डोकवावें लागेल.

अमेरिकेंतील निसर्गवादी तत्त्वज्ञ आणि समाजवादी लोकशाहीचे पुरस्कर्ते सिडनेहूक यांनीं १९४० सालीं लिहिलेल्या एका पुस्तकांत वरील रशियन अधिकाऱ्याच्या विधानाचा अर्थ सांपडतो. सिडनेहूक म्हणतात कीं, मार्क्सनें " मानवता, " " न्याय, " " बंधुभाव " यांसारख्या अमूर्त कल्पनांत भौतिक आशय ओतण्याचा प्रयत्न केला. आणि हें मार्क्सवादाशीं अगदीं सुसंगत आहे. कारण मार्क्सवादाची अशीच धारणा आहे कीं, जें जें म्हणून वास्तव असेल त्याचा आशय भौतिक किंवा जडच असला पाहिजे. पण हें विधान किती चुकीचें आहे तें सहज लक्षांत येईल. आपण " बंधुभावा "चेंच उदाहरण घेऊं. " बंधुभाव " ही नुसती अमूर्त कल्पना नसून ती भौतिक वास्तवता आहे असें कल्पूं या. मग बंधुभाव म्हणजे काय ? आणि त्यांतील

भौतिक किंवा जड आशय म्हणजे काय? एक माणूस दुसऱ्याचा भाऊ असतो म्हणजे काय असतें? या ठिकाणीं मार्क्सवाद्यांना समान मातृपितृत्व किंवा रयतसंबंध खासच अभिप्रेत नाहींत—अर्थात ते संबंध तरी केवळ भौतिकवादी दृष्टीनें सिद्ध करून दाखवितां येतील किंवा नाहीं, हा प्रश्नच आहे. मार्क्सवादी बंधुभावाचा उल्लेख करतात त्यावेळीं त्यांना सामाजिक बंधुभाव अभिप्रेत असतो. आणि या सामाजिक बंधुभावाच्या कल्पनेला भौतिक आशयाची आपणाला जोड द्यावयाची आहे. परंतु तसा प्रयत्न करूं लागतांच आपल्या दृष्टोत्पत्तीस येतें कीं, आपल्याला हवा असलेला आशय पुरवूं शकेल असें भौतिक जगांत कांहींहि नाहीं. बंधुभाव म्हणजे संपत्ति नव्हे किंवा तिचें वाटप म्हणजेहि बंधुभाव नव्हे. उत्पादनसाधनांवरील सामुदायिक मालकीलाहि बंधुभाव म्हणतां येणार नाहीं. संपत्ति आणि उत्पादन यांची विशिष्ट व्यवस्था केली तर सामाजिक बंधुभाव निर्माण होऊन तो वाढीला लागण्यास मदत होऊ शकेल. पण केवळ ती व्यवस्था म्हणजे अर्थातच बंधुभाव ठरूं शकणार नाहीं. म्हणजेच संपत्ति किंवा उत्पादन बंधुभावाला कोठलाहि आशय पुरवूं शकत नाहीं. आर्थिक व्यवस्थेप्रमाणें राजकीय व्यवस्थेसंबंधींहि तसेंच म्हणतां येईल. बंधुभावाचा कांहीं कायदा करतां येणार नाहीं किंवा तो यंत्रावर तयारहि करतां येणार नाहीं.

सामाजिक बंधुभावनेसंबंधीं, तिचा अर्थ सहज समजूं शकेल अशा भाषेंत बोलावयाचें असेल तर सिडनेहूक यांनीं दुसऱ्या एका ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें "ज्याचें पृथक्करण करतां येत नाहीं अशा अमूर्त धुक्याच्या वातावरणांतून तिला बाहेर आणलें पाहिजे. तिला आशयाची जोड दिली पाहिजे. पण तरी आपल्याला तिला भौतिक आशय देतां येणार नाहीं. कारण बंधुभाव हा मानवी अनुभूतीचा एक प्रकार आहे. जडवस्तूच्या संदर्भांत त्याची व्याख्या कशी करतां येईल? वस्तुतः जडवस्तु किंवा त्यासंबंधीचें नियम यांतून उदित झालेली मुळीं ती कल्पनाच नव्हे. जडवस्तु, बंधुभाव वगैरें कांहीं जाणत नाहीं. आणि आपणहि एखादी भौतिक घटना बंधुभावनिदर्शक आहे असें कधीं म्हणत नाहीं. बंधुभाव ही अशी वस्तु आहे कीं, जिची जाणीव आणि अनुभूति अंतर्यामींच होऊं शकते. ती आंतरिक जगांतील बाब असल्याकारणानें अध्यात्मिक दृष्ट्याच तिच्यांतील आशय समजून

घेतला पाहिजे. आध्यात्मिक ज्ञान हें प्रत्यक्ष आणि प्रत्ययात्मक असतें. भूमितींतील एखाद्या प्रमेयाप्रमाणें तें सिद्ध करून दाखवितां येणार नाहीं. परंतु ज्यांना ज्यांना त्याची अनुभूति प्राप्त झालेली आहे, ते सर्वजण असा निर्वाळा देतील कीं, भौतिक जगांतील एखाद्या घटनेइतकेंच तेंहि वास्तव आहे. स्वातंत्र्याबद्दलदेखील नेमकें असेंच म्हणतां येईल. स्वातंत्र्य ही देखील आध्यात्मिक वास्तवता आहे—आंतरिक जगांतील आध्यात्मिक वस्तुस्थिति असें वाटलें तर म्हणूं या.

नेहमींच्या संकेतबद्ध आधुनिक जीवनाच्या बुडाशीं फार मोठा आध्यात्मिक असंतोष धुमसत असतो. आजच्या काळांत माणसांवर दडपणांचें जें प्रचंड ओझें पडत आहे, त्यामुळें तीं अधिकाधिक अंतर्मुख बनत आहेत. आणि त्या आंतरिक जगांत त्यांना काय आढळून येत आहे ? तिथें त्यांना दुसऱ्याच स्त्रीपुरुषांचें दर्शन होतें. अर्थात् आपल्यापैकीं प्रत्येकजण स्वार्थी आहे. आणि जो तो स्वतःच्या गरजा प्रथम कशा पुऱ्या होतील तें पाहात असतो. परंतु आपल्याला असें दिसून येतें कीं, स्वार्थीपणा किंवा स्वयंकेंद्रित वृत्ति ही माणसाची एक बाजू झाली. त्यापलीकडचा मानव हा खरोखरीचा आध्यात्मिक प्रवृत्तींचा असून इतर स्त्रीपुरुषांशीं तो आत्मियतेनें जोडलेला असतो. आणि आपल्या अंतर्यामींच्या या वास्तव 'मी' ची विश्वाशीं असलेली एकात्मकता, जर स्वतःशीं प्रतारणा करावयाची नसेल तर, प्रयत्न करूनहि आपण विसरूं शकणार नाहीं.

या आंतरिक ज्ञानसिद्धीचे परिणाम हळूहळू घडून येत असतात. आणि त्यांत निश्चितता, ठामपणा नसतो. आपल्यापैकीं कित्येक जण तर असे परिणाम घडून येतात हें मान्य करावयासहि तयार नसतात. कारण बाह्य जगाचें फार मोठें दडपण आपल्यावर पडत असतें. तरीदेखील सूक्ष्म निरिक्षण करणाराला बाह्य जगांत घडून येणारे कांहीं बदल दिसून आल्याशिवाय राहाणार नाहींत. याचा अर्थ असा नव्हे कीं, आपल्यांतील स्वार्थी वृत्ति लोप पावली आहे. परंतु आपणां सर्वांत एक नवी सामाजिक जाणीव निर्माण होत आहे. आपल्यापैकीं प्रत्येकाची अशी खात्री पटूं लागली आहे कीं, स्वतःचें हित साधावयाचें असेल तर आपण इतरांचेंहि हित साधलें

पाहिजे. आणि मानवासंबंधींचें हें एक मूलभूत सत्य असल्यामुळें स्वातंत्र्याच्या बाबतींतहि तें तसेंच मूलभूत सत्य आहे.

थोडक्यांत सांगायचें तर, स्वातंत्र्य म्हणजे बंधुभाव हें समीकरण ‘ विरोध-विकासी ’ मानवाला, मान्य होईल असें नाहीं. कारण त्याचें तत्त्वज्ञान फार निराळ्या स्वरूपाचें आहे. स्वतंत्र मानवाला मात्र हें समीकरणाच्या अनुरोधानेंच आपण व्यक्तिहित आणि समाजहित यांचा समन्वय साधूं शकूं त्यासाठीं आपल्याला ज्याला सामाजिक किंवा सामाजीकरण केलेली व्यक्ति असें म्हणतां येईल, तिचा विकास घडवून आणावा लागेल. ही कल्पना आणि सामाजिक किंवा सामाजीकरण झालेली राज्यसंस्था यांतील फरक लक्षांत ठेवण्याजोगा आहे. आतांपर्यंत कधीं केला गेला नसेल इतका बहिर्मुख वृत्तीचा अवलंब करून मनुष्य समाजीकृत राज्यसंस्थेपर्यंत येऊन पोंचला आहे. समाजीकृत म्हणजेच सामाजिक व्यक्ति निर्माण करण्यासाठीं आपल्याला अंतर्मुख दृष्टि स्वीकारून अंतर्यामांत आंतपर्यंत जाऊन भिडावें लागेल. तेथें आपल्याला दिसून येईल कीं, प्रत्येक मानवाच्या अंतरात्म्यांत वसत असलेला ‘ मी ’ पृथ्वीवरील इतर सर्वांच्या अंतरात्म्यांतील ‘ मी ’ मध्यें स्वतःलाच पाहात असतो. आणि या आध्यात्मिक बंधुभावाची एकदां ओळख पटली म्हणजे मग आपल्याला स्वातंत्र्याचा अर्थ आणि त्या मागील हेतु यांचें आकलन होऊं शकेल.

* * *

## ४ : : पायथ्याच्या पुढें

पाश्चात्यांनीं आणि त्यांतल्या त्यांत अमेरिकनांनीं वस्तुमात्रासंबंधीचा विचार करण्याचें तंत्र कमालीच्या विकसितावस्थेप्रत नेलें आहे, परंतु सचेतना-संबंधीं विचार करण्याच्या तंत्रांत मात्र त्यांनीं फारशी प्रगती केलेली नाहीं. आणि तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें तर त्याकडे त्यांनीं दुर्लक्षच केलें आहे. अचेतन वस्तुविषयींच्या विचाराचें एक वैशिष्ट्य असें असतें कीं, त्या वस्तूचें निरिक्षण

करणारी व्यक्ति त्या वस्तूंपासून अलिप्त राहून विचार करीत असते. उलट सचेतन वस्तूंचा विचार करतांना निरीक्षक प्रत्यय शक्तीच्या साहाय्यानें त्या वस्तूंत प्रत्यक्ष प्रवेश करतो. तो स्वतः ती वस्तु होतो. तो तिच्या अंतरंगांतून त्या वस्तूचें आकलन करून घेतो आणि तेथूनच त्या वस्तूसंबंधींच्या सत्याचें त्याला साक्षात् आकलन होतें. या पुस्तकांतील मुख्य प्रतिपादन हें आहे कीं, विचाराची ही पद्धत समजून घेतल्यावांचून स्वातंत्र्याचें संपूर्ण आकलन होऊं शकणार नाहीं.

जीवनाच्या द्वारांच माणसाला ईश्वरापर्यंत पोहोंचतां येतें. ईश्वर जर असेल तर तो सजीवच असला पाहिजे. त्यामुळें मोटारच्या एंजिनाला ज्याप्रमाणें आपण प्रेम किंवा द्वेष असले गुणावगुण चिकटवीत नाहीं, त्याचप्रमाणें ईश्वराचा विचार करतांना त्याचें अस्तित्व कोणत्याहि वस्तूच्या संदर्भात दाखवून देतां येणार नाहीं, त्याचप्रमाणें 'वस्तु' विषयीं विचार करणारे शास्त्रज्ञ ज्यावेळीं ईश्वर अशी कांहीं "वस्तु" असूंच शकत नाहीं असें म्हणतात, त्यावेळीं त्यांचेंदेखील आपल्याला आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं, कारण खरोखरच ईश्वर ही कांहीं एखादी वस्तु नाहीं! येशू ख्रिस्तानें एका स्त्रीला सांगितल्याप्रमाणें ईश्वर चैतन्यरूप आहे आणि चैतन्य या शब्दाला कांहीं अर्थ असेल तर ईश्वर सजीव असला पाहिजे. म्हणून ज्यांना केवळ वस्तुमात्राचा विचार करण्याचें तेवढेंच तंत्र माहीत आहे आणि त्याचाच जे उपयोग करतात त्यांना, स्वतःशीं प्रामाणिक राहावयाचें तर, ईश्वर नाहीं या निर्णयाप्रत येणें भागच आहे. त्यांची विचारसरणी अगदीं निर्दोष आहे आणि वस्तूसंबंधीं विचार करण्याचीं तंत्रें हींच काय तीं निर्दोष आणि विश्वासार्ह असूं शकतात. ही त्याची या विचारसरणीमागील बैठक (अर्थात् ती अगदीं सुप्त असते) एकदां मान्य केली म्हणजे मग ईश्वरासंबंधींचें त्याचें प्रतिपादन खोडून काढणें अशक्य होऊन बसतें. आधुनिक विज्ञानांतील विश्लेषणात्मक व संख्यात्मक दृष्टीकोणामुळें माणसाला अध्यात्माची ओळख पटणें अशक्य होत नाहीं. कारण अध्यात्म हें नेहमीं गुणात्मक असतें.—तें संख्यात्मक असूंच शकत नाहीं.

पाश्चात्य तत्त्वज्ञानापुढें सध्यां हीच समस्या उभी आहे. या प्रश्नाला तोंड देण्यावांचून तत्त्वज्ञानाला आतां गत्यंतरच उरलेलें नाहीं. कारण, सध्यां

विज्ञानांत जी क्रांति घडून येत आहे, तीच हा प्रश्न सोडवणें तत्त्वज्ञानाला भाग पाडीत आहे. विज्ञानांतील क्रांतीमुळें वस्तूंच्या विचारासंबंधीचीं तंत्रें ज्यासंबंधीं विचार करावयाचा, त्या वस्तूच्या कक्षेच्या कितीतरी पलीकडे जाऊन पोहोंचलीं आहेत. अणूमधल्या पोकळ्या आणि नक्षत्र समूहांमधलीं प्रचंड अंतरें ह्या दोहोंनींहि भौतिक शास्त्रांना अध्यात्माला तोंड देणें भाग पाडलें आहे. परंतु अध्यात्म म्हणजे काय? किंवा त्यासंबंधीचा विचार कसा करावयाचा ह्याची त्यांना कांहींच माहिती नाहीं. अध्यात्म हें त्यांच्या मुठीं-तून निसटून जातें. कारण, त्यांना जी विचारपद्धति अवगत आहे ती अध्यात्माची पकड घेऊं शकत नाहीं. त्यांतून जे प्रश्न निर्माण होतात, ते नैसर्गिक शास्त्रांतील प्रश्न नसतात. त्यांचें स्वरूप तत्त्वज्ञनाविषयक असतें. पण आपल्या काळांतील एक अजब घटना अशी आहे कीं, तत्त्वज्ञाना-पेक्षां शास्त्रज्ञांचेंच लक्ष या प्रश्नांनीं अधिक तीव्रतेनें वेधून घेतलें आहे. तेंच तत्त्ववेत्त्यांवर नव्या कल्पना आणि नवे विचार मांडण्यासाठीं दडपण आणीत आहेत. विज्ञानांत झालेल्या क्रांतीला पूरक होईल अशा तऱ्हेची क्रांति तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांतहि घडून आली पाहिजे. असा लकडा त्यांनीं लावला आहे आणि तत्त्वज्ञानाची आतां त्यापासून सुटका होणें शक्य नाहीं.

या सर्वांचें सार म्हणून शेवटीं आपल्याला थोडक्यांत असें म्हणतां येईल:— अध्यात्माच्या कल्पनेविषयींची ही पोकळी जोंपर्यंत आपण भरून काढूं शकत नाहीं, तोंपर्यंत पाश्चात्य जगाभोंवतीं पसरलेलें अंधाराचें वलय नष्ट होऊं शकणार नाहीं; परंतु झालें आहे मात्र असें कीं, सत्यशोधनाच्या क्षेत्रांतून या अध्यात्माच्या कल्पनेलाच अजिबात फांटा देण्यांत आला आहे सत्य शोधण्या-साठीं आपण वस्तूवस्तूंची तपासणी करतों. गणित, इतिहास, भूगर्भ अशा नाना शास्त्रांची आपण सत्यशोधनासाठीं छाननी करतों. परंतु अध्यात्मांत मात्र आपण सत्याचा शोध घेत नाहीं—फार काय आपण अध्यात्माचा-देखील शोध घेत नाहीं.

आंतरिक जगाचें गूढ उकलण्याचा जो प्रयत्न करतो, त्याच्यापुढें हिमालयासारखीं बर्फाच्छादित उत्तुंग शिखरें उभीं राहतात. त्या शिखरांचा

अंदाज घेणें हें आपलें प्रस्तुत कार्य नाहीं. परंतु ज्या गिर्यारोहकाला त्या शिखरांवर जावयाचें असतें, तो कांहीं शिखराकडे एकदम धांव घेत नाहीं. पायथ्याच्या टेकडीवरून तो आधीं जें निरीक्षण करतो त्यांतून तो आपल्या अंगीकृत कार्यासंबंधींची बरीचशीं माहिती प्राप्त करून घेऊं शकतो. त्या शिखरांवर अद्यापपर्यंत कोणींहि जाऊं शकलेलें नाहीं, असें म्हणून तो आपला प्रयत्न सोडून देत नाहीं, तें शिखर गाठतां येणें शक्य आहे आणि कोणीं ना कोणीं तरी तें गांठेलच, या भरंवशावर तो आपलें अगाकृत कार्य सुरू ठेवतो. माणसाच्या आंतरिक जीवनांतील गूढ देखील असेंच उकलणें शक्य आहे. कोणी ना कोणीतरी तें एक दिवस उकलून दाखवीलच अशी श्रद्धा, या सर्व लिखाणाच्या मागें आहे; आणि हें माझें मत कितीहि विचित्र वाटलें तरी, तें जर पत्करायचें नसेल तर, पाश्चात्य जगांत स्वातंत्र्याचा जो अर्थ लावला जातो किंवा लावला जाण्याची आशा बाळगली जाते, त्या अर्थानें स्वातंत्र्याचा मार्ग सोडूनच देणें योग्य ठरेल.

या आपत्तींतून जर आपल्याला स्वतःची सुटका करून घ्यावयाची असेल तर, स्वतंत्र मानवाचे हक्क मोठ्या धैर्यानें आणि नव्या पद्धतीनें बजावायला आपण सुरवात केली पाहिजे. वैचारिक जगाच्या वास्तवतेसंबंधीं आपल्याला बरोबर आकलन झालें पाहिजे. स्वातंत्र्यासंबंधीं आपण समजतों तेवढें ज्ञान झालेलें असतें तर, वैफल्याच्या भावनेनें आपल्याला इतकें ग्रासलें नसतें.

जीवनांतील मोठमोठीं गूढें उकलण्याचें आधुनिक मानवानें सोडून दिलें आहे, असें आपण वर म्हटलें आहे. हीं गूढें उकलण्याच्या दृष्टीनें त्यानें आपल्या विचाराच्या साहाय्यानें उकललीं पाहिजेत, असें आपणांस म्हणावयाचें आहे काय ? होय, असेंच म्हणावयाचें आहे. परंतु असले गूढ प्रश्न उकलण्याचा प्रश्न येतो, त्यावेळीं ते विचाराच्या कक्षेंत बसत नाहींत, असें सामान्यतः पाश्चात्य लेखक मानतात. अनेकांच्या मतें हा प्रांत धर्माचा आहे. आणि त्यांत श्रद्धा, गूढ, अनुभूति, साक्षात्कार इत्यादि गोष्टी येतात. त्यांचें हें विधान अमान्य करण्याचें कारण नाहीं. पण मग धर्म ही बाब विचाराच्या क्षेत्रांत मोडत नाहीं.

किंवा धर्माला विचाराचें अधिष्ठान नाहीं असें समजावयाचें का ? परंतु, कोणत्याहि धर्मवेत्त्यानें असें सिद्ध करून दाखविलेलें नाहीं. कांहीं प्रॉटेस्टंट ख्रिश्चन धर्मवेत्त्यांनीं धर्माचें आकलन होण्यासाठीं विचाराची आवश्यकता नाहीं, हा सिद्धांत जवळ जवळ मान्य केला आहे. परंतु, ल्यूथर आणि कॅलविन हे या सिद्धांताचे प्रमुख प्रवक्तेच स्वतः थोर विचारवंत होते. आणि त्यांनीं आपले सिद्धांत मांडले ते देखील त्यांच्या विचारशक्तीच्या आधारेंच, हें मात्र ते नाकारूं शकत नाहींत. श्रद्धा आणि विचार यांत भेद आहे, यांत शंकाच नाहीं. परंतु, त्यांचा एकमेकांशीं अजिबात संबंध नाहीं, त्यांचीं क्षेत्रें सर्वस्वी भिन्न आहेत, असें मात्र म्हणतां येणार नाहीं. ख्रिस्ती धर्मात श्रद्धेवर विशेष भर दिलेला असून श्रद्धेवांचून खरेंखुरें ख्रिस्तानुयायी बनतां येणार नाहीं असें मानलें जातें. पण विवेकाशिवाय श्रद्धा संभवत नाहीं. हा थौमिस्ट सिद्धांत कोणीहि खोडून काढूं शकलेलें नाहीं. आणि बौद्ध धर्मासारख्या अधिक प्राचीन धर्मात तर विचार हें धर्मासंबंधीचें ज्ञान प्राप्त करून घेण्याचें एक साधन आहे असेंच मानलें जातें. जीवनांतील गूढ उकलण्यासाठीं विचारशक्तीची मदत घ्यावयास कोणतीहि आडकाठी नाहीं. इतकेंच नव्हे तर, ती टाळण्याचा मार्ग अद्यापपर्यंत कोणत्याहि थोर गूढवाद्यांनीं दाखवून दिलेला नाहीं.

याबाबत अडचण अशी आहे कीं, विचारक्रियेचा आपला मेंदू या इंद्रियाशीं एकरूपतेचा संबंध जोडतो; आणि ती केवळ तार्किक आहे असें मानतो. मूलतः यांत कांहीं चूक आहे असें नाहीं. परंतु, त्याचा परिणाम असा होतो कीं, विचार म्हणजे खरोखर काय, ह्याची यथार्थ कल्पना आपल्याला येत नाहीं. विचारशक्ति आणि मेंदू हीं एकच आहेत असें समजण्यासारखें आहे. तसेंच तार्किक पद्धतीनें विचाराची व्याख्या करणें हें देखील, माणूस म्हणजे केवळ सांगाडा आहे असें मानण्यासारखेंच आहे. विचारशक्ति ही मेंदूपेक्षां आणि तर्कशक्तीपेक्षां कांहींतरी अधिक आहे. तिचा आशय मेंदूच्या पलीकडे जातो आणि तर्काला रूप देतो. माणसाच्या विचारशक्तीनें आजच्या काळांतच नव्हे तर, प्राचीन काळींहि जी भव्य निर्मिति केली आहे, तिचा विचार केला म्हणजे आपला विचारासंबंधींचा दृष्टिकोन किती सांकेतिक आणि संकुचित आहे तें लक्षांत येऊं लागतें. हा दृष्टिकोन

आपण आपलें शास्त्रीय, तांत्रिक आणि औद्योगिक कार्य चांगल्याप्रकारें फलद्रुप व्हावें म्हणून मुद्दाम स्वीकारलेला आहे.

" सत्य जाणून घ्या, म्हणजे तें सत्यच तुम्हांस मुक्त करील ", या वर दिलेल्या सेंट जॉनच्या वचनाचा आपण जसजसा अधिक विचार करूं, तसतसें आपल्या लक्षांत येत जाईल कीं, आपल्या काळांतील सत्यविषयक समस्येचें हेंच खरें रहस्य आहे. आणि म्हणूनच सत्यसंशोधन कितीहि जरी अवघड असलें तरी, तें आपल्याला टाळतां येणार नाहीं. सोव्हिएट युनियन-बरोबर चाललेला संघर्ष असो, दोस्त राष्ट्रांबरोबर चाललेल्या वाटाघाटी असोत, किंवा अंतर्गत व्यवहारासंबंधीं नवें धोरण आंखण्याचा प्रश्न असो, प्रत्येक ठिकाणीं सत्यासंबंधींची ही समस्या आपल्यासमोर उभी ठाकते. पूर्वग्रह आणि भावनात्मक समजुती, दडपण आणणारे गट आणि प्रचार, सत्तास्पर्धा आणि राष्ट्रवाद यांचा अंधःकार आपल्या सभोंवतीं पसरलेला आहे. आणि जेथें दडपणाला प्रतिदडपणानें तोंड द्यावें लागतें, पूर्वग्रहांचा मुकाबला तशाच प्रकारच्या पूर्वग्रहांनीं करावा लागतो, सत्तेशीं सत्तेनें टक्कर द्यावी लागते, आणि कोणीं राष्ट्रवादाचा आश्रय घेतला तर आपल्यालाहि राष्ट्रवादालाच आवाहन करावें लागतें, अशा जगांत स्वातंत्र्याची प्राप्ति कशी होणार ? या जगावर जर आपल्याला प्रकाशझोत टाकतां आला तरच, आज सर्वत्र थैमान घालीत असलेलीं हीं भयानक भूतें आपण घालवून देऊं शकूं आणि हा प्रकाश केवळ सत्याचाच असला पाहिजे.

प्राचीन काळीं तलवार हें विचाराचें प्रतीक समजलें जात असे. मायकेलच्या हातांतील तलवार हें विचार-खड्गच आहे. दोषांचें छेदन करून पापावर विजय मिळविण्याची ताकद त्या खड्गांत होती. आजच्या काळालाही हें प्रतीक छान लागू पडण्यासारखें आहे. पण त्या प्रतीकाचा अर्थ आपल्याला बरोबर समजला आहे, ह्याची खातरी असली पाहिजे. पापाच्या राक्षसाचें निर्दालन करणें त्या खड्गाला कसें साध्य झालें ? सत्याच्या कारणीं तें वापरलें गेलें म्हणूनच. सत्यापरतें अन्य कशासाठींही तें वापरलें गेलें—म्हणजेच सत्यसंशोधनावरून विचलित होऊन इतर बाबींवरच आपले विचार केंद्रित होऊं लागले—तर त्यांतून

भांडणें आणि संघर्ष, हाणामाऱ्या आणि लढाया यांचा उद्‌भव झाल्यावांचून राहणार नाहीं. परंतु मायकेलच्या हातांतील खड्‌ग हें ईश्वरासंबंधींच्या विचारांचें प्रतीक आहे. आणि ईश्वरासंबंधींचे विचार म्हणजे सत्यासंबंधींचेच विचार. म्हणून मायकेलच्या हातांतील दैवी खड्गांत सत्याचेंही सामर्थ्य असतें. कारण सत्यशोधकाच्या पकडीनें तें धरलेलें आहे. आधुनिक मानवाच्या हातांतहि आज खड्‌ग आहे, परंतु त्या खड्गावरची पकड अजून त्याला साधलेली नाहीं. ती त्यानें साधणें आवश्यक आहे.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व.
अनुक्रम 63583 वि: विभाग
दिनांक ... नों. क्र. 23169

REFBK-0010290

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९०२९०
दा. क्र.

मूल्य रु. २=५०


## आमचीं नवीं प्रकाशनें

१. श्रोते हो !

म. म. द. वा. पोतदार यांच्या
साहित्यविषयक भाषणांचा संग्रह

## आगामी

१. निबंध : शास्त्र व कला

डॉ. प्र. न. जोशी

२. माझे समकालीन

ना. न. वि. गाडगीळ

३. ललकार ( बालांसाठीं अभिनय-गीतें )

श्री. द. गो. दसनूरकर

४. पत्रव्यवहार-शास्त्र

अ. ह. लिमये


व्हीनस बुक स्टॉल : पुणें २